ठाण
म. ग्रं. सं
विषय
RFFBK-0013079

# चिंतन आणि चर्चा

ना. बनहट्टी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. १९५८
अनुक्रम ... विं ...
ग्रंथ ... नों. दि. ...

वनहट्टी लेखसंग्रह : ६

श्रीनिवास नारायण बनहट्टी

# चिंतन आणि चर्चा

सुविचार प्रकाशन मंडळ

नागपूर आणि पुणे

RLFBK-0013079

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 23.6.68
ठाणे शाखा

प्रथमावृत्ती, फेब्रुवारी १९६३
सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशक
श्यामकान्त बनहट्टी,
सुविचार प्रकाशन मंडळ,
धनतोली, नागपूर १ व
४६१/४, सदाशिव पेठ, पुणे २

मुद्रक :
श्यामकान्त बनहट्टी,
श्रीनिवास मुद्रणालय,
सुविचार प्रकाशन इमारत,
धनतोली, नागपूर १.

## . . . 'चर्चे'त शिरण्यापूर्वी

प्रा. बनहट्टी यांच्या लेखसंग्रहाचा हा सहावा खंड. यापूर्वी प्रकाशित झालेल्या पाच खंडांचे मराठी वाचकांनी जसे चांगले स्वागत केले तसेच स्वागत या खंडाचेही होईल अशी आशा आहे.

किंबहुना या खंडाचे स्वागत अधिकच आस्थेने व आदराने व्हावे अशी इच्छा आम्ही प्रकट केली तर ती अस्थानी ठरू नये. या खंडाचे महत्त्व काही आगळे आहे. आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या खंडांचे स्वरूप स्थूल मानाने वाङ्मयात्मक आहे. वाङ्मयविवेचक, समालोचक, टीकाकार ही बनहट्टींची भूमिका प्राधान्यत्वेकरून तेथे प्रकट झाली आहे. प्रस्तुतच्या खंडामध्ये त्यांच्या व्यापक लेखनकर्तृत्वाचे आपल्याला दर्शन होते. मानवी जीवनाच्या आणि सामाजिक व्यवहाराच्या अनेक अंगांचा परामर्श घेणारे जे लेखन आजपर्यंत बनहट्टींनी केले त्यातील बऱ्याचशा महत्त्वाच्या लेखांची निवड करून हा संग्रह तयार केला आहे. जीवनाच्या बहुतेक सर्व अंगांचे मूलगामी चिंतन करू शकणारा मराठी समाजातील एक श्रेष्ठ व समर्थ विचारवंत या नात्याने प्रा. बनहट्टी अवतीर्ण झालेले इथे आपल्याला दिसतील.

प्रस्तुत संग्रहातील सर्वांत जुना लेख १९३० मधला, तर सर्वांत अलीकडचा लेख १९६२ मधील आहे. बत्तीस वर्षांच्या दीर्घ कालावधीवर हे लेखन पसरले असल्यामुळेच त्याला एक प्रकारचे उद्बोधकत्व आणि विकासदर्शकत्व

प्राप्त झाले आहे. सामाजिक व्यवहारांना अनुलक्षून लिहिलेले लेख, ते ज्यावेळी लिहिले त्या वेळच्या परिस्थितीस धरून लिहिले असल्यामुळे त्यांना एक प्रकारचे ऐतिहासिक महत्त्व आले आहे. ‘लेखक–प्रकाशक–संबंध’, ‘प्रकाशनव्यवसायाचा प्रश्न’ इत्यादि लेख अशा प्रकारचे होत. याचे स्वरूप आता केवळ ऐतिहासिक होऊन बसले आहे, असे मात्र नव्हे. अशा लेखामध्ये आजही महत्त्वाचे वाटतील असे चिरंतन विचार अनेक ठिकाणी व्यक्त झालेले आढळतील. शिवाय ज्या काळातली परिस्थिति या लेखात चित्रित झाली आहे, तो अगदी निकटचा असल्यामुळे तत्कालीन प्रश्नासंबंधी लेखकांनी जे विवेचन व मार्गदर्शन केले ते किती उपयोगी पडले व त्यासंबंधात कशी प्रगती घडून आली हे वाचकास आजमावता येईल आणि लेखकाच्या दूरदर्शी विचारसामर्थ्याचा प्रत्यय येईल.

काही लेख त्या त्या काळी गाजले व चर्चाविषय झाले. ‘लेखक–प्रकाशक–संबंध’ आणि ‘वैचारिक नेतृत्वाची अभावलापिका’ या दोहोंवर अनुक्रमे प्रतिभा व केसरी यामधून उलटसुलट चर्चा झाली होती. पण खरा गाजला ‘महाराष्ट्राचे केन्द्र’ हा लेख. यात मोठ्या माणसाशी सामना होता. तथापि समाजहितास्तव आपणास जे सत्य वाटते ते सांगण्याचा बाणा त्यांनी सोडला नाही. निंदानालस्तीमुळे, कुचेष्टेमुळे आपली साम्यावस्था ढळू न देता प्रसन्नपणाने आणि तर्कशुद्ध युक्तिवादाने त्यांनी या विषयाच्या चर्चेला जे उत्तर दिले ते ‘महाराष्ट्राचे केन्द्र मुंबई हेच’ या मथळ्याखाली प्रस्तुत संग्रहात समाविष्ट केले आहे.

मार्मिक वाचकांना लेखकाचे द्रष्टेपण इथे दिसून येईल. संयुक्त महाराष्ट्राच्या एकंदर चळवळीत मुंबईकरिता जे महासंगर झाले त्याचा तत्त्वोपन्यास वीस वर्षांपूर्वी या लेखात सुंदर रीतीने झाला होता, हे त्याच्या प्रत्ययास येईल. असेच द्रष्टेपण ‘जागृत गोमन्तक’ या लेखात प्रकट झाले आहे. गोव्यासंबंधाने सध्या जी तणातणी चालली आहे, तिच्यात सत्याचा प्रकाशझोत टाकणारी अनेक विधाने पंचवीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या या लेखात आढळतील.

त्या त्या काळच्या परिस्थितीला अनुलक्षून लिहिलेल्या लेखाप्रमाणे, जीवनातील चिरंतन मूल्याचा विचार करणारे परिस्थितिनिरपेक्ष लेखही प्रस्तुत संग्रहात समाविष्ट झाले आहेत. पहिला, चौथा व तेरावा हे लेख अशापैकी होत. यात लेखकाची गाढ चिंतनशीलता व्यक्त झाली आहे.

प्रस्तुत संग्रहाच्या आणखी एक विशेष आहे. आतापर्यंतच्या पाच खंडामध्ये ते ते लेख मुळात जसे लिहिले गेले तसेच समाविष्ट करण्यात आले होते. या खंडात घेतलेले लेख लेखकानी स्वतः तपासून दिले आहेत. आता त्यांचे स्वारस्य नाहीसे झाले आहे असे केवळ तात्कालिक घटनांचे व व्यक्तींचे उल्लेख वगैरे निरुपयोगी मजकूर गाळला आहे. उलट चौथ्या लेखाचा उत्तरार्ध लेखकांनी या खंडाकरिता मुद्दाम लिहिला आहे. या परिष्करणामुळे या खंडातील लेख अधिक वाचनीय झाले आहेत. वाचकाकडून त्यांचे स्वागत अधिकतर प्रेमाने केले जाईल असा विश्वास आहे.

मराठी साहित्य महामंडळाने पुरस्कारिलेल्या मराठी लेखननियमाप्रमाणे प्रस्तुत पुस्तक छापले आहे. नजरचुकीने काही अशुद्धे राहिली ती 'शुद्धिपत्रा'त दिली आहेत. त्यांवरून मजकूर प्रथम दुरुस्त करून घ्यावा अशी विनती आहे.

—प्रकाशक

मराठी

अनुक्रम

क्रमांक

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३० | २ | गाडाने | गाडीने |
| ३३ | ६ | बुद्धीमत्ता | बुद्धिमत्ता |
| ३५ | १३ | अबाधीत | अबाधित |
| ३७ | १ | गाधीची | गाधींची |
| १३१ | ४ | आणिबाणीच्या | आणीबाणीच्या |
| १३२ | १ | सस्थावर | संस्थांवर |
| १३२ | ४ | वार्ताव्यवहरापासून | वार्ताव्यवहारापासून |
| १३२ | २८ | कार्यकत्यांची | कार्यकर्त्यांची |
| १३३ | १५ | असेल किंवा उत्पन्न होत | असेल किंवा नसलेला उत्पन्न होत |
| १३६ | १० | कोणत्या | कोणत्याही |
| १३८ | ४ | सरकाच्या | सरकारच्या |
| १४४ | २३ | शिशणाबाबत | शिक्षणाबाबत |
| १४४ | २४ | प्रचड त्याग पुरावा | प्रचंड त्याग यांचा पुरावा |
| १४४ | २४ | बाबतीत | बाबतीत |
| १५९ | २ | शाले | झाले |
| १६० | २ | मरठी | मराठी |
| १६० | ६ | मराठी मुलूख राज्यात | मराठी मुलूख त्या राज्यात |
| १६२ | ३ | राज्ययत्रणेत चागल्या गोष्टी | राज्ययंत्रणेत ज्या चांगल्या गोष्टी |

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | बुकमनच्या परकायाप्रवेशावरून सुचलेले काही विचार .. | १ |
| २ | महाराष्ट्राचे केंद्र .. ... .. | १० |
| ३ | महाराष्ट्राचे केंद्र मुंबई हेच ... .. | २० |
| ४ | वर्तनक्रमातील सुवर्णमध्य .. .. ... | ३० |
| ५ | लेखक–प्रकाशक–संबंध ... ... ... | ५२ |
| ६ | प्रकाशनव्यवसायाचा प्रश्न ... ... ... | ६० |
| ७ | भारतापुढील महान प्रश्न–सांस्कृतिक नियोजन ... | ७३ |
| ८ | परिभाषानिर्मितीचे कार्य ... ... .. | ८३ |
| ९ | भारतापुढील भाषिक प्रश्न .. ... ... | १०० |
| १० | वैचारिक नेतृत्वाची अभावलापिका ... ... | ११२ |
| ११ | संस्कृत विद्येचे संरक्षण .. ... ... | १२१ |
| १२ | जागृत गोमन्तक ... ... ... | १३१ |
| १३ | सुखसाधनांचे समायोजन ... ... ... | १४८ |
| १४ | एकरूप होऊ सगळे ... ... ... | १५९ |

## श्रीनिवास नारायण बनहट्टी

### ग्रंथ

* मयूरकाव्यविवेचन ( १९२६ )
विष्णु कृष्ण चिपळूणकर; द्विविधदर्शन–उत्तरार्ध ( १९३४ )
* ज्ञानोपासना व भारतीयांचे कर्तव्य, द्वितीयावृत्ती ( १९४० )
* टिळक आणि आगरकर, तृतीयावृत्ती ( १९६१ )
मराठी रंगभूमीचा इतिहास, खंड १ ला ( १९५७ )
मराठी नाट्यकला व नाट्यवाङ्मय ( १९५९ )

### लेखसंग्रह

* एकावळी, द्वितीयावृत्ती ( १९५१ )
* नाट्य व रंगभूमी ( १९५५ )
वाङ्मयविमर्श ( १९५५ )
आदरांजली ( १९५६ )
* आकाशलहरी ( १९६१ )
* चिंतन आणि चर्चा ( १९६३ )

लवकरच प्रसिद्ध होत आहे :

मराठी रंगभूमीचा इतिहास, खंड २ रा

* 'सुविचार' प्रकाशने

मराठा
अनुक्रम ......... वि. .........
क्रमांक ................ नों. दि. .........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 73069
संदर्भ शाखा

१.

# बुकमनच्या परकायाप्रवेशावरून सुचलेले काही विचार

एखादे मासिक बंद करण्याचा प्रसंग येणे ही आपणाकडे मोठ्या नवलाची गोष्ट नाही. अननुभवी उत्साहाच्या उसळीसरशी मनात वागत असलेल्या काही गोड अगर उदात्त कल्पना प्रत्यक्ष सृष्टीत आणून दाखविण्यासाठी एखादे मासिक जन्मास घालावे आणि पुढे खडतर अनुभवाच्या एकेक धक्क्याबरोबर मनोरथाचा एकेक कोपरा ढासळू लागून त्याच्याखाली मासिकाचा कोंडमारा होत होत ते लवकरच गतप्राण व्हावे हा जन्ममरणक्रम आपणाकडे परिचित असाच आहे.

विलायतेतल्या माणसाचे आयुष्य हिंदुस्थानातल्या माणसापेक्षा जसे जास्त त्याप्रमाणे तेथील नियतकालिकेही येथल्यापेक्षा अधिक दीर्घायुषी असतात हे सहजच आहे. लंडनच्या 'टाइम्स' पत्रास यंदा दीडशे वर्षे पुरी होतात. त्या पत्राने आपल्या एकशेपन्नासाव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ स्वतःचा दीडशे वर्षांचा इतिहास लिहून प्रसिद्ध करण्याचे योजिले असून त्याचा एक भाग जानेवारीत प्रसिद्धही झाला. ह्या दांडग्या आयुर्मानाच्या मानाने चाळीस पंचेचाळीस वर्षांची हयात म्हणजे अगदीच अल्प होय. तेव्हा 'बुकमन' नावाच्या वाङ्मयास वाहिलेल्या सुप्रसिद्ध मासिकाचा नुकताच जो अंत झाला तो अकालमृत्युच म्हटला पाहिजे. हे मासिक १८९१ साली रॉबर्टसन निकोल नावाच्या सुप्रसिद्ध विवेचकाने काढिले

होते. ते १९३४ च्या अखेरीस बंद करण्याचा प्रसंग त्याच्या चालकावर आला, यावरून ते चालू ठेवणे प्रकाशकास व्यावहारिक दृष्टीने परवडत नसले पाहिजे असे दिसते. कारण झीज सोसून नियतकालिके चालविणे अगर निर्वेतन वाङ्मयसेवा करणे या गोष्टी विलायतेतील लोकास फारशा परिचित नाहीत. पावणेतीनशे वर्षांपूर्वी विलायतेत धर्मश्रद्धा कळसास जाऊन पोचली होती; अशा काळी उदात्त भावनेने आपले धार्मिक कर्तव्य म्हणून काव्य करणाऱ्या कवि मिल्टनने देखील आपल्या 'प्यारडाइज लॉस्ट' या महाकाव्याकरिता प्रकाशकांकडून पैसे घेतले! पधरा पौंडच का होईनात पण ते प्रकाशकानी दिले व उदात्त व त्यागी अशा मिल्टनने घेतले!

अशा व्यवहारदक्षाच्या देशात एक नाणावलेले मासिक ज्याअर्थी बंद करावे लागते त्याअर्थी ते फायदेशीर रीतीने चालू शकत नसले पाहिजे असे अनुमान सहज निघते. कारण नियतकालिक अगर कोणतीही संस्था बुडण्याला चालकामधील दुफळी, परस्पर हेवेदावे, मत्सर इत्यादि गोष्टी कारणीभूत होत असलेल्या आमच्याकडे जशा कित्येक वेळा दिसतात तशा त्याच्याकडे सहसा दिसत नाहीत. 'मरण प्रकृति शरीरिणाम्' हे आमचे तत्वज्ञान; अर्थात् आमच्याकडे मरण्याला कारणे अनेक, वाटेल तितकी. तेव्हा 'क्षणमप्यवतिष्ठते श्वसन् यदि जन्तुर्ननु लाभवानसौ'—'एक क्षणभर प्राणी जिवंत राहू शकला तर तेवढ्यापुरता तरी तो नशीबवान' असेच समजले पाहिजे. आणि मासिकाच्या बाबतीत—गेल्या चार-पाच महिन्याचा वीस हजार, सात हजार, पाच हजार अशा खपाच्या कल्पनातीत आकड्यानी मनाला स्तिमित करणारा काळ सोडून दिल्यास—आपल्याकडे एकदर वस्तुस्थिति अशीच नाही काय?

परंतु इग्लडातील परिस्थिति फार वेगळी आहे. तेथे मरण अगोदरच दुर्लभ, त्यातून मरताना देखील फायदेशीर रीतीने, व्यावहारिक कल्याण साधून मरण्याची कला इग्रजास जशी साधली आहे तशी इतरांस क्वचितच साधली असेल. आम्ही मेलो की आमच्या पश्चात् आमच्या कुटुबाची, पैशा-अडक्याची, पुस्तकालयाची वाताहत होते. जिवतपणी कितीही दिमाखाने इतमामाने राहणारे आम्ही असलो तरी पुष्कळ वेळा आमची बायकापोरे उघडी पडण्याचा प्रसंग येण्याचा काही चुकत नाही. पण इग्रज गृहस्थ मरताना अशा बदोबस्ताने मरेल की त्याच्या पश्चात् त्याच्या तनसडीचीही जिकडच्या तिकडे व्यवस्था लाविली

जाईल. गेल्या महायुद्धाच्या काळात दोस्त राष्ट्राच्या 'व्यवस्थित आणि यशस्वी पीछेहाटी' 'orderly and successful retreat' च्या बातम्या येत तेव्हा त्याची कुचेष्टा करण्यात येत असे. पीछेहाट करणारे इंग्रज खरोखरच अखेरीस यशस्वी झाले आणि धडाडीने आघाडी मारणारा जर्मनी हतप्रभ झाला! नियत-कालिकांच्या बाबतीतही त्यानी अशी 'सोईस्कर पीछेहाटी' ची अगर 'फायदेशीर मरणा' ची युक्ति शोधून काढली आहे. आपल्याकडे नियतकालिके बुडावयाची म्हणजे त्याच्या चालकांवर कोर्टाच्या डिक्र्या झालेल्या असावयाच्या, जमलेले पैसे लांबविले जावयाचे, वर्गण्या नापत्ता व्हावयाच्या, कचेरीतील सामानास पाय फुटावयाचे, छापखान्यातील यंत्रसामग्री गहाण पडलेली असावयाची, असे अनेक चित्रविचित्र प्रकार होत असलेले विचक्षण प्रेक्षकाच्या नजरेस येतात. विलायतेतील नियतकालिक बंद पडावयाचे म्हणजे वरच्यासारखी बेबंदशाही अगर धूळधाण होण्याचे तर दूरच राहो, उलट प्रकाशक, लेखक व वाचक यांना फायदेशीर व सोईस्कर होईल अशाच रीतीने नियतकालिकाचा शेवट व्हावा याविषयी दक्षता बाळगली जाते. यासाठी जी युक्ति अमलात आणण्यात येते ती दिसावयास अगदी सोपी परंतु आमच्या इकडल्या दुही व संशय यानी झपाटलेल्या वाता-वरणात अमलात आणावयास तितकीच कठीण अशी आहे. ती युक्ति म्हणजे हीच की बंद पडणारे नियतकालिक दुसऱ्या एखाद्या साधारणपणे त्याच विषयास वाहिलेल्या नियतकालिकात सामील करणे. आसन्नावस्थेप्रत प्राप्त झालेल्या 'बुकमन' ने हीच परकायाप्रवेशाची युक्ति अमलात आणली; व १९३५ च्या जानेवारीपासून ते 'लंडन मर्क्युरी' नामक वाङ्मयविषयक मासिकात समाविष्ट झाले. गाजावाजा नाही, अश्रुसिंचन नाही, दीर्घरुदन नाही, चालकाच्या कामगिरीबद्दल त्यांचे स्वतःचे व त्याच्या भोवती दिवे ओवाळणाऱ्याचे लांबलचक लेख नाहीत, काहीच नाही! डिसेंबरच्या 'बुकमन' मध्ये पुढील व्यवस्थेबद्दल एक ल्हानशी सूचना येते, लगेच जानेवारीच्या 'मर्क्युरी'च्या अंकावर London Mercury या नावाखाली 'Bookman' हे नाव दिसू लागते व 'मर्क्युरी' चा संपादक या प्रेमसंगमाबद्दल चार उद्गार काढून पुढे चालू लागतो!

परकायाप्रवेशाची ही युक्ति दिसावयास अगदी साधी दिसते खरी, परंतु ती सोयीची व फार शहाणपणाची आहे. सामील होणाऱ्या मासिकाचा लौकिक, त्याची प्रतिष्ठा, याचा फायदा सामील करून घेणाऱ्या मासिकास मिळतो. हा

केवळ अमूर्त स्वरूपाचा फायदा; परंतु सामील होणाऱ्या मासिकाच्या ग्राहकांपैकी व लेखकांपैकी बरेच जण सामील करून घेणाऱ्या मासिकास मिळतात, हा प्रत्यक्ष फायदा देखील कमी महत्त्वाचा नसतो. अशा रीतीने बंद पडणाऱ्या मासिकाची प्रतिष्ठा (Goodwill) दुसऱ्या मासिकास लाभत असल्यामुळे त्या प्रतिष्ठेच्या मोबदल्यात त्याला पैसेही मिळतात. दोन्ही मासिके साधारणतः एकाच विषयावर निघत असल्यामुळे परस्पर स्पर्धा करण्यात जो उत्साहाचा व द्रव्याचा व्यय पूर्वी होत असेल तो यापुढे टळतो. विषयैक्यामुळे दोन्ही मासिकामध्ये होणारी पुनरुक्ति आता एकच मासिक अस्तित्वात असल्यामुळे साहजिकच होईनाशी होते. परंतु बंद होणाऱ्या मासिकाची विशिष्ट व लोकप्रिय अशी जी अंगे असतील ती दुसऱ्या मासिकात शक्य तितक्या प्रमाणात सुरू करण्यात येतात. त्यामुळे वाचकांस बहुधा पूर्वीच्याच वर्गणीत अधिक मोबदला मिळतो. शिवाय बंद होणाऱ्या मासिकाचे नाव व त्याच्या परंपरेची आठवण या सामील होण्याच्या युक्तीमुळे कायम राहते. व पुनः ते मासिक सुरू करण्याचे कोणाच्या मनात आल्यास त्यास तसे करणे सुलभ जाते. असे अनेक फायदे असल्यामुळे विलायतेत नियतकालिक बंद करण्याचा प्रसंग आल्यास ते दुसऱ्या कोणत्या तरी नियतकालिकात सामील करण्याची ही पद्धतीच बहुधा अवलंबिली जाते. आपल्याकडे मात्र हिचा अवलंब फारच क्वचित केला जातो. विलायतेत व आपणामध्ये पांच हजार मैलांचे अंतर आहे, याचे प्रत्यंतर यावरून आपणास मिळते !

* * *

तथापि कितीही सोइस्कर रीतीने निभावून नेला तरी मासिक बंद करण्याचा प्रसंग एकंदरीने खेददायकच. जिवाभावाने ज्याची जोपासना केली अशा अपत्याची अंत्यक्रिया आपल्या हाताने करावी लागण्यासारखाच हा प्रसंग 'उफराटा' होय. अशा प्रसंगी विलायती हृदये झाली तरी ती भावनोद्रेकाने थोडी तरी विचलित होणारच. 'बुकमन'च्या या अंतसमयी त्याचा संपादक ह्यू रॉस विल्यिमसन याची अशीच स्थिति झाली व आपल्या शेवटच्या संपादकीय लेखात, निरोप घेण्याच्या या प्रसंगी काय लिहावे हे आपणास सुचेचना, अशी कबुली त्यास द्यावी लागली. तथापि या लेखात जो एकच मुद्दा त्याने विवेचिला आहे तो मननीय आहे. मराठी वाङ्मयाच्या उन्नतीची चिंता वाहणारांस त्याचे विचार विशेषच उद्बोधक वाटतील.

श्री. विलियमसन यांचे म्हणणे असे की सध्याच्या लोकसत्तेच्या व सार्वत्रिक शिक्षणप्रसाराच्या काळात बहुजनसमाजामधील वाचकवर्ग अफाट प्रमाणात निर्माण झालेला असून तो उत्तरोत्तर संख्येने वाढतच चालला आहे. दिवसातला बराच वेळ काबाडकष्टात घालवणाऱ्या या वर्गाला त्या काबाडकष्टाचा विसर पाडील असे उत्तेजक व उत्तान लिखाण आपल्या फुरसतीच्या वेळात वाचावयास पाहिजे असते. अशा वाङ्मयाच्या नशेत काही काळ गुंगण्यास मिळाले म्हणजे तेवढ्यापुरता स्वस्थितीचा त्यास विसर पडून त्यांना थोडे बरे वाटते. उत्तेजक लिखाण धंदा म्हणून लाभप्रद होत असल्यामुळे कित्येक सुयोग्य व कुशल लेखकही अशाच लिखाणाचा पुरवठा करण्यात इतिकर्तव्यता मानतात. आणि अशा लेखकांची पीक दिवसेदिवस वाढत जाते.

ही प्रक्रिया एवढ्यावर थांबत नाही. उत्तेजक लिखाण लिहून प्रसिद्धीस आलेल्या लेखकांपैकी काही लेखक कालांतराने मोठमोठ्या वृत्तपत्रांचे अभिप्रायलेखक बनतात आणि त्या स्थानावरून मग ते उत्तेजक लिखाणाची यथास्थित टिमकी वाजवू लागतात. उत्तान लिखाणाचा असा उदो उदो करण्यासाठी संस्कृतिसंपन्न अशा वाङ्मयाची अवहेलना करण्यासही हे मागेपुढे पाहत नाहीत. संस्कृतिसंपन्न वाङ्मयाच्या चाहत्यांना हे टिमकी-डफ-बहादर 'शिष्ट' व 'जड बुडाचे' (highbrows) असे संबोधितात. बहुजनसमाजालाही आजवर आदर्श वाङ्मय म्हणून नाणावलेल्या परंतु स्वतःच्या अभिरुचीस न झेपणाऱ्या अशा वाङ्मयाचा नक्षा उतरविला जात असलेला पाहून व स्वतःस रुचणाऱ्या लिखाणाची प्रशंसा केली जात असलेली पाहून मोठा संतोष होतो. परिणामी अशा लिखाणाच्या उत्तेजक कैफात ते अधिकाधिक वाहवत जातात.

विलायतेतील वाङ्मयाची स्थिति श्री. रॉस विलियमसन यांनी जी वर्णन केली आहे तिचा सारांश वर दिल्याप्रमाणे आहे. अशा स्थितीत संस्कृतिसंपन्न वाङ्मयाचे चहाते व पुरस्कर्ते असे जे मूठभर लोक उरतात त्यांचे कर्तव्य काय, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. त्यांनी या हुल्लडीच्या काळातही आपला क्षीण स्वर शक्य तितका उंचावून संस्कृतिसंपन्न व उच्च वाङ्मयाचे आदर्श जनतेच्या समोर मांडीत राहण्याचे कार्य एकसारखे चिकाटीने करीत राहिले पाहिजे, असे रॉस विलियमसन यांचे म्हणणे आहे. "असंस्कृत व उथळ वृत्तीच्या बहुजनसमाजाच्या हातात आज राजकीय सत्ता गेली आहे. त्याच्या असंस्कृत व

वेल्गामी वृत्तांच्या वावटळीत लोकशाहीचे तारू सापडले आहे. अशा स्थितीत समाजाच्या संस्कृतिवर्धनाचे कार्य जर यापुढे चिकाटीने व एकतान निष्ठेने झाले नाही तर हे तारू कोणीकडे भडकेल किंवा कोणत्या खडकावर आपटून फुटेल याचा भरवसा नाही. तेव्हा वाङ्मयोपासकांनी आजवर युगानुयुगे जे आदर्श उच्च, उदार व मानव्यास साधक म्हणून उराशी बाळगले त्यांना कसोटीला लावण्याची वेळ आता आली आहे, असे समजून असे आदर्श पुढे ठेवणाऱ्या खऱ्या वाङ्मयाची कास त्यांनी सोडता कामा नये. त्यांचा आक्रोश अरण्यरुदनवत् झाला, त्यांनी पुढे ठेवलेल्या आदर्शांची हेटाळणी अगर पायमल्ली झाली, तरी त्यांनी आपले निशाण सोडता कामा नये. " असा आदेश देऊन श्री. रॉस विलियमसन विराम पावले आहेत.

त्यांचे म्हणणे आपणासहि विचारात घेण्याजोगे आहे. इंग्लंडात जो प्रश्न उद्‌भवला आहे, त्याचे अस्तित्व आम्हासहि इकडे भासमान होत नाही, असे नाही. किंबहुना आपल्यापुढे तो प्रश्न अधिक बिकट स्वरूपात उभा आहे, असे म्हटले पाहिजे. इंग्लंड व इतर युरोपातील देशात युद्धोत्तरकालीन समाज युद्ध-पूर्वकालीन समाजाहून जसा अगदी निराळ्या तऱ्हेचा निर्माण झाला आणि त्यामुळे तेथे उपर्युक्त प्रश्नासारखे अनेक प्रश्न जसे उद्भवू लागले तसेच स्थित्यंतर काही अंशाने आमच्या देशातहि घडून आले आहे. बाजाराच्या दिवशी रस्त्याच्या बाजूस आपले कपडे मांडून बसणारा फेरीवाला किंवा हॉटेलाच्या बाजूस पानपट्टी विकणारा तांबोळी वर्तमानपत्र विकत घेऊन आवडीने वाचीत बसतो, हा देखावा वीस वर्षांपूर्वी अश्रुतपूर्व वाटला असता. परंतु आता तो सर्वसामान्य झाला आहे. असा मनुष्य काय वाचील ? तो आपटे-जोशी यांच्या कादंबऱ्या, कोल्हटकर-खाडिलकरांची नाटके अगर केळकर-वैद्य यांचे लेख हातात तरी धरील काय ? त्याच्या रुक्ष दैनंदिन जीवनाचा त्यास विसर पाडील आणि भलत्याच काल्पनिक व उत्तेजक वातावरणात त्यास गुंगवून टाकील असे लिखाण त्यास आवडेल व तेच तो वाचील ही गोष्ट अगदी स्वाभाविक आहे. आणि असेच लिखाण पुरविणाऱ्या माला व वृत्तपत्रे यांचा अलीकडे सुकाळ झालेला आहे, हे आपण पाहतोच आहो.

हे लिखाण नेहमीच अश्लील असते असे नाही. अश्लीलतेवर हल्ला करणाऱ्यांनी या प्रश्नाच्या फक्त एका बाजूस स्पर्श केला आहे, एवढेच म्हणता

येईल. हे लिखाण उथळ असते, भडक असते, सत्यावर अधिष्ठित नसते आणि खोट्या, निरुपयोगी व पुष्कळदा उपद्रवी अशा कल्पनांचा आविष्कार करणारे असते. खरे वाङ्मय—ज्याला 'संस्कृति-संपन्न' असे विशेषण वर लाविले आहे ते—मनुष्याच्या सर्व मानसिक शक्तींचे पोषण करिते. ते जगतातील सारभूत व सहृदयग्राह्य अशा सत्यावर अधिष्ठित असते. ते मनुष्याला सारासारविचारक्षम बनविणारे आणि वैयक्तिक रागद्वेषातून किंचिदंशाने तरी मुक्त करून व्यापक विचारात रमण्यास उद्युक्त करणारे असे असते. पूर्वीच्या काळी निर्माण होणारे सर्व वाङ्मय सदासर्वदा वरील कसोटीस उतरणारे असे आणि सध्याचे लिखाण मात्र सर्व हीन दर्जाचे व भ्रष्ट असते असे तारतम्यशून्य मनुष्याखेरीज कोणी म्हणणार नाही. तथापि एवढे खरे की पूर्वी खरे वाङ्मय व उत्तान लिखाण यांच्या निर्मितीचे जे प्रमाण असे ते आता फार मोठ्या प्रमाणात पालटले आहे. उत्तान लिखाणाचे प्रमाण संस्कृतिसंपन्न वाङ्मयाच्या मानाने अफाट झाले आहे. असले लिखाण म्हणजे वाङ्मय-प्रांतातील बाजारबुणगे अगर पेंढार होय. लढाऊ सैन्या-बरोबर बाजारबुणगे असणे अपरिहार्य आहे. परंतु ते फारच अवाढव्य झाले व बेलगामी बनले म्हणजे मूळ सैन्यासच ग्रासून टाकते हा अनुभव आम्हा मराठ्यांना तरी नवीन नाही. वाच्यार्थाने लष्करी बाबतीत ते कटुसत्य आम्ही अनुभवून चुकलो आहोत. तोच अनुभव लाक्षणिक अर्थाने वाङ्मयाच्या क्षेत्रात यावयास नको आहे.

उदाहरण घेऊन सांगावयाचे झाले तर पुढे दिल्याप्रमाणे सांगता येईल. ऐतिहासिक कादंबरी लिहिणाऱ्या लेखकाने शिवकालीन कथानक रंगविताना त्यात विलायती समाजातील नमुन्यावर प्रेमकथा व प्रणयाराधनाची वर्णने घातली किंवा शिवाजीला राष्ट्रीय भावना व स्वातंत्र्य यांचे बोल घडघडा बोलणारा मॅझिनी अगर डी व्हॅलेरा बनविला तर ते कितपत योग्य दिसेल! असे प्रकार ज्यात केले आहेत ती खरी ऐतिहासिक कादंबरी नव्हे व अर्थात् खरे वाङ्मयही नव्हे. ते वाचकांच्या भावना उत्तेजित करण्याकरिता लिहिलेले असत्याधिष्ठित लिखाण होय. मोठमोठ्या कादंबऱ्याविषयीची ही कथा, तर मग मासिके, वृत्तपत्रे, माला, इत्यादिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या शतशः गोष्टींविषयी काय पुसावयाचे आहे!

असे असत्याधिष्ठित उत्तेजक लिखाण किंवा कुटाळकीस वाहिलेले लिखाण फार मोठ्या प्रमाणात निपजत आहे ही गोष्ट खेदाची आहेच. परंतु याच्याही

पुढची पायरी म्हणजे सद्वाङ्मयाच्या गुणलक्षणाची जाणीव नष्ट होऊन साहित्य-मापनाचे निकष (standards) भ्रष्ट होऊन जाणे ही होय. ही दुर्भाग्याची पराकाष्ठा होय. आणि हिचाच उल्लेख रॉस विलियमसन्‌ने प्रामुख्याने केला आहे. दुकानदार तागडीला झोका देऊन गिऱ्हाइकाला फसवीत असला तर ते गैरच; परंतु तो धडधडीत खोटी वजनेमापे वापरू लागला तर त्याच्या हातून कोणालाही बरोबर माल मिळणे अशक्य होते. वाङ्मयाच्या बाजारातही खोटी मापे वापरणारे भ्रष्ट बुद्धीचे निरीक्षक स्थानापन्न होऊन बसले म्हणजे वाङ्मयाचे नष्टचर्य ओढवले म्हणून समजावे. कारण लौकिक व्यवहारात वजनमापावर देखरेख करून खोटी मापे वापरणाऱ्यास शिक्षा करण्यास सरकारी पोलीस सज्ज असते, तसा प्रकार वाङ्मय-क्षेत्रात नसतो.

उत्तेजक लिखाणाच्या पुरस्कर्त्यांनी वाङ्मयमापनाचे निकष अत्यंत हीन दर्जाचे बनविले असल्याबद्दल रॉस विल्यमसन्‌ने गाऱ्हाणे गायिले आहे. परंतु आपल्याकडील स्थिति याहूनही शोचनीय आहे. वाङ्मयपरीक्षणाच्या संबंधात 'निबंधमाला'कारानी आपल्या 'ग्रंथावर टीका' या निबंधात जी निकृष्ट स्थिति असलेली वर्णन केली आहे तीच थोडेसे अपवाद वगळले असता आजतागायत अस्तित्वात आहे. इतकेच नव्हे, तर त्यात व्यक्तिविषयक पक्षविषयक कंपूविषयक रागद्वेषांमुळे निर्माण झालेल्या पक्षपातीपणाची भर पडून स्थिति अधिकच वाईट झाली आहे. अगोदर वाङ्मयविवेचन किंवा ग्रंथनिरीक्षण म्हणजे काय, हे शेकडा पन्नास टीकाकाराना समजत नाही. ज्यांना थोडेबहुत समजते त्यांपैकी निदान शेकडा पन्नास तरी, वर सांगितल्याप्रमाणे रागद्वेषानी लिप्त असल्यामुळे मातीमोल झालेले असतात. उरलेल्यांपैकी बहुतेक उत्तेजक लिखाणाचे पुरस्कर्ते असतात. अशा स्थितीत सुपरीक्षक कधीमधी एखादाच निपजत असेल असे म्हटल्यास कोणास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

अज्ञानी व अपात्र अशा टीकाकारांचाच भरणा आपणाकडे फार असल्या-मुळे त्याना काढून त्याच्या ऐवजी जाणते व लायक असे ग्रंथपरीक्षक प्रत्येक नियतकालिकाने नियुक्त केल्यास निम्मे काम होणार आहे. 'साहित्यपरिषदे'ने परीक्षा घेऊन पदव्या द्याव्यात की नाही याविषयी वाटाघाट आजकाल चालली आहे. परिषदेला जर काही उपयुक्त कार्य करणे असेल तर तिने 'वाङ्मय-विवेचन' (Literary Criticism) या विषयात परीक्षा घेऊन त्यावर प्रशस्ति-

पत्रके देण्यास सुरुवात करावी. संस्कृत साहित्यशास्त्र व पाश्चात्य वाङ्मयविवेचन यांचा भरदार अभ्यासक्रम नेमून लायक परीक्षकाची योजना केल्यास पदवीधरासहि या परीक्षास बसणें भूषणावह वाटेल. अशा अधीत व लायक परीक्षकांकडून, वेतन देऊन परीक्षणें लिहवून घेण्याचा परिपाठ नियतकालिकांच्या चालकांनी ठेवल्यास आपल्याकडील 'अज्ञान' हा रोग तरी बराच दूर होईल.

'अज्ञान' हें जे आमचें विशिष्ट व्यंग त्यावर एक तोडगा सांगितला. बाकीचे रोग विलायतेंत व आपल्याकडे समानच आहेत. त्यावर उपाय अर्थात रॉस विल्यमसनने सांगितला तोच. तो म्हणजे सर्व मनोवृत्तींना पुष्ट व कार्यक्षम बनवून मानवास उन्नततर करणारें वाङ्मयाचें खरें स्वरूप ज्यांस पटलें आहे त्यांनी त्याची प्रतिष्ठा राखण्याकरिता बद्धपरिकर होऊन निशाणाभोंवती जमा झालें पाहिजे व फजिती होवो, उपहास होवो, छळ होवो, खऱ्या वाङ्मयाचे उच्च आदर्श लोकांपुढे ठेवून त्याजकडे त्यांचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न अखेरपर्यंत चिकाटीने चालविला पाहिजे.

♣ ♣ ♣

—'प्रतिभा,' १ मार्च १९३५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ....... वि. .......
क्रमांक ....................... नों. दि. .......

२.

# महाराष्ट्राचें केंद्र

पुणे शहर हे महाराष्ट्राचे केंद्र आहे, अशी एक समजूत बरीचशी प्रचलित असलेली आढळते. ती समजूत कितपत यथार्थ आहे व ती यथार्थ नसल्यास दुसरे कोणते शहर महाराष्ट्राचे केंद्र ठरते, या गोष्टींचा या लेखात थोडक्यात विचार करावयाचा आहे.

हा विचार करण्यापासून तादृश काही उपयोग नसता तर प्रस्तुत लेखक तो करण्यास प्रवृत्त झाला नसता. वायफळ वाद माजवून शाब्दिक दंगल उडवून द्यावी अशी प्रस्तुत लेखकाची वृत्ति नाही. महाराष्ट्राच्या केंद्रस्थानाचा प्रश्न याच्या सर्वांगीण प्रगतीच्या व उन्नतीच्या प्रश्नाशी निगडित झालेला आहे अर्थात् त्याची चर्चा करणे आजच्या घटकेस अत्यंत उपयुक्त ठरणारे आहे, म्हणूनच प्रस्तुत लेखक या चर्चेस प्रवृत्त होत आहे.

महाराष्ट्राच्या केंद्रस्थानाच्या मानावरील पुणे शहराचा हक्क जितका वारंवार सांगितला जातो तितका इतर कोणत्याही शहराचा सांगितला जात नाही. पुण्याच्या केंद्रत्वाबद्दलची भावना पुष्कळांच्या मनात वागत असते व ती जाहीर रीतीने केव्हा केव्हा प्रकटही होते. पुण्याचे विख्यात सार्वजनिक पुरुष श्री. दत्तोपंत पोतदार यांनी काही दिवसांपूर्वी केलेल्या एका भाषणामध्ये ती, विषय

प्रतिपादनाच्या ओघात सहजगत्याच, परंतु अगदी स्पष्ट रीतीने प्रकट झालेली आढळते. हे पोतदारांचे उद्गारच आपल्या विवेचनाचा प्रारंभबिंदु म्हणून धरून चालण्यास हरकत नाही. श्री. पोतदार म्हणतात :—

"त्यानी (टिळकांनी) जे प्रयत्न केले त्याचे दृश्य स्वरूप म्हणजे आज ज्या निरनिराळ्या संस्था चालू आहेत हेच होय. या सर्व संस्था पुण्यातच कार्य करीत आहेत. याचे कारणही हेच की इंग्लंडला जसे लंडन, फ्रान्सला जसे पारिस त्याप्रमाणेच महाराष्ट्राला पुणे आहे. शरीराला एकच हृदय असते, अनेक नसतात, त्याप्रमाणेच महाराष्ट्राचे पुणे हे हृदय आहे. सर्व गोष्टी पुण्यातच केंद्रीभूत झालेल्या आहेत. व्यापार, उद्योग इ० बाजू जरी पुण्यात नसल्या तरी पुण्यात अनेक विद्यासंस्था आहेत." (पोतदाराच्या व्याख्यानाचे त्यांनी दुरुस्त केलेले प्रतिवृत्त. साप्ताहिक त्रिकाळ, ९।९।१९३५.)

महाराष्ट्राच्या केंद्रत्वाच्या बाबतीत पुण्याची बाजू स्पष्टपणाने व प्रांजल-पणाने या उद्गारात पुढे मांडलेली दिसते. यात गौणत्व एवढेच की पुण्यात राहून उदयास आलेल्या एका गृहस्थानेच—थोडक्यात सांगावयाचे म्हणजे एका 'पुणेकरा'नेच—ती पुढे मांडली आहे. पुण्याचा हक्क, पुण्याची थोरवी पुण्याबाहेरच्या एखाद्या गृहस्थाने इतक्याच मुक्तकंठाने वर्णिली असती तर ते अधिक उचित व पुण्यास अधिक गौरवास्पद झाले असते.

महाराष्ट्राचे केंद्र कोणते, हे ठरविण्याच्या प्रयत्नास लागण्यापूर्वी 'महाराष्ट्र' व 'केंद्र' या दोन शब्दांचा अर्थ अगोदर निश्चित केल्यानेच अर्धी अधिक वाट चालून गेल्याचे श्रेय आपणास लाभणार आहे.

पैकी महाराष्ट्र या शब्दाचा निश्चित अर्थ काय हे ठरविणे जरा बिकट काम आहे. अनेकानी याविषयी विचार केला असला तरी सद्यःस्थितीस लागू पडेल व व्यवहारतः फलदायी व प्रगतिसाधक होईल असा त्याचा काय अर्थ करता येईल याविषयी विचार करण्यास अद्याप पुष्कळच वाव आहे. परंतु तो एका स्वतंत्र निबंधाचाच विषय होण्याजोगा असल्यामुळे त्याविषयी अधिक चर्चा येथे न करिता नागपूरचे श्री. बेहेरे, केसरीकार श्री. करंदीकर इत्यादिकानी प्रति-पादलेली व अलीकडे बरीच प्रचलित झालेली 'महाराष्ट्र' या शब्दाची व्याख्याच येथे आपण ग्राह्य मानून चालू. ती व्याख्या अशीः—'मराठी भाषा बोलणारे लोक ज्या प्रदेशात बहुसंख्य आहेत तो महाराष्ट्र.' ही व्याख्या एकदरीने पुष्कळच

उपयुक्त आहे. या व्याख्येस अनुसरून मध्यप्रांतातील नागपूर, भंडारा, वर्धा, व चांदा हे जिल्हे, वऱ्हाडचे चार जिल्हे, मुंबई इलाख्यातील अकरा मराठी जिल्हे, कोल्हापूर, सावंतवाडी, सांगली, मिरज, कुरुंदवाड इ० दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थाने, गोवे प्रांत, निजाम इलाख्यातील औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी व उस्मानाबाद हे पांच जिल्हे, इतका सर्व मुलूख—अर्थात् त्यांत नांदणारी जनता—म्हणजे महाराष्ट्र, असा अर्थ निष्पन्न होतो. तेव्हा इतक्या मोठ्या व अनेक राजकीय अमलाखाली विभागलेल्या प्रदेशाचे—राष्ट्राचे केंद्र कोणते हे आपणास शोधून काढावयाचे आहे, ही गोष्ट लक्षांत बाळगिली पाहिजे.

महाराष्ट्र या शब्दाविषयी एवढी फोड केल्यानंतर 'केंद्र' या शब्दाच्या अर्थाचे निरीक्षण करू. 'वर्तुलाचा मध्यबिंदु' हा केंद्र याचा मुख्य कोशगत अर्थ होय. अर्थात आपल्या स्वीकृत विषयास अनुसरून 'राष्ट्राचा मध्यबिंदु' असा त्याचा अर्थ होईल. परंतु 'मध्यबिंदु' म्हणजे तरी काय? मध्यस्थानी ठेवलेली वस्तु आजूबाजूस असलेल्या वस्तूंपेक्षा बहुधा अधिक मोठी व प्रमुख असते, आजूबाजूच्या वस्तु तिच्या अधीन असतात, आजूबाजूच्या वस्तूंना प्रेरणा देण्याचे सामर्थ्य तिच्या अंगी असते अशी सामान्य स्थिति आपल्या अनुभवास येते, निदान अशी समजूत तरी आहे हे खास. तेव्हा राष्ट्राचे केंद्र म्हणजे राष्ट्रातील इतर कोणत्याही ठिकाणापेक्षा अधिक मोठे, प्रमुख, सामर्थ्यवान व कार्यप्रेरक असे ठिकाण होय. त्याचप्रमाणे केंद्र किंवा मध्यबिंदु शब्दामध्ये चालकत्वाची व मध्यस्थत्वाची कल्पनाही अंतर्भूत झालेली आपणास दिसून येते. यावरून केंद्र म्हणजे राष्ट्रातील व्यवहाराचे अंतिम चालकत्व व त्या व्यवहारातील मध्यस्थी ज्याच्या हाती प्रामुख्याने आहे असे ठिकाण होय, असेही म्हणण्यास हरकत नाही.

तेव्हा अखिल राष्ट्रावर छाप ठेवील असे सामर्थ्य, प्रेरकत्व, चालकत्व आणि मध्यस्थत्व ज्या ठिकाणच्या लोकांच्या अंगी असेल ते ठिकाण त्या राष्ट्राचे केंद्र होय, असे वरील विवेचनावरून फलित होते. ही व्याख्या कित्येकांस कदाचित फार व्यापक व कठीण वाटेल. परंतु केंद्र या शब्दाच्या अर्थात या सर्व छटा अंतर्भूत होतात; शिवाय वर निर्देशिलेल्या सर्व गुणांचे स्वरूप परस्परांपासून फारसे पृथक नसून ते एकरूपच आहेत, किंवा प्रथमनिर्दिष्ट गुणाच्या परिणामाच्या स्वरूपाचेच बाकीचे गुण आहेत, हे थोडा विचार केल्यास दिसून येईल. सामर्थ्य, मग ते

कोणत्याही प्रकारचे असो, ज्या लोकाच्या अंगी असेल त्याच्याचकडे राष्ट्राचे प्रेरकत्व, धुरीणत्व आणि मध्यस्थत्व येते. असे सामर्थ्यवान लोक विशेष प्रमाणात एकाच शहरी एकवटले म्हणजे त्या शहरास राष्ट्राचे केंद्र अशी पदवी सहजच प्राप्त होते. प्रभावशाली व्यक्ति अशा रीतीने केंद्रस्थानी आल्या म्हणजे त्या आपले सामर्थ्य किंवा विशिष्ट गुण प्रकट करण्यास निरनिराळे मार्ग किंवा द्वारे त्या ठिकाणी निर्माण करतात. हे मार्ग किंवा ही द्वारे म्हणजेच कार्यकर्त्या व्यक्तीनी निर्मिलेल्या सस्था होत. अशा रीतीने व्यक्तिगत विशिष्ट गुण प्रकट करण्याच्या सोयी केंद्रस्थानी फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे सर्व प्रकारचे सामर्थ्यवान व गुणी जन राष्ट्रातील सर्व ठिकाणाहून त्या केंद्रस्थानाकडे आकर्षिले जातात. या योगाने दुहेरी कार्य होते. प्रभावशाली व्यक्तीचा प्रभाव प्रकट होण्यास योग्य वाव मिळतो व अशा व्यक्तींची आयात एकसारखी चालू असल्यामुळे केंद्रस्थानाचे केंद्रत्व कायम राहते. या परस्परोपकारकत्वामुळे केंद्रस्थानाचे केंद्रत्व कित्येक पिढ्या, किंबहुना कित्येक शतके, टिकून राहते. पोतदारानी आपल्या भाषणात लडन व पारीस या शहरांचा उल्लेख केला आहे. त्या दोन्ही शहराचे उदाहरण या बाबतीत अत्यत समर्पक होय. इग्लडमध्ये व फ्रान्समध्ये शहरे अनेक आहेत. परतु राजकारणात काय, वाङ्मयात काय, समाजकारणात काय, किंवा व्यापारात काय, सर्व चालकत्व आणि मध्यस्थत्व या दोन्ही देशात अनुक्रमे लडन व पारीस या शहराकडेच कायमचे येऊन बसले आहे. समाजजीवनाच्या कोणत्याहि शाखेमध्ये कार्य करू इच्छिणारा गुणी मनुष्य असो, त्याला या शहराकडे आकृष्ट व्हावे लागते व या शहराच्या द्वारे त्याच्या कार्यास प्रसिद्धी मिळते. नुसता वाङ्मयाचाच प्रांत घेतला तरी शेक्सपियर, जॉनसन, कार्लाईल, बॅरी ही निरनिराळ्या काळातील वाङ्मय-धुरीणाची नावे हेच सत्य मनावर ठळक रीतीने ठसवितात.

ज्या सामर्थ्यामुळे कोणत्याही एखाद्या स्थानास केंद्रत्व प्राप्त होते ते सामर्थ्य अनेक प्रकारचे असते. सर्वांत सूक्ष्म, अतींद्रिय परतु उदात्त असे सामर्थ्य म्हणजे नैतिक सामर्थ्य होय. त्यानतर बौद्धिक किंवा मानसिक सामर्थ्य येते. सापत्तिक सामर्थ्य हे तर मनुष्याच्या सर्व सामाजिक व्यवहारांना व्यापून राहिलेच आहे. सर्वांत स्थूल स्वरूपाचे म्हणजे शारीरिक सामर्थ्य होय. समाजाच्या सघटित अवस्थेत हे सामर्थ्य लष्कर व पोलीस यांच्या ठायी अवतीर्ण होत असते. आणि लष्करी किंवा पोलिसी सामर्थ्याचे अधिष्ठान राजसत्ता हीच असते. तेव्हा

शारीरिक सामर्थ्य म्हणजे राजकीय सामर्थ्य असे समीकरण धरून चालण्यास हरकत नाही.

आतापर्यंत केंद्र या शब्दाच्या अर्थाचे विवरण झाले. या विवरणानुसार पुण्यपत्तन हे महाराष्ट्राचे केंद्र ठरते की नाही हे आता पाहावयाचे. वर वर्णिलेल्या राष्ट्रव्यवहाराच्या निरनिराळ्या अंगाचे धुरीणत्व पुण्याच्या अंगी कितपत आहे हे पाहिले म्हणजे पुण्याचे स्थान निश्चित होईल.

सर्वांत स्थूल व ढोबळ असे राजकीय सामर्थ्य घेऊ. याचा मुख्य गड्डा परदेशीय राज्यकर्त्यांच्या हाती असल्यामुळे हिंदुस्थानातल्या कोणत्याच शहरी ते मुख्यांशाने केंद्रित झालेले आढळणार नाही. तथापि त्यातला जो काही अंश लोकांच्या हाती आला आहे तो वहिवाटण्यात पुण्याच्या लोकांचे किती अंग आहे हे पाहिल्यास काहीच हाती लागणार नाही. अगोदर हे लक्षात ठेविले पाहिजे की मध्यप्रांतातील अर्धकोट लोकांच्या राजकीय सामर्थ्यांचे केंद्र नागपूर हे आहे. आणि मुंबई इलाख्यातील राजकारणाची सूत्रे जेवढी एतद्देशीयांच्या हाती आहेत तेवढी बहुतेक मुंबईच्या धनिकांनी व राजकारणी मुत्सद्द्यांनी आटोपली आहेत. पुण्याच्या राजकारणी पुरुषांस मुंबई इलाख्याच्या राज्यकारभारात कितपत मान आहे याचा अंदाज निःपक्षपाती मनाने खुद्द पोतदारांनीच करावा!

जनतेचे कांग्रेस वगैरेच्या द्वारे जे राजकारण चालले आहे त्यात पुण्याचे सामर्थ्य कितपत दृग्गोचर होत आहे हे महशूरच आहे! खास पुण्यातून प्रसृत होणारे जे लोकशाही वगैरे पक्षाचे राजकारण त्याचा पगडा महाराष्ट्रीय जनतेवर कितपत आहे, याची परीक्षा होण्याचा जेव्हा प्रसंग येतो तेव्हा पुणे परीक्षेस उतरत नाही असाच अनुभव येतो. एक काळ असा होता की राजकीय चळवळी-बाबत वऱ्हाड-नागपुरासहित अखिल महाराष्ट्राचे डोळे पुण्याकडे लागलेले असत. तो काळ इतका जवळचा आहे की अझूनही त्याच काळांत आपण आहोत अशी कित्येकांच्या मनाची समजूत कायम असण्याचा संभव आहे. परंतु ती समजूत भ्रांत आहे, असा प्रत्यय कठोर वास्तवतेने अनेकवार आणून दिला आहे.

राष्ट्रीय व्यवहाराचे दुसरे जे सांपत्तिक किंवा आर्थिक अंग त्याचे चालकत्व पुण्याकडे कितपत आहे याविषयी विचार करण्याची जरूरीच नाही. आर्थिक व्यवहार हे समाजाच्या जीवनाचे अत्यंत महत्त्वाचे अंग होय. किंबहुना असेही एक सामाजिक तत्त्वज्ञान प्रचलित आहे की ज्याच्या मते मनुष्याच्या भौतिक

गरजा व त्यावर ताबा चालविणारा पैसा हाच सर्व समाजजीवनाचा पाया व त्याची नियामक शक्ति होय. महाराष्ट्रामध्ये ही शक्ति सध्या कोणाच्या हातात आहे हा प्रश्न जरी तडकाफडकी उत्तर देण्याइतका सुलभ नसला तरी ती शक्ति पुण्यपत्तनस्थ जनतेच्या हाती नाही, ही गोष्ट पुण्याच्या कट्टया अभिमान्यासही मान्य करावीच लागेल. श्री. पोतदारानीही ही गोष्ट मान्य केलीच आहे.

तिसरे बौद्धिक धुरीणत्व. आधुनिक जगात राजकीय व आर्थिक वर्चस्व ज्या स्थलाकडे असते त्याच्याकडेच बौद्धिक सामर्थ्यही वाट चालत येते असा सामान्य नियम आढळतो. पुण्याच्या बौद्धिक धुरीणत्वाविषयीच्या समजाची या नियमानुसारच वासलात लागत असली तरी यासबंधात पुष्कळ लोकाचा अन्यथा समज असलेला आढळतो, यास्तव त्याविषयी दोन शब्द लिहिणे जरूर आहे.

'पुणे हे विद्वानाचे माहेरघर आहे' (ज्ञानकोश) असे म्हटले जाते. परतु वाङ्मयनिर्मिति हे विद्वत्तेचे एक प्रमुख व अखिल महाराष्ट्रीय जनतेवर प्रभाव पाडणारे लक्षण मानले, तर त्या बाबतीत महाराष्ट्रांतील दोन शहरे, पुण्यापेक्षा आघाडीवर नसली, तरी पुण्याशी स्पर्धा करणारी तरी निदान खास आढळतील. या दोन शहरापैकी नागपूरविषयी प्रस्तुत लेखक स्वतःच काही बोलत नाही. परतु अलीकडे कित्येक वर्षे उच्च दर्जाचे व प्रभावशाली वाङ्मय निर्माण करण्याच्या बाबतीत मुबई मोठ्या वेगाने पुढे सरसावत आहे. कोल्हापूर-किर्लोस्करवाडी व बडोदे ही वाङ्मयकेंद्रेही जोमात आहेत. आणि ही चारी केंद्रे स्वतत्र रीतीने, पुण्याच्या स्फूर्तीची व धुरीणत्वाची अपेक्षा न करिता कार्य करीत आहेत, ही गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे.

आता येऊन जाऊन उरल्या काय त्या 'सस्था.' या 'सस्था'वर पोतदारांची फार मदार दिसते. पुण्याचे केंद्रत्व सिद्ध करण्यास त्यानी या 'सस्था'-चाच काय तो दाखला दिला आहे. आता ही गोष्ट खरी आहे की अखिल महाराष्ट्रातील जनतेच्या पैशावर पुष्ट झालेल्या अनेक मोठमोठ्या सस्था जितक्या पुण्यांत आहेत, तितक्या इतरत्र कोठेही नाहीत. परतु सस्था म्हणजे काय ? या सस्था राष्ट्राचे केंद्र केव्हा होऊ शकतात ? पुण्याच्या 'विद्यासस्था'मधील अध्यापक इतर ठिकाणच्या अध्यापकाप्रमाणेच बरे अगर वाईट विद्यार्थी तयार करीत असले, तर पुण्याच्या सस्था केवळ आकाराने मोठ्या, त्याचे फड मोठे व त्याच्या इमारती मोठ्या म्हणून इतर ठिकाणच्या सस्थानी त्यांचे धुरीणत्व मान्य करावयाचे

की काय ? बौद्धिक प्रेरकत्वाच्या दृष्टीने विचार करिता संस्था हे केवळ द्वार होय. प्रतिभाशाली कार्यकर्त्या पुरुषाच्या प्रतिभेचा झरा या संस्थांच्या द्वारे वाहत असेल आणि तो अखिल जनतेच्या तृषित मनाना तृप्त करीत असेल तरच त्या संस्थांचे राष्ट्रास महत्त्व. नाही तर वृत्तपत्रे काय, कॉलेजे काय, आणि संशोधन-मंडळे काय, एखाद्या पंधरा वीस हजार वस्तीच्या गावी देखील निघू शकतात व उत्कृष्ट रीतीने चालू शकतात. पुण्यातील संस्थांमधून अशा प्रतिभेचा, कार्य-शक्तीचा, कळकळीचा स्रोत आजच्या घटकेस वाहतो आहे काय ? याचे उत्तर पोतदारासारख्या मार्मिक व मुरब्बी निरीक्षकांनीच द्यावे. ज्या महाभागांनी या संस्था स्थापन केल्या त्यांच्या अमदानीत इमारती नव्हत्या, कार्यवाहादि अधि-काऱ्यांचा वर्ग व सुखासीन कारकुनांचा संचही नव्हता. त्या वेळी लाकडी खोक्यांची आफिसे होती, वळकट्यांची टेबले होती...पण असें काही होते की जे अखिल महाराष्ट्रीयांची अंतःकरणे वेधून घेत होते. त्या वेळी पुणे हे खरोखरीच महाराष्ट्राचे बौद्धिक केंद्र होते. आजच्या संस्थांचे चालक बुद्धिमान आहेत, कर्तबगार आहेत. ते संस्थांच्या योगक्षेमाची काळजी वाहतात हे खरे आहे. परंतु ते इतक्यावरच थांबतात. त्यांची बुद्धि नवीन विचार, नवीन कल्पना, नवीन ध्येये यांचे धुरीणत्व धडाडीने पतकरण्यास धजावत नाही—निदान या बाबतीत पुणेकर संस्थाचालकांची बुद्धि इतर अनेक ठिकाणच्या कार्यकर्त्यांपेक्षा अधिक परिणामकारी व प्रभावशाली असल्याचे दृष्टोत्पत्तीस येत नाही.

बौद्धिक क्षेत्रात जी स्थिति तीच नैतिक क्षेत्रातही विद्यमान असल्याचे दिसून येते. वरील विवेचन योग्य तो ऊह केल्यास नैतिक बाबतीतही लागू पडणारे अस-ल्यामुळे त्याविषयी अधिक विवेचन येथे करीत नाही.

राष्ट्रीय केंद्राचे एक हमखास व अनन्यसामान्य लक्षण कोणते याचा निर्देश करून त्या दृष्टीने सद्यःकालीन पुण्याचे निरीक्षण करू 'सर्व प्रकारचे सामर्थ्यवान व गुणी जन राष्ट्रातील सर्व ठिकाणाहून केंद्रस्थानाकडे आकर्षिले जातात,' असे विधान वर केले आहे. राष्ट्रकेंद्राचे अनन्यसामान्य लक्षण ते हेच होय. कारण कर्तबगार व्यक्ति हीच राष्ट्राची प्रेरक शक्ति होय; व ती आपणाकडे आकृष्ट करून घेण्याचे सामर्थ्य ज्या स्थानात असेल तेच राष्ट्रीय केंद्र बनेल व टिकेल हे उघड आहे. काही कालापूर्वी पुण्याच्या अंगी हा चुंबकत्वधर्म मोठ्या प्रमाणात वसत होता. गेल्या पाउणशे वर्षांत पुण्याचे नाव उजळ करण्यास ज्या व्यक्ति कारणीभूत

झाल्या त्यापैकी बहुतेक पुण्यात बाहेरूनच आल्या होत्या, हे लक्षात घेतले असता खऱ्या राष्ट्रीय केंद्राचे सामर्थ्य कसे असते याचा तेव्हाच प्रत्यय येईल. पेशवाई-मध्ये पुणे हे महाराष्ट्राचे केंद्र निःसंशय होते. पेशवाईच्या अस्तानंतर पुण्याचे केंद्रत्व नष्ट झाले ते बौद्धिक व नैतिक क्षेत्रात त्याला पुनः स्थूलमानाने १८७०च्या सुमारास प्राप्त झाले. तेव्हापासून पुढे पुण्यामध्ये झालेल्या कर्तबगार व्यक्ती बहुतेक बाहेरूनच आलेल्या आहेत. खुद्द पुण्यास काही पिढ्यापासून असलेले चिपळूणकरच एकटे दिसतात. रानडे पुण्यास नोकरी-निमित्ताने आलेले असले तरी त्यांचे कर्तृत्व पुण्यानेच फुलविले यात शंका नाही. टिळक, आगरकर, गोखले, शिवरामपंत परांजपे, कर्वे, शिंदे, देवधर, केळकर, खाडिलकर, पागारकर, रँग्लर परांजपे, वामनराव जोशी ही मंडळी सर्व बाहेरची असून कर्तृत्व प्रकट करण्यास योग्य संधी देणारे शहर म्हणून पुण्याकडे प्रौढ वयामध्ये आकृष्ट झाली. परंतु अलीकडे पुण्याचे हे आकर्षकत्व कमी झालेले दिसते. अगदी अलीकडे पुण्याकडे आकृष्ट झालेले विशेष कर्तबगार गृहस्थ म्हणजे डॉ. केतकर हे होत. यांचा पुण्या-विषयीचा अनुभव काय असेल तो त्यांचा तेच जाणोत. परंतु पुण्यामध्ये ते 'पद्मपत्रमिवाम्भसा' अशा अलिप्त स्थितीतच राहत असलेले आढळतात. ज्यांचा उदयकाल पुढे यावयाचा आहे अशा काही होतकरू व्यक्ती आजही पुण्याकडे आकृष्ट झालेल्या असतील, नाही असे नाही. तथापि उच्च दर्जाचे कर्तृत्व फार वेळ लपून राहत नाही, हा सामान्य नियम लक्षात घेतला असता कर्तृत्ववान लोक सध्या पुण्याकडे विशेष प्रमाणात आकृष्ट होत नाहीत असा जो कयास आपण बांधला त्यास बाधा येण्याचा संभव दिसत नाही. उलट आकर्षण करण्याऐवजी अपसारण करण्याचा गुण पुण्यात आला आहे की काय असा काही उदाहरणा-वरून संशय येतो. खाडिलकर, पागारकर, फडके, घारपुरे, पटवर्धन ही मंडळी अगदी अलीकडे पुण्याहून बाहेर गेली. त्यांच्या निष्क्रमणाच्या बाबतीत पुण्यातल्या विशिष्ट व्यक्तींवर अगर संस्थांवर दोषारोप करावयाचा प्रस्तुत लेखकाचा उद्देश नाही. कोणत्याही कारणामुळे का होईना, इतर ठिकाणचे आकर्षकत्व पुण्यापेक्षा यांच्यावर जास्त प्रभावी झाले, इतकेच प्रतिपादन येथे करण्याचा उद्देश आहे.

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून पुण्याला महाराष्ट्राचे केंद्र किंवा 'हृदय' (श्री. पोतदार यांचा हा शब्द केंद्र या अर्थीच घेतला पाहिजे)

मानण्याच्या बाबतीत मोठ्या अडचणी उत्पन्न होतात, हे वाचकाच्या लक्षात येईल. पुणे हे जर महाराष्ट्राचे केंद्र नव्हे, तर मग दुसरे कोणते ठिकाण महाराष्ट्राचे केंद्र ठरते ? असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. या प्रश्नाचा विचार करण्याच्या अगोदर, प्रत्येक राष्ट्राला एकच केंद्रस्थान असते किंवा तसे असणे अवश्यच आहे की काय याचा विचार केला पाहिजे. जगातील अत्यंत संघटित, नमुनेदार व प्रभावशाली राष्ट्रे घेतली तर त्याच्यामध्ये अत्यंत ठळक व सर्वातिशायी असे एकच केंद्र असलेले दिसून येते, यात शंका नाही. इंग्लंडचे लंडन, फ्रान्सचे पारिस, जर्मनीचे बर्लिन ही अशा प्रकारची उदाहरणे होत. यावरून उलट नियम स्थूल मानाने असाही बांधण्यास हरकत नाही की ज्या राष्ट्रामध्ये एकच निर्विवाद व सर्वातिशायी असे केंद्र असते तीच अत्यंत संघटित, प्रगतिपर व प्रभावशाली असतात. या नियमाला उपोद्बलक असे एक उदाहरण हिंदुस्थानातही आहे. ते बंगालचे होय. अखिल हिंदुस्थानात बंगाल हे सर्वांत अधिक सुसंघटित, बलवान व प्रगत असे उपराष्ट्र आहे, असा आपला यथार्थ समज आहे. आणि लंडन वगैरे शहरांप्रमाणे कलकत्ता हे आज शंभर दीडशे वर्षे एकसारखे बंगालचे सर्वातिशायी असे केंद्र आहे. याच्या उलट हिंदी मुलुखाकडे पहा. दिल्ली, आग्रा, कानपूर, अलाहाबाद, लखनौ, काशी ही सहा शहरे, जवळ जवळ सारख्याच महत्त्वाची व निरनिराळ्या क्षेत्रांत पुढारलेली अशी आहेत. यावरून हिंदी बोलणारा मुलूख राष्ट्ररूपाने अद्याप संघटित झालेला नाही असे अनुमान काढले तर ते कितपत योग्य होईल ? प्रश्न विचारणीय आहे.

महाराष्ट्राकडे पाहिले तर त्यातील वऱ्हाड मध्यप्रांत या विभागाचे केंद्र नागपूर निर्विवादपणे ठरते. या प्रांतातील लोकांस पुण्याचे धुरीणत्व व चालकत्व सध्या तरी कोणत्याच बाबतीत भासत नाही. तिकडची वृत्तपत्रे, मासिके व ग्रंथ इकडे बरेच खपतात, हे खरे. परंतु त्यातील बराच अंश मुंबईचा असतो, हे एक, त्या खपामुळे इकडील लोकांच्या विचारावर काही विशिष्ट परिणाम होतो, असे दिसत नाही, हे दुसरे; व याच्या उलटही प्रकार आता सुरू झाला आहे व तो वाढत आहे, हे तिसरे. या तीन कारणास्तव पुण्याचे धुरीणत्व सिद्ध होत नाही. राजकीय व आर्थिक बाबतीत तर बोलावयासच नको. मुंबई इलाख्यातील महाराष्ट्राकडे पाहिले तरी पुण्याचे धुरीणत्व बहुतांशी लयाला गेले असून मुंबई महाराष्ट्राचे धुरीणत्व संपादन करण्याच्या दिशेने हळू हळू आक्रमण करीत आहे असे दिसून

येईल. मोठी लोकसंख्या ही एक मोठी अनुकूल गोष्ट मुबईला आहे. शिवाय राजकीय व आर्थिक व्यवहारांचे चालकत्व यद्यपि महाराष्ट्रीयाच्या हाती नसले तरी ते मुबईतच केंद्रीभूत झाले असल्यामुळे त्याचा फायदा तेथील महाराष्ट्रीयास अप्रत्यक्ष रीत्या मिळतो. दक्षिण महाराष्ट्राचे कोल्हापूर हेही एक स्वतंत्र केंद्र बनू पाहते आहे. किंबहुना परस्परांपासून फुटून वागण्याचा महाराष्ट्रीयांच्या स्वभावामुळे प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाण हे निदान बौद्धिक बाबतीत तरी मुख्य केंद्राची परवा न करणारे छोटेखानी केंद्र बनू पाहते आहे की काय असा भासही होतो. नुकताच झालेला धुळे—पुणे वाद या दृष्टीने लक्षात घेण्याजोगा आहे.

श्री. पोतदारानी महाराष्ट्राच्या सद्यःस्थितीविषयी आपल्या व्याख्यानात विवेचन केले, त्यातून विचार करण्याजोगे असे बरेच मुद्दे निघतात. त्यापैकी एका मुद्द्याचा विचार या लेखात केला आहे.

* * *

—नागपूर महाविद्यालय ( पूर्वीचे मॉरिस कॉलेज )
यातील ‘ शारदामडळा ’ च्या ‘ फुलोर ’ या
प्रकाशनात प्रथम प्रसिद्धी १९३५. नंतर
‘ प्रतिभा ’ — २९ नोव्हेंबर १९३५.

## ३.

# महाराष्ट्राचे केंद्र मुंबई हेच

[ 'महाराष्ट्राचे केंद्र' हा लेख 'प्रतिभे'त प्रसिद्ध झाल्यानंतर, त्यातील प्रतिपादनासंबंधी महाराष्ट्रातील अनेक कार्यकर्त्यांची व विद्वानांची मते संपादकांनी मागविली होती. तदनुसार प्रथमतः प्रा. द. वा. पोतदार यांनी प्रा. बनहट्टींच्या लेखाला उत्तर देऊन आपली बाजू मांडली व नंतर अनेक नामवंत व्यक्तींनी या विषयावर आपले वेगवेगळे विचार प्रगट केले. हा 'केंद्रवाद' 'प्रतिभे'तून बरेच दिवस चालला होता व त्याचा समारोप, संपादकांच्या सूचनेवरून, प्रा. बनहट्टी एका स्वतंत्र लेखात करणार होते. तथापि त्याच सुमारास या वादाच्या समारोपाच्या स्वरूपाचे एक पत्र प्रा. बनहट्टी यांनी श्री. मामासाहेब वरेरकर यांना लिहिले व तेच उभयतांच्या संमतीने 'केंद्रवादाचा समारोप', म्हणून 'प्रतिभे'त प्रसिद्ध झाले. ते पत्रच, त्यातील प्रासंगिक मजकूर वगळून येथे घेतले आहे.

—प्रकाशक ]

## केन्द्रवादाचा समारोप

नागपूर, ता. २६-९-१९३६

श्री. मामासाहेब वरेरकर यांस,

सप्रेम नमस्कार वि. वि.

आपले ता. १-९-३६ चे पत्र वेळीच पोचले होते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कारभारामध्ये व घटनेमध्ये घडत असलेले परिवर्तन आपणास बरेच समाधानकारक वाटत आहे हे कळून फार आनंद वाटला. थोर योग्यतेचे व स्वतंत्र वृत्तीचे असे जे आपणासारखे साहित्यसेवक आहेत, त्यांस पसत पडेल असे कार्य जर साहित्य परिषद करू शकली नाही, तर त्या संस्थेचा उपयोग तरी काय? गेले सात आठ महिने जेव्हा सर्व बाजूनी उठावणी करण्यात आली तेव्हा आता इतके तरी प्रकरण ताळ्यावर आलेले दिसत आहे. असो.

"परिषदेची कचेरी नागपूर, पुणे आणि मुंबई येथे तीन वर्षे ठेवण्याचे ठरल्यामुळे केंद्राचा वाद आता बहुतेक मिटला आहे असे म्हणण्यास हरकत नाही," असे आपण लिहिले आहे. माझ्या दृष्टीने केंद्राचा वाद साहित्य परिषदे-पुरताच नव्हता. किंबहुना 'महाराष्ट्राचे केंद्र' हा लेख लिहिताना साहित्य परिषद माझ्या डोळ्यासमोर देखील नव्हती. समाजाच्या अनेकविध व्यवहाराची व्यापकता लक्ष्यात घेऊन, त्या समाजाचे केंद्र कोणते ते ठरविले पाहिजे, असे प्रतिपादन करण्यावर माझा कटाक्ष होता. तेव्हा साहित्य परिषदेच्या आळीपाळीने होणाऱ्या स्थलांतराशी केंद्रवादाचा काही संबंध आहे असे मी मानीत नाही. परंतु महाराष्ट्राच्या केंद्रावर व साहित्य परिषदेच्या कारभारावर माझे लेख थोड्याशाच अवकाशाने येत गेल्यामुळे केंद्रवाद हा देखील साहित्य परिषदेवरच रोख धरून उत्पन्न केला आहे, असा पुष्कळांचा समज झाला हे मात्र खरे. इतकेच नव्हे, तर परिषदेची कचेरी नागपुरास आणून ती आपल्या ताब्यात घ्यावी, अशा उद्देशाने ही केंद्रवादाची उठावणी व परिषदेवरील टीका केली जात आहे, असा ग्रह पुष्कळांचा झाला असल्याचे मला कळले आहे. परंतु वस्तु-स्थिति तशी नाही. केंद्रासंबंधीचा लेख मी लिहिला आक्टोबरात व परिषदेच्या कारभारासंबंधीचा वाद सुरु झाला इंदूर संमेलनाच्या वेळेस, म्हणजे डिसेंबर

अखेरीस. माझे कित्येक पुणेकर मित्र अर्धवट विनोदाने मला म्हणाले देखील की "परिषदेचे 'केंद्र' पुण्याहून नागपूरला नेले म्हणजे तरी तुमचे समाधान होईल ना ?" परंतु परिषदेसारखी एकंदर राष्ट्राच्या व्यवहाराच्या दृष्टीने दयामे खसखस असलेली संस्था एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याचा आणि केंद्र-कल्पनेचा अर्थाअर्थी संबंध तरी काय ?

परिषदेची कचेरी पुणे येथे असण्यावर माझा कधीच कटाक्ष नव्हता व ती तेथून हलवावी असे मी कोणत्याच लेखात प्रतिपादन केले नाही. माझ्या परिषद-विषयक लेखामध्ये मी केंद्रवादाचा दुरूनही संबंध आणलेला नसून, पुणेकरांवर त्यात कोणताहि आक्षेप घेतलेला नाही. किंबहुना, 'पुणे' व 'पुणेकर' असे स्थल-वाचक उल्लेख करावयाचेही त्यात टाळले आहे, हे ते लेख पाहिल्यास आपल्या लक्षात येईल. केंद्रवादाचा संबंध परिषदवादाशी लावला जाईल असे स्वप्न मला आगाऊच पडले असल्यामुळे मी माझ्या परिषदविषयक लेखमालेच्या शेवटी पुढीलप्रमाणे स्पष्ट उल्लेख केला होता—

"—केंद्रवादाचा संबंध या विषयात आणून प्रांतिक वा स्थानिक दुर-भिमानाच्या भावना उत्तेजित करून त्यांच्या आधाराने प्रस्तुत लेखकास झोड-पण्याचा प्रयत्न केला जाईल. कोणत्याही स्थानाच्या किंवा प्रांताच्या अभिमानाचा या विषयात दुरूनही संबंध येत नाही. प्रस्तुत लेखकाने या लेखात तसा संबंध मुळीच आणलेला नाही, ही गोष्ट वाचकांच्या सहज लक्षात येईल."

अर्थात आपण आपल्या पत्रात दोन्ही वादांचा संबंध जो जोडल्यासारखा दिसतो तो अहेतुपूर्वक आहे यात मला शंका नाही. आपण सहजगत्या केलेल्या विधानाचा आधार घेऊन मी हे स्पष्टीकरण करण्याची संधि साधली आहे इतकेच.

केंद्राच्या वादाचा समारोप करण्याबद्दल श्री. मोटे यांचे व माझे बोलणे झाले होते हे खरे; परंतु मजकडूनच लेख लिहून पाठविणे झाले नाही. काही जणांनी मला या बाबत विचारले असूनही फुरसतीच्या अभावी त्याजकडे मला दुर्लक्षच करावे लागले. केंद्रवादावरील माझ्या समारोपाची आपण देखील वाट पाहात आहा, हे कळून साश्चर्य आनंद वाटला. आपला अपेक्षाभंग माझ्याने करवत नसल्यामुळे समारोप म्हणून मी जे काय 'प्रतिभे'त लिहिले असते ते आपणास कळवीत आहे.

केंद्रवादाचा समारोप करण्याविषयी मला विशेषशी उत्सुकता राहिली नाही यास दुसरेही एक कारण होते. वादाची फलश्रुति इतकी स्पष्ट होती की ती सांगण्यासाठी ज्वनिकेतून बाहेर येण्याची जरुरी आहे असे मला वाटेना. ती फलश्रुति मला सर्वस्वी अनुकूल असल्यामुळे प्रतिपक्षाचा परामर्श घेण्याच्या दृष्टीने विशेषसे काही लिहिण्याजोगे नव्हते. माझ्या लेखाच्या विरुद्ध उपन्यास येऊन जाऊन काय तो प्रो० पोतदार यानी केला. परंतु त्यातील मुद्यांचा राजरत्न जोशी यांनी आगाऊच घेतलेला समाचार इतका झणझणीत व त्यांस आपण दिलेले उत्तर इतके समाधानकारक होते की याउपर त्याचे आणखी खंडन करीत बसण्याची काही आवश्यकता मला वाटत नाही.

एका गोष्टीबद्दल मला मोठे समाधान वाटत आहे. वाद झाला तो फार उच्च भूमिकेवरून झाला. पुण्यातील काही वृत्तपत्रातून मजविरुद्ध काहूर उठविण्याचे काही सुक्तासूक्त प्रकार झालेच. परंतु ते अपेक्षितच होते! सामान्य मनुष्यस्वभावानुसार पाहिले असता पुणेकर याहीपेक्षा मजवर उसळून उठले असते तरी ते मी गैर मानले नसते. कसेही असो, या वादाचे पडसाद प्रत्येकाच्या अंतःकरणात उठलेले जरी माझ्या दृष्टोत्पत्तीस आले तरी वर्तमानपत्रात त्याची चर्चा मर्यादित प्रमाणातच करण्यात आली. खुद्द 'प्रतिभे'तील वाद सुंदर व नमुनेदार झाला. वादाला सभावितपणाच्या उच्च भूमिकेवर ठेवण्याचे श्रेय माझ्या मते 'प्रतिभे'चे संपादक हरिभाऊ मोटे यास आहे. प्रो. पोतदारांनीही आपली बाजू सुंदर, ठसकेबाज भाषेत, अतिशय कौशल्याने व समाहित बुद्धीने मांडली याबद्दल त्यांस धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत. आजवर अनेक फड गाजविलेल्या त्यांच्यासारख्या वादचतुरास साजेसेच हे सर्व झाले.

तथापि, त्यांची बाजूच लंगडी होती त्याला ते तरी काय करणार? त्यामुळेच त्यांच्या लेखानंतर येणाऱ्या प्रत्येक लेखातून साहजिकपणेच त्यांच्या युक्तिवादातील व्यंगे उघड करण्यात आली आहेत व सरते शेवटी आपल्या लेखाने तर त्या बाबतीत काही बाकीच ठेवली नाही.

पुण्यातील संस्थांचा काही विलक्षण असर प्रो. पोतदार यांच्या मनावर पडलेला दिसतो. त्यामुळे संस्थांची महती गाण्यात त्यांच्या लेखातील बहुतेक जागा खर्ची पडलेली आहे. पुण्यातील संस्थांचे अनुकरण अजूनही चालू आहे; त्या अर्थी त्याचे केंद्रत्व कायम आहे, असे ते म्हणतात. संस्थांचा प्रसार हाच

राष्ट्राचा संसार हे सूत्र नीट धरून चालण्याचा उपदेश करितात. परंतु ही सर्व अर्धसत्ये आहेत, असे मला वाटते. संस्थामुळेहि एखाद्या शहरास केंद्रत्व प्राप्त होईल; परतु ते केव्हा, तर त्याच्या अंगी तशा तऱ्हेचे प्रेरकत्व व मध्यस्थत्व असेल तर; कर्तबगार व्यक्ती त्या संस्थाकडून आकर्षिल्या जात असतील तर. परंतु पुण्यातील संस्थांच्या अंगी असे प्रेरकत्व राहिलेले नाही, हे या वादात लिहिणाऱ्या पुण्याबाहेरील सर्व विचक्षण विद्वानाच्या साक्षीवरून सिद्ध होत आहे. म्हणजे, पुण्याबाहेरील विचारी विद्वानाच्या अनुभवास पुण्याचे केंद्रत्व येत नाही, तथापि पुण्यातील विद्वान मात्र 'पुणे हेच केंद्र' असा आग्रह धरीत आहेत, असा देखावा या प्रकरणी दिसत आहे.

आपण आपल्या लेखात प्रदर्शित केलेले सर्वच विचार माझ्या विचाराशी जुळते आहेत असे नाही. मतभेद पुष्कळच बाबतीत आहे व कित्येक बाबतीत तो बराच मूलगामी असल्याचेही आढळेल. तरी देखील केंद्राच्या प्रश्नावर आपले विचार बहुतांशी एक आहेत व ते विचार आपण दोघेही स्पष्टपणे बोलून दाखवितो ही अतिशय आनंदाची गोष्ट होय.

'महाराष्ट्राचे केंद्र नागपूर असावे, असा बनहट्टी यांनी कोठेच आग्रह धरलेला दिसत नाही,' असा स्पष्ट उल्लेख आपल्या लेखात करून आपण मला ऋणी करून ठेवले आहे. राजरत्न जोशी व श्री. दर्दे यानी याबाबत केलेला आरोप अस्थानी होता, हे खरेच; तथापि त्यानी तो निवळ गमतीदाखल केलेला असावा असेच मला वाटते. विवेचनाचा मार्मिकपणा सर्वांच्याच लेखात दिसून आला. एकंदरीत वाद मोठा नमुनेदार झाला असे मला पुनः एकवार म्हणावेसे वाटते.

या वादात एका निनावी लेखकाचे एक 'खाजगी पत्र' श्री. मोटे यानी १ मार्चच्या अंकात प्रसिद्ध केले आहे. केंद्राविषयीचा वाद यांना अगदी क्षुल्लक व बालबुद्धीचा द्योतक वाटतो. त्याना बौद्धिक करमणुकीपेक्षा या वादाचे जास्त महत्त्व वाटत नाही; त्याचप्रमाणे हा वाद बालिशपणाचाही वाटतो. या दोन्ही आक्षेपामधली सूक्ष्म दृष्टीस होणारी परस्पर विसंगति जरी सोडून दिली तरी, त्यांच्या 'खाजगी पत्रात' या दोहोंपैकी एकही आक्षेप सिद्ध करण्यात त्याना यश आले आहे असे वाटत नाही! तथापि याच्याप्रमाणेच इतर कित्येक सद्गृह-स्थनाही हा केंद्राचा वाद म्हणजे वायफळ काथ्याकूट किंवा रिकाम्या न्हाव्याचा

उपद्व्याप असे वाटते, हे मला दिसून आले आहे. यास्तव माझ्या कल्पनेप्रमाणे हा केंद्राचा प्रश्न महाराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीच्या प्रश्नाशी कसा निगडित झालेला आहे, हे स्पष्ट करून हा 'समारोप' पुरा करितो.

केंद्रस्थानाचा विचार भौगोलिक व मानसिक दोन्ही दृष्टींनी करता येईल व तसाच येथे करण्याचा विचार आहे. मराठशाहीत व पेशवाईत, मुलूखगिरी करणे हेच ज्यावेळी मराठ्यांचे मुख्य ध्येय बनले होते अशा वेळी, पुणे हे केंद्रस्थान या नात्याने फार सोईस्कर होते. उत्तरेतून दक्षिणेत येण्याच्या वाटेपासून बरेच एकीकडे असल्याने देवगिरी अथवा पैठण यांच्याप्रमाणे उत्तरेकडील स्वाऱ्यांच्या सपाट्याखाली न सापडणारे, दुर्गपङ्क्तींनी सुसज्जित असा शूर मावळ्यांचा मुलूख पाठीशी घालून त्याच्या आधारावरच जणू काय पूर्वोत्तर दिशांना आपली विजिगीषु दृष्टि वाटेल तितकी लांबवर फेकू शकणारे हे शहर आपल्या स्वभावगुणानीच पेशव्यांची राजधानी बनले. परंतु पेशवाईची अखेर होताच पुण्याच्या या भौगोलिक महत्त्वाचाही अंत झाला. लष्करी दृष्टीने पुणे हे अद्यापही महत्त्वाचे स्थळ असेल. पण त्याचे हे महत्त्व कोणाला? राज्यकर्त्यांना.

मुलूखगिरीचा अंत होऊन इंग्रजी आमदानीत परदेशी व्यापार, यांत्रिक शक्तीने चालणारे कारखाने यास महत्त्व आले. देशी मालाची उतारपेठ, आयात निर्गतीचे द्वार, गिरण्या वगैरे कारखान्यांचे मूळपीठ, या सर्व दृष्टींनी मुंबईला जे महत्त्व आहे, त्याच्या पासंगासही पुणे येणार नाही. राष्ट्रीय व्यवहाराची एवढी मोठी अंगे ज्या ठिकाणी एकत्रित झाली आहेत तेच स्थळ केंद्र म्हणवून घेण्यास पात्र ठरेल यात संशय नाही.

परंतु महाराष्ट्रातील सुशिक्षित व बुद्धिजीवी वर्गाला पुणे हे आपले केंद्र असे मानण्याची सवय काही काळ जडली होती. तिजमुळे आपले दुहेरी नुकसान झाले आहे. मुंबईमध्ये स्वसमाजाच्या बळाची जोपासना न केल्यामुळे मुंबईतील महाराष्ट्रीय समाज असंघटित व बळहीन बनून त्याची पीछेहाट होऊ लागली. व्यापार कारखाने व तदंगभूत इतर कला याकडे दुर्लक्ष झाले. बाप-दूकपणाच्या एक प्रकारच्या नशेत गुंग झाल्यामुळे आपण स्वतःचीच फसवणूक करून घेऊ लागलो. आणि याच कालामध्ये गुजराती, पारशी व इतर परप्रांतीय समाज धिमेपणाने मुंबईचे व्यापार व उद्योगधंदे तर काबीज करते झालेच, परंतु

मुंबईच्या द्वारे महाराष्ट्राच्या अंतर्भागात सर्वत्र आपल्या व्यापाराची व धंद्यांची जाळी विणावयास त्यांनी सुरवात केली. सध्याचा महाराष्ट्र अशा परप्रांतीयांनी विणलेल्या अर्थव्यवहाराच्या जाळ्यात पूर्णपणे गुनून गेलेला आहे, असे आपणास आढळेल. ही त्याची सर्वतोव्यापी प्रसरणशीलता कौतुकास्पद व अभिनंदनीय आहे. तिजबद्दल माझी तक्रार नाही. आमचे गुर्जर (व इतर) बंधु व्यापाराच्या निमित्ताने आले तरी ते बहुधा येथेच स्थायिक होतात, महाराष्ट्र भूमीतून शोधिलेल्या द्रव्याचा येथेच व्यय करितात व येथील समाजासच आपली सेवा देतात. तेव्हा राष्ट्रीय दृष्टीने यात फारसे नुकसान आहे असे नाही. तथापि खास महाराष्ट्रीय समाजाच्या दृष्टीने पाहता, मुंबई हे जे इंग्रजी अमलामधील महाराष्ट्राचे स्वभावसिद्ध केंद्र, त्या ठिकाणी आपल्या बलाची जोपासना न केल्यामुळे स्व-समाजाच्या आर्थिक व्यवहाराची वेसण दुसऱ्याच्या स्वाधीन करून त्यास कारकुनीचे अगर मजुरीचे धनी बनावे लागले आहे, हा परिणाम स्पष्ट दिसून येतो. यास इतरही कारणे असतील. परंतु केंद्राच्या प्रश्नाचा याच्याशी काही संबंध नाही, असे म्हणणे बालबुद्धीचे ठरेल.

इंग्रजी अमलामध्ये आयातनिर्गत व्यापार व यांत्रिक कारखाने यांच्या अफाट व्यवहाराचा जसा उदय झाला तशीच एका अति प्रचंड सांस्कृतिक आंदोलनासही सुरवात झाली. आंग्ल व युरोपीय संस्कृतीचे प्रवाह भारतीय संस्कृतिदुर्गाच्या प्राकारावर येऊन आदळू लागले. ते ज्या द्वाराने आपल्या राष्ट्रात घुसले ते द्वार मुंबई हेच होय. म्हणून सांस्कृतिक आंदोलनाचे व राष्ट्रीय जागृतीचे मुख्य पीठ प्रारंभी मुंबई हेच होते. पुढे या जागृतीचे स्फुल्लिंग पुण्यास आले व सुमारे १८७०–७५ पासून विचारजागृतीचे व सांस्कृतिक खळबळीचे केंद्र पुणे हेच बनले, हे मी माझ्या चिपळूणकरांवरील प्रबंधात सविस्तर रीतीने दाखविले आहे. चिपळूणकर, रानडे, भांडारकर, ज्योतिराव फुले, आगरकर, टिळक, गोखले, आपटे, इत्यादि राष्ट्र-पुरुषांनी पाश्चात्य संस्कृतीच्या प्रवाहामधील आपआपल्या प्रवृत्तीस रुचेल व मानवेल असे निरनिराळे अंश घेऊन ते राष्ट्राच्या पचनी पाडण्याचे कार्य स्थूलमानाने १८७० ते १९२० या काळात केले. या कर्मयोग्यांची कर्मभूमि मुख्यत्वेकरून पुणे हीच होती. म्हणूनच वरील काळात सांस्कृतिक व वैचारिक क्षेत्रात महाराष्ट्राचे केंद्र पुणे हे होते, असे मी म्हणतो. या काळात देखील मुंबईस महत्त्व नव्हते असे नाही. तथापि प्रभावी स्फूर्ति पुण्याची होती.

तेव्हा भौगोलिक मांडणीच्या दृष्टीने पाहता इंग्रजी अमलात व्यावहारिक व सांस्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्राचे स्वभावसिद्ध केंद्र मुंबापुरी हेच आहे, हा सिद्धांत मला तरी स्वयंसिद्ध वाटतो. सध्यातर नवीन विचारसरणीच्या प्रसाराच्या बाबतीत मुंबईचे केंद्रत्व निर्विवाद आहे. समुद्रवलयांकित सिंहासनावर पूर्वाभिमुख होऊन बसलेल्या या सम्राज्ञीचा वाम कटाक्ष नाशिक, जळगाव, अकोला, अमरावती या सामंतांवरून थेट नागपूर या महासामंतापर्यंत येऊन पोचतो; दक्षिण कटाक्ष असाच पुण्यावरून नगर सोलापूर पंढरपूर यावरून वाडी, गुलबर्ग्यापर्यंत जातो. दक्षिणेस किंचित तिर्यक अपांगप्रेक्षण केल्यास सातारा, कोल्हापूर-सांगली इत्यादि सामन्त तिच्या दृष्टिक्षेपात येऊ शकतात. तीच दृष्टि आणखी उजव्या बाजूस वळविल्यास अलिबाग-रेवदंड्यापासून तो थेट गोवा-कारवारपर्यंतचे अनेक सागरी मानकरी साक्षात् तिच्या छत्राखाली स्वव्यापारमग्न असल्याचे दिसून येते.

राष्ट्राच्या सर्वांगीण व्यवहारात मुंबईचे जे स्वभावसिद्ध प्राधान्य आहे, ते लक्षात घेता "**जंजीरे मुंबई आज आमच्या महाराष्ट्राचे मध्य व मध्यवर्ती मुख्य केंद्र करण्याची आशा बाळगताच येत नाही,**" ही प्रो. पोतदारांची वाणी कोणाही महाराष्ट्रीयास नाउमेदीची व अवसान गाळणारी वाटेल. मुंबई ही मूळची मराठ्यांची, अस्सल मराठी मुलखातला तो एक तुकडा असे असता, ते आमचे केंद्र आहे, किंवा बनावे अशी बोलण्याची हिम्मत आम्हा महाराष्ट्रीयात असू नये काय?

मुंबईच्या व्यवहारात आपले स्वभावसिद्ध स्थान प्राप्त करून घ्यावयाचे असल्यास त्यासाठी महाराष्ट्रीय समाजाने इतर समाजाशी स्पर्धा अगर कलह केला पाहिजे, असे मुळीच नाही. आपसातील एकी व इतरांशी भ्रातृभाव, याच्याद्वारेच महाराष्ट्रीय समाजाने आपले कर्तृत्व प्रकट केले पाहिजे. व्यापक व संग्राहक दृष्टि, सामोपचार, ध्येय व व्यवहार याची सांगड घालण्याचे कौशल्य इत्यादि गुण आपल्यात आणून अदम्य उत्साहाने प्रयत्न केल्यास इतर समाजांशी सहकार्य करून त्यांची प्रगति साधीत असताही आपण आपले यथायोग्य स्थान मुंबईमध्ये प्राप्त करून घेऊ, या विषयी शंका बाळगण्याचे कारण मला तरी दिसत नाही.

आणि उपरिनिर्दिष्ट गुणांची जोपासना होण्यासही मुंबई हे स्थान इतर कोणत्याही स्थानापेक्षा अधिक उपयुक्त आहे. मानसिक दृष्ट्या केंद्रवादाचे परीक्षण करता येईल असे मी म्हणतो याचा अर्थ हाच. या दृष्टीने मुंबईच्या व पुण्याच्या

मानसिक वातावरणाची तुलना आपण केलीच आहे. मला त्यात फारशी भर घालता येईल असे नाही. सडेतोडपणे बोलण्याचे सामर्थ्य आपणास आहे, मी अल्प सामर्थ्यांचा मनुष्य आहे. स्वतः निस्पृह वृत्तीने कार्य करीत असताना वाटेत येतील ते अनुभव खिशात घालून पुढे चालू लागावयाचे असा माझा क्रम आहे. शिवाय पुणे तरी आपलेच! तेथील लोक आपल्याला कोणी परके थोडेच आहेत! त्यांच्यामध्येही अनेक उत्कृष्ट गुण आहेत. संस्थारूपी साधनसंपत्तीहि त्यांनी चांगली निर्माण करून ठेवली आहे, तिचा व्यापक दृष्टीने राष्ट्रकार्यार्थ व्यय केला तर पुण्याचेच काय, महाराष्ट्राचे नाव उज्ज्वळ होईल. पुण्याची थोरवी महाराष्ट्र जाणीव नाही असे नाही. त्या थोरवीस साजेसे राष्ट्रकार्य व राष्ट्रसेवा त्यांजकडून घडली पाहिजे असे म्हणण्याच्या अखिल महाराष्ट्रास हक्क आहे.

"केंद्रस्थानाचा हा प्रश्न महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीच्या प्रश्नाशी निगडित झाला आहे", असे मी का म्हणतो हे वरील विवेचनावरून समजेल. मुंबई हेच आपले केंद्र समजून तेथे महाराष्ट्रीयांनी आपसातील एकीच्या बळावर आपली शक्ती संघटित केली तर अखिल महाराष्ट्राचे पाऊल एकदम फार पुढे पडेल, तद्वत पुण्यातील संस्थांच्या महत्त्वाच्या कल्पनेत जर तो गुंग होऊन राहील तर त्यास सध्याच्या स्थितीतच कुंचबत राहावे लागेल, अशी भीति वाटण्यास जागा आहे. मुंबईस आपले बळ बांधून जोराचा एल्गार केला तरच आपला तरणोपाय आहे.

केंद्राच्या प्रश्नाविषयीची माझी दृष्टि व्यापक व निर्विकार आहे. माझ्या वृत्तीत स्थानाभिमान नाही, उलट स्थानाभिमानाविरुद्ध मी झगडत आलो आहे, हे 'खाजगी पत्र' लेखकाच्या सहज लक्षात येऊ शकले असते. पुणेकराविरुद्ध माझा कसलाहि दावा नाही किंवा मुंबईकरांनी मला एखादी जहागीर आंदण दिलेली नाही. दोन्ही ठिकाणे, आणि तिसरे नागपूर, ही मला सारखीच प्रिय आहेत. किंबहुना, महाराष्ट्रातील यच्चयावत् स्थान व तेथील लोक मला सारखेच प्रिय व सेव्य आहेत. पुणे केंद्र असल्याबद्दलची प्रचलित समजूत बरोबर नाही व हितकर नाही (खुद्द पुणेकरांना देखील), अशी विचाराअन्ती माझी समजूत झाली तेव्हाच मी या विषयावर लिहिण्यास प्रवृत्त झालो. त्यात स्थानाभिमानाचा अगर दुसऱ्या कोणत्याही वैयक्तिक भावनेचा लेशही नव्हता व अजूनही नाही. इतर

सर्वजण—खुद्द पुणेकरही—अशाच व्यापक दृष्टीने या प्रश्नाकडे पाहतील तर माझे (व आपले) म्हणणे त्यांस पटेल, अशी मला आशा वाटते.

* * *

केंद्रवादावरील माझ्या समारोपाची आपण अपेक्षा करिता, असे जेव्हा आपल्या पत्रात वाचले तेव्हा या बाबतीत मला काय म्हणावयाचे आहे ते थोडक्यात आपणास कळवावे, असे वाटून मी उत्तर लिहावयास बसलो. परंतु लिहावयास बसलो तो मजकूर वाढू लागला. तेव्हा माझ्या मनात अशी कल्पना आली की, आपले पत्र एखाद्या लेखाइतके विस्तृत होत आहे, तर ते या वादाचा समारोप म्हणून 'प्रतिमे'त प्रसिद्ध करण्याविषयी श्री. हरीभाऊ मोटे यांस विनती केल्यास दुहेरी काम होईल, व 'प्रतिमे'च्या वाचकांपैकी जे लोक अशा समारोपाची अपेक्षा करीत असतील त्याची अपेक्षा पूर्ण केल्याचे श्रेय मिळेल. आपण व मी हरीभाऊंना विनती केल्यास ते नाकारणार नाहीत असा अजमास आहे.

बहुत काय लिहिणे, लोभाची वृद्धी व्हावी, ही विनन्ती.

आपला

श्री. ना. बनहट्टी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... नों. दि. ...

* * *

—'प्रतिभा' १५ आक्टोबर १९३६

# ४.

# वर्तनक्रमातील सुवर्णमध्य

सकाळी सात वाजता पुण्याहून मिरजेस जाण्याकरिता एक गाडी निघते त्या गाडीने मी चाललो होतो. बरोबर काही स्नेही मंडळीही होती. त्यांना साताऱ्यास जावयाचे होते. गर्दी टाळण्यासाठी जरा लौकर येऊन एंजीनजवळच्या अगदी पुढच्या डब्यात घुसून बरीचशी जागा आम्ही बळकावली होती. स्टेशनच्या अगदी समोर येणाऱ्या दोन तीन डब्यामध्ये जोपर्यंत तसूभर तरी जागा शिल्लक आहे तोपर्यंत आमचे प्रिय उतारु बांधव पुढच्या डब्यापर्यंत येण्याची तसदी घेऊन आम्हाला जागेसाठी तसदी करणार नाहीत अशी आमची खात्री होती. त्यामुळे स्टेशनामागून स्टेशने येत चालली तरी आम्ही बिनघोरपणे गप्पा मारीत बसलो होतो. आमच्या या स्वस्थतेचा भंग लोणंद स्टेशनावर झाला. एका हातात लहानशी वळकटी व एका हातात बॅग घेतलेली एका वृद्ध गृहस्थाची टेंगणीशी मूर्ती जागा पहात पहात आमच्या डब्यापर्यंत आली. व आम्हाला पाहताच आत शिरली. ती मूर्ती म्हणजे साताऱ्याचे सुप्रसिद्ध वकील श्री. दादासाहेब करंदीकर हे ओळखावयास आम्हास मुळीच विलंब लागला नाही. आमच्या पैकी काही मंडळींनी त्यांच्याबरोबर संभाषण सुरू केले व त्यांनीही मोकळ्या मनाने कित्येक महत्त्वाच्या विषयावर आपले विचार प्रकट केले. दादासाहेब साताऱ्याला उतरेपर्यंत

आम्ही त्याच्या सहवासाचा चांगलाच फायदा घेतला- इतका की, त्याच्या फराळाच्या डब्यावर हल्ला करून त्यातील स्वादिष्ट व ताज्या खाद्यवस्तूवर ताव मारणामही आम्ही कमी केले नाही. अखेर आम्ही सातारारोड स्टेशनवर त्याचा निरोप घेतला त्यावेळी आमचे हृदय भरून आले की नाही कोणास ठाऊक, परतु आमचे पोट मात्र चागलेच भरून आले होते !

वकिलीच्या धद्यातील आपल्या अप्रतिम कौशल्यामुळे ज्यानी लक्ष्मीला तिचा चचलपणा सोडावयास लावून आपली दासी बनविली आहे, अशा या वकिलाग्रणीचा तो कमालीचा साधा पोषाक, ते आपले सामान आपण वाहून नेणे, तो थर्डक्लासातील अडचणीच्या जागेतून केलेला प्रवास या गोष्टी पाहून कोणाचे मन चकित होणार नाही ! कित्येक वर्षापूर्वीपासून मी असे ऐकत आलो आहे की, दादासाहेब पहाटे उठून गार पाण्याने आघोळ करून आपले धोतर स्वतः धुऊन टाकतात, व इतरही लहान सहान कामे स्वतः करतात. स्वतःला पोटभर खायला मिळविण्याची कुवत नसताही राजाची मिजास बाळगू इच्छिणाऱ्या आजकालच्या तरुणांनी हा स्वावलबनयोग लक्षात ठेवण्याजोगा नाही काय ?

स्वावलबनयोगाचे प्रणेते गाधीजी याचे उदाहरण तर फारच विलक्षण. स्वतःचे कपडे स्वतः धुणे व सामान वाहून नेणे हे तर काय पण स्वयपाक, झाडलोट, भग्याचे काम हे सुद्धा आपले आपण केले पाहिजे असे त्याचे म्हणणे. या म्हणण्याबरहुकूम त्यांनी स्वतः आचरण करून दाखविले आहे व इतर शेकडो लोकांकडून हा वर्तनक्रम त्यानी आचरणात आणविला आहे. मध्ये काही वर्षे प्रकृतीस मानवत नसल्यामुळे तिसऱ्या वर्गातून प्रवास करणे त्याना सोडून द्यावे लागले होते, तर त्याबद्दल त्याना किती वाईट वाटत होते हे 'यग इडिया' मधून कधी कधी निघणाऱ्या त्याच्या तळमळीच्या व अनुतापाच्या उद्गारावरून स्पष्ट दिसत असे. काटकसर व हिशेबीपणा इतका की, पाटकोरे कागद उपयोगासाठी जमा करून ठेवावयाचे. हातरुमाल हारवल्यास तास न् तास त्याच्या शोधात गमवावयाचे व पै न् पैच्या खर्चाविषयी दक्ष असावयाचे ! ज्यानी केवळ मनात आणताच गजान्तलक्ष्मी हात जोडून पुढे उभी राहते अशा महानुभावाचे हे असिधाराव्रत पाहून मन थक्क होऊन जाते.

अनेक थोर पुरुषाचे अशा तऱ्हेचे जे वर्तन दिसून येते त्याच्या बुडाशी काही तत्त्वे आहेत व ती उघड आहेत. पहिले तत्त्व स्वावलबनाचे. स्वतःचे काम

स्वतः करणारा मनुष्य स्वतंत्र असतो. त्याला दुसऱ्याचा मिंधेपणा पत्करावा लागत नाही. सर्व कामे आपल्या मनाप्रमाणे चांगली होतात व शरीर व मन उद्योगात गुतलेले राहते. दुसरे अत्यत हितकारक तत्त्व अगमेहनतीची थोरवी (Dignity of manual labour) हे होय. कोणतेही काम भाडोत्रीपणा टाकून आपलेपणाच्या भावनेने व सद्बुद्धीने केले असता त्याच्यात हीनपणा बिलकूल राहत नाही. इतकेच नव्हे तर असे काम आपल्या हाताने करण्यात एक प्रकारचा विशिष्ट आनंद वाटतो. कष्टाळूपणात जे खरे सुख आहे ते गाद्यागिरद्यावर लोळणाऱ्याच्याही अनुभवास येत नाही. तिसरे तत्त्व काटकसरीचे स्वतःची सर्व कामे स्वतः करण्याने खर्च वाचतो हे तर उघडच आहे.

स्वतःची सर्व कामे स्वतः करण्याचे हे तत्त्व गाधीजीसारख्यांनी पराकोटीला नेले असले तरी आम्हा हिंदु आचार विचारांच्या लोकामध्ये ते पूर्वीपासून मुरलेले आहे. त्या तत्त्वाप्रमाणे आमचे आचरण होत नसले तरी त्याची उदात्तता आम्हास चटकन पटते व अशा तत्त्वाप्रमाणे वागणाऱ्याविषयी पूज्यभाव आपोआप आमच्या मनात उत्पन्न होतो.

पाश्चात्त्य लोकाच्या राहणीकडे व विचारसरणीकडे बघितले म्हणजे मात्र वरील तत्त्वाच्या उपयुक्ततेविषयी शका यावयास लागते. पाश्चात्त्य राष्ट्रे आज जगाच्या आघाडीस आहेत, आणि ती स्वत च्या कर्तबगारीनेच आघाडीस आली आहेत, व तेथे स्थिर राहिली आहेत, यात काही शका नाही. आपले आयुष्य अत्यत उपयुक्त, कार्यक्षम व जास्तीत जास्त उत्पादक कसे होईल याचा सूक्ष्म विचार करूनच त्यानी आपला वर्तनक्रम आखलेला आहे. त्यामुळेच प्रचड कर्तृत्वशक्ती त्या लोकांच्या अगात निर्माण झाली असून तिच्या प्रभावाने ते आज सर्व जगाला पुरे पडत आहेत व त्यांच्यापैकीच एका लहानशा बेटातील लोक आज तेहतीस कोटी हिंदवासीयांना भारी होऊन बसले आहेत.

कार्यक्षमता व उत्पादक शक्ती हे दोन गुण आपल्या अगी आणण्याकडे पाश्चात्त्य लोकाचे सर्व लक्ष असते. कोणत्याही व्यक्तीने आपल्या कायशक्तीचा व्यय अधिकात अधिक उपयुक्त अशा कामीच केला पाहिजे, हे त्याच्या वागणुकीत मुख्य तत्त्व दिसून येते. समाजाच्या किंवा व्यक्तीच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे व अधिक फलदायी असे काम करण्याचे ज्याच्या अगी सामर्थ्य आहे, त्याने कमी महत्त्वाची कामे करीत बसणे म्हणजे आपल्या उत्साहाचा व शक्तीचा अपव्यय

करणे होय असे ते समजतात. चिलटाला मारण्याकरिता तलवारीचा उपयोग करण्यासारखाच हा प्रकार होय. आपली स्वतःची धोतरे व इतर कपडे आपण धुणे, आपले अन्न आपण स्वतः शिजविणे यात वस्तुगत्या दोषात्मक असे काही नाही. प्रसंग पडलाच तर कोणताही पाश्चात्त्य गृहस्थ असली कामे करावयास मागे घ्यावयाचा नाही. परंतु कपडे धुणे अगर स्वयपाक करणे असल्या कामास फार उच्च दर्जाची कार्यशक्ती किंवा बुद्धीमत्ता लागते असे नाही. कमी योग्यतेच्या व्यक्तीकडून फार कमी मोलात ही कामे चांगल्या रीतीने करून घेता येतात. तेव्हा उच्च कार्यशक्ती ज्याच्या अंगी आहे असा मनुष्य, म्हणजे उदाहरणार्थ एखादा बॅरिस्टर, मुत्सद्दी किंवा कारखानदार कमी महत्त्वाची कामे करण्यात आपला वेळ, उत्साह कधीही खर्च करणार नाही. ज्याचे एकेक मिनिट मोहराच्या मोलाने मापले जात आहे असा बॅरिस्टर, किंवा सॉलिसिटर स्वतःचे कपडे धुण्यात व स्वतःचे अन्न शिजविण्यात तासचे तास दवडू लागला तर त्याने आपल्या वेळेचा अपव्यय केला असे होईल. कारण तोच वेळ त्याने आपल्या धंद्याचे कामकाज पाहण्यास घालविला असता तर त्याचा शेकडो पटीने अधिक फायदा झाला असता.

तेव्हा आपली कार्यशक्ती शक्य तितक्या अधिक फायदेशीर व उत्पादक अशा कार्याकडे नियोजित करणे हे पाश्चात्त्य राहाणीचे एक मुख्य तत्त्व आहे. या तत्त्वाचे दाखले आपल्या ईकडील समाजस्थितीतूनही आपल्याला काढून दाखविता येतील. मुंबईचे प्रसिद्ध वकील बापूसाहेब याना खटल्याकरिता पुष्कळ वेळा परगावी जाणे पडते. अशा वेळी ते सेकंड क्लास अगर फर्स्ट क्लास याशिवाय प्रवास करीत नाहीत. हा प्रवासाचा खर्च अर्थातच त्याच्या अशीलाच्या डोक्यावर असतो. सामान्य लोकांना हे करणे दुसऱ्याच्या जिवावर निर्दयपणे चैन करण्याप्रमाणे वाटते. परंतु वकीलसाहेबांना बाहेरगावी जाऊन लगेच एखादी गुंतागुतीची ' केस ' चालवावयाची असते, कायद्याची कलमे, पूर्वीचे निवाडे, खटल्यातील मुद्दे, पुराव्याचे पाचपेच या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून आपल्या अशिलाची बाजू सजवून दाखवायची असते व आपल्या अमोघ वक्तृत्वाचे फवारे सोडून न्यायाधिशाला गार करुन सोडावयाचे असते. हे सर्व करण्यासाठी उच्च दर्जाच्या मानसिक शक्तीची जरूरी असते. ते करण्यासाठीच त्यानी

अशिलाकडून पैसे घेतलेले असतात व आपल्या सर्व मानसिक शक्ती एकवटून अशिलाचे काम करणे हे त्या दिवसापुरते त्याचे कर्तव्य असते. मनाच्या स्वस्थतेच्या अभावी हे कर्तव्य त्याना पूर्णपणे बजाविता येईल काय ? आपल्या देशातील आगगाडीचा तिसऱ्या वर्गाचा प्रवास किती त्रासाचा व दगदगीचा असतो हे सर्वांस माहीत आहे. तसल्या त्रासाच्या प्रवासाने जर त्याचे मन शिणून गेले असले तर त्यास आपल्या सर्व मानसिक शक्ती एकवटून अशिलाचा खटला उत्कृष्ट रीतीने चालविता येईल काय ? मनाला त्रास झाला असल्यामुळे आयत्या वेळेस ते गोंधळून गेले, आपल्या पक्षाचा चांगला उपन्यास करता आला नाही व प्रतिपक्षाच्या कोट्याना प्रसंगावधान राखून चांगली उत्तरे देता आली नाहीत तर त्याचा काय उपयोग ? तिसऱ्या क्लासातून येण्याने अशिलाचे जितके पैसे वाचविले त्याच्या किती तरी पट त्याचे नुकसान केल्याचा दोष पदरी यावयाचा.

किंवा एखाद्या राजकीय पुढाऱ्याचे उदाहरण आपण घेऊ. एखाद्या मोठ्या गावी व्याख्याने देऊन जागृति करण्याकरिता, तेथील कार्यकर्त्यांना पुढील दिशा दाखविण्याकरिता व ईतर अनेक देशसेवेची कामे करण्याकरिता एक विख्यात पुढारी निघाले आहेत असे आपण समजू. त्याच्यासाठी सेकंड क्लासचा डबा ( निदान दोनतीन बर्थस तरी ) रिझर्व्ह केलेला असतो. गाडी निघण्याचे अगोदर कित्येक तास स्टेशनावर स्वयंसेवकांची हुल्लड सुरु होते. आसपासचे लोक एकमेकाशी चौकशी करित आदरमिश्रित कुतूहलाने त्या सर्व तयारीकडे बघत असतात. त्यातीलच काही कुचेष्टेखोर मंडळी आपआपसात 'यांची देशभक्ति चांगलीच फळाला आली बर का !' 'देशाची सेवा करावयाची तर मग लोकांच्या जिवावर हे सेकंड क्लासच्या प्रवासाची चैन कशी करतात !' अशा तऱ्हेचे उद्गार काढून कुजबुजत असतात. परंतु आमच्या हिंदुस्थानात खऱ्या कळकळीचे जे देशभक्त आहेत ते किती काम करत असतात व त्याना एकसारखे आपले शरीर व मन किती झिजवावे लागते याची कल्पना ज्यास आहे त्याच्या मनात वर दर्शविलेल्या तऱ्हेचे विचार कधीही येणार नाहीत. वर दर्शविल्याप्रमाणे उद्गार काढणारा मनुष्य गाडीतून तिसऱ्या क्लासाने हाल सोसून जाईल हे खरे; पण घरी पोचल्यावर यथेच्छ जेवण करुन खुशाल ताणून देईल. तो चार पाच तास झोप घेतल्याखेरीज उठणार नाही. परंतु बिचाऱ्या सेकंड क्लासमधून जाणाऱ्या देशसेवकाला अपरात्री कोठेतरी एखाद्या स्टेशनावर उतरावे लागून दहापधरा मिनिटापुरतेच व्याख्यान

घ्यावे लागेल. व पुढे मुक्कामावर पोचल्यावर व्याख्याने देणे व लोकांच्या संस्थांना भेटी देणे, लोकांच्या गाठी घेणे, पुढील कार्याची योजना ठरविणे, अनेकांच्या लहानसहान अडचणी दूर करणे वगैरे अनेक उद्योग एका क्षणाचीही विश्रांति न घेता करावे लागतील. अशा स्थितीत त्याने आगगाडीच्या प्रवासात ईतर लोकांपेक्षा जास्त सुखसोयी स्वतःसाठी करून घेतल्या ( किंवा लोकानी आपणहून त्याच्यासाठी केल्या ) तर ते गैरवाजवी ठरेल काय ?

वर वकिलाचे व देशभक्ताचे अशी जी दोन उदाहरणे घेतली, त्यांवरून वकिलीच्या धंद्यात लोकाकडून अनेक प्रकारानी जो पैसा ओढला जातो व देश-भक्तीच्या नावाखाली गर्हणीय प्रकार कोठे कोठे चालतात त्या सर्वांचे मी समर्थन करतो असे कोणी समजू नये. प्रत्येक धंद्यात गैरवाजवी प्रकाराचे अवलंबन करून आपला स्वार्थ साधणारे लोक असावयाचेच. त्याच्या संबधाने मी येथे बोलतच नाही. महत्त्वाची कामे करण्यासाठी आपले मन व शरीर अगदी ताजे राहावे व आपली कार्यक्षमता अबाधीत राहावी यासाठी क्षुल्लक बाबतीत काटकसरीचे व साधेपणाचे तत्त्व बाजूला ठेऊन शारीरिक सोयीच्या अधीन व्हावे लागते, व पाश्चात्त्य राहणीच्या तत्त्वाप्रमाणे असे वागणे हेच मनुष्याचे खरे कर्तव्य होय, एवढेच मला सांगावयाचे आहे.

पाश्चात्त्य राहणीत आणखी श्रमविभागाच्या तत्त्वाचा प्रभाव फार दिसून येतो. प्रत्येक मनुष्याने आपले कपडे धुण्यापेक्षा काही विशिष्ट लोकानी सर्व लोकाचे कपडे धुण्याचा पत्कर घेतला व धुण्याच्या व्यवसायाकडे आपली सर्व शक्ती व बुद्धी वेचून धुण्याची कला अगदी पूर्णतेस नेली तर ते किती तरी चागले ! हीच गोष्ट सर्व उद्योगास व धंद्यास लागू. या श्रमविभागाच्या तत्त्वाच्या आधारावर समाजाची घटना होऊ लागल्याने पाश्चात्य समाजात प्रत्येक व्यक्ती ही केवळ एकेक काम करणारी यन्त्रच बनू लागली आहे. एखादा टायपिस्ट असला तर तो फक्त टायपिंगचेच काम करीत राहील. तो एखाद्या भोजनगृहांत जाऊन पैसे टाकून जेवण करील, परटाच्या दुकानात जाऊन कपडे धूऊन येईल, आंघोळीच्या दुकानात जाऊन आंघोळ करील व कुठे भाड्याची खोली घेतली असेल तेथे निजेल. त्याच प्रमाणे प्रत्येक गृहस्थ आपण स्वतः एक धंदा करून बाकीच्या सर्व गरजा इतराकडून मोलानें पुरवून घेईल.

अधिक महत्त्वाच्या व अधिक फायदेशीर अशा कामाकरिता आपली सर्व कार्यशक्ती राखून ठेवणे (व बाकाची कामे इतरांकडून मोलाने करून घेणे) हेच धोरण एकदरीने श्रमविभागाच्या तत्त्वाच्याही बुडाशी आहे. कारण आपण पुष्कळ परिश्रम करून ज्या कामामध्ये पारगतता मिळविली असेल तेच काम आपल्याला इतर सर्व व्यवसायापेक्षा अधिक फायदेशीर होऊ शकेल. आणि तेच काम स्वतः करून आपली इतर कामे दुसऱ्याकडून करवून घ्यावयाची म्हणजे श्रमविभाग आलाच. "स्वे स्वे कर्मण्यभिरतः ससिद्धिं लभते नरः" असे गीतेत म्हटले आहे. त्याप्रमाणे "जे ज्याने आपले काम आखून घेतले आहे तेवढे त्याने करावयाचे आणि त्या कामातील मिळकतीच्या जोरावर बाकीच्या 'ससिद्धिचा' म्हणजे सुखसोयीचा व चैनीचा लाभ करून घ्यावयाचा" असे युरोपीय व अमेरिकन लोकांच्या वागणुकीचे धोरण असते.

परंतु गांधीप्रभृति महात्म्यांच्या स्वावलंबनाच्या, कष्टाळूपणाच्या, मनोनिग्रहाच्या शिकवणुकीशी हे युरोपीयन लोकांचे तत्त्वज्ञान कसे जुळणार? गांधी वगैरे भारतीय सतांचा व पाश्चात्त्यांचा असे हे दृष्टीकोन परस्पर भिन्न, किंबहुना विरोधी आहेत. एक म्हणतो की "स्वतःची सर्व कामे तू स्वत: कर" तर दुसरा म्हणतो, "तू ज्या कामात प्रवीण झाला आहेस व जे काम तुला सर्वांत अधिक फायदेशीर होणारे आहे तेवढेच काम कर, बाकीची कामे धंदेवाईकाकडून करून घेणे हेच तुझे कर्तव्य आहे." एक म्हणतो "एकसारखे कष्ट कर. सुखसोयींच्या व विलासाच्या अधीन होऊ नकोस, सेवा हेच तुझे व्रत आहे." तर दुसरा म्हणतो, "स्वतःच्या स्वीकृत व्यवसायात कमालीची मेहनत करून त्यापासून मिळालेल्या संपत्तीचा भरपूर उपभोग घेणे हीच तुझी इतिकर्तव्यता आहे; द्रव्यसामर्थ्याच्या जोरावर दुसऱ्याची सेवा घेणे हा तुझा हक्क आहे." तेव्हा अशा या दोन तत्त्वाच्या झगड्यात आपण कोणत्या तत्त्वाप्रमाणे व कसे वागावे असा प्रश्न विचारी तरुणांच्या मनामध्ये पुष्कळ वेळ उत्पन्न होत असण्याचा संभव आहे. एकीकडे पाश्चात्त्य राहाणीचा पगडा स्वतःवर सर्वस्वी बसलेला तर दुसरीकडे गांधींच्या व त्यांच्या अनेक तेजस्वी शिष्यांच्या धीरोदात्त कृत्यांमुळे त्यांच्याकडे मन ओढ घेत असलेले. अशा विलक्षण पेचात कित्येक तरुण सापडले असतील, यात संशय नाही. तरी वर उल्लेखिलेल्या दोन्ही प्रवृत्तींच्या गुणावगुणाचा आता आपण विचार करू.

प्रथमतः हे लक्षात ठेवले पाहिजे की, गांधीची शिकवण मुख्यतः साधकाकरता आहे. स्वतः गांधी हे मोक्षाच्या किंवा त्यांच्याच भाषेत बोलावयाचे तर सत्यान्वेषणाच्या मार्गात फार पुढे गेलेले एक साधक आहेत. व त्याच मार्गात मागाहून येऊ इच्छिणाऱ्या साधकांकरिता त्यांनी आपण स्वतः अनुभव घेतलेल्या तत्त्वांचा उपदेश केलेला आहे. आपल्या पुष्कळशा तत्त्वांचा पुष्कळ वेळा ते सर्व साधारण जनतेला उद्देशून सुद्धा उपदेश करतात हे खरे, आणि साधकांच्या उन्नतीला ज्या गोष्टी हितावह ठरल्या त्या साधारण माणसालाही हितावह ठरतील हेही खरे; तथापि सामान्य माणसाने तारतम्य बुद्धी ठेवून आपल्याला झेपेल त्या मानानेच या तत्त्वाचे अनुकरण केले पाहिजे. मोठ्या लोकांनी प्रतिपादिलेल्या तत्त्वांचेच नव्हे तर त्यांच्या आचरणातील विशिष्ट वैयक्तिक गोष्टींचे सुद्धा अनुकरण करण्याचा कित्येकांना मोह उत्पन्न होत असतो. गांधींनी फक्त पंचा नेसून राहाण्यास सुरवात केली त्याबरोबर लागले कित्येक लोक तसे करावयाला. गांधींनी कच्चे अन्न खादयास सुरवात केली लगेच त्यांच्या अंधभक्तांनी केला तोच क्रम सुरू. हा प्रकार कित्येक वेळा इतका माजतो की, खुद्द गांधींना ' अमुक अमुक गोष्ट मी वैयक्तिक कारणाकरिता करीत आहे. इतरांनी त्याचे अनुकरण करू नये " असा जाहीर इशारा द्यावा लागतो.

सामान्य मनुष्याने गांधींचा उपदेश आपली कुवत लक्षात आणूनच आचरणात आणला पाहिजे हे वर सांगितले. परंतु जो खरोखरीचा साधक आहे, मग त्याची साधना देशसेवेची असो अगर परमार्थाची असो, आपल्या साधनेच्या मार्गात सर्वस्वाचा होम करण्याची ज्याची तयारी आहे, त्याला गांधींची तत्त्वें व गांधींचा उपदेश केवल आदर्शभूत आहे हे सांगणे जरूर आहे. गांधी स्वतःची लहान सहान कामे स्वतः करतात, तासन्तास सूत काढीत बसतात. पण इतके असूनही राष्ट्रकल्याणाचे प्रचंड उद्योग करण्यास त्यांना वेळेची व उत्साहाची कधीही वाण पडली नाही. कारण साधनेचे, तपश्चर्येचे अलोट सामर्थ्य त्यांच्या अंगी आले आहे. तेव्हा जो खरोखरीच साधक असेल त्याचे गांधींच्या मार्गाने जाण्यात कल्याणच होणार आहे.

परंतु इतरांनी मात्र तारतम्यानेच आपला मार्ग चोखाळणे जरूर आहे. भंग्याचे काम तर राहोच पण सामान्य व्यवहारी मनुष्याने आपले अन्न आपण शिजवून खावे व आपले सर्व कपडे आपण धुवावे ही गोष्ट सुद्धा अमलात येणे

अशक्य आहे. इतकेच नव्हे तर जो स्वतःच्या कष्टाने मिळवून खाणारा मनुष्य आहे त्याने ऐपत असल्यास सेकंड क्लासातून प्रवास केला व घरी स्वयपाका-करता आचारी ठेवला तरी ते गैर नाही. स्वतःच्या कष्टाने द्रव्य मिळवावे न लागता ज्याला ते आयते मिळते आहे त्याने मनास वाटेल तसा खर्च करून चैन भोगणे हे मात्र अत्यत गर्ह्य होय. परतु जगात असेच खुशाल चेंडू चैन करत असलेले अधिक आढळतात. व अशाचीच चैन बोल्शेविझम वगैरे समाजसत्ता-वादाचे प्रकार देशात निर्माण करते.

आयुष्यातील आनद व उल्हास नाहीसा होईल इतके शिस्तीचे व कष्टाचे प्रमाण वाढविल्यास जीवनातील रस नाहीसा होईल. खुद्द गांधींनी आपल्या आयुष्याला आज जी विलक्षण शिस्त लाविली आहे. ती कित्येक वर्षांच्या अविरत परिश्रमाचे फळ आहे. सतत परतु हळूहळू प्रयत्न करून त्यांनी एकेक मोठी उडी मारण्याचा उतावीळपणा केला नाही. त्यामुळे त्यांचे मन व शरीर त्रस्त न होता त्यांचा उल्हास व उत्साह कायम राहिला आहे.

त्याचप्रमाणे कामाच्या महत्त्वाचे तारतम्यही व्यवहारी माणसाने राखले पाहिजे. पुष्कळ महत्त्वाच्या विषयाचे वाचन करावयाचे आहे, परीक्षेचा अभ्यास करून करावयाचा आहे; अशा वेळी बाजारात जाऊन भाजी आणण्याविषयी आणि छोट्या बाळूला शिंप्याकडे नेऊन त्याचे कपडे शिवावयास टाकण्याविषयी वहिनींची कीरकीर सुरू झाली तर धाकट्या भाऊजींनी त्यांची समजूत घातली पाहिजे व वाचन तसेच पुढे चालू ठेविले पाहिजे. वहिनींचे ऐकले पाहिजे त्याच-प्रमाणे घरचा बाजार आपण स्वतः केला पाहिजे हे खरे. भिमी मोलकरीण भाजी आणण्यास गेली तर एखादा जिन्नस वाईट घेऊन येईल, कदाचित एखादा दुसरा पैसाही कमवटीस लावील, परतु या नुकसानीपक्षा अभ्यासाची वेळ गमावल्या-मुळे होणारे नुकसान अधिक महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे दादा कचेरीतून आल्यावर जरी दमलेले असतात तरी क्लबामधे गप्पा झोडण्यात व पत्ते कुटण्यात त्यांचे जे सध्याकाळचे तीन तास खर्च होतात, त्यापैकी एक तास जर त्यांनी बाळूला शिंप्याकडे नेऊन आणण्यात खर्च केला तर फारसे बिघडेल असे नाही. अशा रीतीने वहिनींची समजूत घातल्यास आपले वाचन बिनबोभाट होईल व इतरांचा रिकामा जाणारा वेळ कारणी लावल्याचेही श्रेय मिळेल.

याच्या उलट कष्ट करण्यामध्येही एक प्रकारचे सुख व करमणूक आहे हे विसरता कामा नये. व्यवहारामध्ये साधारपणे मानसिक श्रम हे अधिक महत्त्वाचे व जास्त किंमतीचे असतात हे खरे. परंतु बरेचसे मानसिक श्रम केल्यानंतर शारिरिक कष्टाचे काम केल्यास मनाला विश्रांति मिळून ते उल्हसित होते. कॉलेजातील विद्यार्थ्यांचेच आपण उदाहरण घेऊ. पहाटेस उठून दोन तीन तास एकाग्र मनाने अभ्यास केल्यानतर आपली खोली झाडून सामान नीट नेटके लावून टेवले, स्नानगृहात जाऊन गार पाण्याने स्नान करून धोतर धुवून टाकून, एखादा विद्यार्थी पुन्हा अभ्यास करण्यासाटी आपल्या खोलीत आला तर त्याला किती उल्हास वाटेल ! याच्या उलट खोली झाडणारा गडी येऊन केरसुणीचे कसेतरी चार फराटे मारून गेला व चहा करण्यासाटी टेवलेला गडी येऊन त्याने स्टोव्ह पेटविला म्हणजे मग डोळे चोळीत जागे होऊन गड्याने केलेला चहा घ्यावयाचा; नतर टंगळमगळ करून प्रातर्विधीस जावयाचे, प्रातर्विधी आटोपल्यानतर रॅकेट घेऊन टेनिसकोर्टावर स्वारी अवतीर्ण व्हावयाची, तेथे काही खेळण्यात व काही चेष्टा-विनोदात अशा प्रकारे दोन अडीच तास घालवून जेवण्याची वेळ होत आहे असे दिसताच स्नानगृहाकडे पळावयाचे; तेथल्या गर्दीत कशीबशी आघोळ आटपून धोतराचे सोगे पुढे मागे फडफडाहेत, डोक्यावरील केस अस्ताव्यस्त रीतीने उडताहेत अशा स्थितीत धावत येऊन पानावर बसावयाचे. अशा रीतीचा कार्यक्रम विद्यार्थीवर्गास कितपत भूषणास्पद ठरेल बरे ? विद्यार्थी दशेतल्या निष्काळजी व उत्तेजित मनःस्थितीमध्ये त्याला असे अस्ताव्यस्तपणे वागण्यात एक प्रकारची गमत वाटेल हे खरे. परतु परिणामी त्याच्या मानसिक उन्नतीस असल्या आयुष्यक्रमणाने अडथळा आल्याखेरीज राहणार नाही.

याच्या उलट कष्टाळूपणाने व स्वावलबनाने मनाचे सामर्थ्य वाढते. आत्मविश्वास अंगी बाणतो. आपले सामान जर एकट्यास उचलण्याजोगे असेल तर ते स्वतः वाहून नेऊन गाडीत ठेवण्यामध्ये कोणचाही कमीपणा नाही. स्टेशनवरून गावात जाण्यास अलीकडच्या तरुणांना टांगा लागतो. व इतरही अनेक नाजुकपणाच्या सवयी त्याना जडलेल्या असतात. अशा सवयींवर रावसाहेब ना. गो. चापेकर यांनी मागे सणसणीत टीका केली होती. ती कित्येकांनी वाचली असेल. विद्यार्थीवर्गाखेरीज इतर लोकही अशा प्रकारच्या टीकेस पात्र नसतात असे नाही. माझ्या माहितीचे एक शेतकरी होते. त्यांची वडिलार्जित शेती फार असून

घरी कुणबावाही बराच होता. त्याच्या हाती कारभार आल्यानंतर सर्व कामासाठी नोकर ठेवून त्यांनी घोड्यावर देखरेखीला जाण्याचा क्रम सुरू केला. या शिलेदारी ऐटीचा परिणाम असा झाला की थोड्याच वर्षांत त्याच्या बहुतेक जमिनी गहाण पडून जवळजवळ कफल्लक होण्याची त्याजवर पाळी आली.

सर्वांत अधिक फायदेशीर व महत्त्वाच्या कामाकडेच आपल्या कार्य-शक्तीचा विनियोग करावयाचा, व बाकीची कामे श्रमविभागाच्या तत्त्वानुसार तो तो धंदा करणाऱ्या लोकांकडून करवून घ्यावयाची, हे पाश्चात्त्य वागणुकीचे तत्त्व काही एका मर्यादेपर्यंत हितावह होण्याजोगे आहे परंतु त्याचा अतिरेक मात्र मारक होईल. शिस्त आणि श्रम यांत आनंद वाटेल अशी शरीराची व मनाची तयारी व्हावी, म्हणजे उदात्त रस आपल्या जीवनात भरू लागेल. स्वावलंबनात व कष्टाळू-पणात जो आनंद आहे, तो जर आपण विसरलो व यंत्राप्रमाणे ठराविक काम करणे एवढेच आपले कर्तव्य आहे असे मानू लागलो तर आपले आयुष्य यंत्राप्रमाणेच नीरस व निर्जीव होऊन जाईल. नेहमीचे आयुष्य अशा रीतीने नीरस झाले म्हणजे कृत्रिम उत्तेजनाचा प्रकार उत्पन्न करून रस आणण्याची जरूरी भासू लागते. पाश्चात्त्य समाजामध्ये दिसून येणारे अनेक कृत्रिम उत्तेजनाचे प्रकार अशाच रीतीने उत्पन्न झाले असा तर्क केल्यास गैर होणार नाही. नाटके, सिनेमा, उन्मादक पेयांचे सेवन, रात्रीचे नाच, व त्यानंतरचे नानापरीचे विलास हे सर्व प्रकार म्हणजे दिवसाच्या केवळ व्यावहारिक आयुष्यक्रमाच्या रुक्षपणावर तिकडच्या लोकांनी उगवलेला सूडच होय असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

उत्तेजनाचे सर्व प्रकार सर्वदा गलिच्छच असतात, असे माझे म्हणणे नाही व आपल्या समाजात असे काही प्रकार चालू नाहीत असेही मला प्रतिपादन करावयाचे नाही. माझे म्हणणे एवढेच की, स्वतःची व इतरांची शक्य तितकी कामे स्वतः करून त्यात आनंद मानण्यास आपल्या मनाला शिकविले म्हणजे आपल्या नेहमीच्या आयुष्यक्रमातच इतके वैचित्र्य येते व इतके आनंदाचे प्रसंग येतात की, कृत्रिम उत्तेजनाची आपल्याला जरूरच भासत नाही. स्वतःचा विशिष्ट उद्योग सांभाळून देखील पुष्कळशी कामे करण्याइतका वेळ साधारणपणे सर्व माणसांना भरपूर सापडतो.

स्वावलंबन हे एक तप आहे आणि तप म्हणजेच सामर्थ्य होय. दुसऱ्याच्या उपयोगी पडू इच्छिणाऱ्या माणसाने अगोदर स्वावलंबनयोगाचा अभ्यास केला

पाहिजे. जो आपली कामे दुसऱ्याकडून करवून घेतो तो दुसऱ्याच्या काय उपयोगी पडणार अशा विचारसरणीने गांधीजी सत्याग्रहाश्रमात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस स्वावलंबनाची दीक्षा देतात. ※

यद्यत्परवशं दुःखं यद्यदात्मवशं सुखम् ।

'जे जे दुसऱ्यावर अवलंबून ते ते दुःखकारक व जे जे स्वतःच्या अधीन ते ते सुखकारक' हे मनूने सांगितलेले जीवनसूत्र त्रिकालाबाधित आहे.

गांधीजींसारख्यांच्या वागणुकीच्या बुडाशी केवळ वैयक्तिक जीवनानंदाचे तत्त्व नाही. स्वावलंबनाने आणि परिश्रमी जीवनाने व्यक्तीचा आनंद तर वाढतोच, आध्यात्मिक जाणिवेने आणि त्यागभावनेने केलेले श्रम आध्यात्मिक सामर्थ्य वाढविण्यास साधनीभूत होतात. पण हा केवळ वैयक्तिक विचार झाला. या प्रश्नाला सामाजिक बाजू आहे आणि तीही महत्त्वाची आहे. यासंबंधातला सामाजिक विचार जोराने व स्पष्टपणे महात्मा टॉलस्टॉयने आपल्या ग्रंथामधून प्रतिपादन करून जगातील विचारवंतांना धक्का दिला. गांधीजींच्या जीवनामध्ये हा विचार आचाररूपाने परिणत होत होता. त्याला टॉलस्टॉयच्या तात्त्विक प्रतिपादनाने दुजोरा मिळाला आणि त्यांचे सामाजिक तत्त्वज्ञान टॉलस्टॉयच्या विचारसरणीने प्रभावित झाले.

युरोपात १९ व्या शतकात यांत्रिक सुधारणा अमलात येऊन औद्योगिक क्रांति झाली, तेव्हा नवी अर्थशास्त्रीय तत्त्वे प्रचलित झाली व त्या तत्त्वांचा परिणाम भांडवलदाराच्या धनसंचयाचे, मध्यमवर्गाच्या बौद्धिक जीवनाचे आणि मजुरांच्या शरीरकष्टाचे समर्थन करण्यात होऊ लागला. रशियासारख्या देशात तर सरंजामशाही आणि औद्योगिक क्रांति या दोहोंच्या दबावाखाली श्रमिक वर्ग पिचू लागला. या सर्व परिस्थितीतून एका बाजूने कार्ल मार्क्सचा साम्यवाद व दुसऱ्या बाजूने टॉलस्टॉयचा विशिष्ट विचार उदयास आला. टॉलस्टॉयच्या विचारसरणीला सर्वत्र रूढ असलेले चटकन तोंडाशी येणारे असे नाव नाही. त्याला अहिंसावाद

---

※ प्रस्तुत लेखाचा येथपर्यंतचा भाग सामान्य वैयक्तिक पातळीवरून लिहिलेला होता त्याला सामाजिक व तात्त्विक विचारांची जोड द्यावी असे वाटल्यावरून यापुढील भाग लेखकानी मुद्दाम या पुस्तकाकरिता लिहिला

—प्रकाशक

म्हणा किंवा श्रमवाद म्हणा किंवा करुणावाद म्हणा. या तीन्ही गोष्टी त्यात आहेत त्याला नाव काहीही द्या. टॉलस्टॉय मार्क्सच्या नंतर झालेला असल्यामुळे त्याने मार्क्सच्या साम्यवादाचाही विचार केला असून मानवजातीपुढील प्रश्न अंतिम रीतीने सोडविण्यास साम्यवाद असमर्थ ठरेल असे म्हटले आहे.

भांडवलदार आपला पैसा खर्च करून उद्योग सुरू करतो व आपल्या अकलेने तो वाढवितो, तेव्हा त्यावर नफा घेऊन त्याने धनसंचय करणे व त्या धनाने उद्योगाची वाढ करून आणखी संपत्तीत भर घालणे हे योग्य आहे व बहुजनसमाजाला अधिकाधिक काम मिळत असल्यामुळे हे समाजाच्याही हिताचे आहे, हा जो धनिक वर्गाचा दावा, तो टॉलस्टॉयने खोडून काढला. तो त्यापूर्वी मार्क्सप्रभृतींनीही खोडून काढलाच होता. वस्तूचे उत्पादन माणसाच्या श्रमानी होते. समाजाची संपत्ति म्हणजे माणसाचे पुंजीभूत श्रम होत. तेव्हा भांडवलदार व जमीनदार वर्ग हा ऐतखाऊ आणि श्रमिकाची पिळणूक करणारा वर्ग होय. त्याचप्रमाणे अकलेची विचाराची व विद्येची कामे करून आम्ही समाजाच्या उपयोगी पडत असल्यामुळे आम्ही स्वतः शरीरश्रम करण्याचे कारण नाही; श्रमिक वर्गाने केलेल्या शरीरश्रमांनी आमच्या गरजा पुरवून घेण्याचा आम्हाला हक्क आहे, हा जो बुद्धिजीवी वर्गाचा दावा, तो खोटा आहे असे सांगण्याचा निर्भीडपणा टॉलस्टॉयने केला. आपला आळस, चैन आणि सुखासीनपणा यांच्यावर पांघरुण घालण्याकरिता बुद्धिजीवी वर्गाने चालविलेले हे ढोंग आहे असा त्याने, सर्व शिक्षित पांढरपेशा समाजाच्या मनाला हादरा देणारा आरोप केला.

अन्न वस्त्र निवारा आणि उत्सर्गाची विल्हेवाट ह्या माणसाच्या मूलभूत अत्यंत महत्त्वाच्या गरजा. ह्या भागविल्या जाण्यावरच माणसाचे माणूस म्हणून जगणे अवलंबून असते. आणि ह्या गरजा भागविण्यासाठीच खऱ्या शारीरिक कष्टाची आवश्यकता असते. या उपर आणखी जितक्या चैनी सुखसोयी हव्याशा वाटतील तितक्या सर्व निर्माण करण्यास अधिकाधिक जिकिरीच्या शरीरकष्टांची जरूरी लागते. आम्ही मानवजातीची विद्या कला आणि संस्कृति यांचे संवर्धन करतो या सबबीखाली या सर्व चैनींचा व सुखसोयींचा उपभोग धनिक वर्ग आणि त्याच्या आश्रयाने असणारा बुद्धिजीवी वर्ग घेत असतो. आणि मूलभूत गरजांच्या चैनी सुखसोयींच्या वस्तु निर्माण करण्याचे शरीरश्रमाचे काम श्रमजीवी

वर्गांवर लादण्यात येते. हे लादणे साजरे दिसण्यासाठी अर्थशास्त्राचे एक मोठे अवडंबर रचण्यात आले. श्रमविभागाचे तत्त्व, उपयुक्ततावादाचे तत्त्व, मागणी तसा पुरवठा हे तत्त्व अशी अनेक तत्वे पुढे करण्यात आली की ज्याच्या आधाराने श्रमजीवी लोकानी एकसारखे अधिकाधिक श्रमच करीत जावे आणि पांढरपेशा वर्गाने शरीरश्रम न करता बौद्धिक व्यवसाय करून समाजाच्या ज्ञानाची संस्कृतीची जोपासना करावी हेच अत्यंत योग्य असे ठरविण्यात आले.

पांढरपेशांचे हे अर्थशास्त्र आणि ही तत्त्वे हे सगळे ढोंग आहे; बौद्धिक व्यवसाय करून आम्ही समाजाची सेवा करतो व संस्कृतीचे संवर्धन करतो अशी सबब सांगून स्वतःची चैन व सुखासीनपणा याचे समर्थन करणे, हा फार मोठा दांभिकपणा आहे असे टॉलस्टॉयने कंठशोष करून सांगितले. कामकरी शेतकरी वर्गातला एक माणूस उत्पादित वस्तूंचा जितका उपभोग घेत असेल त्यापेक्षा शंभरपट वस्तूंचा फन्ना धनिक व पांढरपेशा वर्गातला माणूस उडवीत असतो. आणि या सर्व वस्तु निर्माण करण्याचे कष्ट शेतकरी कामकरी वर्गांवर लादले जातात. अतिरिक्त परिश्रम करून उत्पन्न केलेल्या उपभोगाच्या, आरामाच्या सर्व वस्तु सुखासीन पांढरपेशा वर्ग आपल्या ताटात ओढून घेतो आणि श्रमजीवी वर्गाच्या हाती नरोटी येऊन त्याला दैन्यावस्थेत पिचत राहावे लागते. श्रीमंत जमीनदाराचा मुलगा दिवसातून पाच वेळा कपडे बदलतो, पंचवीस वेळा साबणाने हात तोंड धुतो, आणि चारपाच वेळा सुग्रास चमचमीत अन्न अजीर्ण होईपर्यंत खातो. त्याच्या सेवेकरता नोकराचा ताफा राबत असतो आणि या सर्व वस्तूंचे उत्पादन करण्याकरिता अनेक लोकाना मरेमरेतो काम करावे लागते.

समाजातील श्रमजीवी वर्गाची ही भयानक अवस्था टॉलस्टॉयने हृदयविदारक रीतीने वर्णन केली. आणि समाजातल्या उच्चपदस्थांना बजावले की तुम्ही ज्या उच्च स्थानी आज विराजत आहा ती विलासाची अलका नसून तो ज्वालामुखी आहे. तो आत धुमसतो आहे आणि केव्हा त्याचा उद्रेक होऊन तुम्ही त्यात भस्मसात् व्हाल याचा नेम नाही.

अशी जर वस्तुस्थिति आहे, तर मग आपण काय करावे? असा प्रश्न उपस्थित करून टॉलस्टॉयने त्याचे उत्तर दिले आहे. वरील प्रश्नातील 'आपण' म्हणजे टॉलस्टॉय ज्या श्रीमंत जमीनदार ऐतखाऊ वर्गात जन्मला होता तो वर्ग. त्या वर्गाने काय करावे हे सांगण्यासाठी 'तर मग आपण काय करावे?' याच

नावाचा ग्रंथ लिहून, आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात ज्या श्रेयस्कर तत्त्वाचा साक्षात्कार त्याला झाला ते तत्त्व त्याने पुढे मांडले.

ह्या जगात जीवन ही पवित्रतम वस्तु आहे. त्याची जोपासना करणे आणि त्यासाठी जे परिश्रम करायला पाहिजेत ते करणे हे प्रत्येक माणसाचे पवित्र कर्तव्य ठरते. आपल्या जीवनाकरिता अवश्य असलेले परिश्रम आपण स्वतः न करिता, ज्या उद्योगाची उपयुक्तता समाजातील इतर बांधवांच्या अनुभवाला येत नाही असे उद्योग समाजोन्नतीकरिता करीत असल्याचा बहाणा करून जीवनावश्यक परिश्रम गरीब समाजबांधवावर लादणे हे पाप होय. तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, साहित्य, कला यांच्या डामडौली आवरणाखाली हा अत्याचार धनिक आणि बुद्धिजीवी वर्गाने आज शेकडो वर्षे चालविला आहे. बहुसंख्य जनता त्याखाली पिचत आहे. ही स्थिति पालटली पाहिजे. ती पालटण्यासाठी जीवनोपयोगी वस्तूंच्या उत्पादनासाठी समाजाचे (त्यातील बहुसंख्य श्रमजीवी वर्गाचे) जे परिश्रम चालले आहेत त्यातला बुद्धिजीवी वर्गाने आपला वाटा उचलला पाहिजे. त्याने आपली राहणी नैसर्गिक बनवून आपल्या गरजा कमी केल्या पाहिजेत. दुसऱ्याच्या श्रमावर आपण जगणे हे पाप होय. उपभोग्य वस्तूंच्या रूपाने समाजाचे जितके श्रम आपण फस्त करतो, तितके तरी प्रत्यक्ष श्रमांचे दान आपण समाजाला दिले पाहिजे. ते जर दिले नाही तर श्रमजीवी जनतेवरील बोजा वाढत जाईल आणि आपण पापाचे, हिंसेचे धनी होऊ.

टॉल्स्टॉयच्या सामाजिक तत्त्वज्ञानात आणखी पुष्कळ गोष्टी आहेत. तो अहिंसेचा पुरस्कर्ता होता, अराज्यवादी युद्धबहिष्कारवादी होता, आणखी पुष्कळ काही होता. पण त्याच्या समग्र तत्त्वज्ञानाची पाहणी इथे करीत बसण्याची जरूरी नाही. स्वावलंबन आणि शारीरिक श्रमाची आवश्यकता कोणत्या सामाजिक तत्त्वाच्या आधारे त्याने प्रतिपादिली हेच आपणाला पाहायचे होते. बुद्धिजीवी वर्गाच्या आत्मसंतुष्ट व स्वसमर्थक विचारसरणीला त्याने जोराचा धक्का दिला. शरीरश्रमाची प्रतिष्ठा (dignity of manual labour) हे तत्त्व त्याच्या आवेशी द्रष्टेपणामुळे लोकांच्या मनात ठसले व सर्वत्र रूढ झाले.

मार्क्सचा साम्यवाद सत्तेवर व हिंसेवर आधारलेला असल्यामुळे तो टॉल्स्टॉयला मान्य नव्हता. पांढरपेशा वर्गाने प्रेमाने आणि विवेकाने आपल्या जीवनात क्रांति केली पाहिजे, अशी केली तरच ती टिकेल असे त्याचे म्हणणे होते. हे

म्हणणे अर्थातच टॉलस्टॉयच्या नंतर झालेल्या लेनिन प्रभृति साम्यवादी तत्त्वज्ञांनी खोडून काढले व त्याला ' अंतराळात विहार करणारा स्वप्नाळू लेखक ' म्हणून लेबल चिकटवून दिले. धनिक व पांढरपेशा वर्गाचा श्रमजीवी वर्गावरील जुलूम टॉलस्टॉयने वर्णिला, तेथपर्यंतचा टॉलस्टॉय बरोबर—महान कलाकार व तत्त्वज्ञ, पण त्याच्यापुढचा श्रमिक राहणीचा पुरस्कर्ता अहिंसावादी टॉलस्टॉय मात्र भोळसट, स्वप्नाळू, चुकलेला, असा हिशेब लेनिनप्रभृति साम्यवाद्यांनी ठरवून टाकला.

टॉलस्टॉयचे तत्त्वज्ञान गांधीजींच्यामध्ये उतरले. या दोघा महात्म्यांचे मानसिक अधिष्ठान बहुतांशी सारखे होते. टॉलस्टॉयच्या विचारसरणीनुसार प्रत्यक्ष राहणी जशी असावयास पाहिजे तसा आकार गांधीजींच्या राहणीला त्यांच्या स्वतःच्या प्रेरणेनेच यायला लागला होता. अशात त्यांचे मन टॉलस्टॉयच्या विचारांनी प्रभावित झाले. आपल्याला हा समानधर्मा मिळाल्याचा आनंद दोघाहि महात्म्यांना झाला. टॉलस्टॉय हा महान साहित्यकलाकार आणि तत्त्वद्रष्टा होता, तर गांधीजी तत्त्वद्रष्टे संत असून चतुर व्यवहारज्ञ व राष्ट्रनेते होते. स्वतःच्या जीवनाला लागणारे श्रम स्वतः करावे, इतरांच्या श्रमावर जगू नये, हे खरे. गांधीजींनी या तत्त्वाचा सामुदायिक अमल साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमात जारी केला होता. आणि तो त्यांच्या प्रभावाने बराच काळ टिकूनही राहिला होता. यात आध्या-त्मिक साधना आणि सामाजिक क्रांति या दोहोंची बीजे होती. पण गांधीजींचे दुसरे एक व्यक्तिमत्व होते. ते राष्ट्रनेते होते; राष्ट्राला स्वराज्याप्रत नेण्याचे कंकण त्यांनी हाती बांधले होते. त्या प्रयत्नात त्यांना हजारो अनुयायी मिळत होते आणि गांधीवादी म्हणून मिरवीत होते. या अफाट अनुयायी वर्गाला परिश्रमी जीवनाचे धडे देणे शक्य नव्हते; तथापि सत्य—अहिंसा तत्त्वांचा मनाने स्वीकार करून जे स्वराज्यचळवळीत उतरले त्यांच्या शरीराला देखील आचाराची काही तरी शिस्त लावली पाहिजे असे त्यांनी ठरविले. सूत कातणे (आणि खादी वापरणे) ही गोष्ट त्यांनी आपल्या राजकीय अनुयायांना अवश्य केली. आणखीहि सफाई वगैरे काही गोष्टी सांगितल्या. श्रमजीवी वर्गाला त्यांनी दरिद्रनारायण ' या नावाने गौरविले आणि त्यांच्याशी समरस होण्यासाठी बुद्धिजीवी वर्गाने स्वत. श्रम केले पाहिजेत ही कल्पना रूढ केली. श्रमिक जीवनाचे प्रतीक म्हणून सूतकताईचा कार्यक्रम त्यांनी स्वराज्योन्मुख देशभक्तांपुढे ठेवला. निष्ठा व प्रेरणा तितकी प्रबळ असेल तर वस्त्रनिर्माणाच्या सर्व प्रक्रिया आचरा, वस्त्रस्वावलंबनाचे तत्त्व अंगीकारा,

नाहीतर निदान दोन तास सूत काता, तितकेही होत नसेल तर रोज निदान अर्धा तास तरी काता, असा दंडक त्यांनी घालून दिला.

प्रतीकांची योजना हे मानवी बुद्धीचे अत्यद्‌भुत सामर्थ्य आहे. भाषाशास्त्रज्ञ असे सांगतात की मानव प्रतीक कल्पू शकतो म्हणूनच भाषानिर्मिती शक्य झाली. प्रत्येक शब्द हा कोणत्या तरी वस्तूचे, संबंधाचे, भावाचे प्रतीक आहे. भाषेची गोष्ट सोडून दिली तरी इतर प्रतीके आपण कमी मानतो असे नाही. कमळ हे सौंदर्याचे प्रतीक मानतो. परंपरेने मनात दृढ झालेली ही समजूत सोडून मन जर कोरे केले तर कमळाच्या शेजारी उगवलेले घाणेरीचे फूल—त्याचे रंग काय कमी आकर्षक असतात ? दगडाच्या मूर्तीला आपण देवाचे प्रतीक मानतो. वास्तविक तो दगडच आहे, पण पंढरपूरच्या विठ्ठल—मूर्तीचे दर्शन घेऊन विनोबांनी म्हटले की शेकडो भगवद्‌भक्त आणि साधुसंत यांच्या अपार प्रेमभक्तीचे तेज या मूर्तीत पुंजीभूत झाले आहे. ही प्रतीकात्मकता आहे आणि तो भाव निर्माण करण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. त्या भावाने जे भारलेले आहेत अशा हजारो भक्तांच्या जाणिवेत तो विठ्ठल म्हणजे एक पाषाण हे जड सत्य येत नाही. भक्तांचे अपार प्रेम, संतांची असीम करुणा त्याचप्रमाणे विश्वाला व्यापून असणारी अचिंत्य नियामक शक्ति इथे आपल्यापुढे उभी आहे, असा भाव संचरून डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या आणि या अपार प्रेमाला आणि अचिंत्य शक्तीला आपण आपले जीवित वाहिले पाहिजे अशी ऊर्मि नाचू लागून अहंकार गळू लागला म्हणजे मग हा मी आणि हा दगड हे भान कसाला उरेल ? प्रतीकाचे हे महन्मंगल सामर्थ्य आजवर शेकडो भक्तांनी अनुभवल्याच्या स्पष्ट खुणा आज आपण त्यांच्या उद्‌गारात पाहू शकतो. इतक्या परीची नसेल पण त्या उत्तुंग शिखराच्या सुरवातीच्या चढण्यासाठी धडपडणाऱ्या अशा हजारो लाखो माणसांची बायाबापड्यांची भावनिर्भरता आपण पांडुरंगाच्या गाभाऱ्यात आजही डोळ्यांनी पाहू शकतो. तेव्हा प्रतीकाची महनीयता कमी लेखण्याचे कारण नाही. रोज अर्धा तास सूत कातण्याने काही विशेष उत्पादन होत नसेल; त्यातले काही सूत व्यर्थ जात असेल. तरीही श्रमिक जीवनाचे हे प्रतीक श्रमजीवी वर्गाशी आपले सहानुभवित्व प्रस्थापित करण्यास सहायभूत होते. लोभाच्या आणि भोगाच्या वासना गळू लागतात.

प्रतीकोपासनमुळे दंभ माजतो हा आरोप नेहमीचा आहे. गोष्ट खरी आहे.

ती आपणाला समजते आणि प्रतीकाची योजना करणाऱ्या प्रतिभावंतांना समजत नव्हती असे मानणे आश्चर्यतेचे ठरेल.

सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत् ।

याप्रमाणे दांभिक तपाचे वर्णन करणाऱ्या गीताकारापासून सर्वांनी दंभाचे अस्तित्व मान्य केले असले तरी त्यामुळे भावपूर्वक सत्कर्म करण्याचा उपदेश करण्याचे टाळले नाही. गाधीजींनी चरख्याचे जे प्रतीक सांगितले ते केवळ संकेतात्मक नसून उद्दिष्ट वस्तूचा एक अल्प अंश आहे, हा त्याचा मोठा गुण आहे. सूत कातणे म्हणजे लहान प्रमाणावर केलेले उत्पादक परिश्रम होत. शरीर-श्रम करून जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या दरिद्रनारायणाशी आत्मौपम्य निर्माण करू शकेल असा हा एक बळकट दुवा आहे. गाधीजींनी चरख्याच्या याच वैशिष्ट्यावर विशेष जोर दिला होता.

प्रतीक म्हणजे सारसर्वस्व नव्हे. प्रतीकाच्या आत कल्पिलेला भाव हा मुख्य. तोच उपयोगी व उन्नतिकारक असतो. तो भाव उत्पन्न होत नसेल तर प्रतीकोपासना ही जडतेच्या घसरणीला लागते. आणि प्रतीकाचा आश्रय न करताही जीवित भावसंपन्न होऊ शकते. उत्पादक शरीरश्रमाचे महत्त्व व पावित्र्य हा जीवन सुंदर व पूर्ण बनविणारा एक भाव आहे. न्यायमूर्ति रानडे एका कामकरी महिलेला तिची लाकडाची मोळी उचलू लागले होते अशी आख्यायिका आहे. त्यांनी कधी चरखा चालविला नव्हता; पण श्रमजीवनाशी आत्मौपम्य त्यांना साधले होते. आर्यभूषण छापखाना सुरू करताना जुन्या विकत घेतलेल्या छापखान्यातून टाइपाच्या केसी टिळक-नामजोशांनी स्वतःच्या खांद्यावर वाहून नेल्या. मृत्यूपूर्वी काही दिवस टिळक एका मद्रासी पुढाऱ्याबरोबर मोटारीतून फिरावयास गेले असता त्या पुढाऱ्याने तुम्ही एक खासगी चिटणीस का ठेवीत नाही ? असे विचारले, तेव्हा ‘ माझा खासगी चिटणीस मीच आहे ’ असे टिळकांनी हसून उत्तर दिले असली अनेक उदाहरणे श्रमजीवनाचा भाव या महान कर्मयोग्याच्या अंतरंगात कसा भिनला होता हे दर्शवितात.

तेव्हा श्रमजीवनाच्या संबंधात आत्मौपम्याचा भाव मुख्य आहे. दुसऱ्याच्या श्रमावर जगणे पाप आहे असे टॉल्स्टॉय म्हणाला. गाधीजींनी आपल्या सत्याग्रहाश्रमात एक शेती सोडून बाकीचे सर्व उत्पादक श्रम आश्रमवासीयाकडून

आचरविले. पण आता परिस्थिति फार बदलली आहे व उत्तरोत्तर झपाट्याने बदलत आहे. या बदलाचे मानवी जीवनावरील परिणाम आपण लक्षात घेतले पाहिजेत. आधिभौतिक शास्त्राच्या व यांत्रिक सुधारणाच्या प्रथमावस्थेत श्रमजीवी वर्ग आणि धनिक व बुद्धिजीवी वर्ग याच्यामधील वैषम्य अधिक वाढले, श्रमिकाचे कष्ट वाढून तो त्यात पिचत चालला आणि बुद्धिजीवी धनिक अधिक श्रीमंत चैनी सुखासीन बनला. हीच परिस्थिति कडेलोटाला गेलेली मार्क्स व टॉल्स्टॉय यांच्या नजरेसमोर होती व तिच्या आधारे त्यानी आपली परस्परविरोधी तत्त्वज्ञाने मांडली. पण त्यानतर परिस्थिति बऱ्याच वेगाने बदलू लागली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सहकार्यवाद, उदारमतवाद, साम्यवाद, अहिंसावाद, अशी अनेक सामाजिक तत्त्वज्ञाने उदय पावली. एका बाजूने मजूर वर्ग अधिकाधिक जागरूक, सघटित व आक्रमक बनत गेला, तर दुसऱ्या बाजूने धनिक बुद्धिजीवी वर्गाचाही दृष्टिकोन बदलला. श्रमजीवी वर्गाचे उत्पन्न, शिक्षण व जीवनमान वाढले; कामगारवर्गात नेतृत्व उत्पन्न होऊन त्याचा प्रभाव देशोदेशीच्या सरकारांवर पडू लागला आणि धनिक वर्गाच्या धनसचयावर आणि निरंकुशतेवर कठोर आघात होऊन तो पुष्कळ नमविला गेला. अमेरिकेतील सयुक्त सस्थाने, कॅनडा, आणि युरोपातील लोकशाही राष्ट्रे याच्यामधील आजघटकेची लोकस्थिति जर आपण पाहिली तर धनिक वर्ग आणि श्रमिक वर्ग याच्या जीवनमानातील, सुखसोयींमधील अंतर पूर्वीच्या पेक्षा पुष्कळ कमी झालेले दिसून येते. कंगाली व दैन्य यांची पाश्चात्य देशांतून आता जवळजवळ हकालपट्टी झाली आहे. सुरक्षितता आणि सुबत्ता याचा सचार समाजाच्या खालच्या थरापर्यंत होऊ लागला आहे.

श्रमजीवी वर्गाची परिस्थिति सुधारण्याला उदार तत्त्वज्ञान, मजबूत सघटना आणि प्रभावी नेतृत्व ही कारणे तर आहेतच; पण वैज्ञानिक प्रगति आणि यांत्रिक सुधारणा यानी श्रमजीवनाचे स्वरूपच मुळी पालटून टाकले आहे. अन्नोत्पादन, वस्त्रनिर्माण आणि मलमूत्रादि घाणीचा निकाल या तीन्ही बाबतीत भौतिक व यांत्रिक सुधारणेने आजच एवढा पल्ला गाठला आहे की शरीर पिचविणाऱ्या जिकिरीच्या अथवा घृणास्पद कष्टाची काही जरुरी राहिलेली नाही. अमेरिकेत व युरोपीय देशात शेतीच्या सर्व प्रक्रिया यंत्राने होतात. मार्क्स टॉलस्टॉय याच्या काळात दगडी कोळशाच्या उष्णतेने निर्माण होणारी वाफ ही एकच नैसर्गिक

शक्ति उपलब्ध होती. ती निर्माण करणे फार जिकिरीचे व खटाटोपाचे होते. कारखाने थोडे असल्यामुळे कामगाराना बारा बारा चौदा चौदा तास राबावे लागे. आता खनिज तेल, वीज व अणु या नैसर्गिक शक्तींना शास्त्रज्ञानी कामाला लाविले असल्यामुळे शक्तीची विपुलता झाली आहे. यंत्रविद्या इतकी पराकोटीला गेली आहे की हरएक कामासाठी शक्तिचालित यंत्र बनविण्यात आले आहे. कळ दाबणे किंवा दांडा फिरविणे एवढेच काम माणसाला उरले आहे. आवश्यक, उपयोगी, आरामाच्या व चैनीच्या वस्तूंचे उत्पादन इतके प्रचंड प्रमाणावर होऊ लागले आहे की कामगारानी फार काळ काम करण्याची जरुरी राहिलेली नाही. अर्थात कामाचे तास कमी झाले व त्यातील कष्ट, क्लेश हेही कमी झाले. बटन दाबले की गाडाभर कपडे धुवून निघतात, शेतात पाणी धोधो वाहू लागते किंवा गिरणीत मागाचा सच चालू लागतो.

परिणाम असा झाला आहे की पाश्चात्य देशातून श्रमिक वर्गाची 'पिळणूक' जवळ जवळ नामशेष झाली आहे. श्रमिक वर्गाच्या संघटित सामर्थ्यामुळे पिळणूक करणे अशक्य होऊ लागले हे जितके खरे, तितकेच वैज्ञानिक व यांत्रिक प्रगतीमुळे पिळणुकीला स्थान उरले नाही हेही खरे. अमेरिका व युरोपातील पुढारलेली राष्ट्रे आज या स्थितीला पोचली आहेत व उत्तरोत्तर या स्थितीत सुधारणा होत आहे. भारत आणि आफ्री-आशियाई राष्ट्रे (जपानखेरीज) फार मागे आहेत, पण ती या दिशेने वाटचाल करीत आहेत व केव्हा तरी या अवस्थेला पोचणार आहेत. तसे करणे त्यांना भागच आहे. त्याचा मोहरा उलट दिशेला फिरणे शक्य नाही.

वैज्ञानिक आणि यांत्रिक सुधारणामुळे आणखी एक चमत्कार झाला आहे. बौद्धिक जीवन आणि श्रमिक जीवन यांच्या स्वरूपातील अंतर कमी होऊन एकमेकांची गल्लत होऊ लागली आहे. आधुनिक काळात सूक्ष्म मोजमापानुसार यंत्रे बनविणे, ती चालविणे, ती दुरुस्त करणे व राखणे हा श्रमजीवनाचा मुख्य प्रकार बनला आहे. या सर्व कामामध्ये हातापायांच्या श्रमाची जितकी जरुरी असते तितकीच अकलेची जरुरी असते. पूर्वीचा बैलगाडीहाक्या आता मोटार ड्रायव्हर बनला; बैलांना वैरणपाणी करणे, त्याना गाडीला जुपणे आणि लगामाच्या दोऱ्या खेचणे वा सैल सोडणे, या कामापेक्षा मोटर चालविणे, इंजिनाला वेळेवर तेलपाणी

देणे व त्याची किरकोळ दुरुस्ती करणे ही कामे खात्रीने अधिक अकलेची आहेत. आजचा श्रमजीवी हा अर्धामुर्धा बुद्धिजीवी असतो.

परिस्थिती जर इतकी उत्क्रांत झाली आहे व अशीच पुढे होणार आहे, तर टॉल्स्टॉय गांधी यांचा श्रमजीवनाचा उपदेश आता गैरलागू ठरावा असे वाटेल. श्रमजीवनाचे जे स्वरूप या महात्म्यांनी संकल्पिले आणि आचरणात आणण्याचा प्रयत्न केला, ते जरी काहीसे गैरलागू ठरत असले तरी त्याच्या बुडाशी असलेले तत्त्व अबाधित आहे, अबाधित राखले पाहिजे. कापूस वटणे, पिंजणे, सूत कापणे, वस्त्र विणणे, धान्य निवडणे दळणे शिजविणे, भांडी घासणे धुणे ही कामे बुद्धीजीवी वर्गाने नित्य स्वतः करणे आणि या प्रकारे श्रमिक वर्गाशी आपले तादात्म्य स्थापित करणे, याची काही जरूरी नाही. अशा तऱ्हेचे जे प्रयोग झाले ते टिकले नाहीत, त्याचा प्रसार झाला नाही. मानवाच्या गतीच्या विरुद्ध असल्यामुळे ते टिकणे शक्य नव्हते. मग काय टिकणे शक्य आहे आणि काय टिकविले पाहिजे ?

टिकविला पाहिजे श्रमजीवनाचा भाव. आज श्रम कितीही हलके झाले असले, तरी श्रम हा जीवनाचा मूलाधार आहे हा सिद्धान्त अबाधित आहे आणि तो पुढेही अबाधित राहणार आहे. यंत्रे जरी मदतीला असली तरी मनापासून चांगले श्रम केल्याशिवाय आजही धरतीमाता चांगली फळत नाही. तसेच श्रमजीवी वर्गाचे जीवन कितीही सुखी व उन्नत झाले असले तरी श्रमजीवी आणि बुद्धिजीवी वर्गाच्या जीवनातील वैषम्य काही प्रमाणात व काही परींनी कायमच राहणार आहे. काही श्रमिकांना कामगारांना बुद्धिजीवी वर्गातल्या काही श्रेणींपेक्षा पैसेही जास्त मिळत असतील. तरी देखील दोघांच्या जीवनात ठळक रीतीने उठून दिसण्याइतके वैषम्य असते व राहणार. तव्हा स्वतःच्या विशुद्ध आनंदासाठी, उन्नत जीवनासाठी आणि सामाजिक दृढतेसाठी बुद्धिजीवी वर्गाने श्रमजीवनाचा भाव कायम टिकविला पाहिजे.

श्रमजीवनाचा भाव म्हणजे काय ? टॉल्स्टॉय तर बुद्धिजीवी लोकांना तुच्छ करून श्रमिकांना श्रेष्ठ मानतो. तो दुसऱ्या बाजूला जरा जास्त झुकला. गीताकारांनी या बाबतीत समतोल राखलेला दिसतो. ' विद्याविनयसंपन्न ब्राम्हण (उच्च बौद्धिक काम करणारा ज्ञानी पुरुष) आणि चाण्डाल (अत्यंत हीन मानलेले काम करणारा श्रमिक), यांना जाणते लोक सारखे लेखतात ' (भगवद्गीता ५.१८). याच सदर्भात

गीताकारानी घालून दिलेले दुसरे सूत्र ‘आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति’ (भ.गी. ६.३२) हे आपल्या लक्षात येते. ‘जसा आपला आत्मा, तसाच दुसऱ्याचाही आत्मा आहे’ अशी जाणीव असणे म्हणजे आत्मौपम्य. आत्मौपम्यामुळे समत्व-भावना निर्माण होते. श्रमिकाविषयी समत्वभावना, उत्पादक व उपयुक्त शरीर-श्रमाबद्दल आदर, स्वावलंबन म्हणून किंवा इतराना मदत म्हणून केव्हाही श्रम करण्याची मनाची तयारी—या सर्व गोष्टी एकत्र मिळालेल्या म्हणजे श्रमजीवनाचा भाव होय. हा भाव सदोदित जिवंत ताजा राखण्यासाठी प्रतीकांचा अवलंब करणे उपयुक्त ठरते. पण प्रतीकामुळे संप्रदाय बनू लागला किंवा दंभ माजू लागला तर इष्ट नाही. त्याग प्रेम या भावनानी मधुर बनलेली ही एक जीवनदृष्टी आहे. ती ज्याने प्राप्त करून घेतली त्याच्या वृत्तीतून, बोलण्याचालण्यातून ती प्रकट झाल्या-खेरीज राहत नाही. असा मनुष्य दादासाहेब करंदीकराप्रमाणे तिसऱ्या वर्गाने प्रवास करो न करो, रोज स्वतःचे धोतर धुवो न धुवो, तो रानड्यांप्रमाणे नडलेल्या बाईची मोळी उचलून देण्यास धावेल, प्रसंग पडताच ओझी उचलण्यासाठी त्याचा पाय पुढे असेल, मानवजीवनात जिथे कष्ट दिसतील तिथे ते हलके करण्यासाठी त्याचे मन उत्सुक असेल. ही जीवनदृष्टी ज्याच्या ठायी भिनली त्याला वर्तनक्रमातील सुवर्णमध्य साधला, किंबहुना जीवनाचे सुवर्ण करण्याचा परीस त्याला गवसला असे म्हणण्यास चिंता नाही.

* * *

—पूर्वार्ध, प्रथम प्रसिद्धी ‘किर्लोस्कर’,
नोव्हेंबर, १९३०.
उत्तरार्ध, डिसेंबर १९६२.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 23068

५.

# लेखक-प्रकाशक-संबंध

लेखकाच्या दृष्टीने लेखन हे धनोत्पादक कसे होईल, याविषयी बरीचशी चर्चा अलीकडे होऊ लागलेली आहे, हे एक सुचिन्हच म्हटले पाहिजे. तीन वर्षांपूर्वी गोवे येथील साहित्यसम्मेलनात प्रस्तुत लेखकाने याच विषयावर एक निबंध वाचला, व त्यावर बराचसा वादविवादही झाला. त्या निबंधात लेखकांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्याकरिता एक 'लेखकसंघ' स्थापावा अशी सूचना केली होती; व बादाअंती ती सूचना मान्य होऊन, खुद्द सम्मेलनाचे अध्यक्ष श्री. वामनराव जोशी यांनी तिला जोराचा पाठिंबाही दिला होता. प्रस्तुत लेखकाने त्या बाबतीत व्यक्तिशः पत्रव्यवहार करून बराच प्रयत्न नंतर केला. परंतु संघ स्थापण्याच्या दिशेने विशेष प्रगती होण्याचे लक्षण दिसेना. तेव्हा तो प्रयत्न तसाच सोडून देणे भाग पडले.

त्या गोष्टीस जवळ जवळ तीन वर्षे लोटली. मध्यंतरी 'नवभारत ग्रंथमाले'च्या द्वारे प्रकाशनकार्याशी प्रस्तुत लेखकाचा बराचसा संबंध येण्याचा योग आला. गोव्याच्या सम्मेलनाच्या वेळी लिहिलेल्या लेखात जो तपशील व जे आकडे दिले होते, त्यात बराचसा बदल केला पाहिजे, असे प्रकाशनकार्याच्या अनुभवावरून सिद्ध झाले. तथापि त्या

लेखात प्रतिपादिलेले तत्त्व अढळ आहे व असले पाहिजे, ही भावना या अनुभवावरून उलटी दृढच झाली. ते तत्त्व म्हणजे हेच, की लेखन जर योग्य ती किंमत घेऊन बाजारात विकले जाते, तर त्या विक्रीच्या उत्पन्नातील काही ना काही तरी हिस्सा लेखकास मिळाला पाहिजे. या तत्त्वानुसार 'नवभारत ग्रंथमाले'ने आजवर आचरण केले असून, खुद्द संपादकाच्या ग्रंथाशिवाय इतर सर्व ग्रंथांना देता आला तितका मोबदला दिला आहे.

आता अलीकडे कोल्हापूरच्या सम्मेलनाच्या प्रसंगाने या वादास पुनः चालना मिळालेली दिसते. या खेपेस लेखकांस आपल्या पुस्तकाबद्दल मोबदला पुरेसा मिळत नाही, अशी तक्रार लेखकातर्फे श्री. वा. म. जोशी व श्री. ग. त्र्य. माडखोलकर यांनी केली असून त्या तक्रारीस श्री. मंगेशराव कुळकर्णी यांनी प्रकाशकातर्फे उत्तर दिले आहे. प्रस्तुत लेखक हा

कवयः कालिदासाद्याः कवयो वयमप्यमी ।
पर्वते परमाणौ च पदार्थत्वं प्रतिष्ठितम् ॥

या न्यायानेच का होईना, लेखकमंडळीत जमा होण्याजोगा असून, एका प्रकाशन-संस्थेशी त्याचा संबंध आहे. तेव्हा दोघांच्याही अडचणी व हितसंबंध अजमावण्याची काहीशी दुर्मिळ संधी त्यास मिळालेली आहे. ही गोष्ट लक्षात घेऊनच की काय, काही मित्रांनी प्रस्तुत लेखकास स्वतःचे या संबंधीचे विचार व अनुभव प्रसिद्ध करण्याचा आग्रह केला. त्यामुळे, व त्यास स्वतःसही आपले या विषयावरील विचार कदाचित उपयुक्त ठरतील असे वाटल्यामुळे, ते निवेदन करण्यास तो प्रवृत्त होत आहे.

श्री. माडखोलकर व श्री. वामनराव जोशी यांनी पुढे मांडलेल्या तक्रारी दोन प्रकारच्या आहेत. एक तक्रार म्हणजे प्रकाशक हे लेखकाशी अप्रामाणिकपणाने व बेपरवाईने वागतात, ही होय. दुसरी तक्रार, प्रकाशक लेखकांस मोबदला पुरेसा देत नाहीत, ही. या दोन्ही तक्रारींचा एकमेकाशी घोटाळा न करिता त्या दोन्ही पृथक ठेवूनच त्यांचा विचार केला पाहिजे. कारण या दोन्ही तक्रारींची कारणे, त्यांचे स्वरूप, त्यांचे परिणाम वेगवेगळे आहेत.

पहिली तक्रार प्रथम विचारासाठी घेऊ. सारखी सामाजिक परिस्थिती व समान कायदेशीर हक्क असलेल्या दोन व्यक्तींमध्ये स्वेच्छेने होणाऱ्या व्यवहारात जर एक व्यक्ती दुसरीला फसवू लागली, तर त्यापैकी फसवणारी व्यक्ती ही तर

दोषार्ह ठरतेच; परंतु फसणारा मनुष्य हा तरी असा का फसतो, हा प्रश्न कोणाच्याही मनात उपस्थित झाल्याखेरीज राहत नाही. समाजात इतर अनेक व्यवहार जे चालतात, त्यात काही व्यक्ती जशा फसतात, तशा याही व्यवहारात कोणी कदाचित फसत असतील. त्यासाठी उपाय म्हणजे प्रत्येकाने आपल्या हिताविषयी जागरूक राहावे, हाच !

परतु, हे फसवेगिरीचे प्रकार वैयक्तिक व तुरळक नसून, प्रकाशकांचा वर्गांचा वर्ग 'लेखक' ह्या वर्गाला फसवू पहात असतो, व लेखकवर्ग बिचारा असहायपणे प्रकाशकांच्या कुटिलपणाला बळी पडत असतो, असे प्रतिपादन करण्याचा श्री. माडखोलकर प्रभृतींचा रोख दिसतो. 'शेकडा नव्वद लेखकाची तरी प्रकाशकानी फसवणूक केल्याचे सिद्ध होईल', असे श्री. माडखोलकर म्हणतात. अशा तऱ्हेची विधाने मात्र एकांगी व अत्युक्तिपूर्ण होत असे मला वाटते. प्रकाशकाचा वर्गांचा वर्ग फसवेगिरी करणारा आहे असे प्रतिपादन करणे, म्हणजे लेखकाचा वर्गांचा वर्ग केवळ बोळ्याने दूध पिणारा आहे, असे म्हणण्यासारखे आहे. परतु वस्तुस्थिती तशी नाही, असणे शक्य नाही. महाराष्ट्रातल्या सर्व प्रकाशकांनी आपणाला लेखकाच्या विषयी आलेले अनुभव जर मोकळ्या मनाने निवेदन केले, तर त्यात साधुवृत्तीच्या तुकारामबुवाचीच चित्रे सर्वत्र दृष्टीस पडतील, असे लेखकांचा कैवार घेऊन भांडणाऱ्यानी समजू नये. व्यवहारविमुख ध्येयनिष्ठा, निष्कपटपणा, साळसूदपणा वगैरे गुणांचा मक्ता काय तो लेखकाकडेच आहे आणि बहुतेक प्रकाशकानी मात्र पापाने पाय धुतले आहेत, असे लेखकांनीच प्रतिपादन करणे, म्हणजे इसापनीतीतील 'सिह आणि मनुष्य' या गोष्टीतील न्यायास अनुसरणे होय. प्रकाशकांचे तोंड मोकळे सोडले तर त्यातून कोणत्या गोष्टी बाहेर पडतील याची कल्पना देखील माडखोलकरासारख्या उदारहृदय सद्गृहस्थास व्हावयाची नाही. पण ते तोंड मोकळे आहे कुठे ? कारण लेखक–प्रकाशकाच्या व्यवहारात साधारण नाव मिळविलेल्या लेखकांच्या बाबतीत प्रकाशक हाच गरजू असतो. मोठे भाडवल खर्च करून तो धदा मांडून बसलेला असतो. त्याच्या धद्याचा मूळ आधार जे लेखक त्यास दुखविण्यास तो धजत नाही.

कायद्याच्या दृष्टीने जरी अप्रामाणिक न ठरले, तरी सभावित सद्गृहस्थाच्या व्यवहारात जे अप्रामाणिकपणाचे ठरतील असे व्यवहार लेखकाच्याकडून अगदीच होत नसतील असे का माडखोलकरांना वाटते ? इतर गैरशिस्त प्रकार

तर राहोतच, पण एकदा कबूल केलेली गोष्ट पुढे नाकबूल करून प्रकाशकाला पेचात टाकण्याचे व्यवहारकौशल्य दाखविणारे महाभागही लेखकवर्गात असू शकतात.

लेखकवृंद म्हणजे इथून तिथून स्वार्थी चाणक्यांचीच टोळी आहे, असे माझे मुळीच म्हणणे नाही. परंतु आपली बाजू निष्कलंक आहे अशा विश्वासात दुसऱ्या बाजूवर जेव्हा गैरवर्तणुकीचे व्यापक आरोप केले जातात, तेव्हा आरोप करणाऱ्यांच्या बाजूला काय काय प्रकार घडत असण्याचा संभव आहे, याची जाणीव त्यास करून देणे प्राप्त होते. एरवी लेखकवर्गावर, किंवा त्यातील विशिष्ट व्यक्तींवरही काही आरोप करून त्यांचे उणे दाखवावे असा माझा हेतु नसून, उभय पक्षांत पूर्ण सलोखा नांदावा हीच मनापासूनची इच्छा आहे. वर वर्णिलेल्या प्रकारची 'रत्ने' ही कदाचित कोठे असली तरी ती खरोखरीच 'गाळीव' म्हणजे अपवादभूत रत्ने ठरतील. सर्वसामान्य लेखकवर्ग हा स्वतःच्या हक्काविषयी जागरूक परंतु उदार व समंजस असाच आहे. लेखकानीच काय परंतु समाजातील सर्वच व्यक्तींनी असे असावे. वाङ्मयाच्या द्वारे समाजास शिक्षण देणाऱ्या लेखकवर्गावर तर या बाबतीत विशेषच जबाबदारी येऊन पडते. सध्याच्या पिढीत श्री. मंगेशराव कुळकर्णी हे जसे महाराष्ट्राला ललामभूत झालेले प्रकाशक आहेत तसेच पूर्ण व्यावहारिक दृष्टीचे परंतु अत्यंत उदार, सहृदय व समंजस असे लेखकही पुष्कळ आहेत. अशा लेखकांच्या आधारावरच 'नवभारत ग्रंथमाला' चालली असून, त्यांच्याशी मालेचे संबंध पूर्ण सलोख्याचे आहेत व पुढेही राहतील, असा आमचा विश्वास आहे.

तेव्हा मनुष्यस्वभाव सगळीकडे सारखाच आहे ही गोष्ट लक्षात ठेवून लेखकांनी प्रकाशकवर्गाविरुद्ध ओरड करण्याचे सोडून द्यावे. स्वतः काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्याच्या घरावर गोटमार करू नये. प्रकाशक लेखकाला ज्यात फसवू शकेल, किंबहुना फसविण्याचा त्याला मोह पडेल, अशी एकच बाब असते. ती म्हणजे ठरावापेक्षा जास्त प्रती काढण्याची. कित्येक मुद्रकही असा प्रकार करतात असे ऐकिवात आहे. हा प्रकार नीतीच्या दृष्टीने जितका निंद्य, तितकाच व्यवहाराच्या दृष्टीनेही मूर्खपणाचा ठरण्याचा संभव असतो. अधिक प्रती काढून त्या पडून राहिल्यास त्याच्यासारखी आतबट्ट्याची गोष्ट प्रकाशकास दुसरी कोणतीही नसते. तेव्हा अधिक प्रती काढण्याची ही लबाडी लोकप्रिय ग्रंथकारांच्या लोकप्रिय

ग्रथासबधानेच घडत असली तर असेल. आणि ती देखील एखाद्याच प्रकाशकाच्या हातून क्वचित घडत असेल. या बाबतीत जरूर तो बदोबस्त अशा ग्रथकारांनी केल्यास त्यास कोणीही दोष देणार नाही. 'लेखकसघ' स्थापन करण्याची सूचना या लेखाच्या शेवटी मी करणार आहे; ती अमलात आल्यास तिच्यामार्फत देखील अशा गैरशिस्त प्रकाराना आळा घालण्याचे काम करता येण्याजोगे आहे.

परतु येवढ्या गाजावाजास कारणीभूत झालेल्या प्रकाशकाच्या ह्या आगळिकी-शेजारी लेखकाकडून घडत असलेल्या आगळिकी जर आणून बसविल्या, तर त्या तुलनेत काय निष्पन्न होईल? ठरलेल्या वेळेवर ग्रंथ न देणे, व नंतर एकदम सगळी हस्तलिखित प्रत न देता थोडथोडा मजकूर प्रकाशकाच्या अगावर फेकणे ह्या आगळिका आजपर्यंत कोणत्या ग्रथकाराच्या हातून घडलेल्या नाहीत? त्यामुळे प्रकाशकाचे किती नुकसान होते याचा कोणी विचार केला आहे काय? ठरलेल्या सख्येपेक्षा अधिक प्रती काढल्याने काही थोड्याशा ग्रथकारांचे जे नुकसान झाले असेल त्यापेक्षा ग्रथकारांच्या ह्या अनियमितपणाने प्रकाशकाचे अनेकपटींने अधिक नुकसान होत असेल. पण त्याची कदर कोण करतो? आता ग्रंथकाराकडून या गोष्टी हेतुपुरस्सर होत नसतील हे खरे. परतु उलटपक्षी प्रकाशकावर हेतूचा आरोप लादण्यास तरी काय पुरावा आहे? तसा आरोप करण्यास काही आधार नाही, असे श्री. वामनराव जोशी यांनी स्पष्ट कबूल केले आहे. कोणाच्या पोटात कोणी शिरू शकत नाही, यास्तव हेतूचा आरोप उभयपक्षीही न केलेला बरा. आगळीक घडते की नाही व त्यामुळे उलट बाजूचे नुकसान होते की नाही, एवढाच प्रश्न मुद्याचा समजावा व त्याचाच विचार व्हावा.

तेव्हा, मनुष्यस्वभाव जोपर्यंत आहे तसाच आहे, तोपर्यंत फसवेगिरीचे, अनियमितपणाचे, अतिरिक्त स्वार्थीपणाचे व मत्सरप्रेरित कारवायांचे प्रकार उभय-पक्षी कोठे कोठे चालावयाचेच; त्याबद्दल कोणाही एका पक्षाने दुसऱ्याविरुद्ध तक्रार करीत बसण्यात फायदा नाही.

आता लेखकास मोबदला पुरेसा मिळत नाही, ही जी दुसरी तक्रार तिला समर्पक व चोख उत्तर माझे मित्र श्री. मगेशराव कुळकर्णी यानी दिलेच आहे. परतु या बाबतीत श्री. माडखोलकर यानी तपशीलवार विधायक सूचना करून फार मोठी कामगिरी बजावली आहे. अत्यत आनदाची गोष्ट ही की त्यानी लेखक-प्रकाशकांमधील कराराची जी योजना स्वयस्फूर्तीने पुढे मांडली आहे, ती

'नवभारत ग्रंथमाले'ने ग्रंथकारासाठी साधारणपणे ठरविलेल्या मोबदल्याच्या प्रमाणाशी व इतर तपशिलाशी बहुतेक बाबतीत ततोतंत जुळते. समजसपणाने व सहकार्याच्या बुद्धीने प्रवृत्त झाल्यास, लेखक व प्रकाशक यांचे विचार परस्पराशी जुळते होऊन वादाचे मूळच कसे नाहीसे होते याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

तेव्हा ग्रंथकारास मिळणारा मोबदला अपुरा आहे, ही ओरड सध्याच्या घटकेस तरी अप्राप्तकाल आहे. प्रकाशकाची स्थिती सध्या किती हलाखीची आहे हे श्री. मंगेशराव कुळकर्णी यांनी ता. २६ जानेवारी १९३३ च्या 'सकाळ'च्या अंकात लिहिलेल्या लेखामध्ये निवेदन केलेच आहे. महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या प्रकाशकाची ही स्थिति! मग छोटेखानी प्रकाशकाची किती दैना असेल? अशा स्थितीत लेखक लोक जर प्रकाशक जितका देऊ शकतात त्यापेक्षा जास्त मोबदल्याचा हट्ट धरून बसले, तर प्रकाशकाना आपल्या नावाच्या पाट्या उलट्या करून कचेऱ्यास टाळी ठोकून परागंदाच होणे भाग पडेल! लेखनावर उपजीविका करणाऱ्या व्यक्ती महाराष्ट्रात आज हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या तरी आढळतील. परंतु निव्वळ प्रकाशनावर उपजीविका करणारा असा एकही प्रकाशक दाखवून देता येणार नाही. यावरून प्रकाशकाच्या धंद्याची काय स्थिति आहे हे सहज ताडता येण्याजोगे आहे. जेव्हा ग्रंथाचा खप पुष्कळ वाढेल तेव्हाच प्रकाशनाचा धंदा चांगला लाभदायक होईल; व ग्रंथकारासही मोबदला सध्याच्यापेक्षा जास्त प्रमाणात मिळू लागेल.

'मोबदला वाढवा' अशी ओरड करण्याऐवजी 'सर्व प्रकाशकानी सर्व लेखकाना मोबदला दिलाच पाहिजे,' अशी चळवळ जर आमचे वाङ्मयधुरीण करतील तर किती फायद्याचे होईल! अशी चळवळ करण्याची वेळ सध्या खास आलेली आहे. अस्वलाआधी आरोळी ठोकणाऱ्या धूर्त प्रवाशाप्रमाणे स्वतःच्या स्वार्थत्यागाचा (?) व दरसाल गणितश्रेढीने वाढणाऱ्या नुकसानीच्या आकड्याचा स्वहस्ते परहस्ते गवगवा करून लेखकांचे लेख व ग्रंथ फुकट लाटणाऱ्या प्रकाशकांची चंदी जर बंद केली, तर तो सर्वांवरच फार मोठा उपकार होणार आहे! नुकसानीची ओरड करून वाचक व लेखक ह्यांची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केल्याने वाङ्मयाच्या क्षेत्रात पक्षपाताचे वातावरण निर्माण होते, दांभिकपणास उत्तेजन मिळते, वाङ्मयाचा खप वाढवून व्यवसाय यशस्वी करण्याचे

प्रयत्न व्हावे तसे होत नाहीत आणि भलत्या ठिकाणी स्वार्थत्यागाचे स्तोम माजविल्याने खोट्या कल्पना समाजात प्रसृत होतात. तेव्हा, लेख स्वीकारला की मोबदला दिलाच पाहिजे, असा निरपवाद नियम सर्वत्र प्रचलित करण्याचा सर्व लेखकांनी प्रयत्न करावा. तो वाङ्मयोन्नतीस फारच साधक होईल.

मोबदल्याचा हा नियम सर्व नियतकालिकांतील लेखानाही लागू करणे अत्यंत अगत्याचे आहे. काही ठळक अपवाद सोडले तर सध्या मराठीतील सर्व मासिक व वृत्तपत्रे बहुतेक लेखांस मोबदला न देण्याचे व्रत अखंडपणे चालवीत आहेत! मोबदल्याचा नियम पुस्तकप्रकाशकांच्या मात्र बोकांडी बसावयाचा आणि मासिकादिकांच्या चालकास मोकळे सोडावयाचे, हा पक्षपात समर्थनीय नाही. नियतकालिके ग्राहकाकडून वर्गणी आगाऊ घेतात, त्यांचा माल फारसा पडून राहात नाही व जाहिरातीचेही उत्पन्न त्यांना असते. तेव्हा लेखकांस मोबदला देण्याचा नियम त्यांनी खरोखर पुस्तकप्रकाशकापेक्षा अधिक कसोशीने पाळला पाहिजे आणि तसा तो विलायतेत पाळण्यातही येतो. परंतु आमच्या इकडे सर्व प्रकार उलटा आहे!

उपर्युक्त सर्व गोष्टी घडवून आणण्यासाठी व लेखकाच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी इंग्लंडातील Author's Society च्या धरतीवर महाराष्ट्रात एक 'लेखकसंघ' स्थापावा अशी तीन वर्षांपूर्वी मी सूचना केली होती. अशा संघाची आवश्यकता उत्तरोत्तर इतक्या तीव्रतेने भासमान होत आहे की, तीच सूचना पुनः एकवार या लेखाच्या द्वारे सर्व लेखकांसमोर मांडल्याशिवाय माझ्याच्याने राहवत नाही. या संघास पुष्कळ सभासद मिळून तो जर चांगला वजनदार बनला तर त्याच्यामार्फत पुढील गोष्टी सहज घडवून आणता येतील.

१. सर्व स्वीकारलेल्या पुस्तकास व लेखांस प्रकाशकाकडून मोबदला मिळेल अशी व्यवस्था करणे.

२. होतकरू लेखकाचे चांगले लेख वा ग्रंथ अप्रकाशित स्थितीत पडून असल्यास त्यांचे प्रकाशन घडवून आणणे.

३. लेखकांना प्रकाशकाशी करार करण्याबाबत सल्ला देणे.

४. कोणाही लेखकास जरूर लागल्यास कायदेशीर सल्ला सुलभतेने मिळवून देणे.

५. लेखकाच्या व प्रकाशकाच्या गैरशिस्त वर्तनाला आळा घालणे.

६. कोणत्याही व्यवहारात वाद उत्पन्न झाल्यास त्याचा सामोपचाराने किंवा पंच नेमून निकाल करणे.

असा संघ कार्यक्षम झाल्यास तो लेखकास कामधेनूप्रमाणे फलप्रद होईल.

जरूर वाटल्यास प्रकाशकांनीही आपला असा एक संघ स्थापावा व आपले हितसंबंध सुरक्षित राखण्याची खटपट करावी. अशा रीतीने दोन्ही पक्षांनी संघटित व बलिष्ठ होऊन वाङ्मयकार्याची धुरा आपल्या खांद्यावर घ्यावी व ओढाळपणा किंवा नाठाळपणा न करिता, महाराष्ट्रसारस्वताचा रथ प्रगतिपथावरून वेगाने ओढीत न्यावा, याखेरीज प्रस्तुत लेखकास प्रियतर अशी दुसरी कोणतीही गोष्ट नाही.

♣ ♣ ♣

—'प्रतिभा', ८ मे १९३३

मराठी ग्रंथ
अनुक्रमांक ३८६४ दि.
नों. दि.

## ६.

# प्रकाशनव्यवसायाचा प्रश्न

भाजीविक्यांच्या किंवा मोटारहाक्यांच्या मागे लागून त्याच्या धंद्याची पाहणी करणाऱ्या गोखले इकॉनॉमिक इन्स्टिटयूटच्या चालकांनी पुस्तकाचे प्रकाशक व विक्रेते यांचा पिच्छा पुरवून त्याच्या धंद्याचे स्वरूप जनतेच्या पुढे का माडू नये, असा प्रश्न माझ्या मनात पुष्कळ वेळा येऊन जातो. जसजसा अनुभव यावा तसतशी ही गोष्ट अधिकाधिक पटत जाते की, पुस्तकाच्या प्रकाशनाचा व विक्रीचा धंदा महाराष्ट्रातील अत्यंत दुर्लक्षिलेल्या व टेकीस आलेल्या धंद्यापैकी एक आहे. त्याचप्रमाणे हीही गोष्ट उघड आहे की या धंद्याच्या नाड्या परकीय व्यापाऱ्याच्या अगर सरकारच्या हाती फारशा नसून त्याचा उद्धार करणे आपल्याच हाती बरेचसे आहे. तरी देखील आमच्या समाजाच्या आर्थिक नेत्याचे व तज्ज्ञाचे लक्ष या धंद्याकडे अद्याप गेलेले दिसत नाही.

या धंद्याच्या महत्त्वाची आम्हास जाणीव नाही, हेच खरे. पुस्तक-प्रकाशन ही एक कला आहे, मोठ्यात मोठ्या कर्तबगारीस वाव देणारा तो एक धंदा आहे, हे साधे सामाजिक व आर्थिक सत्यही आम्हास पटलेले दिसत नाही; मग वाङ्मयाची निर्मिती व उन्नती पुस्तक-प्रकाशनाच्या धंद्यावर

मोठ्या अंशाने अवलंबून आहे याची जाणीव आम्हास कोठून होणार ? आमच्या साहित्यसंस्था देखील याविषयी फारशा जागरूक आहेत असे म्हणवत नाही.

## जुने ' आश्रित ' आणि नवे

सामाजिक उत्क्रांतीचे दोन्ही तीन्ही टप्पे आमच्या प्रकाशनव्यवसायात प्रतिबिंबित झालेले दृष्टीस पडतात. सर्व प्रकाराची अशास्त्रीय व अव्यवस्थित सरमिसळ झाल्यामुळे देखील आमच्या वाङ्मयाच्या प्रगतीस कमी पायबंद बसत आहे, असे नाही. जुन्या सरंजामी समाजपद्धतीस अनुसरून मराठीत अद्यापही बऱ्याच वाङ्मयाचे प्रकाशन होत असते. संस्थानिक सरदार शेटसावकार इत्यादिकांच्या आश्रयाच्या उबेने कित्येक ग्रंथकारांची ग्रंथरूपी अर्भके अप्रसिद्धीचे कवच फोडून साहित्याच्या क्षेत्रात अवतीर्ण होत असतात. हे ' आश्रितांचे वाङ्मय ' वाचकास फुकट दिले जाते असे मात्र नव्हे ! आश्रयदात्यांचा आश्रय संपादून शिवाय ही मंडळी बाजारभावाप्रमाणे आपले ग्रंथ विकतातच. यामुळे या 'आश्रित' ग्रंथकार–प्रकाशकाची स्थिती एकंदरीने बरी असते. प्राचीन काळचे आश्रित ' व अर्वाचीन काळचे ' आश्रित ' याच्यामध्ये व्यवहारदृष्ट्या हा एक फरक आहेच. शिवाय त्यांच्या वाङ्मयात स्वरूपदृष्ट्या मोठा फरक दृष्टीस पडतो. कालिदास बाणासारखे ' आश्रित ' विलासिनींच्या लीलाविभ्रमाभोवती भ्रमराप्रमाणे रुंजी घालून गुंजारव करीत असत तर आजकालचे 'आश्रित' बहुधा धार्मिक व पौराणिक वाङ्मयाचा तंबोरा छेडीत असतात. चिपळूणकर कंपनीच्या टंकारांनी प्रसिद्ध केलेली महाभारतादी ग्रंथाची भाषांतरे, श्री. लक्ष्मणराव पांगारकरांचे संतचरित्रपर ग्रंथ इत्यादी बरेचसे संस्मरणीय वाङ्मय अशा रीतीने प्रकाशित झालेले होय. आमचे जुने भक्तिपर वाङ्मय हे बहुतांशी आश्रित वाङ्मयात गणता येणार नाही. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास हे कोणत्या राजाचे अगर संस्थानिकाचे आश्रित होते ? स्वराज्यस्थापनेनंतर मात्र ' आश्रित ' कवींची अगर बखरकारांची उदाहरणे दृष्टीस पडू लागतात. मोरोपंत हा ' आश्रित ' कवींचा मुकुटमणी होय. पांगारकरांकडे पाहून मला मोरोपंतांची आठवण येते. तो संस्थानिकाचा आश्रय, ती परमार्थप्रवण सोज्ज्वळ वृत्ती, ती पुराणनिरूपणाची आवड, तो ग्रंथलेखनाचा हव्यास–इत्यादी गोष्टी, अगदी जशाच्या तशाच नाही, तरी कालानुसार योग्य तो फेरफार पावून, मयूरकवीप्रमाणे त्यांच्या अभिजात चरित्रकारामध्येहि उतरलेल्या दिसतील. परंतु आश्रित वाङ्मयाचा हा संध्याच्या

काळातील श्रेष्ठ नमुना झाला. याशिवाय कित्येक संस्थानिकांनी स्वतःची चरित्रे लिहवून घेतली आहेत, इतर कित्येक संस्थानिक अनेक मार्गांनी निरनिराळ्या विद्वानांस, ग्रंथकारांस व प्रकाशकास साहाय्य पोचवीत आहेत, हा प्रकार चालूच आहे. त्याचप्रमाणे कित्येक संस्थांच्या व फंडाच्या आश्रयानेही कित्येक ग्रंथ प्रसिद्ध होत असतात.

## वाङ्मयांतील लघु-व्यावसायिक

सरंजामी पद्धतीचा हा अर्धवट अवशेष सोडल्यानंतर वाङ्मयांतील लघु-व्यावसायिक ( Petty Manufacturer ) हा आपल्या लक्षात येतो. हा स्वतः लेखक तसाच प्रकाशक व अगदी क्वचित मुद्रक व पुस्तकविक्याही असतो. कारखानदारी व तिला आनुषंगिक अशी श्रमविभागाची उत्पादनपद्धती अस्तित्वात येण्यापूर्वी आर्थिक व्यवहाराची जी स्थिती होती तीच येथे अस्तित्वात असलेली दिसते. पूर्वीच्या काळी आपण स्वतः घरच्या मागावर तयार केलेले कापड कोष्टी स्वतःच आजूबाजूच्या लोकांमध्ये विकी. आजचा ग्रंथकारही स्वतः ग्रंथ लिहितो, स्वतःच्या खर्चाने छापवितो व भोवतालच्या लोकास विकतो. फार तर इतकेच म्हणता येईल की तो स्वतः एकएक प्रत विकण्याच्या खटाटोपात न पडता एखादा नेकीच्या पुस्तकविक्रेत्यास आपल्या प्रातीतला काही वाटा—कमिशन—देऊ करून त्यांच्या गळयात एकदम बऱ्याचशा प्रती बांधतो. तरी देखील लेखक व प्रकाशक ही दोन्ही नाती त्याच्या ठिकाणी एकवटलेली असतातच. असे असूनही या प्रकारात मोडणाऱ्या ग्रंथकार-प्रकाशकाची स्थिती विशेष चांगली आहे असे म्हणवत नाही. धंदेवाईक प्रकाशकाने दिलेला मोबदला समाधानकारक न वाटल्यामुळे स्वतः ग्रंथाचे प्रकाशन करून तो व्यवहार अंगलट आल्यामुळे खट्टू झालेले ग्रंथकार प्रस्तुत लेखकास माहीत आहेत.

नामांकित ग्रंथकार, विशेषतः कादंबऱ्या, गोष्टी वगैरे ललितवाङ्मय लिहिणारा लेखक आपले लिखाण स्वतःच प्रकाशित करतो, तेव्हा त्याच्या बुडाशी बहुधा हेच कारण असते. प्रकाशकाने दिलेला मोबदला त्यास पुरेसा वाटत नाही किंवा पुरे पडत नाही. तेव्हा तो स्वतः प्रकाशन करू लागतो. पहिले एखाद दुसरे पुस्तक यशस्वी ठरते. त्यामुळे तो अधिकच गुंतत जातो. हळूहळू इतरांची पुस्तके प्रकाशनासाठी घेण्याचा मोह त्यास पडतो. अशा रीतीने गुंतता गुंतता एखाद दुसऱ्या पुस्तकामध्ये ठोकर लागली की त्याचे धाबे दणाणते व तो आपला

पसारा आवरता घेतो. त्यातून एखादा व्यवहारकुशल व चिकाटीचा असेल तर बराच काळपर्यंत तग धरूनही राहतो, परंतु एकंदरीत त्याच्या व्यवहाराचे स्वरूप संकुचित व व्यक्तिनिष्ठ असे राहते. बहुतांशी आपली स्वतःची व त्या-बरोबरच थोडीशी दुसऱ्याची पुस्तके प्रसिद्ध करणारे लेखक-प्रकाशक सध्या नाव घेण्याजोगे व चटकन लक्षात येण्याजोगे श्री. नारायण हरि आपटे व श्री. यशवत गोपाळ जोशी हे होत. हे नाणावलेले लोकप्रिय कथाकार आहेत. यांच्या लिखाणाला समाजात मान आहे व हुकमी गिऱ्हाईकही आहे. असे असूनही निर्वाहाकरिता यांना इतर उद्योगांची कास धरावी लागते, यावरून त्यांच्या प्रकाशन-व्यवहाराची स्थिती यथातथाच असावी असे अनुमान होते. आपटे तर लेखक व प्रकाशक असून शिवाय मुद्रकही आहेत. परंतु या तिन्ही उद्योगांची गोळाबेरीज करून पदरात काय पडते, याची चौकशी केल्यास बहुधा त्यांच्या तोंडून निराशाजनक उद्‌गार ऐकावयास मिळतील.

## विचारसंपत्तीचे दान

फायद्याची इच्छा करणाऱ्यांचा हा वर्ग सोडल्यास लेखक-प्रकाशकांचा एक मोठाच वर्ग बाकी उरतो. यांच्या लिखाणास कोणी प्रकाशक मिळत नाही, तेव्हा आपल्या विचारसंपत्तीला जगाने मुकू नये, या स्तुत्य उद्देशाने ते स्वतःच्या खर्चाने आपली पुस्तके छापून प्रसिद्ध करतात. विचारसंपत्तीचे दान करण्याच्या या उदारतेबरोबरच अल्पसंतुष्टतेचा महनीय सद्‌गुणही यांच्यात भरपूर असतो. पुस्तक छापून काढण्याचा खर्च व खटाटोप यांच्या मोबदल्यात थोडीबहुत प्रसिद्धी मिळाली, चार वृत्तपत्रांनी पुस्तकाला नावाजले की त्यांना मूठभर मांस चढल्या-प्रमाणे वाटते. यासाठी वेळेनुसार वृत्तपत्राच्या संपादकास आपल्या पुस्तकावर आपणच अभिप्राय लिहून देण्यासही काही उदारात्मे तयार असतात !

या वर्गातील लेखक-प्रकाशकाच्या हिशेबाची तपासणी केली तर कागद व छपाई यांचा खर्च ज्यांचा भरून निघाला आहे असे किती आढळतील, हा प्रश्नच आहे ! अकरा वर्षांपूर्वी मी आपले 'मयूरकाव्यविवेचन' हे पुस्तक छापून प्रसिद्ध केले. त्यावर बरेचसे अभिप्राय आले तेव्हा मला किती आनंद झाला ! विशेषतः दोघा अव्वल दर्जाच्या साहित्यसेवकांनी त्यावर मोठे परीक्षणात्मक लेख लिहिले, त्यावेळेस एक प्रकारची धन्यता वाटली. परंतु माझ्या बिनहिशोबी अव्यवस्थितपणाशी टक्कर देऊन जी काही जमाखर्चाची तुटक टिपणे शिल्लक

राहिली होती त्याकडे पाहिले असता पुस्तकासाठी झालेला नगदी खर्च जेमतेम भरून येण्यास तब्बल दहा वर्षे लागली, असे मला दिसून आले !

## विल्हेम रॉबर्ट्स् यांचा कानमंत्र

हौसेखातर लेखन करणाऱ्या आणि स्वतःची पदरमोड करून ते लोकापुढे आणू इच्छिणाऱ्या या लेखकवर्गाविरुद्ध काही बोलण्याचा कठोरपणा कोणीही सहसा करणार नाही. अशा तऱ्हेच्या हौशी लेखकानी घस सोसून आपले लिखाण प्रसिद्ध केले नसते तर आमचे मराठी वाङ्मय अनेक बहुमूल्य रत्नांस मुकले असते, ही गोष्टही लक्षात घेतली पाहिजे. आपणाकडे वाङ्मयाच्या योग्यतेची मार्मिक पारख असणारे आणि सुयोग्य लेखकाचा यथोचित आदर करण्यासाठी झटणारे प्रकाशक कोठे आहेत ? अशा प्रकाशकाच्या अभावी ज्या कित्येक लेखकास ‘ वनीच की एक सुकोनि जावे ’ अशी पाळी आली असती, ते बिचारे, स्वखर्चाने का होईना, थोड्याबहुत प्रशंसेचे व सन्मानाचे विषय झाले तर त्यात बिघडले कोठे ? ज्या समाजामध्ये गुणज्ञ व मार्मिक प्रकाशक गुणी लेखकाला हातावर झेलण्यास तयार असतात अशा वाङ्मयदृष्टया पुढारलेल्या देशात मात्र प्रकाशक मिळत नाही या सबबीवर पुस्तक स्वतः छापून प्रकाशित करणे ही घोडचूक ठरेल. वाङ्मयाचे त्या योगाने हित न होता हानीच होईल. यासाठीच ग्रेट ब्रिटनमधील लेखकसंघाचे ( Author's Society ) सेक्रेटरी श्री. विल्हेम रॉबर्ट्स् हे लेखकास त्यांच्या हिताच्या कानगोष्टी सागताना त्याना असा एक महत्त्वाचा इषारा देतात, की तुमची वाङ्मयकृती पैसे देऊन कधीही प्रकाशित करू नका. ते म्हणतात, Don t pay to have your work published or performed If a work is worth publishing or performing you will, if you go on trying long enough, find someone ready to undertake the risk at his own expense

या म्हणण्याचा इत्यर्थ असा की, दुसरा कोणी पैसे घेऊन तुमचा ग्रंथ प्रकाशित करण्यास तयार असला तरी तसे कधीही करू नका; मग सगळे पैसे स्वतःच खर्च करून शिवाय पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याची दगदगही आपणच करावयाची ही गोष्ट तर दूरच राहिली. आमच्या महाराष्ट्राच्या सध्याच्या परिस्थितीत हा नियम लागू करून कितीसे चालेल बरे ?

विल्हेम रॉबर्ट्‌सचा हा उपदेश आपणाकडे व्यवहार्य ठरो वा न ठरो, त्यातील मर्म उघड आहे. लेखकाने आपणच आपल्या लिखाणाचा प्रकाशक बनू नये, किंवा आपल्या लिखाणाच्या प्रकाशनाकरिता स्वतः खर्च करू नये हे यातील मर्म होय. ही गोष्ट लेखकाच्या हिताची आहे, तशीच एकंदर वाङ्मयाच्याही हिताची आहे. लेखकाने प्रकाशनाच्या खटाटोपापासून पूर्णपणे अलिप्त असावे, तरच त्याला निर्वेधपणे लेखन करिता येईल व त्याच्या लेखनास तेज चढेल. त्याचप्रमाणे वाङ्मयाचे प्रकाशन धन्देवाईक प्रकाशकवर्गाकडून व्हावे हे योग्य. असे झाले तरच वाङ्मयाचा प्रसार पद्धतशीर रीतीने आणि खऱ्या आस्थेने होईल. अपवाद हे कोठेही असावयाचेच, परंतु सामान्य नियम असा मानावयास हरकत नाही की लेखक हा प्रकाशक बनू लागला की त्याचे लेखक या नात्याने कर्तृत्व अडकून पडल्यासारखे होते. इंग्लंडात देखील इ. व्ही. लुक्यास ( Methuen ), मायकेल सॅडलेअर ( Constable ) यासारखे काही प्रसिद्ध लेखक प्रकाशकमंडळ्यांचे सूत्रचालक आहेत; परंतु शेकडोंनी मोजल्या जाणाऱ्या प्रकाशकांच्या वर्गात असे गृहस्थ हाताच्या बोटावर मोजण्याइतके सापडतील.

**धन्देवाईक प्रकाशक**

आणि अशा तऱ्हेचा, इतरांचे ग्रंथ नफ्याकरिता प्रकाशित करणारा धन्देवाईक प्रकाशक हाच आजच्या कारखानदारीच्या युगाचा वाङ्मयक्षेत्रातला खरा प्रतिनिधी होय. या वर्गाच्या वाढीवर आणि संपन्नतेवरच आपल्या वाङ्मयाची प्रगती व उन्नती आज अवलंबून आहे ही गोष्ट आपण जितक्या लवकर ओळखू तितकी आपल्या हिताची होणार आहे.

प्रकाशक ही काय चीज असते, याचे प्रयोजन काय, व हा वाङ्मयाच्या प्रगतीस कसा साधनीभूत होतो हे आपण प्रथम लक्षात घेतले पाहिजे. हा प्रकाशक हाडाचा व्यापारी असला पाहिजे. अर्थात हा जितका चाणाक्ष, जितका प्रामाणिक, जितका दूरदर्शी, तितकाच स्वतःच्या पायाखालचे पाहणारा, तितकाच नफ्याचा हव्यासी, तितकाच हाताने सढळ असला पाहिजे. हा प्रकाशक आपले स्वतःचे भांडवल घालून पुस्तके छापतो, नफ्यातोट्याची जोखीम पत्करतो, पुस्तकांची साठवण करून त्याच्या विक्रीची व्यवस्था करतो. पुस्तकाचा खप शक्य तितक्या लवकर व्हावा यासाठी जाहिरात व इतर मार्गांनी प्रसार करणे त्याचे कर्तव्य

असते. पुस्तकांच्या प्रती जितक्या जास्त खपतील तितके त्याच्या हिताचे असते. अर्थात ग्रंथकाराचे व त्याचे हितसंबंध परस्परास पोषक असतात. म्हणूनच प्रकाशक हा ग्रंथकाराचा शत्रू अगर त्याला लुबाडणारा नसून नेहमी ग्रंथकाराचा मित्र व त्याचा हितकर्ताच असतो. ग्रंथकाराला नाखुश करणे हे त्याच्या हिताचे नसते; कारण ज्या मालावर तो व्यापार करणार असतो तो माल त्याला ग्रंथकारच पुरवू शकतो. अर्थात अगदी असह्य होईपर्यंत ग्रंथकाराशी मिळते व नमते घेण्याची त्याची प्रवृत्ती असते.

इंग्रजी वाङ्मयाचा इतिहास ग्रंथकार व पुस्तकप्रकाशक यांच्यामधील गाढ स्नेहाच्या अनेक हृदयंगम उदाहरणांनी नटलेला आहे. स्कॉट व कान्स्टेबल, बायरन व जॉन मरे, बर्नार्ड शॉ आणि कान्स्टेबल यांच्या आजन्म स्नेहाच्या रम्यकथा इंग्रजी वाङ्मयाच्या चौकस वाचकाच्या दृष्टिपथाखालून गेल्याखेरीज कधीही राहत नाहीत. कॉन्स्टेबल नसता तर स्कॉटच्या वेव्हरली कादंबऱ्या लिहिल्या गेल्या असत्या की नाही याचा संशयच आहे. विख्यात कादंबरीकार जार्ज मेरिडिथ हा एका प्रकाशकाकडे हस्तलिखिते तपासण्याकरिता होता व प्रकाशकाच्या उत्तेजनाशिवाय तो कधीही इतक्या ख्यातीस चढला नसता. इंग्लंडातील असे शेकडो ग्रंथकार सांगता येतील की, ज्यांना प्रकाशकांनी पुढे आणले व त्यांच्या गुणाच्या प्रकटीकरणास संधी देऊन त्यास ख्यातीस चढविले. इंग्रजी वाङ्मयाचा अवाढव्य विस्तार, अफाट प्रसार व अलौकिक संपन्नता याचे श्रेय त्या वाङ्मयाच्या प्रकाशकाकडे फार मोठ्या प्रमाणात येईल हे कोणासही कबूल करावे लागेल.

## भांडवलवाला व दलाल

वाङ्मयप्रकाशन हा एक धंदा किंवा व्यवसाय असला तरी त्याचे काही स्वतंत्र शास्त्र आहे असे नाही. शरीरशास्त्र, चिकित्साशास्त्र इत्यादी शिकल्याशिवाय जसे एखाद्यास डॉक्टर होता येत नाही, किंवा वस्त्रनिर्माणाची विशिष्ट विद्या शिकल्याशिवाय जसे वीव्हींग मास्टर होता येत नाही तसे या धंद्याचे नाही. कोणाही सत्प्रवृत्त व बुद्धिमान माणसास करता येईल असा हा धंदा आहे. प्रकाशकाच्या व्यवसायाचे वर जे वर्णन केले त्यावरून लक्षात येईल की प्रकाशक हा एका दृष्टीने भांडवलवाला आहे तर दुसऱ्या दृष्टीने पाहिले असता तो लेखक व वाचक यांमधील मध्यस्थ आहे. सध्याच्या समाजस्थितीत इतर सर्व आर्थिक

व्यवहारामध्ये ज्याप्रमाणे भांडवलवाला व दलाल यांची जरूर भासते, त्याप्रमाणे ती वाङ्मयव्यवहारामध्येही भासणार हे उघडच आहे. भांडवलाशिवाय पुस्तके छापून निघणे शक्य नाही व सध्याच्या पुढारलेल्या समाजस्थितीत विक्रीचा व्यवहार सर्व देशभर चालणारा व अतिशय गुंतागुतीचा झाला असल्यामुळे दलालाशिवाय विक्रीची व्यवस्थाही नीट होणे शक्य नाही. याबरोबरच हीही गोष्ट उघड आहे, की सामान्यतः लेखकानेच भांडवलवाला व दलाल यांचा पेशा पत्करणे हे इष्ट नाही. भांडवलवाला व दलाल हे व्यापारी पेशाचे लोक होत. लेखक व व्यापारी याना आपआपल्या कामात यशस्वी होण्यास अत्यत भिन्न गुणांची जरुरी असते. भांडवल जमविण्याची, ते सुरक्षित ठेवण्याची, ते योग्य रीतीने कामी लावून मालाची निपज करण्याची व पुढे त्या मालाची विक्री करण्याची सर्व यातायत व जोखीम लेखकावरच लादणे हे अत्यत अन्यायाचे व वाङ्मयनिर्मितीस हानिकारक होईल हे कोणासही सांगावयास नको. तेव्हा स्वतत्र प्रकाशकवर्गाचा उदय होणे हे वाङ्मयाच्या उन्नतीस आवश्यक आहे हे सत्य निर्विवाद आहे.

**इंग्लंड आणि हिंदुस्थान**

इग्लडच्या इतिहासावरून हीच गोष्ट सिद्ध होते. इग्लडात वैयक्तिक उत्पादनाच्या पद्धतीचा लोप होऊ लागून कारखानदारीच्या युगास जसजशी सुरवात झाली, तसतसा वाङ्मयाच्या क्षेत्रात स्वतत्र प्रकाशकांचा वर्गही वाढीस लागला. त्यापूर्वी पुस्तके प्रसिद्ध केली जात नसत, असे नाही. परतु बहुधा मुद्रक हेच प्रकाशक व विक्रेते असत. लेखक मात्र त्याहून साधारणपणे निराळा असे, तथापि जो लेखक तोच प्रकाशक ही गोष्टही त्यावेळी अगदीच अपवादात्मक नव्हती. प्रकाशकाचा स्वतत्र वर्ग अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत वाढीस लागला, तेव्हापासून आजपर्यंतच्या दीडशे वर्षांत या धंद्याची केवढी प्रचड वाढ झाली आहे हे सर्वांस दिसतच आहे. श्री. विल्हॅम रॉबर्ट्स् यानी तयार केलेल्या Author's Handbook नावाच्या पुस्तकात इग्लडातील नाव घेण्याजोग्या प्रकाशकाची यादी दिली आहे, तिजमध्ये एकूण १६८ प्रकाशन मडळाची नावे आहेत व त्यांपैकी दरसाल ५० वर पुस्तके प्रकाशित करणाऱ्या प्रकाशक मडळ्या ६६ आहेत.

दरसाल चौदा हजार पुस्तकांना प्रसिद्धी देणाऱ्या देशामध्ये झालेल्या या प्रकाशनव्यवसायाच्या वाढीच्या मानाने आपल्या महाराष्ट्रातील प्रकाशनव्यवसाय हा हुटुपुटीतल्या खेळासारखा वाटावा यात नवल नाही. दरसाल ५० पुस्तके

प्रसिद्ध करणारे प्रकाशक राहोत, सबंध जन्मात ५० पुस्तके प्रसिद्ध केलेले प्रकाशक आमच्याकडे कितीसे आढळतील? आमच्याकडील प्रकाशनव्यवहाराची वाढ अगदी अलीकडची आहे आणि प्रारंभीच सांगितल्याप्रमाणे हा व्यवसाय समाजाकडून उपेक्षिला गेला असल्याकारणाने त्याची वाढ व्हावी तशी नीट होत नाही, ही विशेषच दुःखाची गोष्ट आहे.

### मराठीतील पहिले प्रकाशक

मराठीतील प्रकाशनाचा विचार करू लागलो म्हणजे श्री. बळवंत गणेश दाभोळकर या व्यक्तीचे नाव इटकून डोळ्यासमोर येते. मराठीतील पहिले खरेखुरे प्रकाशक दाभोळकर होत असे म्हटल्यास ते स्थूलमानाने तरी खरेच ठरेल. ग्रंथकारांना मोबदला देऊन त्याजकडून ग्रंथ लिहवून घेऊन ते प्रसिद्ध करणे व त्यावर आपणही चार पैसे मिळविणे हे जे प्रकाशनव्यवसायाचे मुख्य लक्षण ते त्यास बरोबर लागू पडते. दाभोळकराच्या यशाचे मर्म त्यांच्या प्रचारनैपुण्यात आहे. त्यांनी आपल्या गोडवेपणाने लेखक मिळविले व ग्राहकही मिळविले. त्यांनी आपल्या एका पुस्तकात स्वतःच्या व्यवसायाविषयी लिहिताना पुढील आशयाचा मजकूर लिहिला आहे.—" सरकारची किंवा कोणा संस्थानिकाची मदत न घेता आजवर मी इतकी पुस्तके आणि ग्रंथकारांस मेहनताना देऊन, कशी प्रसिद्ध करू शकलो याचे कित्येक लोकास मोठे आश्चर्य वाटते. परंतु त्यात आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही. माझा हा व्यवसाय निव्वळ लोकाश्रयावर चालला आहे. मी घरोघर हिंडून चांगल्या प्रतिष्ठित लोकांचे गिऱ्हाईक संपादन केले आहे. ग्रंथ प्रसिद्ध केला की तो विकत घेण्यासद्दल सुमारे ६४० लोकाची लेखी अभिवचने आज मजजवळ आहेत. त्यांच्या आश्रयावर मला हा आपला व्यवसाय चालविता येतो " इ० इ०. मोठमोठ्या अवजड व शास्त्रीय आणि त्यातून भाषांतरित ग्रंथांस ६४० कायम ग्राहक म्हणजे काही कमी नव्हेत. इतके ग्राहक मिळवून सुमारे २० वर्षे दाभोळकरानी आपला व्यवसाय चालविला ही काही सामान्य गोष्ट नव्हे.

### डॉ. केतकरांची कामगिरी

आर्यभूषण काय आणि निर्णयसागर काय, हे मुख्यत्वेकरून मुद्रक होत. प्रकाशन हा त्यांचा गौण व्यवसाय. काशीनाथपंत मित्र हे मुख्यत्वेकरून मासिकाचे चालक म्हणून स्मरणीय; प्रकाशक या नात्याने त्यांनी बजावलेली कामगिरी कमी महत्त्वाची खास नाही. तथापि त्यांच्या उद्योगात नवीन व्यवसायपद्धती

दृग्गोचर होत नसल्यामुळे त्याचा येथे नामनिर्देश करणे इतकेच बस होईल. दामोळकरांनतर प्रकाशनव्यवसायावर किंबहुना महाराष्ट्राच्या वाङ्मयक्षेत्रावर आपली छाप उठविणारा व आपल्या कर्तृत्वाने एकंदर व्यवहाराला जबरदस्त कलाटणी देणारा असा एकच पुरुष निर्माण झाला, तो डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर हा होय. परदेशातून आणलेल्या विद्या व कल्पना स्वदेशहिताच्या कामी लावल्या अशा डॉ. केतकरानीच. त्यानी ज्ञानकोश लिहून अथवा लिहवून जे काही ज्ञानदान केले त्यापेक्षा व्यावसायिकदृष्ट्या नवीन कल्पना अमलात आणून दाखवून वाङ्मयाचा व्यवसाय करणाऱ्याना जो नवीन मार्ग दाखवून दिला त्याचे महत्त्व निःसंशय अधिक होय. त्याची कामगिरी मुख्यत्वेकरून तीन बाबतीत झाली. पहिली बाबत म्हणजे प्रकाशनासाठी भाडवल जमविण्याची अत्यंत अभिनव व फलप्रद अशी युक्ती आपल्या डोक्यातून काढून प्रत्यक्ष व्यवहारात यशस्वी रीतीने उतरवून दाखविली, ही होय. समाईक भाडवलाची मडळी काढून तिच्या भागांच्या मोबदल्यात प्रकाशित पुस्तके द्यावयाची व जमलेले भांडवल सगळे प्रकाशनकार्याच्या कामी लावावयाचे ही कल्पना नव्याने काढून ती ज्ञानकोशाच्या बाबतीत त्यानी यशस्वी करून दाखविली. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे विक्रयकलेचा ( Salesmanship ) त्यांनी फार मोठ्या प्रमाणावर प्रकाशनकार्यात उपयोग करून घेतला व याही बाबतीत पूर्वी कधी कोणी मिळविले नव्हते येवढे यश मिळवून दाखविले. समाईक भांडवलाच्या मडळीबरोबरच व्यावसायिक सघटनाही ( Business Organisation ) आलीच. ही सघटना कशी करावी हे दाखवून देण्याचा पहिला मानही डॉ. केतकरांकडे जातो.

या सर्व बाबतीत आपआपल्या मगदुराप्रमाणे डॉ. केतकराच्या पावलावर पावले टाकून जाणारे अनेक कार्यकर्ते—काही खुद्द त्यच्या तालमीतले व काही इतर—निघाले व त्यानी शब्दकोश, भारतीय ऐतिहासिक कोश, व्यावहारिक ज्ञानकोश, यांसारखी कामे उभारून ती नेटाने चालविली आहेत. यावरूनच डॉक्टरसाहेबांनी प्रकाशनाच्या व्यवसायावर आपली केवढी जबरदस्त छाप उठविली याची कल्पना येते. त्याची कार्यपद्धती उचलून कार्ये करणारे अनेक निघाले, एवढ्यानेच त्याचे यश मर्यादित नाही. त्यांच्या उद्योगामुळे प्रकाशनव्यवसायात गुतलेल्या सर्वच लोकांचा आत्मविश्वास वाढला. मराठी वाचकामध्ये बहुश्रुतपणाची वाढ होऊन विविध विषयांवरील लिखाण वाचण्याची प्रवृत्ती बळावली, साहित्याच्या

ससारात प्रकाशकाचा दर्जा कमी प्रतीचा नाही याची जाणीव लोकास होऊ लागली, असे किती तरी इष्ट परिणाम त्याच्या उद्योगामुळे झाले. एकदरीने पाहता मराठी साहित्याच्या व्यावसायिक अगात त्यानी प्रचंड स्थित्यतर घडवून आणले, यात शका नाही.

**इतर प्रकाशक**

प्रकाशनव्यवसायाच्या दृष्टीने भारत गौरव ग्रथमालेचे उत्पादक व चालक **प्रभाकर श्रीपत भसे** याची कामगिरी उल्लेखनीय आहे. यांनी पद्धतशीर स्वरूपाची ग्रथमाला व तिजसाठी थोडीशी प्रवेश फी भरून होणारे कायम ग्राहक याची योजना सुरू केली. या नवीन कल्पनेस आपल्या विक्रयकलानैपुण्याची (Salesmanship) जोड देऊन त्यानी आपल्या कार्यात चागलेच यश सपादन केले. एका आकाराचे, सारख्याच पृष्ठसख्येचे ग्रथ ठरीव मुदतीने प्रसिद्ध करून ते कायम ग्राहकास सवलतीने द्यावयाचे, हे तत्त्व त्याच्या योजनेत प्रथमच समाविष्ट झालेले दिसते. याचे अनुकरण करणाऱ्या पुष्कळ माला पुढे कशा निघाल्या व त्यानी या कल्पनेचा बाजारी व हीन वाङ्मयाच्या निष्पत्तीच्या कामी कसा उपयोग केला हे येथे सागण्याची जरूरी नाही.

अगदी अलीकडच्या काळात बीरकर, मोटे, कोल्हटकर, अधिकारी इत्यादी व्यक्ती प्रकाशनव्यवसायात मोठ्या धडाडीने पुढे आल्या असून नव्यानव्या लेखकाना पुढे आणून साहित्याला नवी लेणी प्राप्त करून देणे ही जी प्रकाशनव्यवसायाच्या उपयुक्ततेची श्रेष्ठ कसोटी तिला ते चागल्या रीतीने उतरत आहेत, असे दिसते. कै. भसे यांच्यामागे श्री. मंगेशराव कुळकर्णी यानी त्यांचेच काम चांगल्या रीतीने पुढे चालविले आहे. केसरी व किर्लोस्कर हे दोघे भाडवलशहा वाङ्मयक्षेत्रावर आक्रमण करण्यास उद्युक्त झालेले दिसत असून त्या दोघांमध्ये परस्पर काही तेढ उत्पन्न झालेली दिसते आहे. ही केवळ सात्त्विक स्वरूपाची राहावी, तिला व्यावसायिक चुरशीचे स्वरूप येऊ नये अशी सर्वांची इच्छा व अपेक्षा आहे.

**भांडवलशहा !**

भांडवलशहा हा शब्द येथे वाईट अर्थाने योजलेला नाही. आपल्या महाराष्ट्रातील प्रकाशनव्यवसायाच्या मानाने विचार करता उपर्युक्त दोन्ही सस्था-मध्ये साधनसपत्ती मोठ्या प्रमाणात केंद्रीभूत झालेली आढळते, इतकाच अर्थ या शब्दात अभिप्रेत आहे. साधनसपत्तीच्या केंद्रीकरणामुळे प्राप्त झालेली

सत्ता, भांडवलाचे गिरमीट अधिकाधिक आवळले जाऊन केवळ मालक व दास असे दोन वर्ग साहित्याच्या क्षेत्रात देखील निर्माण होतील अशा रोखाने वापरली जाणार असेल तर मात्र तिजपासून धोका उत्पन्न होईल. बऱ्याच दिवसापूर्वी किर्लोस्करी वाङ्मयाच्या एका प्रमुख आधारस्तंभाला मी येणेप्रमाणे प्रश्न केला— " किर्लोस्कर प्रभृति मासिकामधून ज्या विचारसरणीचे प्रतिपादन होत असते तिचे मुद्देसूद रीतीने खंडन करणारे लेख जर कोणी लिहिले, तर ते या तुमच्या मासिका-मधून प्रसिद्ध करण्यात येतील की नाही ? " या माझ्या प्रश्नास माझ्या मित्रानी चक्क 'नाही' म्हणून उत्तर दिले. " आमच्या हातातली साधने आम्हास जी विचारसरणी इष्ट वाटते तिच्याच प्रसारार्थ आम्ही वापरणार. उलट बाजू योग्य रीतीने पुढे येते की नाही याची काळजी आम्ही का म्हणून घ्यावी ? " असा त्याच्या म्हणण्याचा आशय दिसला. माझे मित्र जरी किर्लोस्करी वाङ्मयाचे आधारस्तंभ असले तरी ते काही अधिकृत संपादक नव्हेत, आमचे संभाषणही स्नेह्यामधील खासगी गप्पांच्या स्वरूपाचे होते व त्याचा वर दिलेला सारांश स्मरणाने दिला आहे, या सर्व गोष्टी येथे नमूद करून ठेवणे न्याय्य होइल. तथापि वरील उद्‌गार जर किर्लोस्कर मासिकांच्या संपादकीय धोरणाचे निदर्शक असतील तर त्यात मोठा अनर्थकारक अर्थ दडून राहिलेला आहे व लेखक वर्गाने आपणाला हा एक इशारा आहे असे समजून त्याबद्दल सावध राहिले पाहिजे, इतके येथे म्हटल्यावाचून राहवत नाही.

## प्रकाशकांची कर्तव्ये

सत्तेचे व संपत्तीचे अतिरिक्त प्रमाणात केंद्रीभवन झाल्यामुळे होणारे दुष्प-रिणाम इंग्लंडातील प्रकाशनव्यवसायात दिसून येत नाहीत. या अभिनंदनीय स्थितीचे श्रेय बऱ्याच अंशाने तेथील प्रकाशकाकडे आहे, असे म्हटल्यास चिंता नाही. प्रगतिपर विचारांना प्रसिद्धी देण्यास तेथील प्रकाशक त्रिचकत नाहीत, लेखकवर्गाला पैशाच्या जोरावर राबवून घेण्याची त्यांची वृत्ती दिसत नाही, हे सामान्यतः पाहता खरे आहे. याचे कारण खरीखुरी व्यावसायिक वृत्ती त्यांच्या अंगी बाणली आहे, हे होय. ... दर्जाचा व्यापारी जसा उत्कृष्ट माल निर्माण करील, तो घेण्याविषयी सफाईने गिऱ्हाईकाचे मन वळवील व या उत्कृष्ट सेवेबद्दल योग्य तो मेहनताना घेईल, त्याप्रमाणे जातिवंत प्रकाशकाने पहिल्या प्रतीचे वाचनीय वाङ्मय निर्माण करावे, ते वाचण्याविषयीची आवड जनतेच्या मनात उत्पन्न करावी

व अशा रीतीने समाजाच्या संस्कृतिवर्धनाला हातभार लावल्याबद्दल आपल्या धंद्यातून योग्य ते वेतन घ्यावे. राष्ट्रोन्नतीच्या कामी ही सेवा कमी दर्जाची ठरेल असे मुळीच नाही.

परंतु असे प्रकाशक आपल्यात आहेत कितीसे ? जे आहेत त्यांचा योगक्षेम तरी चांगल्या रीतीने चालला आहे काय ? हे प्रश्न आमच्या साहित्याच्या उन्नतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. परंतु त्याकडे कोण लक्ष देतो ? वाङ्मयाविषयी लोकांच्या मनात अभिरुची कशी उत्पन्न होईल व असलेली वाढीला कशी लागेल हे आजच्या घटकेचे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न आहेत. याखेरीज प्रकाशकाच्या मार्गामध्ये इतरही अनेक अडचणी उभ्या आहेत. त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न कोण केव्हा करणार ?

आजचा प्रकाशक असहाय आहे. भरपूर खेळते भांडवल त्याजपाशी नाही, उत्कृष्ट व्यासंगी लेखकांना आधार देऊन त्याजकडून वाङ्मयनिर्मिती करवून घेण्याचे सामर्थ्य त्यास नाही, व ज्ञान असले तरी ते उपयोगात आणण्यास जरूर ती साधने नाहीत. हलाखीच्या या स्थितीकडे लक्ष न देता हीन व अश्लील वाङ्मयाची निपज वाढत आहे म्हणून आरडाओरड करण्यात काय अर्थ आहे ? आजाराच्या मूळ कारणाकडे लक्ष न देता वरून मलमपट्ट्या बांधीत बसण्यासारखेच हे आहे.

तेव्हा प्रकाशनव्यवसायाचा प्रश्न आमच्या साहित्याच्या उन्नतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा व निकडीचा होऊन बसला आहे. आणि साहित्याचे संवर्धन हे समाजाच्या मानसिक आरोग्याचे व संस्कृतिविकासाचे प्रमुख साधन आहे. यास्तवच आज अत्यंत जिव्हाळ्याचा होऊन बसलेल्या, परंतु ज्याच्या महत्त्वाची कोणास जाणीव नाही अशा, या प्रश्नाचा या लेखात मुद्दाम ऊहापोह केला आहे. प्रत्यक्ष रीत्या व्यावहारिक सूचना करण्यासाठी हा लेख लिहिलेला नाही. प्रस्तुत लेखकास तसे करण्याचा काही अधिकारही पोचत नाही. आजकालच्या एका निकडीच्या प्रश्नाचे महत्त्व महाराष्ट्रीय वाचकवर्गाच्या लक्षात आणून देऊन त्यास त्यासंबंधाने विचार करावयास लावावे, इतकाच हा लेख लिहिण्याचा हेतू आहे.

♣ ♣ ♣

—'प्रतिभा', १ एप्रिल १९३७

# ७.

# भारतापुढील महान प्रश्न - सांस्कृतिक नियोजन

## काँग्रेसची द्विराष्ट्रवादाला संमती

फाळणीने कलंकित झालेले स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतापुढे तात्कालिक महत्त्वाचे जे निकडीचे प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यांच्या माऱ्यामुळे स्थिर स्वरूपाच्या चिरकालिक प्रश्नाकडे आपले लक्ष जात नाही. अन्नवस्त्राच्या प्रश्नाइतके हे प्रश्न रोजची गरज भागविण्याच्या दृष्टीने निकडीचे नसले, तरी राष्ट्राच्या सुदृढ जीवनाच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व कमी नाही. त्यांची आज उपेक्षा होत आहे हे आमच्या राष्ट्रातील विचारवंतांच्या बुद्धिवैकल्याचे निदर्शक आहे.

आमच्या देशाची फाळणी का झाली ? तर हिंदुस्थान हे एक राष्ट्र नसून यात हिंदु आणि मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत, त्या दोघाना आपआपल्या विकासाकरिता भिन्न प्रदेश तोडून पाहिजे, असा हट्ट मुसलमानानी धरला म्हणून. इतर अवांतर कारणे काही असली तरी मुसलमानांचा द्विराष्ट्रवादाचा हट्ट हे भारताच्या विभाजनाचे मुख्य कारण होय, हे निर्विवाद आहे.

मुस्लिम लीगचे अध्यक्ष झाल्यापासून द्विराष्ट्रवादाचे कट्टे पुरस्कर्ते बनलेले महमदअली जिना यांनी आपल्या सिद्धांताचे प्रतिपादन पुढीलप्रमाणे १९४० साली

लाहोरास केलेल्या आपल्या भाषणात केले आहे, " इस्लाम आणि हिंदुत्व हे दोन धर्म शब्दाच्या काटेकोर अर्थानुसार पाहता, धर्म नसून वस्तुतः परस्पर भिन्न सामाजिक व्यवस्था आहेत. हिंदु आणि मुसल्मान यांची धार्मिक तत्त्वज्ञाने, सामाजिक रूढी, वाङ्मय ही परस्परांहून भिन्न आहेत. त्यांच्यामध्ये परस्परांत बेटीव्यवहार आणि रोटीव्यवहार होत नाही, इतकेच नव्हे तर परस्पर विरुद्ध कल्पना आणि ध्येय यांच्यावर मुख्यतया आधारलेल्या दोन भिन्न संस्कृतींचे हे दोघे समाज वारस आहेत. त्या दोघांची पुराणे निराळी, वीर पुरुष निराळे आणि कथाप्रसंग निराळे. पुष्कळदा एकाचा जो महापुरुष तो दुसऱ्याचा शत्रू असतो. . ' राष्ट्र ' शब्दाची कोणतीही व्याख्या घेतली तरी तिच्या अन्वये मुसल्मान हे एक राष्ट्र ठरतात आणि त्यांना आपला स्वतःचा प्रदेश आणि राज्य मिळाले पाहिजे. "

या द्विराष्ट्रवादाचा प्रामुख्याने हिंदु समाजाचे मत बोलणाऱ्या कॉंग्रेसने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला; डॉ. राजेंद्रप्रसादासारख्यांनी या प्रमेयाचा फोलपणा दर्शविण्यासाठी ग्रंथ लिहिले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. मुस्लिम लीगने योजिलेल्या अघोरी उपायांशी मुकाबला देण्यास कॉंग्रेस पुढाऱ्यांची मुत्सद्देगिरी व दृढता अपुरी पडल्यामुळे असो, अथवा द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत हाच बरोबर असल्यामुळे असो, फाळणीला संमती देणे कॉंग्रेसी हिंदु पुढाऱ्यांना भाग पडले.

## पाकिस्तानचे धोरण

फाळणीने अस्तित्वात आलेले पाकिस्तान हे बोलूनचालून मुस्लिम राष्ट्र आहे. विसंवादी, किंबहुना विरोधी संस्कृतीच्या अल्पसंख्य परंतु वजनदार अशा जमातीचे अस्तित्व त्यांना शल्याप्रमाणे खुपणे, आणीबाणीच्या प्रसंगी अशा जमातीचे लोक राष्ट्रघातकी कारवाया करतील अशी त्यास धास्ती वाटणे हे स्वाभाविक आहे. म्हणूनच त्यांनी पाकिस्तानाच्या एकेका भागामधून हिंदूंचा पुरता नायनाट किंवा हकालपट्टी करण्याचा क्रम आरंभिला आहे. प्रथम वायव्य सरहद्दप्रांत आणि पश्चिम पंजाब यातून एकूणएक हिंदु त्यांनी नाहीसा केला. नंतर लगेच सिंधमधील हिंदूंचा छळ आरंभून त्यांना निर्वासित केले. हे पचले असे पाहून पूर्व बंगाल्यामधील हिंदूंवर त्यांनी संक्रांत आणली.

८ एप्रिलच्या करारामुळे त्यांचे शिरकाण आज काहीसे थाबल्यासारखे दिसत असले तरी उद्या ते होणार—आमच्या सरकारने जर परिणामकारक इलाज योजले नाहीत तर—हे निश्चित आहे

आधुनिक राष्ट्रवादाच्या दृष्टीने यात विलक्षण किंवा अस्वाभाविक असे काही नाही. आधुनिक काळातले राष्ट्र म्हणजे कोणत्याही क्षणी युद्धास सज्ज असा एकमुखी व एकसंध समाज. अर्थात आपल्या राष्ट्राच्या संस्कृतीशी आणि जीवनप्रवाहाशी विसवादी असा एखादा गट अगर समाज आपल्या राष्ट्रात असेल तर तो आणीबाणीच्या प्रसंगी धोक्याचा ठरेल असे राष्ट्रनेत्यांना वाटणे साहजिक आहे. जर्मनीतल्या ज्यू लोकांचा समाज मुसल्मानांहून हिंदु जितके निराळे आहेत तितका देखील बाकीच्या जर्मन राष्ट्राहून निराळा नव्हता. तरी पहिल्या महायुद्धात ज्यू लोकांनी घातकीपणा केला अशी समजूत होऊन, असली विसवादी जमात आपल्या राष्ट्रात नको म्हणून नाझीपक्षाने ज्यूंची ससेहोलपट केली, हे प्रसिद्ध आहे. तीच नीती पाकिस्तान तितक्याच निष्ठुरपणाने अल्पसंख्य हिंदूविरुद्ध आचरीत आहे.

## हिंदु आणि मुसलमान

पाकिस्तानचे धोरण त्याच्या द्विराष्ट्रवादाशी सुसंगत, सरळ व तर्कशुद्ध आहे. आपल्यापुढे प्रश्न आपल्या भारताचा आहे. पाकिस्तानातील हिंदूपासून पाकिस्तानाला एकपट धोका वाटत असेल, तर हिंदुस्थानातील मुसल्मानापासून संभवनीय धोका राष्ट्राला दसपट तरी निदान वाटावयास पाहिजे. माणूस मुळात येथून तेथून सारखाच असला तरी, हिंदु हा परंपरागत संस्कारांमुळे निरुपद्रवी, शांतताप्रिय, ज्याचा धर्म त्याला चांगला, अशा प्रवृत्तीचा असतो, मुसल्मान परंपरागत संस्कारामुळे धर्मवेडा व आक्रमक बनलेला असतो. त्यात हिंदुस्थानाच्या दृष्टीने अत्यंत अनर्थकारक असलेले द्विराष्ट्रवादाचे विष गेली पंधरा वर्षे या मुसल्मान समाजाच्या मनामध्ये भिनविण्यात आले आहे.

द्विराष्ट्रवादाचा पुरस्कार आणि पाकिस्तानची मागणी हिंदुस्थानात आज विद्यमान असलेल्या याच साडेतीन कोटी मुसल्मानांनी हिरिरीने केली होती. या मुसल्मानांचे म्होरके आज जरी आपल्या समाजाची हिंदी राष्ट्राविषयी निष्ठा जाहीर करीत असले तरी त्यांच्या वृत्तीची परीक्षा पाकिस्तानच्या विरुद्ध लढा उभा राहील तेव्हा खरीखुरी होईल.

## धर्मातीत राज्याची भूमिका

ही धास्ती किंवा हा धोका राहू नये, म्हणून आमच्या राष्ट्राच्या सध्याच्या नेत्यांनी एक उपाय योजिलेला आहे, तो कोणता म्हणाल, तर राज्याचे धर्मातीतत्व ( Secularism ) हा होय. राज्यसत्तेचा आणि राष्ट्रीय व्यवहाराचा धर्माशी काही संबंध नाही, सर्व धर्मांचे, पंथाचे व संप्रदायाचे लोक येथे सारखे मानले जातील; असे आपले धोरण ठेवले म्हणजे साहजिकच या साडेतीन कोटी मुस्लिम जमातीला आपल्याविषयी विश्वास वाटू लागेल आणि या राष्ट्राविषयी त्यांच्या मनात निष्ठा उत्पन्न होईल, अशी आमच्या पुढाऱ्यांची कल्पना दिसते.

परंतु एवढ्याने भागेल काय ? आज आपल्या काँग्रेस सरकारने जे धर्मनिरपेक्षत्वाचे धोरण जाहीर केले आहे व जे राज्यघटनेतही ग्रथित करून टाकले आहे, तेच पूर्वीपासून काँग्रेसचे धोरण होते. काँग्रेस प्रथमपासूनच सर्व जाती, संप्रदाय, धर्म यांना समान लेखीत आली आहे. तरी देखील धर्माधिष्ठित द्विराष्ट्रवादाच्या फैलावणाऱ्या जहराला ती आळा घालू शकली नाही. मग यापुढे तरी हे धर्मातीतत्वाचे धोरण भारतीय मुस्लिम समाजाला कशानेही विचलित न होणाऱ्या राष्ट्रनिष्ठेने बांधू शकेल असे मानता येईल काय ?

धर्मातीतत्वाचे धोरण हे केवळ अकरणात्मक आहे. सगळेजण सारखे समजले जातील, एवढ्या हमीने सगळ्या जणामध्ये ऐक्य, एकसंधपणा प्रस्थापित होईलच असे नाही. राष्ट्राला निर्धारतपणा वाटावयास पाहिजे असेल आणि राष्ट्राची प्रगती अनिर्बंध रीतीने पूर्ण वेगाने व्हावयास पाहिजे असेल, तर राष्ट्रामध्ये एकसंधपणा, एकजूट नांदावयास पाहिजे, त्याच्यामध्ये परस्पर विसंवादी असे अनेक गट किंवा जमाती असता कामा नयेत, हे सहज समजण्याजोगे आहे.

## दोन मार्ग

राष्ट्रातील अंतर्गत विसंवादी गट नाहीसे करण्याचे दोन मार्ग असू शकतील. एक मार्ग म्हणजे पाकिस्तानने आचरिला तोः विसंवादी अल्पसंख्य गटाला मारून किंवा हाकलून नाहीसा करणे हा. हा मार्ग आपण आचरावयाचा नाही, असे आपल्या राष्ट्रनेत्यांनी ठरविले आहे आणि आपल्या राष्ट्रातील बहुसंख्य समाजाला देखील नेत्यांचे हे धोरण पसंत आहे. अर्थात या मार्गाचा विचार करण्याचे प्रयोजन नाही. दुसरा मार्ग म्हणजे विसंवादी गटाचे विसंवादित्व नाहीसे करून त्याला सुसंवादी बनवून सोडावयाचे, हा होय.

मुसलमान समाजाच्या संबंधात विचार करावयाचा तर हे सुसंवादित्व दोन प्रकारचे असू शकेल. एक पूर्ण संवादित्व आणि दुसरें पुरेसें संवादित्व पूर्ण संवादित्व म्हणजे मुस्लिम समाजामध्ये हिंदुधर्माचा प्रसार करून त्यांना हिंदु बनवून सोडणे; आणि पुरेसे संवादित्व म्हणजे मुस्लिमांचा धर्म—म्हणजे उपासनामार्ग—तोच कायम राहिला तरी सांस्कृतिक दृष्ट्या त्या समाजाला आपल्याशी एकरूप करून सोडणे. हे एकरूपत्व इतके झाले पाहिजे की, कोणत्याही परिस्थितीत—पाकिस्तानाने कितीही चिथावणी दिली तरी—या समाजाची राष्ट्रनिष्ठा आणि हिंदू-विषयीचा बंधुभाव विचलित होणार नाही.

## पूर्ण संवादित्व

पूर्ण संवादित्व निर्माण करायचे, म्हणजे मुसलमानांमध्ये स्वधर्मप्रसार करावयाचा, तो कोणत्याही जबरदस्तीच्या अथवा फसवणुकीच्या मार्गांनी करावयाचा नाही, हे उघडच आहे. अशा मार्गांना आपल्या राज्यघटनेने बंदी केलेली आहे आणि ते योग्यच आहे. पण मन वळविण्याची सर्व प्रकारची प्रामाणिक आणि शांततामय साधने उपयोजिण्यास कोणाचीहि हरकत येण्याचे कारण नाही. विसंवादी गटांना अशा रीतीने आत्मसात करून घेणे हे राष्ट्रसंघटनेच्या दृष्टीने मोठे पुण्यकर्म होय. या पुण्यकर्माला आता काल अनुकूल येणार आहे. ज्या राष्ट्रात आपल्याला कायमचे राहायचे आहे त्यातील बहुसंख्य समाजाशी आपण एकरूप होऊन जावे अशी बुद्धी हळुहळू अल्पसंख्य समाजामध्यें उत्पन्न होऊ लागेल. या बुद्धीची जोडगण आपल्या प्रयत्नाशी करून देण्याचा शहाणपणा आपण दाखविला पाहिजे. या मार्गात अडचणी व संकटे येणार नाहीत असे नाही. स्वयंशिष्ट लोक खोट्या कागाळ्या करतील, खोटे आरोप करतील, सरकारी अधिकाऱ्याकडून गैरसमजावरून त्रास होईल. पण मिशनरी लोकांप्रमाणे चिकाटीने, निर्धाराने, दृढ भक्तीने हे काम चालविले पाहिजे. आपल्या राष्ट्राचे कल्याण यात आहे, ही ज्वलंत निष्ठा या कार्याच्या बुडाशी असली पाहिजे.

## पुरेसे संवादित्व

दुसरा मार्ग पुरेसे संवादित्व म्हणजे धर्मभिन्नता असली तरी सांस्कृतिक एकता करणे. आपले आजचे राष्ट्रनेते हे वस्तुतः असल्या सांस्कृतिक एकतेचे पुरस्कर्ते आहेत. हिंदुस्थानातील हिंदु-मुसलमानांचा धर्म भिन्न असला तरी थोड्या बहुत फरकाने दोघांची संस्कृती एकच आहे, दोघेही एकाच विचारसंपत्तीचे आणि

परंपरेचे वारस आहेत, असे डॉ. राजेंद्रप्रसाद प्रभृति नेत्यानी म्हटले आहे. सर्व धर्मांच्या, सप्रदायाच्या समिश्रणाने आपली भारतीय सस्कृती तयार झाली आहे, ती निवळ हिंदूची नाही, तशीच मुसल्मानाची वा जैनाची वा ख्रिस्त्याची नाही—तर सर्वांची आहे अशा आशयाचे विचार प. नेहरूनी अनेकवार व्यक्त केले आहेत.

पण हे हवेत तरगणारे विचार वेगळे, आणि प्रत्यक्ष अनुभवास येणारी वस्तुस्थिती वेगळी. हिंदु-मुसल्मानांच्या ऐक्याचा डिंडिम कितीही जोराने वाजविला तरी प्रत्यक्ष प्रसग येताच हे दोघे परस्पराच्या नरडीचा घोट घेण्यास सिद्ध झाले, हे आपल्या प्रत्यक्ष अनुभवास येऊन चुकले आहे. अर्थात या बाबतीत नेहरू-राजेंद्र प्रभृतींचे म्हणणे चुकीचे ठरून, हिंदु-मुसल्मान हे समाज तत्त्वज्ञान, सस्कृती, परपरा, इतिहास, सामाजिक रूढी, राहणी इ. सर्व बाबतीत परस्परांहून अत्यत भिन्न आहेत, हे जिनाचे म्हणणे प्रत्यक्ष इतिहासाने खरे करून दाखविले आहे. पुढून शत्रू येताना पाहून वाळूत चोच खुपसून बसणाऱ्या आस्ट्रिच पक्ष्याप्रमाणे पोकळ व भोंगळ भाषणे करून वस्तुस्थिती नजरेआड करू पाहणे पूर्वी एकवार घातक ठरले आहे. त्याचा भयकर मोबदला द्यावा लागला आहे. तीच चूक पुनः करता कामा नये. विसवाद आहे, विरोध आहे, द्वेष आहे, याची जाणीव ठेवून, विसवादाच्या जागी सुसवाद, विरोधाच्या जागी ऐक्य आणि द्वेषाच्या जागी प्रेम कसे निर्माण करावयाचे याचा विचार केला पाहिजे.

### श्री. टंडनजींचे मत

या वर्षाचे कॉंग्रेसचे अध्यक्ष बाबू पुरुषोत्तमदास टडन यानी सुमारे दोन वर्षांपूर्वी एका व्याख्यानात असे प्रतिपादिले होते की " आता पाकिस्तान वेगळे झाल्यावर हिंदुस्थानातील मुसलमानांनी हिंदु सस्कृतीचे ग्रहण करावे. त्यांचा धर्म इस्लाम असला तरी, सस्कृती हिंदूची व त्यांची एकच राहील व राहावी."

परवा नाशिक कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात या प्रश्नाला त्यानी स्पर्श केला असून पूर्वीपेक्षा काहीसे निराळे प्रतिपादन केले आहे. ते म्हणतात—

" आपल्या देशामध्ये, काही स्थानिक फरक असले तरी, एक संस्कृती ( Culture ) असावी आणि सर्व जमातींनी त्या संस्कृतीला आकार देण्यामध्ये व विकसित करण्यामध्ये भाग घ्यावा. माझे असे नम्र निवेदन आहे की आपल्या

देशाने यापुढे कधीही धर्म आणि संस्कृती यांची गल्लत करण्याची चूक करू नये. भिन्न भिन्न धर्मांच्या लोकांची संस्कृती एक असू शकते. सर्वांना समान अशा एका संस्कृतीचा विकास आणि संवर्धन करण्याचा कामी हातभार लावण्याची जरूरी सर्वांच्या मनावर ठसविण्याकरिता काँग्रेसजनांनी फार मोठा यत्न करण्याची आवश्यकता आहे."

## हिंदूंच्या संघशक्तीचा ऱ्हास

सर्वांची एक संस्कृती निर्माण करावी हे म्हणणे फार सोपे आहे, पण करणे तितकेच कठीण आहे. हा बिकटपणा मुसलमान समाजाच्या तेढेपणामुळे आणि आत्यंतिक भिन्नतेमुळेच केवळ आला आहे असे नव्हे. मुसलमानांना आत्मसात करून घेण्याचा प्रश्न तर बिकट आहेच, पण मुसलमानांना कशामध्ये आत्मसात करून घ्यायचे ? अशी एक हिंदु संस्कृती म्हणून चीज आहे कुठे, की जिच्यात मुसलमानांना सामील करून टाकता येईल ? खुद्द हिंदु समाज अत्यंत विस्कळीत, परस्पर विसंवादी अशा अनेक खंडदिखंडामध्ये विभक्त झालेला असा आहे. हिंदु समाजातल्या जातीजातीत परंपरा, राहणी, चालीरीती यांच्या बाबतीत परस्पर इतकी भिन्नता आढळून येते, की ते एका संस्कृतीचे घटक आणि एका धर्माचे अनुयायी आहेत हे म्हणणे हास्यास्पद वाटू लागते. खेडेगावात राहणारे मुसलमान आणि मराठे हे एकमेकांना जितके जवळचे वाटतात, तितके ब्राह्मण मराठ्यांना जवळचे वाटत नाहीत, ही अनुभवाची गोष्ट आहे. गेली कित्येक शतके विलगीकरण आणि भेदाचे दृढीकरण हेच जणू हिंदु समाजाचे ध्येय बनून राहिले होते. प्रत्येक जातीने, जमातीने, संप्रदायाने इतरांपासून आपण जास्तीत जास्त वेगळे कसे होऊ याबद्दल कटाक्षपूर्वक दक्षता घेतलेली दिसते. त्यामुळे हिंदु समाज हे अठरा धान्यांचे रुचकर कडबोळे न होता अठरा धान्ये एकत्र एका सुपामध्ये घालून ठेवावी, तसा अत्यंत विस्कळीत जातिसमूह बनला आहे.

समाजाचे नियमन करणारे नेते पूर्वी आपल्या समाजाला लाभले नाहीत असे नाही. असे म्हणता येईल की बुद्धिपुरस्सर नियोजन ( planning ) करून समाजनियमन करणारे नेते आपल्याच समाजाला लाभले. सूत्रकार, स्मृतिकार, निबंधकार हे निरनिराळ्या काळातले धर्मशास्त्रप्रवक्ते म्हणजे वास्तविक समाज-नियंतेच होत. प्राचीन काळी आपल्या धर्मशास्त्रकारांची नीती, भिन्न भिन्न वंश, जाती आणि त्यांच्या संस्कृती यांचा समन्वय करण्याचीच होती. पण प्राचीन

काळची ही प्रवृत्ती लुप्त होऊन गेली कित्येक शतके विलगीकरणाची आणि घनी-भवनाची प्रवृत्ती बळावली. प्रत्येक जातिरूपी गट इतरापासून अलग होऊन प्रस्तरीभूत होऊ लागला. प्रत्येक गटाची दैवते निराळी, उपासनापद्धती निराळी, पेहराव निराळा, चालीरीती निराळ्या, असे होऊ लागले. पागोट्याची वृत्ती एकच असली तरी ब्राह्मणाचे पागोटे निराळे, शेणव्याचे ( ब्राह्मणाचाच पोटभेद ) निराळे, प्रभूचे निराळे, मराठ्याचे निराळे—त्यात आणखी शिंदेशाही पगडी निराळी, होळकरशाही निराळी आणि गायकवाडी तिसरीच ! रोटीबंदी आणि बेटीबंदी यांचा तर अतिरेक झाला, देशस्थ कोकणस्थ एकमेकाच्या पंक्तीला बसेनात, उच्च मराठे कडूना अपंक्त समजू लागले !

समाजाच्या या प्रस्तरीभूत स्थितीवर इंग्रजी अमल सुरू झाल्यापासून आघात होत आहेत. पण त्यात काही शिस्त किंवा पद्धत नसल्यामुळे सर्वत्र गोंधळ माजून ' अंधेर नगरी आणि बेबंद राज्य ' असा प्रकार झाला आहे. पूर्वी चुकीची का होईना, पण काही तरी व्यवस्था होती. जातींच्या अगर संप्रदायाच्या बंदिस्त कुपणाच्या आत सहकार्य व बंधुभाव चांगला नांदत असे, आता तो नष्ट झाला आहे आणि नवीन कोणतेही सहकार्याचे दृढ अधिष्ठान निर्माण झालेले नाही. त्यामुळे विस्कळीतपणा शिगेस पोचला आहे. समाजाची संघशक्ती शून्यवत झाली आहे.

## सांस्कृतिक नियोजन

यातून आपल्याला स्वतंत्र भारताची, राष्ट्राला एकसंध, एकमुखी बनविणारी समन्वयात्मक संस्कृती निर्माण करावयाची आहे. भारताच्या आर्थिक पुनर्घटनेसाठी आणि उत्कर्षासाठी ज्याप्रमाणे नियोजनाची ( Planningची ) जरूरी आहे त्याप्रमाणे त्याच्या सांस्कृतिक व सामाजिक पुनर्घटनेसाठी आणि उत्कर्षासाठी नियोजनाची आवश्यकता आहे. हिंदु कोड बिलाचे निर्माते श्री. नानासाहेब घारपुरे, टी. आर. वेंकटरामशास्त्री, बाबू पुरुषोत्तमदास टंडन, डॉ भी रा. आंबेडकर, सर्वपल्ली राधाकृष्णन् इत्यादि, आधुनिक भारताचे धर्मद्रष्टे होण्यास म्हणजेच राष्ट्राचे सांस्कृतिक नियोजक होण्यास पात्र अशी मुनितुल्य मंडळी अनेक आढळतील.

आपल्याला समाजघटकांचे घनीभवन करून त्यांना प्रस्तर करून सोडावयाचे नाही; उलट त्यांचे द्रवीभवन किंवा बाष्पीभवन करून त्यांना परस्परात मिसळणारे,

चल, वेगवान् आणि सामर्थ्यवान् अशा अनवावयाचे आहे. सर्वांना एकत्र आणील, सामान्यांना सन्मानाने जवळ करील, दलितांना वर खेचील, उद्धतांना नमवील, तेढ्यांना सरळ करील, अशी उदार व्यापक आणि समर्थ संस्कृती निर्माण करावयाची आहे. अत्यज तिच्यातून वगळले जाणार नाहीत, मुसलमान तिच्यातून निसटू शकणार नाहीत, ख्रिस्ती अगर पारशी तिजपासून अलग राहू इच्छिणार नाहीत, अशा संस्कृतीचे नियोजन आता झाले पाहिजे.

संस्कृती म्हणजे सत्य अहिंसा असल्या उदात्त तत्त्वांची पढवणी नव्हे. संस्कृती म्हणजे संस्कारयुक्त आचार. पाश्चात्त्य देशांमध्ये जेवणाच्या आरंभी काटे-चमचे कसे ठेवायचे आणि जेवणाच्या अखेरीस कसे ठेवायचे, असल्या क्षुल्लक गोष्टीपासून तो राज्याभिषेकसमयी काय विधी आचरायचा, येथपर्यंत सर्व गोष्टी अलिखित नियमाने ठरलेल्या असतात. कोणच्या प्रसंगी कोणच्या तऱ्हेच्या कटाईचा पोषाख वापरावयाचा हे ठरलेले असते. आमच्याकडे देखील स्मृतिकारांनी शौच कसे करावे येथपासूनच्या सर्व गोष्टी सांगितल्या आहेत. सध्या आपणा भारतीयांच्या आचाराच्या सर्वच बाबतीत बजबजपुरी माजली आहे, ती नाहीशी करून तेथे नियोजित स्वातंत्र्य निर्माण केले पाहिजे.

या सांस्कृतिक नियोजनाच्या बुडाशी तत्त्वे कोणती असावी आणि त्याचे उद्दिष्ट काय असावे, याचा थोडक्यात निर्देश करून हे विवेचन संपवू.

( १ ) भारतातील निरनिराळ्या जातींचा व धार्मिक गटांचा खाण्यापिण्याच्या बाबतीतला अलगपणा नाहीसा झाला पाहिजे. शाकाहाऱ्यांनी मांसाहारी बनले पाहिजे असा याचा अर्थ नाही. पण दोघांची एकत्र पंगत होण्याइतका शाका-हाऱ्यांनी आपला सोवळेपणा अथवा भावनांचा नाजूकपणा सोडला पाहिजे.

( २ ) पेहरावात आणि भेटीच्या प्रसंगीच्या शिष्टाचारात एकरूपता आणली पाहिजे. प्रांतनिहाय थोडेबहुत फरक चालतील. पण जाती, धर्म, संप्रदाय यांच्यात परस्पर भिन्नपणा असता कामा नये.

( ३ ) अस्पृश्यता घटनेने नाहीशी केली आहे. पण ती प्रत्यक्षात ताबडतोब नाहीशी झाली पाहिजे. घराच्या बाहेर पडल्यावर कोणाचेही कसलेही सोवळे अथवा स्पर्शास्पर्शांचे निर्बंध चालू देता कामा नयेत.

(४) बेटीबंदी रद्द होऊन पधरा वर्षांच्या अवकाशामध्ये जातींचे विलीनीकरण घडून आले पाहिजे. सर्व हिंदुसमाज इथून तिथून एक झाला पाहिजे. सर्व हिंदूकरिता एक उपनयन विधी, एक विवाहविधी आणि एक अंत्यविधी प्रचलित झाला पाहिजे.

(५) भिन्नधर्मीयांमध्ये विवाह सर्रास व्हावयास पाहिजेत. विवाहामुळे धर्मान्तर होत नाही हे तत्त्व पूर्णतया प्रस्थापित झाले पाहिजे.

(६) प्रांतनिहाय योग्य त्या बदलास परवानगी देऊन राष्ट्रीय महोत्सव आणि सण निश्चित केले पाहिजेत. या महोत्सवामध्ये सर्वांनी भाग घेतलाच पाहिजे. न घेईल तो समाजद्रोही गणला जावा. या ठरीव महोत्सवांखरीज दुसरे कोणतेही उत्सव कोणीही सार्वजनिकरीत्या करता कामा नयेत. केल्यास ते राष्ट्रविरोधी कृत्य मानले जावे.

येथे अधिक तपशिलामध्ये शिरण्यात मतलब नाही. मुख्य मुद्दा हा की राष्ट्रातील तमाम व्यक्तींना समान आचार, समान विचार आणि समान संस्कार यांच्या एका पातळीवर आणून त्यांच्यामध्ये साहजिकपण एकसंघपणा, एकमुखी वृत्ती निर्माण होईल असे केले पाहिजे. म्हणजे या सर्वांच्या अंगभूत जी अभंग राष्ट्रनिष्ठा ती निर्माण होईल. या सांस्कृतिक आणि सामाजिक नियोजनाचा पाया धर्म हा न राहता राष्ट्र हा राहावा. राष्ट्रनिष्ठा हे साधन, राष्ट्रैक्य हा मार्ग आणि राष्ट्रशक्ती हे साध्य मानले जावे. सर्व धर्म, सर्व जाती, सर्व संप्रदाय यांचा या नियोजनात समावेश झाला पाहिजे. कोणालाही यांच्यापासून फटकून राहू देता कामा नये. देशातील विचाराग्रणींनी असे नियोजन हाती घेतले, आणि सरकारने त्याचा पुरस्कार केला तरच आपल्या या विशाल देशातील विस्कळीत जनतेचा तरणोपाय आहे.

♣ ♣ ♣

—'राष्ट्रशक्ती,' नागपूर, विजयादशमी विशेषांक,
२० आक्टोबर १९५०.

अनुक्रम 3066 दि:
नों. दि:

८.

# परिभाषानिर्मितीचें कार्य

— १ —

स्वातंत्र्य मिळाल्यापासून ज्या अनेक प्रश्नांना महत्त्व आलेले दिसते त्यात भाषेच्या प्रश्नाची प्रामुख्याने गणना करावी लागेल. या प्रश्नाचे दोन विभाग पडतात. परकीय भाषा इंग्रजी, राष्ट्रभाषा हिंदी आणि प्रादेशिक भाषा बंगाली, तेलुगु, मराठी, तामीळ इ०, यांचे आपल्या राष्ट्राच्या व त्यातील राज्यांच्या सामाजिक व सरकारी व्यवहारात काय स्थान असावे आणि या भाषांचा परस्पर संबंध कसा असावा, हा या महान प्रश्नाचा एक विभाग होय. निरनिराळ्या राज्यामध्ये सरकारी कामकाजाच्या भाषा कोणत्या असाव्या, देशातील माध्यमिक व उच्च शिक्षण कोणच्या भाषेतून देण्यात यावे, हे व असेच सध्या वादग्रस्त होऊन बसलेले पोटप्रश्न या विभागात अंतर्भूत होतात. थोडक्यात म्हणायचे तर या विभागाला 'भाषिक राजकारण' असे नाव देणे योग्य होईल. निखालस राजकारण म्हणून जे समजले जाते, त्याच्याशी या विषयाचा निकट संबंध येतो—आणला जातो, हे एक; आणि भिन्न भिन्न भाषांच्या परस्पर संबंधात एकमेकींचे हक्क, आक्रमण अथवा दडपण इत्यादी भावनोद्दीपक मुद्दे

उपस्थित केले जातात, हे दुसरें;—या दोन्ही कारणास्तव 'भाषिक राजकारण' असे नाव या विभागाला देणे रास्त ठरेल.

भाषाविषयक महान प्रश्नाचा दुसरा विभाग विधायक (constructive) आणि पंडिताऊ (academic) स्वरूपाचा आहे असे म्हणता येईल. आपली राष्ट्रभाषा हिंदी आणि प्रादेशिक भाषा बंगाली, तेलुगु इत्यादी, यांना सर्व प्रकारच्या सामाजिक व सरकारी व्यवहाराची गरज पुरी पाडण्याइतके समर्थ कसे बनवावे याचा विचार या विभागात अंतर्भूत होतो. प्रस्तुत लेखात याच विभागाचा विचार करण्याचे योजिले आहे. राजकारणी लोक भाषांचे राजकारण लढवितील. पण भाषांचे सामर्थ्य वाढले नाही तर, ते राजकारणही फोल ठरेल व आपल्या देशाचे भाषिक स्वातंत्र्य येणार नाही.

गेल्या दीडशे वर्षांत, इंग्रजी अमलामध्ये, हिंदुस्थानच्या सर्व प्रांतांमध्ये विचारजागृती होऊन सर्व भाषांच्या वाङ्मयाला एक प्रकारे बहर आला असला तरी राष्ट्राच्या गरजांच्या मानाने आपल्या भाषा एकंदरीने पंगूच राहिल्या. १९२५ च्या सुमारास पुणे येथे एका संमेलनात (मला वाटते, शारदोपासक संमेलन) विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी इंग्रजी अमलामध्ये आपल्या मराठी भाषेच्या वापराचा किती संकोच झालेला आहे, हे भेदक व भेदक रीतीने दाखवून दिले होते. राष्ट्राच्या एकंदर व्यवहाराचे क्षेत्र किती व्यापक व बहुशाख असते हे दाखवून देऊन या क्षेत्राच्या प्रचंडपणाच्या मानाने मराठीचा (व देशी भाषांचा) वापर किती अल्प क्षेत्रात होतो हे त्यांनी सांगितले होते. अशा रीतीने मराठीच्या उपयोगाचा जर संकोच होत चालला तर मराठी भाषा (अर्थात सर्व देशी भाषा) मरण्याच्या पंथास लागेल असे भाकीतही त्यांनी वर्तविले होते, असे प्रस्तुत लेखकास स्मरते.

राजवाड्यांचे भविष्य जरी चुकीचे असले आणि या अशुभ भविष्याबद्दल त्यांच्यावर त्यावेळी खूप टीकाही झाली असली, तरी त्यांचा मुख्य मुद्दा फारसा चुकीचा नव्हता. त्यांच्या प्रतिपादनाची यथार्थता आपल्याला पटेल अशी स्थिती आता प्राप्त झाली आहे. स्वराज्य, स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी 'स्वधर्म स्वदेश स्वभाषादिकांचा । जगी मान व्हावा असा हेतु साचा' हे आपण घोकीत होतो खरे, पण स्वराज्य व स्वातंत्र्य खरोखर आमच्यावर येऊन आदळल्या-नंतर आपण खडबडून चक्क होऊन विशाल विश्वाच्या खळखळाटात लोटल्या

गेलेल्या आपल्या देशाचे साचभावे निरीक्षण करू लागलो तेव्हा आपणास काय आढळून आले ? आहे का खरोखरीच आपला धर्म जगाने शिरी धारण करण्याजोगा ? आपल्या भाषा खरोखरी इतक्या सपन्न आहेत का, की जगातल्या प्रगत भाषाच्या सपूतानी त्यांचा बहुमान करावा ?

देश व धर्म याची गोष्ट सोडून देऊन भाषांच्या पुरते बघितले तर आमच्या देशी भाषाची स्थिती लहानशा डबक्याप्रमाणे होती–आहे; व त्या भाषांचे दुरभिमानी जे कोणी असतील त्याना—

बसोनी थिल्लरी । बेडुक सागरा धिक्कारी

हा तुकारामबुवांचा दृष्टान्त देणे योग्य होईल, यात शका नाही. सरकारी कामकाजाचे जरासे गुतागुतीचे पत्र देशी भाषेत–विशेषतः हिंदीत–लिहावयाचे तर पंचाईत पडते. मग निरनिराळ्या शास्त्रामधील उच्च व गहन सज्ञा व विचार देशी भाषेत व्यक्त करणे दूरच राहिले. गेली दीडशे वर्षे आपल्या राष्ट्राचे वरच्या पातळीचे बौद्धिक व्यवहार इग्रजीतून होत राहिले. त्यामुळे अर्थव्यक्तीकरणाच्या बाबतीत आपल्या भाषांची प्रगती व्हावी तशी झाली नाही. आणि गेल्या दीडशे वर्षांचा काळ हाच मानवसमाजाची सर्व क्षेत्रात वायुवेगाने प्रगती झाल्याचा काळ होय. मानवाच्या उत्पत्तीपासून एकोणिसाव्या शतकाच्या प्रारभापर्यंत मानवाची जेवढी वैज्ञानिक आणि आधिभौतिक प्रगती झाली नसेल, तेवढी एकोणिसाव्या शतकाच्या प्रारभापासून तो आजपर्यंतच्या दीडशे वर्षांत झाली आहे. हे प्रचड ज्ञान आणि या ज्ञानामुळे अफाट वाढलेले व्याप व व्यवहार व्यक्त करण्याकरिता भाषा हेच सर्वोत्कृष्ट साधन असल्यामुळे ज्या पाश्चात्त्य राष्ट्रानी हे ज्ञान व हे व्याप निर्माण केले त्याच्या भाषा साहजिकपणे ज्ञानाच्या व व्यापांच्या वाढीबरोबर समातर रीतीने वाढत गेल्या. आपल्या देशातील इंग्रजी भाषेच्या दडपणामुळे ही स्वाभाविक प्रक्रिया घडून येऊ शकली नाही.

भौतिक शास्त्राच्या प्रगतीच्या पूर्वी दोनतीनशे वर्षे पाश्चात्त्य राष्ट्रांनी वैचारिक प्रगतीला आरभ केला होता. विचारक्रांतीच्या या युगाला ' नवचैतन्य ' (Renaiscence) असे अभिधान आहे. तेव्हापासून पाश्चात्त्य राष्ट्रांनी जगभर आवाडाव करून राजकारण, कायदा, राज्यशासन, व्यापार आणि अर्थव्यवहार याचा व्याप इतका वाढविला की प्रत्येक क्रियेचे आणि व्यवहाराचे अनेक सूक्ष्म, सूक्ष्मतर भेदप्रभेद निर्माण झाले, आणि या व्यवहारवृद्धीबरोबरच समांतर रीतीने

त्यांच्या भाषाही वाढत गेल्या. दुर्दैवाने याच काळात आपल्या देशाची सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रगती थांबून आपला देश बौद्धिक व वैचारिक दृष्ट्या केवळ 'थंड गोळा' झाला होता. अर्थात आपल्या भाषाही खुंटलेल्या अवस्थेत राहिल्या.

समाजाच्या विचारात व व्यवहारात येणाऱ्या सूक्ष्मतेमुळे भाषेची अभिवृद्धी कशी होत जाते याची सर्वांना समजण्याजोगी एकदोन उदाहरणे देता येतील. आपल्या देशात जुन्या काळी न्यायदानाच्या पद्धतीत दिवाणी (Civil) आणि फौजदारी (Criminal) हा भेद नव्हता. फौजदारीला इंग्रजीत prosecution म्हणतात व दिवाणी दाव्याला suit म्हणतात. आपल्या स्मृतीमध्ये 'अभियोग' हा शब्द आढळतो, पण तो सर्व प्रकारच्या न्यायप्रविष्ट तक्रारींना उद्देशून वापरलेला दिसतो. त्यात दिवाणीफौजदारीचा भेद नाही. याचा अर्थ हा, की समाजाच्या व्यवहारात हे पृथक्करण त्या वेळी झालेले नव्हते. दुसरा एक 'आसेध' हा शब्द आपल्या धर्मशास्त्रग्रंथात आढळतो. पण त्याचा अर्थ बराच स्थूल उर्फ मोगळ असल्याचे दिसते. अलीकडच्या भाषेत बोलायचे तर आसेध म्हणजे समन्स, आसेध म्ह० वारंट, आसेध म्ह० अटक, आसेध म्ह० जप्ती! ही गोष्ट हेच दर्शविते की या सर्व शब्दांनी दर्शविलेल्या क्रियांचे सूक्ष्म पृथक्करण त्या काळात झालेले नव्हते. ज्या मनुष्याविरुद्ध काही तक्रार करण्यात आली असेल त्याला आपली बाजू पुढे मांडण्यास भाग पाडता येईल असा काही तरी इलाज करणे म्हणजे 'आसेध' एवढी ढोबळ कल्पना त्या वेळी असावी असे दिसते.

— २ —

इंग्रजी अमल सुरू झाल्यानंतर इंग्रजांनी, विशेषतः प्रारंभीच्या काळात, देशी भाषांची वाढ पुष्कळ केली, यात काही शंका नाही. त्यांनी न्यायदानपद्धती इथे चालू केली, पण न्यायदान हे सामान्य जनतेकरिता असल्यामुळे न्यायाच्या व्यवहारात लागणारे शब्द इथेच तयार करवून घेऊन ते त्यांनी वापरात आणले. वरच्या परिच्छेदात आलेले शब्द, म्हणजे दिवाणी, फौजदारी, जप्ती, तसेच अदालत, वकील, हुकूमनामा, फिर्याद, दावा इ० शेकडो शब्द मुख्यतया इंग्रजी अमलाच्या प्रारंभीच्या काळातच आपल्या भाषेत दृढमूल होऊन गेलेले आहेत. न्यायदानाची सर्व परिभाषा, त्याचप्रमाणे जिल्ह्यापर्यंतच्या सरकारी कामकाजाची

परिभाषा इंग्रज शासकांनी देशी भाषांसाठी तयार करविली. हे शब्दघडणीचे कार्य मुख्यतया बंगाल्यात झाले व तेथे तयार झालेली परिभाषा प्रांतभेदानुसार थोड्याफार फरकाने इतरत्र रूढ करण्यात आली. बंगाल्यात इंग्रजांचा अमल सर्वांत अगोदर सुरू झाला आणि तेथील इंग्रजांच्या पूर्वीचे राजे मुसलमान होते. साहजिकच इंग्रजांनी जी परिभाषा बनविली ती त्या काळी मुसलमानी राज्यात प्रचलित असलेल्या फारसी शब्दसंग्रहावरून तयार करविली. पुढे जरुरीनुसार संस्कृत शब्दांचा समावेश त्यात करण्यात आला, पण एकंदरीने त्याचे प्रमाण थोडेच राहिले.

या गोष्टी अर्थात इंग्रजांनी आपले राज्य चालविण्यास जरुरीच्या म्हणून केल्या. देशी भाषांचे संवर्धन होऊन त्यांचे सामर्थ्य वाढावे, हा त्यात हेतू नव्हता. पण हा हेतू ज्यात स्पष्ट दिसून येतो असेही अनेक प्रयत्न त्यांनी केले ही गोष्ट कृतज्ञतेने नमूद करून ठेवायला पाहिजे. ईस्ट इंडिया कंपनीचे धोरण खरोखरी प्रजानुरंजनाचे होते. देशी भाषांचे शक्य तितके सर्वांगपरिपूर्ण कोश कंपनीच्या डायरेक्टरांच्या प्रोत्साहनाने करविण्यात आले. सुमारे १८४८ पर्यंत देशी भाषातूनच शिक्षण देण्याचे धोरण डायरेक्टरांचे होते. तेव्हा सर्व विषयाची पुस्तके लिहिण्याचा प्रयत्न झाला व त्यांसाठी शास्त्रीय परिभाषा देखील बनविण्यात आली. गणित, भूमिती, पदार्थविज्ञान, रसायन इ० विषयात माध्यमिक शिक्षणापर्यंतची जी परिभाषा सध्या आपल्या भाषेत रूढ होऊन गेलेली आहे, तिचे मूळ शंभर वर्षांपूर्वी ईस्ट इंडिया कंपनीच्या आमदानीत झालेल्या परिभाषानिर्मितीच्या प्रयत्नात आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

पुढे युनिवर्सिट्या उर्फ विद्यापीठे आली; पण देशी भाषांचा आश्रय तुटला. सरकारने निराश्रित केलेल्या देशी भाषांना विद्यापीठामधून बाहेर पडलेल्या पदवीधर विद्वानांनी सनाथ केले. देशाभिमानाने प्रेरित झालेल्या अनेक मान्यवर पंडितांनी देशी भाषांचा कैवार घेऊन चळवळी केल्या व विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात देशी भाषांना स्थान मिळवून दिले. अनेकांनी प्रौढ शास्त्रीय ग्रंथ निर्माण करून भाषेच्या शब्दसंपत्तीत भर घातली. अभ्यासविषय म्हणून देशी भाषांना स्थान मिळाल्यानंतर शिक्षणाचे माध्यम देशी भाषा असाव्या, ही मागणी सुरू झाली, आणि माध्यमिक शिक्षणापर्यंतचे माध्यम देशी भाषा या बहुतांशी बनल्या असून

विद्यापीठीय शिक्षणाचे माध्यम होण्याच्या बेतात त्या आहेत, अशा दोन कालखंडांमधल्या उंबरठ्यावर आपण आज आहो.

या अलीकडच्या काळात देशी भाषांसाठी शास्त्रीय परिभाषा बनविण्याचे वैयक्तिक व संघटित प्रयत्न अनेक झाले. दीर्घदर्शी व प्रतिभाशाली नृपती सयाजीराव गायकवाड यांच्या प्रेरणेने व आश्रयाने तयार झालेला राज्यकारभार, कायदा, कोर्टव्यवहार इ० विषयांतील इंग्रजी शब्दांचे संस्कृत, गुजराती, मराठी, हिंदी व उर्दू प्रतिशब्द देणारा 'सयाजी शासनकल्पतरु' नावाचा कोश इ. स. १९३१ साली प्रसिद्ध झाला. काशी नागरी प्रचारिणी सभेने निरनिराळ्या भौतिक शास्त्रांतील संज्ञांचे हिंदी प्रतिशब्द देणारे कोश तयार केले. कलकत्ता विद्यापीठाने एक परिभाषासमिती नेमून बंगाली भाषेसाठी हेच कार्य केले व निरनिराळ्या शास्त्रांच्या परिभाषेच्या पुस्तिका प्रसिद्ध केल्या. गुजरातेत अमदाबादेस गांधीजींचे गुजरात विद्यापीठ व गुजरात व्हर्न्याक्युलर सोसायटी यांनी परिभाषानिर्मितीचे काही कार्य केले आहे. हैद्राबादेच्या निजाम सरकारने तर उर्दूमध्ये तमाम विषयांच्या उच्च शिक्षणाची परिभाषा तयार करण्याचा चंग बांधून त्यासाठी उस्मानिया विद्या-पाठाची एक शाखाच खोलली होती. या शाखेने आरबीनिष्ठ उर्दूत परिभाषा संपूर्णतया निर्माण केली असल्याचे ऐकिवात आहे. महाराष्ट्रात महाराष्ट्र साहित्य परिषद् आणि पुण्याचे शास्त्रीयपरिभाषामंडळ यांनी बरेच काम केलेले असून आपआपले शब्दसंग्रह प्रसिद्ध केले आहेत. प्रा. म. वि. आपटे यांचे या बाबतीतले परिश्रम दांडगे आहेत.

वैयक्तिक प्रयत्नही अनेक झाले आहेत. श्री. पी. जी. शहा या गुजराती शास्त्रज्ञाचा एक परिभाषाकोश प्रसिद्ध झाला आहे. आपल्याकडील श्री. यशवंत रामकृष्ण दाते यांनी निरनिराळ्या स्थळी व काळी वापरण्यात आलेल्या शास्त्रीय संज्ञा गोळा करून आपला परिभाषाकोश तयार केला आहे. त्यापूर्वी प्रा. नी. बा. रानडे यांनी केलेल्या इंग्रजी मराठी कोशात इंग्रजीतील शास्त्रीय संज्ञांना देशी प्रतिशब्द देण्याचा प्रयत्न कसोशीने केलेला आढळतो. हे सर्व प्रयत्न पूर्वीपासून रूढ असलेल्या व प्रयुक्त झालेल्या संज्ञा व शब्दप्रयोग यांची बूज राखून केलेले असल्यामुळे अत्यंत उपयुक्त झाले आहेत.

परिभाषेच्या बाबतीत सर्वांत अधिक गाजलेला अगदी अलीकडचा प्रयत्न

डॉ. रघुवीर यांचा होय. त्याचा उल्लेख करण्याचा पुढे प्रसंग येणार असल्यामुळे येथे केवळ नामनिर्देश करून पुढे जाणे उचित होईल.

वर वर्णिल्याप्रमाणे देशी भाषाची प्रगतीसाठी धडपड चालू असता स्वराज्य आले. त्याबरोबर भाषाविषयक प्रश्नाचे स्वरूप बदलून गेले. भारताच्या राज्यघटनेत हिंदी ही भारतीय संघाची सरकारी भाषा ठरविली गेली, मात्र १५ वर्षे इंग्रजी हीच चालू राहील अशी त्या ठरावाला पुस्ती जोडली गेली. हिंदीखेरीज बाकीच्या देशी भाषांचा घटनेत केवळ उल्लेख केला गेला; त्याचे स्थान अगर अधिकाराचे क्षेत्र या गोष्टी अनिश्चित स्वरूपात लोंबत राहिल्या. सर्वांचे लक्ष मुख्यत्वे हिंदी भाषेकडे लागले आणि राष्ट्रभाषेच्या पदवीवर सार्वभौमत्वाने स्थानापन्न होण्यासाठी तिला संपन्न आणि समर्थ कसे बनविता येईल याविषयी सर्व बाजूंनी प्रयत्न सुरू झाले. प्रादेशिक भाषाच्या उत्कर्षाच्या आड हिंदी येणार नाही असे वारंवार म्हटले गेले. पण बिचाऱ्या प्रादेशिक भाषांना कोणी वाली राहिला नाही असे हळूहळू प्रत्ययास येऊ लागले.

मुख्य बदल झाला तो मनोवृत्तीत. पूर्वीच्या काळात स्वभाषाभिमान हे देशाभिमानाच्या आणि स्वातंत्र्याच्या चळवळीचे एक महत्त्वाचे कलम होते. खाजगी व्यवहारात, सार्वजनिक संस्थात, लेखनात भाषणात स्वभाषेचा उपयोग करण्याबद्दल कटाक्ष बाळगिला जाई. स्वातंत्र्य मिळताच भारतातल्या मुख्य भाषा आपापल्या प्रदेशात सार्वभौमपदावर अधिष्ठित होतील; आपल्या भाषेत सरकारचा सर्वोच्च कारभार चालला आहे, हायकोर्टांचे निवाडे जनतेच्या भाषेत होत आहेत, विद्यापीठातले अगदी अखेरच्या पायरीपर्यंतचे शिक्षण त्या त्या प्रदेशातल्या भाषेमधून होत आहे—हे सर्व पाहण्याचे भाग्य आपण अनुभवू; असे मनोरथ विचारवंतांनी आपल्या मनाशी बाळगिले होते. हिंदी अथवा हिंदुस्तानी राष्ट्रभाषा व्हावी याविषयी प्रयत्न चालले होते; पण ते सगळे जनतेने स्वयंप्रेरणेने स्वयंभू उत्साहाने चालविलेले प्रयत्न होते. हिन्दी साहित्यसंमेलनाने राष्ट्रभाषा प्रचार समितीची मोठी संघटना त्यासाठी उभी केली होती.

— ३ —

स्वातंत्र्य मिळाले; राज्यघटनेच्या कलमानी हिंदी ही संघसरकारची भाषा ठरविली. हिंदी भाषेच्या अभिमान्याचे घोडे गंगेत न्हाले. पण हिंदी भाषाभाषी लोकाखेरीज इतरांचे स्वभाषा राजमान्यतेच्या सिंहासनावर आरूढ झालेल्या

पाहण्याचे मनोरथ बहुतांशी विरून गेले. शिक्षणक्षेत्रात प्रादेशिक भाषांनी माध्यम म्हणून जेवढे आक्रमण केले होते त्याच्या पुढच्या पायऱ्या चढणे राहूनच राहो, त्यांचे पूर्वीचे स्थान तरी कायम राहते की नाही याचीही शंका वाटण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली. प्रादेशिक भाषांना स्थान नाही, आणि हिंदीचा वापर करणे जमत नाही, तेव्हा परिणाम काय? इंग्रजीचा उपयोग स्वातंत्र्यपूर्वकाला-पेक्षाही अधिकाधिक होऊ लागणे, हा! भाषाभिमानाची पूर्वीची भावना विगलित झाली. इंग्रजीची प्रतिष्ठा कायमच राहिली—थोडीबहुत वाढली देखील!

स्वभाषेचे सामर्थ्य व संपन्नता वाढविण्याचे स्वयस्फूर्तीचे, संस्थाद्वारा होणारे प्रयत्न स्वराज्य मिळाल्यानंतरच्या काळात बहुतकरून थांबल्यासारखे दिसत आहेत. आता प्रयत्न होताहेत ते सरकारमार्फत, सरकारच्या मदतीने व पाठिंब्याने आणि ते बहुतेक राष्ट्रभाषा हिंदीकरिता! १९४६ साली प्रांतोप्रांती जनतेची सरकारे होताच त्यांनी देशी भाषांना राज्यकारभारात स्थान देण्याचे ठरवून इंग्रजी संज्ञांचे देशीकरण करण्याकरिता कमिट्या नेमल्या. पश्चिम बंगालचा प्रश्न सोपा होता. त्या सरकारने बंगालीत राज्यकारभाराची परिभाषा निर्माण करण्याकरिता समिती नेमली; तिने आजतागायत शब्दसंग्रहाची दोन चोपडी प्रसिद्ध केली असून तिसरे लवकरच प्रसिद्ध होईल असे कळते. बिहार सरकारने हिंदी हीच अधिकृत राज्यभाषा म्हणून मान्य केली असून तिच्यात अवश्य ती परिभाषा निश्चित करण्याकरिता एक बोर्ड नेमले आहे असे ऐकिवात आहे. प्रस्तुत लेखकास त्यासंबंधी पक्की माहिती नाही. उत्तरप्रदेश सरकारने सरकारी खात्या-मार्फतच 'बजट तथा शासनशब्दावली' या नावाने एक शब्दकोश नमुन्यादाखल छापून काढला आहे. पण अद्याप त्याला पक्के स्वरूप देण्यात आलेले नाही. मध्यभारत सरकारने परिभाषेसाठी समिती वगैरे न नेमताच सरकारी पत्रव्यवहार व इतर कामकाज हिंदीमध्ये करण्यास सुरवात केली आहे अशी माहिती मिळते. हैद्राबाद सरकारने स्वातंत्र्यपूर्वकालात उस्मानिया विद्यापीठाच्या द्वारे उर्दूमध्ये कायदा, राज्यकारभार यांबरोबर सर्वच शास्त्राची परिभाषा निर्माण करण्याचा प्रयत्न केला, हे प्रसिद्धच आहे. पण राज्यातील सर्व भाषांची प्रातिनिधिक समिती नेमून सर्वजनमान्य अशी परिभाषा निर्माण करण्याचा प्रयत्न स्वराज्योत्तर काळात तेथे झालेला दिसत नाही. मद्रास, म्हैसूर, ओरिसा, आसाम, पंजाब व राजस्थान या भारतातील बाकीच्या राज्यात या विषयासंबंधात काय झाले किंवा काय

चालले आहे याची माहिती प्रस्तुत लेखकास मिळू शकली नाही.

भाषेच्या या विषयासंबंधात सर्वांत धाडशी प्रयत्न झाला मध्यप्रदेशात, आणि सर्वांत अधिक निष्क्रियता दिसून आली मुंबईत असे म्हणावेसे वाटते. नागपूर विद्यापीठाने पदवीपरीक्षेपर्यंतचे सर्व शिक्षण विद्यार्थ्यांना मराठी व हिंदी या प्रादेशिक भाषामध्ये देण्याचा निर्णय पूर्वीच घेतला होता. तो निर्णय अमलात आणायचा तर शास्त्रीय विषयाची परिभाषा निश्चित करून त्याची पाठ्यपुस्तके निर्माण करणे जरूर होते. हे कार्य कसे घडवून आणावे या विवंचनेत विद्यापीठाची मंडळी असता डॉ. रघुवीर हे या ठिकाणी जणू काय ईश्वरी प्रेषिताप्रमाणे अकस्मात अवतीर्ण झाले. या प्रांताच्या प्रमुख सत्ताधाऱ्यांची मने त्यांच्याकडे आकृष्ट झाली. तेव्हा डॉ. रघुवीरांच्या आधिपत्याखाली विद्यापीठाच्या अभ्यास-क्रमानुसार शास्त्रीय विषयांची इन्टरमीजिएट व बी. एस्सी. पर्यंतची पाठ्यपुस्तके तयार करण्याची योजना सिद्ध झाली. मध्यप्रदेशाचे सरकार आणि रघुवीर किंवा त्यांची International Academy of Indian Culture ही संस्था यांच्यामध्ये काही एक करार होऊन रघुवीरांनी हे काम पतकरले. सरकारी कॉलेजातील प्राध्यापकांचा ताफा या कामासाठी रघुवीरांच्या दिमतीस देण्यात आला. सुमारे पाच वर्षे काम चालून गणित, पदार्थविज्ञान, रसायन, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र इ. विषयांची दोन्ही भाषामधील इन्टरपर्यंतच्या अभ्यासक्रमाची पुस्तके या वर्षाच्या प्रारंभी तयार झाली.

या कामाबरोबरच डॉ. रघुवीर यांनी आपल्या 'आंग्ल-भारतीय महाकोशाची' (The Great English Indian Dictionary) रचना सिद्धीस नेली. पुरवणीसह या कोशाची सुमारे २००० पृष्ठे प्रसिद्ध झाली आहेत. केवळ शब्दसंख्या व पृष्ठसंख्या यांच्या दृष्टीने पाहिल्यास परिभाषानिर्मितीचे एवढे प्रचंड कार्य कोणीही केलेले नाही, हे निर्विवाद आहे. डॉ. रघुवीर हे या क्षेत्रात अप्रतिमल्ल आहेत. अशी ख्याती आहे की बसल्या बैठकीला ते शेदोनशे शब्द उरकतात !

या प्रचंड कार्याचा भरीवपणा किती आणि त्याची उपयुक्तता किती हा प्रश्न अलाहिदा आहे. त्यांनी तयार केलेल्या परिभाषेवर कित्येक शास्त्रज्ञानी व भाषाभिज्ञानी टीका केल्या; त्यांनी दिलेल्या संज्ञा वापराव्या असा दंडक घातला तरी त्या सर्वत्र वापरणे अशक्य होते, हे प्रस्तुत लेखकाने व्यापारविषयक व अर्थशास्त्रविषयक पुस्तकांच्या बाबतीत पाहिले आहे.

रघुवीराच्या परिभाषेवर सर्वत्र झालेल्या टीकेमुळे असो, वा इतर कोणत्याही कारणामुळे असो, मध्यप्रदेश सरकारने गेल्या वर्षीपासून भारतीय भाषांचे एक खातेच (Indian Languages Deptt ) स्वतःच्या अखत्याराखाली निर्माण केले आहे. सरकारी कारभारास लागणाऱ्या सर्व इंग्रजी संज्ञा, मायने, वाक्यखंड, इत्यादिकांना हिंदी व मराठी प्रतिशब्द तयार करणे हे काम या खात्याकडे दिले आहे. हे खाते जे शब्द वगैरे तयार करील त्यांना अखेर डॉ. रघुवीराची मंजुरी मिळाली पाहिजे हा दंडक आहेच. म्हणजे या विषयातला डॉ. रघुवीरांचा पगडा व सरकारी आसरा कायमच आहे.

निरनिराळ्या राज्यांच्या सरकारांनी याप्रमाणे आपल्या भाषांचा राज्य-कारभारात इंग्रजीच्या ऐवजी उपयोग करिता यावा या हेतूने काहीना काही योजना केल्या आहेत. पण मुंबई राज्याच्या सरकारने याबाबत काही हालचाल केली असल्याचे ऐकिवात नाही. मुंबई राज्यात गुजराती व मराठी (आणि कानडी) या अत्यंत प्रगत भाषा आहेत. या दोघींच्या (व कानडीच्याही) शब्दसंपत्तीत आणि रूढ झालल्या परिभाषेत फार मोठी एकरूपता आहे. राज्य-कारभारात, न्यायदानात, विद्यापीठात या भाषा सुरू करण्यासाठी जरूर ती परिभाषा निश्चित करणे ही मोठी कठीण गोष्ट नाही. तथापि या आपल्या जनतेच्या पुढारलेल्या भाषा सोडून मुंबई सरकारने हिंदीची सर्वत्र योजना करण्याचे मनात आणले आहे असे ऐकिवात आहे.

निरनिराळ्या राज्यांनी चालविलेल्या या प्रयत्नापेक्षा केंद्र सरकारने परि-भाषानिर्मितीबाबत चालविलेला प्रयत्न अर्थातच फार मोठा असणार हे उघडच आहे. आणि तो राष्ट्रभाषा हिंदीकरिता असणार हे स्वाभाविक आहे. रेल्वेबोर्डाने आपली परिभाषा हिंदीत तयार करवून घेण्याचे योजिले. केंद्रीय अन्न व शेतकी खात्यानेही आपली मोठी शब्दांची यादी तयार केली. संसदेचे अध्यक्ष श्री. मावळणकर यांनी कायदा व सरकारी कामकाज याच्याकरिता एक योजना आखली. केंद्रीय कायदेखात्याने तर वरिष्ठ सरकारच्या कायद्यांची हिंदीत भाषांतरे करून घेण्याचा उपक्रम केला असून एक दोन कायद्यांची भाषांतरे झाली आहेत असे ऐकिवात आहे.

बाकीच्या खात्याच्या या प्रयत्नांच्या मानाने केंद्रीय शिक्षणखात्याने आरंभिलेला प्रयत्न अधिक व्यापक व मूलगामी आहे. या खात्याने 'शास्त्रीय परिभाषामंडळ' नावाचे हिंदुस्थानातील विख्यात शास्त्रज्ञांचा समावेश असणारे

मंडळ स्थापन केले असून त्या मंडळाने केलेल्या मार्गदर्शनानुसार प्रत्यक्ष परिभाषा बनविण्याकरिता आपल्या खात्यात एक हिंदी शाखा सुरू केली आहे. या शाखेचे सचालक एक नाणावलेले भाषाशास्त्रज्ञ असून त्याच्या हाताखाली ८।१० तरुण विद्वानाचा गट गणित, पदार्थविज्ञान, रसायन, इ० शास्त्रातील सज्ञासाठी हिंदी शब्दाची घडण करण्याचे काम करीत आहे. केवळ भौतिक शास्त्रेच नव्हेत तर मानवीय आणि सामाजिक शास्त्रे घेऊन त्यातील संज्ञांचे हिंदीकरण करण्याचे काम या हिंदी शाखेमार्फत होणार आहे.

- अखिल भारतीय नभोवाणीचा न्याराच पथ प्रथमपासून राहिला. सरकारच्या इतर खात्यातील कारभाराचे हिंदीकरण करण्यात थोडीबहुत सबुरी चालेल; पधरा वर्षे सबूर करण्याचा आदेश तर घटनेनेच दिला आहे. पण ‘ रेडियो ’ला सबुरी मुळीच चालण्याजोगी नव्हती. त्या खात्यात बोखारीसारख्या एकांगी दृष्टीच्या मुसल्मानाचे प्राबल्य पूर्वी फार होते. तेव्हा रेडियोमधून असल्या काही हिंदीचा नमुना सुरू झाला की जो अस्सल ऊर्दूवाल्याना देखील पेलण्यास जड वाटावा. प्रयागच्या हिंदी साहित्य समेलनाने त्याविरुद्ध ठराव केले आणि समेलनाच्या आदेशानुसार हिंदीतील लेखकानी व कवींनी रेडियोवर बहिष्कार घातला. पुढे फाळणीच्या वेळी बोखारीप्रभृती पाकिस्तानात निघून गेले. नभोवाणीचे खाते सरदार पटेलांच्याकडे आले. तेथून रेडियोच्या हिंदी भाषेत बदल होण्यास सुरवात झाली. सर्वप्रचलित सामान्य जनतेची खडी बोली नभोवाणीतून ऐकू येऊ लागली. नभोवाणी खात्याने ८४४४ शब्दाचा एक कोश नमुन्यादाखल करविला असून त्यात नेहमी येणाऱ्या इग्रजी शब्दांना हिंदी–हिंदुस्तानी प्रतिशब्द दिले आहेत. नेहमीच्या वर्तमानपत्री लिहिण्याच्या व बोलण्याच्या भाषेत येणाऱ्या हिंदी–हिंदुस्तानी शब्दाचा हा कोश प्राथमिक सकलन या नात्याने सुदर झालेला आहे.

— ४ —

निरनिराळ्या राज्यसरकारानी आणि केंद्र सरकारच्या निरनिराळ्या खात्यानी हिंदीकरणाचा जमाना सुरू करण्यासाठी हे जे प्रयत्न चालविले आहेत, त्यामुळे सामान्य मनुष्य भाबावून जाईल.

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनदन ।
बहुशाखा ह्यनताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥

या वचनाची प्रचीती येथे येईल. जे अध्यात्मात तेच व्यवहारात, व्यवसायात्मिका बुद्धी दोन्ही ठिकाणी पाहिजे. 'तदेक वद निश्चित्य' असेच सामान्य मनुष्य म्हणणार!

ही व्यवसायात्मिका बुद्धी कोणच्या प्रकारची असावी? म्हणजे हिंदीमध्ये (अर्थात कोणच्याही भारतीय भाषेमध्ये) परिभाषानिर्मितीचे काम कोणच्या तत्त्वानुसार चालावे? या कामाचा उद्देश कोणता व तो उद्देश कोणत्या पद्धतीने आणि धोरणाने सिद्धीस जाईल?

उद्देश सूत्ररूपाने सहज सांगता येईल. जनतेमधील ज्या वर्गाच्या उपयोगाकरिता परिभाषा बनवावयाची असेल त्याला ती समजावयाला शक्य तितकी सोपी जावी, त्याला समरसतेने ग्रहण करता येऊन त्याच्या मानसिक विकासाला साधनीभूत व्हावी, हाच उद्देश परिभाषानिर्मितीच्या कार्याचा असू शकतो. याखेरीज दुसरा उद्देश संभवत नाही. त्याच्या पायाकरिता जोडा शिवायचा, त्याच्या पायाला उत्तम रीतीने बसेल, त्याला सुखकारक वाटेल अशा रीतीनेच तो शिवायला पाहिजे. फॅशनच्या किंवा दुसऱ्या काही मनःपूत कल्पनाच्या आहारी जाऊन आपण जर जोड्याचा आकार ठरवू लागलो आणि तो जर घालणाराला बोचू लागला तर आपली कारागिरी विफल झाली असेच समजायला पाहिजे.

अर्थात बनवला जाणारा प्रत्येक शब्द धातू व रूपसिद्धी किंवा रूढी यांच्या योगाने नियोजित अर्थ बरोबर व्यक्त करणारा असावा ही तर मूलभूत आवश्यकता होय. या दृष्टीने योग्य शब्द असतील त्यात निवड करावयाची ती वर बाणलेल्या उद्देशानुसार करण्यात आली पाहिजे. म्हणजे ज्या वर्गाच्या उपयोगाकरिता तो शब्द असेल त्या वर्गाच्या समजुतीत स्वाभाविक रीतीने चपखल बसेल अशा धोरणाने शब्दाची निवड व्हावी.

आपल्याला जी परिभाषा बनवावयाची आहे, तिचे वरील उद्देशानुसार ढोबळ मानाने वर्गीकरण करता येईल.

१ सरकारच्या सर्व खात्यांचे व्यवहार, त्याना लागणारे नियम, सरनामे, पत्रके इ०.

२ कायदा व कोर्टाचे सर्व व्यवहार; न्यायदानपद्धतीत अंतर्भूत होणाऱ्या सर्व बाबी, कोर्टाच्या नोटिसा, फिर्यादी कैफियती, वकिलाचे युक्तिवाद इ०.

३ राजकारण, सार्वजनिक संस्थांचे व्यवहार, सभा-संमेलने इ०.

४ शिक्षणाचे क्षेत्र. मूलभूत शास्त्रे विद्या व कला (माध्यमिक शिक्षणापर्यंतची मर्यादा).

५ मानवीय आणि सामाजिक शास्त्रांचा उच्च शिक्षणात अंतर्भूत होणारा अंश.

६ भौतिक शास्त्रे. उच्च शिक्षणात अंतर्भूत होणारा अंश. तांत्रिक (technical) विद्या व कला यांची उच्च पातळी.

हे वर्ग अर्थात स्थूल मानाने केलेले आहेत. यापैकी प्रत्येक वर्गाची परिभाषा वर वर्णिलेल्या उद्देशाच्या सिद्ध्यर्थ कोणत्या धोरणानुसार बनविली जावी याचा थोडक्यात निर्देश येथे करू.

हे करण्यापूर्वी एक महत्त्वाचा इशारा देणे जरूर वाटते. वर नमूद केलेल्या सहाही वर्गांमध्ये समाविष्ट होतील अशा पुष्कळशा संज्ञा यापूर्वीच तयार झालेल्या असून त्या भाषेत रूढही झालेल्या आढळतील. पुष्कळसे शब्द मागे वर्णिल्याप्रमाणे सरकारने उपयोजून रूढ केले, कित्येक लोकांनी आपल्या कल्पनेने वापरात आणले; अनेक विद्वानांनी व्यक्तिशः व अनेक संस्थांनी संघशः परिभाषानिर्मितीचे प्रयत्न करून आपले पारिभाषिक कोश प्रसिद्ध केले. हे सर्व प्रयत्न जमेस धरून, रूढ झालेल्या व होऊ पाहणाऱ्या व शकणाऱ्या सर्व शब्दांचे आपुलकीने स्वागत करून मगच त्या पायावर नवीन परिभाषानिर्मितीची इमारत बांधली पाहिजे. सर्व समाजाची खर्ची पडलेली ही शक्ती वाया घालविता उपयोगी नाही.

पूर्वी झालेले प्रयत्न जमेस धरून पुढचे प्रयत्न केले पाहिजेत, हे सांगण्याची जरूरी काय ? ही स्वाभाविक क्रमप्राप्त गोष्ट आहे, असे कोणासही वाटेल. पण ही गोष्ट देखील बजावायला पाहिजे अशी दुर्दैवाने आज परिस्थिती आहे. परिभाषेच्या काही कारखानदारांनी अशी भुरळ उत्पन्न केलेली आहे की पूर्वी झालेले सर्व प्रयत्न निरुपयोगी व अशास्त्रीय होते. परिभाषानिर्मितीची गुरुकिल्ली यांना गवसलेली नव्हती. आम्ही आपल्या प्रतिभाबलाने ही गुरुकिल्ली साध्य करून घेतली आहे. तेव्हा आम्ही देतो तेच शब्द वापरा. पूर्वीचे रूढ शब्द किंवा इतरांनी सुचविलेले शब्द वापराल तर अधोगतीला जाल ! Physics ला पदार्थविज्ञान म्हणू नका, भौतिकी म्हणा; Geometry ला भूमिती म्हणणे खुळेपणाचे आहे, त्याला रैखिकी म्हणतात; Suit ला दावा म्हणणे अब्रह्मण्यम्, त्याला व्यवहार-

थाद म्हणा; absconder ला फरारी म्हणणे चुकीचे, त्याला अपलायक, अगर अपगोप्ता असेच म्हणा; appeal ला अपील म्हणणे हा भ्रष्टाकार, त्याला पुनर्विचार-प्रार्थना असे म्हणणे हेच योग्य. असा हा आग्रह प्रचारकी कौशल्याच्या पाठिंब्याने, एकसारखा चालू आहे आणि त्याने मोठमोठ्याना भुरळ पाडली आहे. म्हणूनच पूर्वजांचे ठेवणे जमेस धरा, असा इशारा देणे जरूर वाटले.

हा सिद्धान्त मान्य केल्यानतर ज्या इग्रजी सज्ञाना अगर शब्दप्रयोगांना बरोबर अर्थांचे प्रतिशब्द पूर्वीच रूढ झालेले अगर सुचविलेले नसतील, त्याच्या-करिता नवीन परिभाषा तयार करणे झाल्यास वर दर्शविलेल्या भिन्नभिन्न वर्गांच्या बाबतीत सर्वसाधारणतः कोणते धोरण अंगीकारावे याचा विचार करू.

वर्ग १ व २ यांच्या बाबतीत दोन-तीन धोरणे राखली पाहिजेत. पहिले व प्रमुख धोरण हे की या दोन्ही वर्गांची परिभाषा सर्वसामान्य जनतेला समजेल अशी सुलभ, सुटसुटीत व व्यवहार्य असली पाहिजे. कारण कायदा, न्यायव्यवहार आणि सरकारी कारभार याचा सर्व जनतेशी सबध येतो. प्रत्येक इग्रजी शब्दाबद्दल निरनिराळ्या देशी भाषामध्ये कोणते पर्यायशब्द प्रचलित आहेत व होते, आज-पर्यंतच्या सरकारी ट्रान्सलेटरांनी, कायद्याच्या भाषांतरकारानी कोणते शब्द वापरले, तेथे इग्रजी संज्ञाना कोणते प्रतिशब्द वापरीत असत, इत्यादि गोष्टीचे नीट सशोधन झाले पाहिजे. जरूर तेथे स्थानिक तलास ( field work ) झाला पाहिजे. आणि या सर्व प्रयत्नानी जमलेल्या सामग्रीच्या आधारावर शब्दनिश्चिती झाली पाहिजे.

या वर्गातील शब्दाच्या बाबतीत बिनचूकपणा व अर्थनिश्चिती यांना अत्यत महत्त्व दिले जावे. एका इग्रजी शब्दाला सहसा एकच प्रतिशब्द निश्चित करण्यात यावा. जेथे एकाच शब्दाचे दोन अथवा अधिक अर्थ परस्परांहून बरेच भिन्न असतील तेथे त्या अर्थांस अनुसरून भिन्न प्रतिशब्द निश्चित केले जावे. उदा० communication याला सचार व निवेदन असे दोन प्रतिशब्द योजणे भाग पडते; Accession याचे दोन अर्थः १. एका राज्याने दुसऱ्या राज्यात सामील होणे व २. सपत्तीत वाढ होणे; या दोन अर्थी दोन निरनिराळे प्रतिशब्द योजावे लागतील. जे प्रतिशब्द योजावयाचे त्यापासून साधित शब्द बनविण्याची सुलभता असावी. मात्र ही बाब आवश्यक नाही. साधित शब्द निराळ्या धातूपासून निराळ्या रीतीने बनविले तरी चालतील. सुलभता आणि निश्चितार्थकता ही दोन धोरणे मुख्य. ती साधली म्हणजे झाले.

वर्ग ३. या वर्गात निश्चितार्थकता आणि एका अर्थी एकच प्रतिशब्द ही धोरणे इतक्या कसोशीने पाळली गेली नाहीत तरी चालतील. जोपर्यंत लोकाच्या समजुतीत बिघाड येत नाही तोपर्यंत एका शब्दाला अनेक प्रतिशब्द झाले तरी चालतील.

Secretary याला सेक्रेटरी, चिटणीस, कार्यवाह, मन्त्री असे अनेक शब्द रूढ आहेत; Leader ला आपण पुढारी म्हणतो, संघ, मंडळ, परिषद, संमेलन हे शब्द ढोबळ मानाने एकाच अर्थी उपयोजिले जातात. होता होईल तो एक कल्पना एकाच शब्दाने द्योतित व्हावी हे उत्तम. पण फार कडक निर्बंधने व्यवहार-सौकर्यास बाधक होतील.

वर्ग ४. माध्यमिक दर्जापर्यंतच्या शिक्षणक्षेत्रात प्रत्येक भाषेमध्ये प्रत्येक विषयाचे प्रतिशब्द यापूर्वी प्रतिष्ठित झालेलेच आहेत. ते शब्द काढून टाकून नवीन शब्द रूढ करण्याचा प्रयत्न घातक होईल. भारतीय ऐक्याच्या नावाखाली निरनिराळ्या भाषानी आपआपल्या परंपरेनुसार कमावलेली शब्दसंपत्ती नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्यास शिक्षणक्षेत्रात ते एक मोठे अरिष्ट उद्भवल्याप्रमाणे होईल. मराठी दुसऱ्या तिसऱ्या यत्तेत बेरीज, वजाबाकी याऐवजी योग, वियोग हे शब्द वापरा म्हणून सक्ती ( किंवा आग्रह म्हणा पाहिजे तर ) कोणी केल्यास ते मराठी जनतेस खपेल काय ? पण असा प्रयत्न होऊ घातला आहे, हे लोकांनी लक्षात घ्यावे.

हा इशारा खरोखरी वर्ग १ व २ यातील शब्दाना सुद्धा लागू आहे. भारतीय ऐक्याच्या नावाखाली गेल्या दीडशे वर्षांची निरनिराळ्या भाषाची निरनिराळी परंपरा पुसून टाकून एकच शब्दपद्धती कोर्टकचेऱ्यात व सरकारी व्यवहारात सर्वांनी स्वीकारावी असे म्हणणे जितके अयुक्तिसिद्ध तितकेच अशक्य आहे. इग्रजी सज्ञांना निरनिराळ्या भाषांमध्ये निरनिराळे प्रतिशब्द असले तरी काहीच बिघडणार नाही. सर्व भाषांतील प्रतिशब्द बिनचूक रीतीने देणारे कोश असले म्हणजे झाले. Accused ला एका भाषेत मुलजिम् म्हटले, दुसऱ्या भाषेत आरोपी म्हटले व तिसरीत अभियुक्त म्हटले तरी त्यात नुकसान काहीच नाही. उलट त्या त्या भाषेच्या लोकाना समजण्याची सुलभता झाली हा फार मोठा फायदा आहे.

५. या वर्गांत पूर्वी रूढ झालेले वा सुचविले गेलेले शब्द सोडून बाकीचे शब्द होताहोईतो संस्कृत धातूपासून व्याकरणशुद्ध रीतीने बनविण्यात यावे. अर्थात हे शब्द शक्यतो सर्व भारताकरिता एकच असावेत, ही दृष्टी जरूर ठेवावी. वेदकालापासूनच्या जुन्या धार्मिक, तात्त्विक, शास्त्रीय व कलाविषयक वाङ्मयातील संज्ञांचा शक्य तो उद्धार करण्यात यावा. सुलभतेची दृष्टी सोडू नये. पण या वर्गातील परिभाषा उच्च शिक्षिताकरिता आहे हे लक्षात ठेवून अर्थाची सूक्ष्मता व बिनचूकपणा याना प्राधान्य देण्यात यावे.

वर्ग ६. भौतिक शास्त्राच्या उच्च स्तरातील संज्ञा इंग्रजीच्या द्वारा आपल्या-कडील उच्च विद्यालयीन शिक्षणात ज्या रूढ झाल्या आहेत व शिक्षक व शिक्षित यांच्या मनात दीर्घ परिचयामुळे मुरून गेल्या आहेत, त्याच स्वीकारणे एकदरीने इष्ट होईल. केंद्रीय शिक्षणखात्याच्या शास्त्रीय परिभाषामंडळाने आंतरराष्ट्रीय संज्ञा स्वीकारण्यात याव्या असाच ठराव केला आहे; आणि उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात भौतिक शास्त्रात तोच उपयुक्त ठरेल. रासायनिक द्रव्ये व रासायनिक संयोग, प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र यातील असंख्य प्राणिजाती व वनस्पतिजाती यांची नावे, इत्यादी अनेकानेक गोष्टींचे संस्कृतीकरण करू जाणे हा वृथा प्रयास ठरेल. आणि त्यात फायदा कोणचाही नाही. ज्या वस्तूला uranium oxide म्हणायच्चे त्याला किरणातुजारेय म्हटले तर त्यात अर्थव्यक्तीच्या दृष्टीने कोणता फायदा झाला? युरेनियम आक्साईड ही संज्ञा त्या क्षेत्रात पूर्वीपासून प्रचलित तरी आहे.

तांत्रिक विद्या व कला यांचे शब्द त्या त्या तंत्रांच्या तज्ज्ञांकडे, प्रत्यक्ष कारखान्यात अगर वर्कशॉपमध्ये काम करणाऱ्याकडे जाऊन जमा केले पाहिजेत. त्यांच्या वापरात असलेले शब्द ही जिवंत परिभाषा होय. असे सर्व विद्या व कला यांच्या कारागिरांच्यामध्ये जाऊन मिसळून केलेले field work (स्थानिक तलास) हेच या वर्गातली पुष्कळशी परिभाषा आपणाला देण्यास समर्थ होईल.

याप्रमाणे वर्गीकरणाच्या आधारावर सर्वोपयोगी परिभाषा कशी निर्माण करता येईल याविषयी अनेक वर्षांच्या विचाराने आणि अनुभवाने बनलेल्या कल्पना निवेदन केल्या. सर्व ठिकाणी व सर्व बाजूंनी संशोधन करून, जमलेल्या सामग्रीचा तारतम्याने विचार करून ज्या वर्गासाठी आपण हे शब्द निर्माण करणार त्यांची समज, परंपरा, अवस्थिती लक्षात घेऊन, शब्दनिश्चिती करण्यात यावी व अपरिहार्य तेथेच नवीन शब्द बनविण्यात यावेत. यात कोणत्याही

प्रकारचा आग्रह नसावा. आणि कोणत्याही मक्तेदारीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रोत्साहन मिळू नये. मक्तेदारी मूळ धरू लागली म्हणजे आग्रह निर्माण होतो. मक्तेदारी जगवण्यासाठी मोठ्या तत्त्वांचे खोटे आभास निर्माण केले जातात आणि संस्कृतीरक्षणासारख्या उदात्त तत्त्वांची भुरळ पाडण्यात येते. मनात एक, वाणीत दुसरे, तर कृतीत तिसरेच असा लपडाव सुरू होतो. सत्ताधारी लोक या प्रचाराच्या जाळ्यात सापडले म्हणजे मक्तेदारी निर्वेध होते. आरबी–फारसी विरुद्ध संस्कृत हा वाद वृथा आहे. वास्तव जगतात त्याला स्थान नाही.

परवा ता. ३० मे रोजी संसदीय हिंदी परिषदेचे उद्घाटन करताना श्री. जवाहरलाल नेहरू यांनी जे फार सुंदर भाषण केले त्याच्याशी स्वतःचे विचार तंतोतंत जुळत असल्याचे पाहून प्रस्तुत लेखकास आनंद वाटला. "भाषा हे समाजाचे जिवंत माध्यम आहे. समाजाची ताकद वाढविणारे, जनतेच्या मनात चैतन्य ओतून त्याला विकसित व स्वतंत्र करणारे असे भाषेचे स्वरूप असले पाहिजे. जी भाषा सामान्य जनांना समजू शकत नाही, जिच्याशी जनता समरस होऊ शकत नाही अशी भाषा समाजाची ताकद कशी वाढविणार? भाषेने जनतेचे मानसिक सामर्थ्य वाढविले पाहिजे, तसेच जनतेच्या चैतन्यामुळे भाषेची ताकद वाढली पाहिजे. भाषा ही सुंदर अलंकारपूर्ण कृती निर्माण करणाऱ्या मूठभर विद्वानांची किंवा साहित्यकारांची नाही. ती जनतेची आहे. तिच्या चैतन्याची व वाढीची मुळे जनतेच्या अंतःकरणात खोल गेलेली आहेत."

♣ ♣ ♣

—'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' १९५१

अनुक्रम......
आवक ........

# ९.

# भारतापुढील भाषिक प्रश्न

— लेखांक १ —

स्वराज्य मिळाल्यानंतर राष्ट्राच्या संघटनेसंबधीचे व प्रगतीसंबधाचे जे प्रश्न आपल्यासमोर उभे राहिले, त्यात भाषेच्या प्रश्नाचे महत्त्व इतर प्रश्नांच्या मानाने कोणत्याही रीतीने कमी नव्हते. इतर सर्व प्रश्नांप्रमाणे या प्रश्नाने राजकीय व शासनिक स्वरूप धारण केले आणि राजकारणाच्या आखाड्यात भाषेवरून भांडणे सुरू झाली. अनेकभाषी प्रांतामध्ये भाषावार प्रांतरचनेसाठी मोठी चळवळ सुरू झाली, भाषिक आक्रमणाचे वाद अनेक ठिकाणी उफाळून आले आणि भावनांच्या क्षोभामुळे भिन्न भाषा बोलणारे लोक एकमेकाचे शत्रू बनतात की काय, अशी धास्ती वाटू लागली.

## हे घडवून आणणे आपल्या हाती आहे

या भावनात्मक कलहांच्या धामधुमीत हे [illegible]रून कोणाच्या लक्षात येत नाही की, भाषाविषयक प्रश्नांना राजकीय बाजूखेरीज इतरही बाजू आहेत; किंबहुना इतर बाजूच अधिक महत्त्वाच्या आहेत. भाषेचा प्रश्न शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. सार्वजनिक [illegible]या दृष्टीने तितकाच निकडीचा

आहे आणि राज्यशासनाच्या दृष्टीनेही अतिशय अगत्याचा आहे. राष्ट्रजीवनाच्या या भिन्न भिन्न क्षेत्रांत भाषेचा प्रश्न आपण जर समाधानकारक रीतीने सोडवू शकलो, तर भाषावार प्रांतरचनेच्या मागणीची तीव्रता, निदान व्यावहारिक दृष्ट्या तरी, कमी होईल. समजा शिक्षणाचे माध्यम अथपासून इतिपर्यंत प्रादेशिक भाषा हे ठरून पुणे विद्यापीठात मराठीची, गुजरात विद्यापीठात गुजरातीची आणि कर्नाटक विद्यापीठात कानडीची माध्यम म्हणून प्रतिष्ठापना झाली; तसेच स्वित्झर्लंड-प्रमाणे मुंबई राज्यात मराठी, गुजराती व कानडी या त्या त्या प्रदेशातल्या राज्यकारभाराच्या भाषा झाल्या, तर भाषावार प्रांतरचना झाल्याने जे आपण मिळविणार, त्यातला बराच अंश आपल्या पदरात पडल्यासारखे होईल. आणि हे सर्व घडवून आणणे आपल्या हातातले आहे.

## कशाचा कशाला पत्ता नाही

पण हे व्हावे कसे ? स्वराज्य मिळून आज सहा वर्षे झाली, तरी अजून कशाचा कशाला पत्ता नाही. कोणत्याही बाबतीत एकवाक्यता होत नाही. राज्यघटनेने भारतीय स्वराज्याची भाषा हिंदी ठरवून दिली, पण त्यातूनही असंख्य वाद निर्माण झाले. कोणी हिंदीला राष्ट्रभाषा म्हणू लागले; अहिन्दी प्रदेशातल्या कित्येक विद्यापीठांच्या कुलगुरूंनी हिंदी भाषा हेच सर्वत्र उच्च शिक्षणाचे माध्यम बनले पाहिजे, असे प्रतिपादन केले; मुंबईसारख्या अहिन्दी राज्यांच्या सरकारांनी हिन्दी भाषेतून राज्यकारभार चालविता यावा अशा अर्थाची विधेयके विधानसभा-तून प्रविष्ट केली. हिंदीचे घोडे दामटण्याच्या ह्या प्रयत्नाच्या प्रतिक्रियाही तितक्याच जोराच्या झाल्या.

शिक्षणाचे व राज्यकारभाराचे माध्यम म्हणून आपल्या भाषांचा वापर करावयाचा, तर त्यांची शब्दसंपत्ती वाढवून त्यांना समर्थ बनविले पाहिजे. त्यासाठी सर्व देशभर, विशेषतः हिन्दी जगतामध्ये, परिभाषानिर्मितीसाठी प्रयत्न सुरू झाले. त्यातही ' जो तो बुद्धीच सांगतो ' या वचनानुसार अनेक पंथ व वाद निर्माण झाले. इंग्रजीतले शब्द जसेच्या तसे उचलून देशी भाषांमध्ये घ्यावे, या एका टोकापासून तो एकजात सर्व शब्द संस्कृत धातूंमधून नवे बनवून घ्यावे, या दुसऱ्या टोकापर्यंत सर्व संभवनीय मते प्रतिपादली गेली आणि शब्दप्रयोगांच्या बाबतीत अराजक माजणार की काय, अशी धास्ती वाटू लागली.

## निश्चित मार्गदर्शनाच्या अपेक्षेने भरविलेली परिषद

अशा या मतमतान्च्या गलबल्यात काही तरी निश्चित आणि प्रभावी मार्गदर्शन व्हावे, म्हणून पुणे विद्यापीठाच्या चालकानी मे महिन्याच्या २३, २४, २५ तारखाना 'भारतीय भाषाविकास परिषद' या नावाने एक परिषद बोलावली. पुणे विद्यापीठाच्या या समयोचित उपक्रमाबद्दल त्याच्या चालकाची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. चालकाच्या योजकतेची आणि दूरदर्शित्वाची एक मोठी खूण ही की, जगाला आवतण देऊन आकाशाला गवसणी घालण्याचा प्रयत्न न करिता त्यानी निवडक व्यक्तींनाच निमंत्रण केले आणि नेमके रेखीव विषय निर्णयाकरिता त्याच्यासमोर ठेविले. भारताचे मध्यवर्ती सरकार आणि सर्व राज्य सरकारे, भारतातील सर्व विद्यापीठे, नामवत भाषासस्था व वाङ्मयसस्था या सर्वांना प्रस्तुत परिषदेला प्रतिनिधी पाठविण्यास विनंती करण्यात आली होती. मध्यवर्ती सरकारच्या शिक्षणखात्याचे प्रतिनिधी प्रो. हुमायून कबीर हे परिषदेस उपस्थित होते. ७ राज्यसरकारे आणि ११ विद्यापीठे यानी आपले प्रतिनिधी पाठविले होते. याखेरीज भिन्न भिन्न सस्थाचे प्रतिनिधी व काही खास निमन्त्रित या परिषदेस आस्थेवाइकपणे उपस्थित होते.

## परिषदेपुढील तीन विषय

परिषदेच्या चालकानी तीन विषय परिषदेपुढे विचारार्थ ठेवले होते:—

१. भारतीय भाषांसाठी पारिभाषिक शब्दसमूह कशा रीतीने बनविण्यात यावा ?

२. घटनेने ठरविलेली सघभाषा जी हिन्दी तिचे शिक्षणक्षेत्रात व इतरत्र कोणते स्थान असावे ? एकीकडे इग्रजी व दुसरीकडे मराठी बगाली इ. प्रादेशिक भाषा यांच्याशी हिंदीचे सबध कसे असावेत ?

३. मराठी, गुजराती इ. प्रादेशिक भाषांचे यापुढे स्वतत्र भारतात काय स्थान असावे ? या भाषाचे सामर्थ्य, उपयुक्तत्व आणि ज्ञान वाढविण्यास काय उपाय योजावेत ? याप्रमाणे आजच्या घटकेस अत्यन्त महत्त्वाचे असे तीन विषय पुढे ठेवून प्रस्तुत परिषदेच्या चालकांनी अखिल भारताच्या विद्याक्षेत्रातील प्रतिनिधींना जणू आवाहन केले, की "मान्यवर ! आपण सर्वजण एकत्र या ! आणि या अत्यन्त महत्त्वाच्या प्रश्नाबाबत आम्हाला मार्गदर्शन करा. पुणे विद्यापीठाने मराठीतून सर्व शिक्षण देण्याचा ठराव नुकताच केला आहे; तो

योग्य आहे की नाही, असल्यास तो कशा रीतीने अमलात आणावा, हे आम्हाला सांगा. ”

या आवाहनाची फलनिष्पत्ती काय झाली ? ज्या मार्गदर्शनाची अपेक्षा होती, ते कितपत प्राप्त झाले ?

## परिषदेच्या चालकांची नामी योजना

परिषदेच्या चालकांची योजना इतकी नामी आणि वेळेचा गुण इतका चांगला, की भरीव फलनिष्पत्ती पदरात पडणार अशी बळकट आशा सुरवातीपासूनच वाटत होती. परिषदेचे अध्यक्षत्व अत्यन्त शांत प्रकृतीचे व समतोल वृत्तीचे गाढे विद्वान महामहोपाध्याय पां. वा. काणे यांना देण्यात आले होते. त्यांचे अध्यक्षत्व ही एक प्रकारे यशाची हमीच होती. विचारासाठी जे तीन विषय ठेवण्यात आले होते, त्यास अनुसरून परिषदेचे तीन विभाग कल्पिण्यात आले असून, तीन्ही विभागांच्या अध्यक्षांची योजना मोठ्या चतुराईने करण्यात आली होती. पहिला विभाग परिभाषेचा. परिभाषेचे प्रत्यक्ष काम करणाऱ्या अशा विद्वानाला जर या विभागाचे अध्यक्षपद दिले असते, तर त्याचा विशिष्ट पक्ष व दृष्टिकोण यांचे अवास्तव दडपण एकंदर चर्चेवर पडून कृत्रिम व एकांगी निर्णय पदरात पडले असते. तेव्हा चालकांनी मोठ्या कुशलतेने या विषयाचा ज्ञाता, भाषाशास्त्राचा महापंडित, पण परिभाषा बनविण्याच्या प्रत्यक्ष कार्यात अभिनिविष्ट नसलेल्या अशा गृहस्थाची—डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांची—नेमणूक या विभागाच्या अध्यक्षपदी केली. परिभाषा बनविण्याच्या संबंधात डॉ. सुनीतिकुमारांची विशिष्ट मते आहेत व ती त्यांनी स्पष्टपणे आपल्या भाषणात मांडण्यास बिल्कूल कमी केले नाही. पण त्यांना ‘ आपल्या कुऱ्हाडीचे पाते पाजळून ’ घ्यायचे नसल्यामुळे त्यांच्या अध्यक्षतेखाली चर्चा अत्यंत मनमोकळेपणाने व खेळीमेळीने झाली आणि त्यांच्या वैयक्तिक मतांशी बऱ्याच अंशी न जुळणारे निर्णयही त्यांनी बहुमताचा कल पाहून निरभिमानतेने मान्य केले.

## हिंदीचा प्रसार व त्याच्या मर्यादा

परिषदेचा दुसरा विभाग हिंदी भाषेसंबंधाचा होता. या विभागासाठी हिंदीच्या अभिमानाने ओसंडत असलेल्या एखाद्या हिंदी साहित्यिकाची अध्यक्षपदी योजना करणे कठीण नव्हते. पण तसे केले असते, तर अध्यक्षाच्या निबिड

आत्मीयतेने चर्चेचे स्वरूप लाछित झाले असते. संघभाषा म्हणून हिंदीला जनतेच्या मनात प्रेमाचे व मानाचे स्थान जर प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर अहिन्दी विद्वानांकडून तिचा पुरस्कार होणे हे खरे महत्त्वाचे. हे महत्त्व लक्षात ठेवून कन्नड भाषेचे सर्वश्रेष्ठ साहित्यिक श्री. मास्ती व्यंकटेश अय्यंगार याना या विभागाचे अध्यक्षपद देण्यात आले होते. हिंदी भाषेचे दोन शब्द देखील न समजणाऱ्या या दिगतकीर्ती कन्नडिगाने हिंदीचा संघभाषा म्हणून पुरस्कार करावा, यात हिंदीच्या राष्ट्रव्यापी महत्तेचे सार्थक झाले.

अशा देशभक्त साहित्यिकाने स्वतंत्र रीतीने विचार करून संघभाषा हिंदीच्या ज्या मर्यादा निर्दिष्ट केल्या, त्या लक्षात ठेवणे सर्वांच्या हिताचे होईल. अहिंदी प्रांतात हिंदी ही शिक्षणाचे माध्यम होऊ शकणार नाही; राज्यकारभाराची, कचेऱ्या कोर्टांची भाषा होऊ शकणार नाही; हा सर्व अधिकार प्रादेशिक भाषेचा आहे व त्या त्या राज्यात तेथील प्रादेशिक भाषा हीच सार्वभौम राहील हे अगदी स्पष्ट शब्दात पण सौजन्यपूर्ण रीतीने श्री. अय्यंगार यांनी निवेदन केले. फार काय, एका प्रादेशिक भाषेच्या लोकाना दुसऱ्या प्रादेशिक भाषेच्या लोकांशी व्यवहार करावयाचा झाल्यास तो त्यांनी हिंदीच्या द्वारेच करावा हे म्हणणे देखील भ्रमात्मक होय, हे श्री. अय्यंगार यानी दाखवून दिले. कानडी गृहस्थ बंगालमध्ये गेला तर तेथील लोकांशी बोलणे करण्याचे स्वाभाविक साधन बंगाली भाषा हेच होय. तो हिंदीत व्यवहार करू लागल्यास पुष्कळशा बंगाली लोकाना हिंदी समजणार नाही, असाही संभव. प्रत्येक कानड्याने व प्रत्येक बंगाल्याने हिंदी शिकावे, हा आग्रह आततायीपणाचा ठरेल.

श्री. अय्यंगार यांच्या या स्पष्टोक्तिपूर्ण भाषणामुळे आणि त्याचा ध्वनी विभागीय चर्चेतही उमटल्यामुळे या विभागात खूप खणखणीत भाषणे झाली. बऱ्याच गरमागरम चर्चेअंती निर्णय झाले, ते मात्र समाधानकारक असेच झाले.

**परिभाषेच्या प्रश्नावर वादळ**

तिसरा विभाग प्रादेशिक भाषासंबंधीचा. याचे अध्यक्ष डॉ. रघुवीर हे होते. डॉ. रघुवी नी नागपुरास मध्यप्रदेश सरकारच्या आश्रयाने परिभाषेचे खूप मोठे काम केले आहे. या कारणास्तव जर त्याना या परिषदेत परिभाषा विभागाचे अध्यक्षस्थान दिले असते तर काय प्रकार झाला असता, याची चुणूक सदस्याना अन्य रीतीने दिसून आली. डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांच्या अध्यक्षीय भाषणात

डॉ. रघुवीर यांच्या परिभाषा बनविण्याच्या पद्धतीवर टीका होती. ती केवळ विषयास धरून सौम्य व निर्लेप रीतीने केलेली होती. त्यावर बोलण्यास मुख्य अध्यक्ष म. म. काणे यांनी डॉ. रघुवीर यांना संधी दिली, त्यावेळी त्यांचा जो प्रक्षोभ व्यक्त झाला आणि आपल्याशी सहमत नसणाऱ्यांना 'द्रोही', 'भारतीयतेचे ध्वंसक' इ. विशेषणे जी त्यांनी बहाल केली, त्यावरून परिभाषेच्या विषयात ते भावनेच्या आहारी किती व कसे जाऊ शकतात, हे प्रत्ययास आले. डॉ. रघुवीर हे भारतातील सर्व भाषांचे प्रेमी आहेत. पण प्रादेशिक भाषांच्या प्रश्नात त्यांचे भावनेचे धागे गुंतलेले नसल्यामुळे, त्या विषयाचे निर्विकार समालोचन करण्याची पात्रता त्यांच्या ठायी आहे. परिषदेच्या चालकांनी प्रादेशिक भाषांच्या तिसऱ्या विभागाच्या अध्यक्षपदी डॉ. रघुवीर यांची जी योजना केली, ती किती चतुराईची होती, हे यावरून पटते.

## — लेखांक २ —

## परिषदेचा सर्वांत महत्त्वाचा निर्णय

भारतीय भाषाविकास परिषदेच्या तीन्ही विभागांचे निर्णय शिफारशीच्या स्वरूपात मुख्य परिषदेस सादर करण्यात येऊन तेथे ते जसेच्या तसेच सर्वानुमतें मंजूर करण्यात आले. ते निर्णय विस्तारशः येथे देण्याचे प्रयोजन नाही. या निर्णयांमधून कोणत्या महत्त्वाच्या गोष्टी पदरात पडल्या किंवा कोणत्या बाबतीत स्पष्ट व निखालस मार्गदर्शन लाभले तेवढयाचा उल्लेख केला म्हणजे बस होईल.

सर्वांत महत्त्वाचा निर्णय जो पदरात पडला तो हा की, शिक्षणाचे माध्यम प्रारंभापासून तो थेट अखेरपर्यंत प्रादेशिक भाषा (म्हणजे बहुतेकांच्या बाबतीत मातृभाषा) याच असाव्यात. केवळ शिक्षणच नव्हे, तर विशिष्ट प्रदेशातील सर्व व्यवहार (all the affairs of the area) त्या प्रदेशाच्या प्रादेशिक भाषेमध्येच व्हावेत, हीही गोष्ट हडसून खडसून ठरली.

हा निर्णय आहे अगदी स्वाभाविक, त्यात शास्त्रशुद्ध व जगन्मान्य असेच तत्त्व ग्रथित करण्यात आले आहे. पण, गेली काही वर्षे काही राज्यसरकारे, काही विद्यापीठांचे कुलगुरु आणि हिंदीचे कित्येक अभिमानी व प्रचारक यांचे उद्गार व हालचाली अशा प्रकारे होत होत्या की, त्यामुळे सर्व वातावरण शंकाग्रस्त होऊन गेले होते. इंग्रजीचा सासुरवास संपला खरा; पण माहेरवाशिणीला एखादे वेळी भावजयीचा जाच काही कमी होत नसतो. तशी आपल्या मातेसमान

पूज्य मातृभाषांची अवस्था होणार की काय, या आशंकेने अहिंदी प्रदेशातील जनतेची मने दडपून गेली होती. पण आता केंद्र सरकार व सात राज्य सरकारे आणि अकरा विद्यापीठे यांच्या प्रतिनिधींच्या व मोठमोठ्या शिक्षणशास्त्रज्ञांच्या, साहित्यिकांच्या, भाषातज्ज्ञांच्या, पूर्ण संमतीने असे ठरले की, जन्मभाषा हीच सुरवातीपासून अखेरपर्यंत शिक्षणाचे माध्यम, आणि प्रादेशिक भाषा हीच त्या त्या भाषेच्या प्रदेशात अकुतोभय स्वामिनी ! पुणे विद्यापीठाने मराठी माध्यम करण्याचा जो ठराव पूर्वी केला आहे, त्याच्या अमलबजावणीस आता निःशंक मनाने लागण्यास हरकत नाही.

## संघभाषा, प्रादेशिक भाषा आणि परिभाषा

प्रादेशिक भाषांना त्यांचे हक्काचे व मानाचे स्थान राजीखुषीने देण्यात आल्यानंतर संघभाषा, म्हणजे केन्द्र सरकारच्या व्यवहाराची भाषा म्हणून जी ठरली, तिजविषयी इतर भाषिकांनी आपले कर्तव्य केले पाहिजे, हे ओघानेच येते. त्या कर्तव्याचा उल्लेखही परिषदेने आपल्या निर्णयात केला आहे. संघभाषेच्या ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी इतरभाषी राज्यांच्या सरकारांनी उपाय योजावेत, अशी परिषदेने शिफारस केली आहे. तसेच संघभाषेचा विकास करणे हे सर्व भारतीय भाषा बोलणाऱ्यांचे समान कर्तव्य असून विद्यापीठे, साहित्यसंस्था, विद्यासंस्था आणि राज्यसरकारे यांनी या बाबतीत प्रत्यक्ष कृती करण्याच्या दृष्टीने पाहाणी करावी; मात्र संघभाषेचा विकास तिच्या मूळ प्रकृतीस अनुसरून व्हावा व तो हिंदी ज्यांची मातृभाषा आहे अशा लोकांना स्वीकार्य वाटेल असा असावा, हे विशेषेकरून नमूद करण्यात आले.

इतरभाषीयांनी संघभाषेसंबंधी करावयाच्या कर्तव्याची ही आखणी अगदी समंजसपणाची आहे, यात शंका नाही. हिंदीच्या ज्ञानाचा प्रसार करा व हिंदीचा विकास करण्याचे मार्ग शोधा, इतकीच सौम्य व मर्यादित अपेक्षा या निर्णयात व्यक्त करण्यात आली आहे. शिक्षणक्रमात हिंदी आवश्यक करा, सर्व सरकारी नोकरांना हिंदी शिकायला लावा, असेही या परिषदेने म्हटलेले नाही. माध्यमिक शाळांमधून हिंदीचे शिक्षण देण्याची तरतूद करावी, एवढेच तिसऱ्या विभागाच्या शिफारशीत कलम आहे. शिक्षणक्रमात हिंदी हा आवश्यक विषय करणे, सरकारी नोकरांवर हिंदीची सक्ती करणे वगैरे जे प्रकार अतिरिक्त उत्साहाच्या भरात

निरनिराळ्या राज्यात चाललेले दिसून येतात, त्याच्यावर या परिषदेच्या निर्णयाचा उतारा चांगला लागू पडण्याजोगा आहे.

खरा वादग्रस्त प्रश्न परिभाषेसंबंधीचा होता. पण त्या विभागातील चर्चा, मतभेद व्यक्त करूनही, अतिशय खेळीमेळीची झाली. परिभाषापारावरपारीण डॉ. रघुवीर हे या विभागात हजर नव्हते! अखेर निर्णय ठेवाणघेवाणीने सर्वांस समाधानकारक असे झाले. सर्व शास्त्राची वैज्ञानिक परिभाषा जेथे शक्य तेथे संस्कृत उगमापासून घेण्यात यावी, आंतरराष्ट्रीय प्रतीके, चिन्हे व फॉर्म्युले सध्या प्रचारात आहेत तसेच ठेवण्यात यावे; सोयीस्कर प्रतिशब्द आढळत नसतील तेथे आंतरराष्ट्रीय शब्द व शब्दप्रयोग स्वीकारण्यात यावे आणि शास्त्रीय व वैज्ञानिक परिभाषा सर्व हिंदुस्थानभर शक्य तोवर एकरूप असावी—असे निर्णय या शाखेचे झाले.

## चालकांच्या परिश्रमांचे सार्थक झाले

परिषदेच्या दोन्ही विभागातील चर्चा व तिच्यातून बाहेर पडलेले हे निर्णय पाहून या परिषदेची मूळ कल्पना काढणारे श्री. धनंजयराव गाडगीळ व तिच्या चालकसमितीचे प्रमुख श्री. दत्तोपंत पोतदार व इतर चालकमंडळी यांना आपल्या परिश्रमाचे पूर्ण सार्थक झाले असे वाटले की नाही, हे समजावयास मार्ग नाही. हजर राहणारांपैकी बहुतेकांना मात्र या परिषदेने थोर यश संपादन केले, असे वाटले. भाषाविषयक प्रश्नाच्या संबधात सर्वत्र वातावरण जे धूसर झाले होते ते निवळले, ह्या प्रश्नांच्या संबधात निश्चित दिशा दाखविली गेली आणि झालेल्या निर्णयावर अखिल भारतातील प्रातिनिधिक व निवडक विद्वानांचे शिक्कामोर्तब झाल्यामुळे त्यांना सर्वमान्यता प्राप्त झाली. काय करावे, कसे करावे, हे प्रश्न आता उरले नाहीत. एखाद्या राज्याच्या सरकारने एखाद्या प्रदेशात प्रचलित नसलेली भाषा—मग ती संघभाषा हिंदी असो किंवा दुसरी कोणती असो—तेथील राज्यकारभाराची भाषा करण्याचे मनात आणले, तर तेथील जनतेला या परिषदेच्या निर्णयाकडे बोट दाखवून सरकारच्या भ्रान्तपणाला आळा घालता येईल. भारतातील कोणत्याही विद्यापीठाला त्याच्या अधिकारक्षेत्रातील प्रचलित भाषा हीच बोधभाषा म्हणून ठरविण्यास यापुढे बिचकण्याचे काही कारण नाही. संघभाषा हिंदीचे शिक्षणक्रमात ऐच्छिक

स्थान असावे, असे म्हणणाऱ्याच्या कपाळावर 'देशद्रोही' असा शिक्का बसू लागल्यास त्या बिचाऱ्याला या परिषदेच्या निर्णयाचा आसरा घेता येईल.

* * *

## डेक्कन कॉलेजातील भाषातज्ज्ञांची परिषद

अशा रीतीने ही भाषाविकासपरिषद चालकाच्या कुशल योजकतेमुळे आणि जमलेल्या विद्वानांच्या सहकारभावनेमुळे यशस्वी झाली, तर हिच्याच पाठोपाठ त्याच पुण्यनगरीच्या परिसरात भरलेली दुसरी भाषाविषयक परिषद नुसती यशस्वीच नव्हे, तर नेत्रोन्मीलनकारक झाली. ही परिषद सुमारे ३५ निमन्त्रित व्यक्तींची अनौपचारिक स्वरूपाची असल्यामुळे तिची प्रसिद्धी वृत्तपत्रांतून फारशी झाली नाही. मराठी वृत्तपत्रांमध्ये तर तिचा नामनिर्देशही झाला नसेल. परंतु तिचे उद्दिष्ट, तिचा दृष्टिकोन आणि तिचे नियोजित कार्य याची माहिती सर्वसाधारण सुशिक्षितांना होणे इष्ट व अवश्य असल्यामुळे येथे ती थोडक्यात देण्याचे योजिले आहे.

पहिली ( पुणे विद्यापीठाची ) परिषद भाषाविषयक व्यावहारिक प्रश्न सोडविण्याकरिता होती, तर दुसरी भाषांच्या शास्त्रीय अभ्यासाचे नियोजन करण्याकरिता होती. या नियोजित शास्त्रीय अभ्यासातून भारतातील भाषांमध्ये अधिक सुसंवाद व जवळीक निर्माण करण्याचे कार्य होणार आहे, हा त्याचा विशेष होय.

## डेक्कन कॉलेज संशोधनसंस्था आणि तिचे कार्य

या शास्त्रीय अभ्यासाचे स्वरूप विशद करण्यापूर्वी ज्या डेक्कन कॉलेज संशोधनसंस्थेतर्फे ही परिषद भरविण्यात आली होती, तिजविषयी दोन शब्द लिहिणे इष्ट वाटते. हेच ते डेक्कन कॉलेज की, जेथे चिपळूणकर, लो. टिळक, आगरकर, आपटे, शिवरामपंत परांजपे प्रभृतींनी आपला विद्याभ्यास केला; जेथे काथवटे, भांडारकर, वर्डस्वर्थ, सेल्बी, बेन प्रभृति थोर प्राध्यापकांनी व प्राचार्यांनी मुक्तमनाने विद्यादान केले. महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासावर ज्याचा कधीही न पुसणारा ठसा उमटला आहे, अशा या पावनस्मृती विद्यालयाचे १९३९ पासून संशोधनसंस्थेत रूपांतर झाले असून, भाषाशास्त्र व इतिहास या दोन विषयांचे शास्त्रशुद्ध संशोधन येथे चालत असते. विख्यात भाषाशास्त्रज्ञ डॉ. सुमित्र मंगेश कत्रे हे या संस्थेचे डायरेक्टर असून त्यांच्या नेतृत्वाखाली या

संस्थेमध्ये संस्कृत भाषेचा शास्त्रीय व ऐतिहासिक तत्त्वानुसार महाकोश तयार करण्याचे, आर्य द्राविड भाषांतील समानार्थक कोश तयार करण्याचे, अशी कित्येक दांडगी कामे चालली आहेत.

## परिषदेचे सूत्रधार आणि परिषदेपुढील विषय

प्रस्तुतची भाषाशास्त्रज्ञांची अनौपचारिक परिषद् भरविण्याची कल्पना व योजना डॉ. कत्रे यांचीच असून, तिचे सूत्रधार तेच होते. या परिषदेसाठी अध्यक्ष म्हणून लंडन विद्यापीठातील प्राच्य व आफ्रिकन भाषांच्या अभ्यासालयाचे संचालक, जगद्विख्यात भाषाशास्त्रज्ञ, व डॉ. कत्रे यांचे गुरु सर राल्फ टर्नर यांना मुद्दाम लंडनहून पाचारण केले होते. डॉ. कत्रे यांच्याप्रमाणे टर्नरांचे अनेक शिष्य हिंदुस्थानात अनेक विद्यापीठांमध्ये काम करीत आहेत त्यांना व खुद्द डेक्कन कॉलेजात भाषाशास्त्रीय विषय घेऊन ज्यांनी अध्ययन केले अशा माजी विद्यार्थ्यांना या परिषदेसाठी बोलावण्यात आले होते. अशा रीतीने गुरुशिष्यपरंपरेच्या दोन पिढ्या निमंत्रितांमध्ये दृग्गोचर होत होत्या. याशिवाय भाषाशास्त्राच्या व्यासंगासाठी प्रसिद्ध असलेल्या इतर काही थोड्या व्यक्ती निमंत्रितांमध्ये होत्या.

परिषदेपुढे विचारासाठी दोन विषय होते:

१. भारतीय भाषाशास्त्राच्या मूलभूत गरजा (Fundamental needs of Indian Linguistics).

२. हिंदुस्थानातील प्रमुख भाषांना समान अशा शब्दसंग्रहाचे संशोधन व संकलन.

यापैकी पहिला विषय तात्त्विक व ध्येयकथनाच्या स्वरूपाचा होता. भाषेसंबंधीच्या शास्त्रीय विचारात फार प्राचीन काळी हिंदुस्थान अग्रेसर असले तरी सध्या भाषाशास्त्राच्या व्यासंगात आपण पाश्चात्त्य देशांच्या मानाने फार मागे आहोत. 'भाषाशास्त्र' असा स्वतंत्र अभ्यासाचा विषय कलकत्ता विद्यापीठाखेरीज हिंदुस्थानातल्या दुसऱ्या कोणत्याही विद्यापीठात नाही. (नुकताच पुणे विद्यापीठाने डॉ. कत्रे यांच्या प्रेरणेमुळे बी. ए. व एम्. ए. या परीक्षांसाठी भाषाशास्त्र हा विषय व त्याचा अभ्यासक्रम नेमला आहे, असे कळते.) इतर विद्यापीठांत भाषेतील वाङ्मयाच्या अभ्यासाबरोबरच एम्. ए. परीक्षेसाठी भाषाशास्त्राचा चुटपुटता कार्यक्रम नेमलेला असतो, तेवढाच. त्याने त्या शास्त्राची स्थूल कल्पनाही विद्यार्थ्यांना येत नाही. या शून्य अवस्थेबद्दल परिषदेत अनेक प्राध्यापकांनी भरपूर खेदप्रदर्शन केले.

ही स्थिती नाहीशी होऊन भाषाशास्त्राचा अभ्यास वृद्धिंगत व्हावा यासाठी बी. ए. व एम्. ए. या परीक्षांना भाषांचा शास्त्रीय अभ्यास हा विषय सर्व विद्यापीठांनी ठेवावा व त्याच्या अध्यापनासाठी भाषाशास्त्राची अभ्यासशाखा सुरू करावी, उच्चारविज्ञानाच्या (Phonetics) अभ्यासासाठी प्रयोगशाळा स्थापन कराव्या, अशा शिफारशी परिषदेने केल्या. याखेरीज भारतीय भाषाशास्त्राच्या निकडीच्या गरजा म्हणून, प्रमुख भाषांची ऐतिहासिक व्याकरणे लिहिण्यात यावीत; परभाषांतील भाषाशास्त्रावरील प्रमाणभूत ग्रंथांची भाषांतरे प्रमुख भारतीय भाषांमध्ये करण्यात यावीत; बोलींचा अभ्यास त्यांच्या भूगोलासह करण्यात यावा; प्रमुख भाषांतील मुख्य मुख्य ग्रंथांच्या शास्त्रशुद्ध संशोधित आवृत्त्या काढण्यात याव्यात; भारताचा भाषिक सर्व्हे नव्याने करण्यात यावा अशा अनेक शिफारशी प्रस्तुत परिषदेने केल्या. या सर्व गोष्टींचे महत्त्व सुशिक्षितांस सहज समजण्याजोगे आहे. तसेच प्रांतिक व केंद्रीय सरकारांनी आणि विद्यापीठांनी मनावर घेतल्यास यातील बहुतेक गोष्टी कृतीत उतरण्याजोग्या आहेत.

पहिल्या विषयासंबंधाने परिषदेला सध्या तरी शिफारशी व सूचना करणेच शक्य होते. दुसऱ्या विषयासंबंधात मात्र प्रत्यक्ष कार्य करण्यासाठी एक योजना तयार करून ती डॉ. कत्रे यांनी निमंत्रितांकडे विचारार्थ पाठविली होती; तिच्या आधारे परिषदेत विचार झाला, व हे कार्य हाती घेण्याचे ठरले. या कार्यासाठी द्रव्याची सोय होण्याचा संभव असल्यामुळे त्याच्या व्यावहारिक बाजूचाही थोड्याबहुत तपशिलात जाऊन विचार करण्यात आला.

## समान शब्दसमूहाचे संशोधन व संकलन

प्रमुख भारतीय भाषांतील समान शब्दसमूहाचे संशोधन करून त्याच्या आधारावर शिक्षणाच्या क्षेत्रात भाषिक नियोजन करण्याचे हे जे कार्य डेक्कन कॉलेजने संकल्पिले आहे, ते फार महत्त्वाचे आहे. साधारणपणे मॅट्रिकपर्यंत शिकणाऱ्या मुलाला जो शब्दसमूह अवगत होतो, त्याचे संशोधन व संकलन करून त्यावरून प्रत्येक भाषेचा पायाभूत शब्दसमूह (Basic vocabulary) तयार करावयाची; सर्व भाषांचे शब्दसमूह याप्रमाणे तयार झाल्यावर त्यातील समान अंश शोधून आणि कोणचा शब्द किती भाषांना समान आहे हे पाहून त्या आधारावर शब्दांच्या परी लावावयाच्या, या समान शब्दांचा वापर करून त्याची विशिष्ट भाषेत उपयुक्तता अजमावयाची आणि मग शिक्षणक्षेत्रात

योग्य स्थळी त्यांचा उपयोग करून तदनुसार शालेय पुस्तके तयार करावयाची असे या योजनेचे अगदी स्थूल स्वरूप आहे.

## भारतीय भाषांमध्ये सुसंवाद निर्माण करण्याचे कार्य

भाषाशास्त्रज्ञ आणि शिक्षणशास्त्रज्ञ या दोहोंच्याही प्रतिभेला व संशोधन-शक्तीला प्रेरणा देणारी ही योजना आहे. ती जर चांगल्या रीतीने तडीस गेली, तर कोणत्याही भाषेच्या मूल प्रकृतीस मुळीच बाध न आणता सर्व भारतीय भाषांमध्ये सुसंवाद व जवळीक उत्पन्न करता येईल आणि भिन्न भिन्न भाषांमधील व्यवहार अधिक सुलभ होईल. 'शेतकरी' हा अस्सल मराठी शब्द आहे. मराठी मुलाला प्रथम तो शिकवावाच. पण अलीकडे मराठीत 'किसान' हा हिंदीतला शब्दही रूढ झाला आहे. आणखी काही भाषांनाही तो समान असेल. 'शेतकरी' शब्दानंतर योग्य काळी मराठी मुलाला 'किसान' हा शब्दही शिकवला, तर त्याची शब्दसंपत्ती वाढेल व हिंदी प्रभृती भाषांच्या तो तितका जवळ येईल. अशा रीतीने सर्व भारतीय भाषांना एकमेकांच्या अधिक जवळ आणणारे व प्रत्येक भाषेची शब्दसंपत्ती वाढविणारे हे महान कार्य आहे.

♣ ♣ ♣

—दैनिक 'तरुण भारत' नागपूर, २२ व २३ जून १९५३

मराठी ... संग्रहालय, ठाणे. स्थं०
अनुक्रम ...
आंक ...

# १०.

# वैचारिक नेतृत्वाची अभावलापिका

**पाहिजे ! नेतृत्व पाहिजे !**

" तुम्ही म्हणता ते सगळं खरं. पण हे करायचं कुणी ? लायक माणसं मिळताहेत कुठं ? आता ही पहा पंचवार्षिक योजना येऊन पडली आहे; तिच्यात पानोपानी आक्रोश केला आहे, की 'लीडरशिप' (नेतृत्व) पाहिजे. खेड्यातून, शहरातून, तालुक्यातून, जिल्ह्यातून जनतेचे नेतृत्व करणारे, बुद्धिमान, दमदार तरुण नेते निर्माण झाले पाहिजेत; तरच ही पंचवार्षिक योजना काय आणि समाजाला पुढे नेणाऱ्या इतर अनेकानेक कल्पना काय, सफलतेच्या मार्गाला लागतील. नाही तर आहेच हे आपलं कागदी घोडे नाचवणं ! "

अखिल भारतीय नभोवाणीच्या एका उच्च दर्जाच्या अधिकाऱ्यांशी गप्पा चालल्या होत्या. रेडिओवर काही भव्य, मनाची पकड घेणारे, सामान्य जनतेच्या जिव्हाळ्याचे कार्यक्रम करावेत या दृष्टीने मी आपल्या कल्पना त्यांना सांगत होतो. त्याला एकदम त्यांनी वरील आशयाचं उत्तर दिलं.

शिक्षणक्रमातून सुशिक्षित होऊन बाहेर पडणाऱ्या सध्याच्या तरुण पिढीमध्ये नेतृत्वगुण नाही, मानसिक सामर्थ्य नाही, बुद्धीचा दमदारपणा नाही,

प्रभावी व्यक्तित्व नाही–असा नन्नाचा पाढा सगळीकडून ऐकू येत आहे. त्याचाच दाखला या अधिकाऱ्यांचा सभाषणात पटला. हिंदुस्थानातील बहुतेक विद्यापीठांचे पदवीदान समारंभ नुकतेच पार पडले, त्यावेळची दीक्षांत भाषणे करणाऱ्या थोर विचारवंतांपैकी कित्येकाच्या भाषणात विद्यापीठीय शिक्षणाचा दर्जा खालावला आहे, उत्साही, ध्येयनिष्ठ आणि कणखर बुद्धिमत्तेचे तरुण निर्माण करण्याच्या कामी आमची विद्यापीठे दुबळी ठरू लागली आहेत, हाच सूर होता.

## ' ते आमचे रानडे, ते आमचे तेलंग !

परवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजच्या वार्षिक दिनाचे प्रवक्ते म्हणून भाषण करताना हीच विलापिका गायिली : " आपण रानडे, तेलंग, जी. व्ही. जोशी या थोर पंडिताच्या तोडीचे आहो असे आजचे विद्यार्थी म्हणू शकतील काय ? त्या जाड्या पंडिताशी आजच्या विद्यार्थ्यांची तुलनाच होऊ शकणार नाही. न्या. रानडे हे एम्. ए. चा अभ्यास करीत होते तेव्हा त्यांनी गहन विषयावरील सुमारे ३५० ग्रंथ वाचले होते असा उल्लेख त्यांच्या चरित्रात सापडतो. आजचा विद्यार्थी त्याच्या क्रमिक पुस्तकाव्यतिरिक्त काही वाचतो की काय याची शंका आहे " असे त्यांनी म्हटल्याचे प्रसिद्ध झाले आहे.

ही तर आता फॅशन पडल्यासारखी झाली आहे. गडकऱ्यांचा गोकुळ "ते आमचे वेद, त्या आमच्या श्रुती " म्हणून टाहो फोडतो, त्याप्रमाणे " ते आमचे रानडे, ते आमचे तेलंग, ते भांडारकर आणि ते शिंदे, ते टिळक आणि ते आगरकर––गेली ती मंडळी–आता कोणी तसे थोर विचारवंत नेते निर्माण होताना दिसत नाहीत–महाराष्ट्राचे नेतृत्व त्यांच्या बरोबर लोपले." अशी अभाव-लापिका उद्गारण्याची एक रूढी पडल्यासारखी झाली आहे.

रूढी पडली म्हणून तिजकडे दुर्लक्ष करावे असे मात्र नाही. विचारवंत कळकळीचे पुरुष ज्या अर्थी ही अभावलापिका गातात त्या अर्थी तीत तथ्य असले पाहिजे. जरा चौकस बुद्धीने आजूबाजूला नजर फेकल्यास ते सत्य विषाद-जनक रीतीने प्रत्ययाला आल्याखेरीज राहत नाही.

## प्रतिभावान व्यक्तीचे तेज तिशीच्या आत प्रकट होते

आपल्या देशात, विशेषेकरून महाराष्ट्रात, असा सर्वसाधारण नियम दिसतो की प्रतिभावान, कर्तबगार व्यक्तीचे तेज तिशीच्या, फार तर पसतिशीच्या, आत प्रकट होऊन ती व्यक्ती समाजजीवनात आपल्या नेतृत्वपदी सुप्रतिष्ठित होते. त्यानंतर आयुर्दाय असेल व बुद्धीचे चैतन्य टिकून असेल, त्या मानाने त्या त्या व्यक्तीच्या कर्तृत्वाचा विकास होत जातो; पण प्रतिभेची मूळ चमक, कर्तृत्वाचा पहिला आविर्भाव प्रकट होण्यास तिशीत्तिशीपेक्षा अधिक कालावधी फार करून लागत नाही. जोतीराव फुले, रानडे, चिपळूणकर, टिळक, आगरकर, वामन शिवराम आपटे, गोखले ही सर्व मंडळी पंचविशीच्या आत-बाहेर आपले कर्तृत्व प्रकट करून कीर्तीसिंहासनावर सुप्रतिष्ठित झाली. पुढच्या पिढीतील हरिभाऊ आपटे, शिवरामपंत परांजपे, राजवाडे इत्यादिकांची स्थितीही तीच. यांच्या जरा पुढचे केळकर, खाडिलकर, कोल्हटकर प्रभृती ख्यातनाम साहित्यिक व राजकारणी पंचविशीतिशीच्या सुमारास आपल्या कर्तृत्वपदी स्थिर झाले होते. कर्मवीर शिंदे यांनी तिशीच्या सुमारास आपला ध्येयमार्ग निश्चित केला, तर केतकरांनी तेहतिशीच्या सुमारास ज्ञानकोशाची मुहूर्तमेढ रोवली. रँग्लर परांजपे, गडकरी इत्यादी मंडळीही अल्पवयातच चमकली.

## आजच्या नेतृत्वात तरुणांचा वाटा

आजच्या महाराष्ट्राच्या नेतृत्वात पहिल्या उमेदीच्या वयात असलेल्या मंडळींचा वाटा कितपत आहे ? राजकारणात, समाजकारणात, साहित्यात, अध्यापनात, उद्योगधंद्यात, वकिलीत ज्यांनी प्रभावी नेतृत्व कमावले आहे अशा मंडळींमध्ये तिशी पसतिशीच्या तरुणांचा भरणा कितपत आहे ? साधारणपणे १९३५ नंतर जी मंडळी तिशीमध्ये आली, अशापैकी किती जणांनी आपापल्या क्षेत्रात महाराष्ट्रव्यापी ख्याती संपादन केली आहे ? आज घडीचे महाराष्ट्राचे नेतृत्व सर्व क्षेत्रात, साठीच्या आतबाहेर असलेल्या किंवा याच्याही पुढे गेलेल्या व्यक्तींकडे आहे आणि सर्व क्षेत्रात ख्यातनाम झालेल्या व्यक्ती निदान पन्नाशी तरी ओलांडलेल्या आहेत असे स्थूल विधान केल्यास ते चुकीचे होणार नाही. एकट्या सिनेमाच्या क्षेत्राचा आणि काहीसा ललित साहित्याच्या क्षेत्राचा मात्र यास अपवाद दिसतो. सिनेमाच्या साहित्यिक, कलात्मक आणि तांत्रिक या तिन्ही अंगांमध्ये १९३५ नंतर आपल्या पंगात आलेल्या व्यक्तींची आवक मोठ्या

प्रमाणात झालेली दिसते. इतर सर्व क्षेत्रात १९२५ नंतर प्रभावी नेतृत्वाची किंवा चमकदार कर्तृत्वाची आवक तरुण पिढीतून फारशी झाली आहे असे दिसत नाही. ज्या थोड्याशा व्यक्ती पुढे आलेल्या दिसतात, त्यांचे सामर्थ्य व कर्तृत्व जुन्या पिढीतल्या व्यक्तींच्या मानाने दुबळे, दुय्यम तिय्यम प्रतीचे असल्याचे प्रत्ययास येते.

राजकारणात पाहिले तर निरनिराळ्या पक्षातून आंबेडकर, काकासाहेब गाडगीळ, डांगे, जेधे, पाटील, हिरे, पंजाबराव व रामराव देशमुख, गोरे, जोशी ही जुन्या पिढीतलीच नावे डोळ्यासमोर येतात, अर्थकारणातहि तसेच—धनंजयराव गाडगीळ, चिंतामणराव देशमुख इ० इ०. समाजकारणात पुन्हा आंबेडकर, महर्षी कर्वे, नारायणशास्त्री मराठे हीच जुनी नावे ! वक्तृत्वासारख्या तरुणांना सहजव्याप्य अशा क्षेत्रातहि पोतदार, कृष्णाजीपंत कुळकर्णी, फडके, अत्रे, दादा धर्माधिकारी, पेंडसे या कसलेल्या वाग्वीराखेरीज सभा रंगू शकत नाहीत, असे अनुभवास येते. अध्यापन काय, वृत्तपत्रव्यवसाय काय, सर्वत्र पन्नाशीच्या पुढे गेलेली मंडळीच जागा धरून आहेत असे, एखादा अपवाद वगळता दिसून येते. ललित साहित्यात मात्र पेंडसे, भावे, गाडगीळ अशा काही नव्या पिढीतल्या व्यक्तींनी जुन्या नेतृत्वाला कलाटणी देण्यास सुरवात केली आहे असा भास होतो. पण इतर सर्व क्षेत्रात कोठेही नव्या पिढीच्या कर्तृत्वाने जुन्या पिढीच्या नेतृत्वास धडक मारली आहे, असे दिसत नाही. साहजिकच जुन्या पिढीतील थोर विचारवंतांची कळकळ त्यांना "शिक्षणाचा दर्जा खालावला आहे", "तरुण पिढीची दानत व सामर्थ्य कमी होत आहे", नवे नेतृत्व आणि कर्तृत्व पुढे येत नाही"—असे विलापाचे सूर काढावयास लावीत आहे.

**शिक्षणाचा दर्जा खालावला आहे म्हणजे काय ?**

देशाच्या बौद्धिक व मानसिक नेतृत्वात असा खड्डा किंवा तुटवडा पडण्याचे कारण काय असावे ? "आजच्या शिक्षणाचा दर्जा खालावला आहे" हे कारण पुष्कळ जण देतात. पण शिक्षणाचा दर्जा खालावला आहे म्हणजे तरी काय ? विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातले विषय गुणाने वा आशयाने कमी केले आहेत म्हणावे, तर तसे दिसत नाही. डॉ. आंबेडकरांनी आजचे प्राध्यापक थोर व विद्वान नाहीत, हे कारण दिले आहे. पण असे म्हणणे काहीसे वृक्षः-बीज न्यायाप्रमाणे तार्किक दुष्टचक्र निर्माण करणारे होते. प्राध्यापक विद्या-

र्थ्यांना घडवितात; आणि त्याच विद्यार्थ्यांतून पुढचे प्राध्यापक निर्माण होतात. आजचे प्राध्यापक कोते व दुबळे असतील तर तो दोष त्याच्या प्राध्यापकांकडे जाईल, आणि ही परंपरा संपणार नाही.

पण याच्या उलट बरीच वर्षे प्राध्यापन करीत असलेले कित्येक प्राध्यापक असे म्हणणारे भेटतात, की आजकाल विद्यार्थीच पूर्वीच्या सारखे येत नाहीत. "काय करावे बोवा? आजकाल वर्गात पहिल्या दर्जाचे Stuff (मालमसाला) येतच नाही. किती माथेफोड उरस्फोड करावी तिचे चीज होत नाही. मुलांमध्ये बुद्धीची झेप, मेंदूची रग आणि दानतीचे सामर्थ्य फार कमी प्रमाणात आढळते. आम्ही तरी काय करावे?" अशी तक्रार पुष्कळ जुन्या प्राध्यापकांच्या तोंडून ऐकू येते.

मात्र ही तक्रार 'आर्टस् कोर्स'च्या प्राध्यापकांकडूनच ऐकू येते, हे या बाबतीत लक्षात ठेवले पाहिजे. विद्यापीठीय शिक्षणाचे स्थूलमानाने तीन विभाग असतात. मानवीय विद्या (Arts, Humanities), भौतिक विद्या (Science) आणि तांत्रिक विद्या (Technology). शिक्षणाचा दर्जा खालावल्याची तक्रार यांपैकी मानवीय विद्यांच्या संबधातच ऐकू येते हे सूक्ष्मपणे पाहिल्यास कोणाच्याही नजरेस येईल. डॉ. आंबेडकरांच्या डोळ्यासमोर, भाषण करताना, आर्टस् कोर्सचा विद्यार्थीच होता. पदवीदान समारंभात भाषण करणारे विचारवंत नेते आर्टस् कोर्समधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांसच मुख्यतया अनुलक्षून बोलतात. कारण, देशाचे वैचारिक नेतृत्व बहुधा मानवीय विद्यांच्या अभ्यासकांतूनच निर्माण होते.

## विद्यापीठीय शिक्षण आणि समाजाचे नेतृत्व यांचा अविनाभाव संबंध

युनिव्हर्सिट्या स्थापन झाल्यापासूनच्या गेल्या शंभर वर्षांच्या सामाजिक इतिहासाचे जर सिंहावलोकन केले तर असे दिसून येते की विद्यापीठीय शिक्षण आणि समाजाचे नेतृत्व यांचा निकट संबंध चालत आला आहे. तुरळक अपवाद सोडल्यास महाराष्ट्रातील जीवनाच्या हरएक क्षेत्रातील पुरुष विद्यापीठाचे पदवीधर होते व आहेत, असे दिसून येईल. हरिभाऊ आपटे, गडकरी, खांडेकर यासारखी काही मंडळी जरी पदवीधर नसली तरी विद्यापीठाच्या माडवाखालून गेली आहेत. काही मंडळी येथे पदवीधर झाली नसली तरी विलायतेतून बॅरिस्टर होऊन किंवा इतर पदव्या संपादून आली. विद्यापीठीय

शिक्षणात कितीही दोष असोत, ते शिक्षण आणि समाजाचे वैचारिक नेतृत्व याचा अविनाभाव संबध इतका स्पष्ट आहे की तो नाकारता येण्याजोगा नाही.

त्यात आणखी असे दिसून येते की विद्यापीठीय शिक्षणात जे बुद्धिमान व व्यासगी विद्यार्थी म्हणून चमकले तेच बहुतांशाने पुढील आयुष्यात कर्तबगार, विचारवत म्हणून प्रसिद्धीस आले. ज्या ज्या व्यक्तींनी निरनिराळ्या क्षेत्रात वैचारिक नेतृत्व केले त्यापैकी पुष्कळसे मॅट्रिकच्या परीक्षेत खूप वर आलेले किंवा पुढील विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये उत्कृष्ट यश संपादन करणारे होते. रानडे, भांडारकर, तेलग, टिळक, गोखले, हे सर्व पुरुष विद्यापीठीय अभ्यासक्रमात पहिल्या दर्जाचे विद्यार्थी म्हणून नावाजलेले होते. त्यानतर चितामणराव वैद्य, वामनराव आपटे, भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, शि. म. पराजपे, रँगलर पराजपे, वा. म. जोशी, पां. वा. काणे, अ. बा. गजेंद्रगडकर इत्यादी उत्तर आयुष्यात समाजाचे नेतृत्व करणारी मडळी विद्यार्थी जीवनात पहिला दर्जा कमावून आपले अलौकिकत्व दाखविलेली अशी होती. बऱ्याचशा लोकानी परीक्षेत पहिला दर्जा व बक्षिसे वगैरे कमावली नसली तरी कॉलेजात बुद्धिमान, विचारी व व्यासगी विद्यार्थी म्हणून त्यांची प्रसिद्धी होती. कॉलेजात ढफर विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध असून पुढील आयुष्यात चमकदार नेतृत्व संपादन केले अशी उदाहरणे अपवादात्मक होती.

**तरुण पिढीचा फुलोरा शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणाकडे वळत आहे.**

हे सिद्धातिक सत्य लक्षात घेतले आणि 'देशाचे वैचारिक नेतृत्व बहुधा मानवीय विद्यांच्या अभ्यासकातूनच निर्माण होते' या मागे वर्णिलेल्या दुसऱ्या सिद्धान्ताशी त्याचा मेळ घातला, म्हणजे सद्यःस्थितीच्या सशोधनाचा एक मार्ग खुला होईल. दमदार व तेजस्वी बुद्धीची मुले आर्टस् कोर्स किंवा मानवीय विद्या याच्या अभ्यासाकडे वळत नाहीत, किंवा कमी प्रमाणात वळतात, अशी वस्तुस्थिती गेल्या काही वर्षांपासून आपल्याकडे निर्माण झाली आहे काय ? प्रस्तुत लेखकाच्या अवलोकनावरून त्याला असे विधान करावेसे वाटते. गेली सुमारे पधरा वर्षे मॅट्रिक परीक्षेत वर येणाऱ्या बुद्धिमान विद्यार्थ्यांचा फार मोठा ओघ 'सायन्स' ( भौतिक शास्त्रे ) कडे वळत असतो. पहिल्या दर्जाचे पुरुष विद्यार्थी आर्टस्कडे फार कमी प्रमाणात जातात याचे मजेदार प्रत्यतर यदाच्या नागपूर विद्यापीठाच्या निकालात मिळते. या विद्यापीठाच्या १९५२ च्या इन्टर आर्टस्च्या

परीक्षेला ९३२ पुरुष व ५७८ स्त्री उमेदवार बसले होते. पुरुषांपैकी ५ जणांना पहिला वर्ग मिळाला तर स्त्री उमेदवारांपैकी १० जणींनी पहिला वर्ग पटकावला. म्हणजे स्थूलमानाने पुरुषांत २०० ला १ असे प्रमाण पडले तर स्त्रियांतून ६० ला १ असे प्रमाण पडले. बी. ए. च्या निकालातही हेच प्रमाण दिसते. त्या परीक्षेला पुरुष उमेदवार ६४९ बसले, त्यातून तीन पहिल्या वर्गात आले; स्त्री उमेदवार २५१ बसले त्यातून ४ पहिल्या वर्गात आले. जी स्थिती नागपूरकडे, तीच बहुधा मुंबई पुण्याकडेही असावी. मॅट्रिकमध्ये पहिल्या वर्गात आला की तो चालल्लाच सायन्सकडे. 'सायन्स'च्या वर्गात ज्यांना प्रवेश मिळत नाही अशा शिल्की दुय्यम दर्जाच्या विद्यार्थ्यांचा लोंढा मग आर्टस्‌कडे वळतो. मॅट्रिक परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवूनही स्वतःच्या आवडीस्तव किंवा ध्येयास्तव आर्टस् कोर्स (मानवीय विद्यांचा अभ्यासक्रम) घेणारे विद्यार्थी विरळा. सायन्सकडे गेलेले विद्यार्थी अभ्यासक्रम दोन अगर चार वर्षे चालवून त्यात बरं नंबर मिळाल्यास तांत्रिक शिक्षणाकडे वळतात आणि त्यातून निरनिराळ्या शाखांचे तज्ज्ञ (एंजिनियर) होऊन बाहेर पडतात. अशा तज्ज्ञांची निरनिराळ्या सरकारी खात्यांमधून, कारखान्यांमधून, संशोधनशाळांमधून उच्च दर्जाचे हुद्देदार म्हणून मोठ्या पगारावर नेमणूक होते. काही थोडे स्वतंत्र औद्योगिक किंवा तांत्रिक व्यवसाय सुरू करतात. त्यानाही अमूप मिळकत होते.

गेली पंधरावीस वर्षे—विशेषतः दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीपासून—देशात औद्योगिक नवरचना मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. मोटारी आणि विमाने ही तर आता जुनी झाली; त्यानंतर अलीकडे रेडिओ, टेलिफोन, रेफ्रिजरेटर आणि इतर अनेक प्रकारची वैद्युत उपकरणे, प्लास्टिक्स, कृत्रिम तंतुवस्त्रे, नानाप्रकारची जीवरसायनी औषधे, इत्यादिकांच्या द्वारा शास्त्रीय प्रगतीचा सामान्य मानवाच्या जीवनात प्रवेश झाला आहे. तेव्हा शास्त्रज्ञांची आणि तंत्रज्ञांची जरूर सर्वत्र भासत आहे. अर्थात मागणी–पुरवठ्याच्या सर्वव्यापी सिद्धान्तानुसार शास्त्रज्ञ–तंत्रज्ञांना सध्या मोठी किंमत येत आहे. त्यामुळे विद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या तरुण पिढीचा फुलोरा, निवडक बुद्धिमंतांचा बहुतांश, शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणाकडे वळत आहे.

## समाजाचे वैचारिक नेतृत्व कोठून येते ?

वैचारिक नेतृत्व भौतिक शास्त्रे आणि तांत्रिक विज्ञान यांच्या व्यासंगातून

निर्माण होणे दुरापास्त असते. रसायनशास्त्रज्ञ अणूचे पृथक्करण करून नवीन शक्तींचा शोध लावील, तन्त्रज्ञ रेडिओचे व्हाल्व्ह, किंवा मोटारीचे एंजिन तयार करील, अभियता मोठे पूल अगर धरण बांधील—भौतिक सुखसमृद्धीची वा विनाशाची साधने उपलब्ध करून देणे हे त्याचे काम. मानवी व्यक्तीच्या आणि समाजाच्या मनाला योग्य वळण लावणे, व्यक्तीचे व समाजाचे सुखसवर्धन होईल अशा रीतीने सर्व व्यवहाराचे नियमन व व्यवस्थापन करणे, साहित्य व कला यांची जोपासना करणे, मानवाच्या विचारसपदेत भर घालणे, इत्यादी गोष्टी भौतिक शास्त्रज्ञाच्या व तन्त्रज्ञाच्या नव्हेत. त्याचे बुद्धिसर्वस्व जड वस्तूशी झटापट घेण्यात खर्च होते. समाजाचे व राष्ट्राचे वैचारिक नेतृत्व करणे हे त्यांचे कार्यक्षेत्रच नव्हे.

आचार्य प्रफुल्लचद्र रे, जगदीशचद्र बोस यासारख्या काही अलौकिक प्रतिभाशाली शास्त्रज्ञानी समाजाचे वैचारिक नेतृत्व थोड्याबहुत प्रमाणात केले आहे. पण अशा शेखरीभूत व्यक्ती फारच विरळा. आपल्याकडेही महर्षी धों. के. कर्वे, रँग्लर परांजपे, महाजनि या गणितशास्त्रज्ञांनी समाजसुधारणेचे व सस्थाचालनाचे चिरस्मरणीय कार्य करून दाखविले आहे. पण या व्यक्ती ज्या काळात भौतिकशास्त्रे आणि मानवीय विद्या याच्या अभ्यासाची विद्यापीठात पूर्ण फारखत झाली नव्हती अशा काळात तयार झालेल्या होत. खेरीज त्या देखील अपवादात्मकच म्हणाव्या लागतील. *

तेव्हा, काही अपवाद असले तरी, समाजाचे वैचारिक नेतृत्व मानवीय विद्याच्या अभ्यासकामधून निर्माण होते हाच सिद्धात खरा. जे पेरावे ते उगवते हे जे कार्यकारण साम्याने तत्त्व सृष्टीमध्ये सर्वत्र आढळते, तेच येथेही लागू पडते. भाषा, साहित्य, मनोरजन, राजनीती, कायदा, शासनशास्त्र, अर्थशास्त्र,

---

* महर्षी कर्वे, र पु पराजपे, ग स महाजनि हे नामांकित गणितज्ञ होत गणित हे भौतिक शास्त्रांना आधारभूत असले तरी ते मुळात मानवीय शास्त्र आहे पाश्चात्त्याकडून आपण घेतलेल्या उच्चशिक्षण व्यवस्थेमध्ये गणिताचा अंतर्भाव आर्टस् व सायन्स या दोन्ही अभ्यासशाखामध्ये केलेला असतो तेव्हा 'वैचारिक नेतृत्व मानवीय विद्याच्या अभ्यासकामधून निर्माण होते' हे जे प्रमेय पुढे मांडले त्याला ही गणिती विद्वानांची उदाहरणे विरुद्ध जाणारी नव्हेत, ती प्रमेयाचे समर्थनच करितात सतराव्या शतकातील प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ देकार्त आणि सध्या ९० वर्षांचा असलेला इंग्रज तत्त्वज्ञ बर्ट्राड रसेल हे मुळात गणितज्ञ होते. ( ही टीप नव्याने जोडली आहे. )

समाजशास्त्र, वेदान्त याच्या अभ्यासातूनच खरे भाषापंडित, साहित्यिक, मनोवैज्ञानिक, राजकारणी, कायदेपंडित, प्रशासक, अर्थशास्त्री, समाजनियामक व तत्त्वज्ञ निर्माण होतील. या सर्व मानवीय विद्यांच्या अभ्यासाकडे राष्ट्राच्या तरुण पिढीतील बुद्धिमत्ताचा ओघ वळला, तर ही सर्व क्षेत्रे कर्तृत्ववान व्यक्तींच्या भरपूर पुरवठ्याने फुलून जातील. पण तेजस्वी व दमदार बुद्धीच्या तरुणांचा ओघ भौतिक शास्त्रे आणि तांत्रिक विद्या याच्याकडे जात राहून मानवीय विद्यांची आलये दुय्यम दर्जाच्या विद्यार्थ्यांनीच जर भरू लागली, तर समाजाच्या वैचारिक आघाडीवर तरुणाच्या खडखडाट होणार नाही तर काय होईल ?

## बुद्धिमत्तेचे समतोल विनियोजन करा

शास्त्रज्ञ आणि तन्त्रज्ञ कितीही बुद्धिमान असला तरी तो जड निसर्ग, म्हणजे वीज, प्रकाश, हवा, पाणी, यावर किंवा जड वस्तू म्हणजे धातू, माती, विटा, दगड, सिमेंट यावर आपली तीव्र बुद्धी खर्च करणार; पण भौतिक शास्त्रे आणि तंत्रविद्या यांच्या अभ्यासाच्या शेवटी चागल्या द्रव्यप्राप्तीची बळकट आशा असते. मानवीय विद्यांच्या पदवीधराना उपलब्ध असलेल्या वकिली, प्रोफेसरी, सरकारी नोकरी, राजकारण, व्यापारी, दलाली, इ. क्षेत्रात अगोदरच खेचाखेच झाली असल्याने त्याच्या नशिबी बेकारी किंवा कारकुनी बहुधा ठेवलेली; अशा स्थितीत तेजस्वी तीव्र बुद्धीचे तरुण मानवीय विद्यांच्या अभ्यासाकडे वळतील हे कसे शक्य आहे !

समाजात नवे नेतृत्व निर्माण होत नाही, शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे, इत्यादी ज्या तक्रारी समाजाच्या पुढाऱ्यांकडून, शासकवरिष्ठांकडून किंवा शिक्षणश्रेष्ठींकडून अलीकडे उद्‌गारल्या जातात त्यातली मूलभूत समस्या ही अशी आहे. हे एकच कारण प्रश्नभूत वैगुण्याच्या बुडाशी आहे असा आग्रह धरावयाचा नाही. सामाजिक घटना अनेक कारणांच्या समवायाने निर्माण होत असतात. शिक्षणक्षेत्रातील उघड दिसणाऱ्या प्रवृत्तीवरून सुचणारे कारण येथे विवरिले आहे. त्याची यथार्थता पारखून शिक्षणप्रांतातील मानवीय विद्यांचा विभाग आणि शास्त्र–तंत्र याचा विभाग यांत शिरणाऱ्या बुद्धिमान तरुणांच्या संख्येचा समतोल राखणे हे काम समाजनियामकांचे व राष्ट्रसचालकाचे आहे.

♣ ♣ ♣

—'केसरी', १९५२

# ११.

# संस्कृत विद्येचे संरक्षण

[ पुणे येथील वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या एकोणऐंशीव्या वार्षिक समारंभाच्या अध्यक्षपदावरून ता. २ मे १९५४ रोजी केलेले भाषण ]

आज आपल्यासमोर उभा राहून भाषण करताना फार पूर्वीच्या आठवणी माझ्या मनात गर्दी करीत आहेत. लहानपणी माझ्या परमपूज्य तीर्थरूपांबरोबर मी इथे, म्हणजे वेदशास्त्रोत्तेजक सभेत, पुष्कळदा येत असे त्यावेळी चाललेल्या परीक्षा आणि त्यावेळचे बक्षीस समारंभ याची चांगली आठवण माझ्या मनात जागृत आहे. त्यावेळी परीक्षा व बक्षीस समारंभ फडतरे यांच्या वाड्यातील दिवाणखान्यात होत असत. मऊ मऊ रुजामा घातलेल्या त्या भव्य दिवाणखान्यात खुरमांडी घालून गुडघ्यावर कागद धरून प्रश्नांची उत्तरे लिहिणारे ते वयस्क उमेदवार, तोंडी परीक्षा देणाऱ्याची कोपऱ्याकोपऱ्यातून चाललेली ती गडबड आणि त्यातच वेदपठनाची परीक्षा देण्याकरिता आलेल्या उमेदवाराचा तो वेदघोष या सर्व गोष्टी माझ्या मनःपटलावर अद्याप रेखल्याप्रमाणे दिसत आहेत. पूज्य महामहोपाध्याय वासुदेवशास्त्रीबोवा अभ्यंकर माझ्या वडिलांचे स्नेही, वेदशास्त्रोत्तेजक सभेचे काम त्यांच्या सल्ल्याने चालायचे. काळा अंगरखा घातलेली

मंद मंद पावले टाकत येणारी त्यांची प्रशांत मूर्ती माझ्या डोळ्यांना अद्याप दिसत आहे. तळेगावाहून पुण्यास आलेले लोकशिक्षणकार जनार्दन विनायक ओक यांना तीर्थरूपांनी या सभेच्या कार्यांत ओढून घेतले होते. त्यांना चर्चेकरिता व परीक्षा घेण्याकरिता सभेच्या जागी आलेले मी कित्येक वेळा पाहिलेले आठवते. साताऱ्याचे पू. बाळाचार्य गजेंद्रगडकर, अगरखेडचे भावाचार्य आद्य इत्यादी विद्वद्रत्ने निरनिराळ्या शास्त्रांच्या परीक्षा घेण्याकरिता सभेमध्ये उपस्थित होत, त्यांच्या गाढ विद्वत्तेने भरलेल्या सभाषणांनी माझे चिमुकले मन विस्मित होऊन जात असे, याची आठवण अद्याप माझ्या मनात ताजी आहे. सभेचा एक पारितोषिक समारंभ मला आठवतो. त्या प्रसंगी डॉ. मोरेश्वर गोपाळ उर्फ नानासाहेब देशमुख यांनी अध्यक्षस्थान मंडित केले होते. त्या वेळी ते काय बोलले हे जरी मला आठवत नाही तरी कदी पागोटे घातलेली त्यांची भव्य गौरवर्णी मूर्ती माझ्या डोळ्यांसमोर साक्षात उभी असल्याप्रमाणे मला भासते आहे.

वर उल्लेखिलेल्या व्यक्तींहून निराळ्या पातळीवरच्या पण फार साक्षेपी व सदा हसतमुख अशा एका व्यक्तीची मूर्ती माझ्या अंतश्चक्षूंना आजही स्पष्ट दिसते. कारण सभेच्या कामाकरिता तिची येजा आमच्या घरी पुष्कळ व्हावयाची आणि वडिलांशी बोलणेचालणे व बाहेरगावी असताना पत्रव्यवहारही चालू असावयाचा. विनायकराव घागरेकर हे या व्यक्तीचे नाव आणि सभेचे कायम कारकून हा तिचा हुद्दा. जुन्या पद्धतीचा चुणीदार बाह्यांचा पांढरा अंगरखा, गुलाबी पागोटे व भरदार मिशा अशा स्वरूपाची बेताच्या उंचीची ही व्यक्ती सभेला प्राणभूत होती. कामकाजाचे सर्व दप्तर यांच्याकडे आणि कारभार यांच्या द्वारा चालायचा. यांचे बोलणे गोड आणि आर्जवी, मोडी अक्षर बोरूच्या लेखणीने लिहिलेले वळणदार व लपेटीचे होते. आम्ही बाहेरगावी असलो म्हणजे सबंध तावावर लिहिलेली सभेच्या कामकाजाबाबतची पत्रे वडिलांना येत. माझी मोडी वाचनाची तालीम लहानपणी बरीचशी यांच्या पत्रांवरून झाली.

या वेदशास्त्रोत्तेजक सभेवर माझ्या वडिलांचे विशेष प्रेम होते. नोकरीच्या निमित्ताने ते जरी बाहेरगावी असले तरी सभेच्या परीक्षांचे संचालन करण्याकरिता ते मुद्दाम रजा घेऊन येथे येत व त्या आठ दिवसांत या कामाखेरीज त्यांना दुसरे काही सुचत नसे. या कामात त्यांचा इतका जीव गुंतलेला होता, म्हणूनच त्या कामाच्या इतक्या गोष्टी बऱ्याचशा तपशिलासह माझ्या ध्यानात राहिल्या आहेत.

चाळीस पन्नेचाळीस वर्षांपूर्वीचा तो काळ आता गेला आहे. काळ हा सदोदित सारख्याच वेगाने पुढे जात असतो. त्याची ही क्रिया एकसारखी चाललेली आहे. तो काळ आता गेला आहे असे मी म्हणतो यातील मतलब असा की त्या काळाची चिन्हे आताशी लुप्त झाली आहेत. त्या काळातले समाजजीवन आज स्मृतिशेष झाले आहे. आमचे वांशिक सातत्य तेवढे कायम राहिले आहे. बाहेरच्या कुठल्या तरी समाजाचे आमच्या रक्तात मिश्रण होऊन आम्ही बदललो नाही, एवढेच कायते. बाकी आमच्यात अंतर्बाह्य बदल इतका झाला आहे की सामाजिक क्रांती असे म्हणण्याखेरीज त्याला दुसरे काही नाव देता येईल असे वाटत नाही. हा क्रांतिकारक बदल पेहेरावात झाला आहे, विचारात झाला आहे, जीवनविषयक ध्येयात झाला आहे. ह्याला केवळ बदल म्हणून भागणार नाही. ही एक उलथापालथ झाली आहे. जुनी मूल्ये, जुन्या श्रद्धा, जुनी समाजव्यवस्था याचे उन्मूलन झाले आहे, किंवा होऊ घातले आहे. त्या काळात, म्हणजे ४०।५० वर्षांपूर्वी आम्ही लहान असताना कसे होतो आणि आजची लहान मुले कशी आहेत, हे पाहिले म्हणजे ही उलथापालथ केवढी मोठी आहे हे ध्यानात येऊन मोठा चमत्कार वाटतो. आमच्या लहानपणी आम्हा मुलाना खाली नुसती लंगोटी असली तरी चालत असे, पण घराबाहेर पडायचे म्हणजे डोक्यावर टोपी घातल्याखेरीज पडणे अगदी अभद्र समजले जात असे. आज माझ्या मुलाला त्याची मुंज होताना लंगोटी माहीत झाली असेल तेवढेच. त्यानंतर त्याने तिला कायमची रजा देऊन टाकली आहे. आणि टोपी घालणे तर त्याला माहीतच नाही. भर उन्हात उघड्या डोक्याने जाऊ नको म्हणून म्हटले तर ते त्याला कसेसेच वाटते. आमच्या लहानपणी सकाळसंध्याकाळ संध्या करणे हे जेवणे आंघोळ करणे या शारीरिक विधीप्रमाणेच आम्हाला अगदी स्वाभाविक वाटत असे. आता संध्या किंवा वेदमंत्र तर राहोतच, नव्या पिढीपैकी किती जणाना चोवीस नावे येत असतील किंवा आपले गोत्र माहीत असेल याची शंका वाटते.

हा जो बदल किंवा ही जी क्रांती गेल्या ४०।५० वर्षांत झालेली आपल्या दृष्टीस पडते ती चांगली किंवा वाईट याविषयी इथे काही अभिप्राय व्यक्त करण्याचा माझा उद्देश नाही. माझी सामाजिक मते कशा प्रकारची आहेत, हे मी कधीच लपवून ठेवलेले नाही. आपणापैकी कित्येकाना याची जाणीव असेल.

आणि आपण मला काही अट न घालता इथे बोलाविले आहे तेव्हा माझी मते मी नाजूक सारावी आणि श्रुतिस्मृतिपुराणोक्त समाजव्यवस्थेचे आणि सामाजिक निर्बंधाचे पोकळ गुणगायन करावे अशी अपेक्षा आपण खास करीत नसाल. आपण ज्याप्रमाणे ही अपेक्षा करू नये त्याप्रमाणे मीही आपणाकडून अशी अपेक्षा करीत नाही की आपण आपली परंपरा टाकून देऊन माझी मते स्वीकारावी आणि तदनुसार आपल्या संस्थेच्या नियमामध्ये आणि कार्यपद्धतीमध्ये काही उलथापालथ घडवून आणावी. स्वतःची मते व विचार इतरावर लादू पाहण्याची माझी वृत्ती नाही. आग्रही मतप्रचारकाची भूमिका मी कधीही पत्करलेली नाही. ती माझ्या स्वभावाला जुळत नाही. स्वतःला जे वाटते ते आग्रहरहित बुद्धीने पुढे मांडणे एवढेच मी माझे कर्तव्य समजतो. वास्तविकपणे आज इथे हा मतभेदाचा प्रश्न उकरून काढून त्यावरील आपणापैकी बहुतेकांना कदाचित कुलक्षणी वाटणारे विचार ऐकवावे असा माझा उद्देशही नाही. तसे करणे अप्रयोजकपणाचे होईल आणि आपण मला इथे ज्या प्रेमाने व आपुलकीने बोलाविले त्याच्याशी ते विसंगत होईल. तेव्हा तसे काही करण्याचा माझा मुळातच विचार नाही. मी आपल्यापुढे विचारार्थ जो विषय मांडणार आहे तो निराळा आहे. मी आपल्या समाजात घडून आलेल्या सामाजिक क्रांतीचा जो उल्लेख केला त्याचे कारण इतकेच की त्या विषयाचा या सामाजिक क्रान्तीशी निकट संबंध आहे.

प्राचीन संस्कृत विद्येचे म्हणजे आपल्या वेदशास्त्रादिकांचे यापुढे रक्षण कसे करावे, त्यांचे अध्ययन अध्यापन समाजामध्ये कसे आणि कोणच्या आधारावर चालू ठेवावे हा एक मोठा प्रश्न आपल्या समाजातल्या विचारवंताच्या पुढे आज उभा आहे. या प्रश्नासंबंधात माझ्यामध्ये, आणि आपणासारखे जुन्या विद्येच्या उत्तेजनासाठी बद्धपरिकर झालेले जे आस्थेवाईक विद्वान व कार्यकर्ते आहेत त्यांच्यामध्ये मतभेद नाही. काही थोडे लोक जुन्या 'विद्येचे रक्षण करून आता काय करायचे आहे' सध्याच्या समाजाला तिचा जर काही उपयोग नाही तर काचेच्या घरात लावलेल्या झाडाप्रमाणे तिचे रक्षण करून काय करावयाचे आहे, तिच्यासाठी समाजातील तरुणांची बुद्धी व उत्साह कशासाठी खर्च करा,' असे म्हणणारे आहेत. पण मला तसे वाटत नाही. काचेच्या घराचा दृष्टान्तच आपल्याला असे सांगतो की काही वनस्पती बाहेरच्या नैसर्गिक परिस्थितीत

जगू शकत नसतील तर ज्ञानसंवर्धनासाठी काचेच्या घरात त्यांची वाढ करून त्यांचा अभ्यास करणे जरूर असते. त्याचप्रमाणे सध्याच्या परिस्थितीत समाजजीवनासाठी ज्यांची जरुरी वाटत नाही अशा आपल्या प्राचीन विद्या व शास्त्रे यांची जोपासना बुद्धिसंस्कारासाठी आणि तुलनात्मक व्यासंगासाठी करणे अत्यंत जरूर आहे असे मला वाटते. युरोप अमेरिकेत ॲरिस्टॉटल, प्लेटो, युक्लिड इत्यादी प्राचीन शास्त्रज्ञांचा अभ्यास आज घटकेस जर आस्थेने आणि आदराने चालू शकतो, होमर, व्हर्जिल, डेमास्थिनीस, सिसरो, प्लुटार्क इत्यादिकांचे वाङ्मयीन आदर्श आजसुद्धा जर तिकडे आदराने अभ्यासिले जातात तर आमचे कणाद आणि कपिल, जैमिनी आणि बादरायण, पाणिनी आणि यास्क यांचे अध्ययन आम्ही जोराने का चालू ठेऊ नये ? तसेच वाल्मीकी आणि व्यास, कुमारिल आणि शंकराचार्य यांच्या वाङ्मयीन आदर्शांचा आम्ही तरी अभ्यास का करू नये ? हा अभ्यास चालू ठेवला पाहिजे आणि या सर्व विद्येचं जिव्हाळ्याने जतन आपण केले पाहिजे ही माझ्या मते निर्विवाद गोष्ट आहे.

पण हे साधावयाचे कसे ? सध्याचे समाजजीवन जुन्या वेदशास्त्रादिकांच्या परंपरेपासून अत्यंत दुरावले आहे ही गोष्ट नाकारण्यात अर्थ नाही आणि ती आता बदलता येणार नाही. वळचणीचे पाणी आढयाला नेता येणार नाही. जुन्या धार्मिक परंपरेमुळे पूर्वीच्या काळी ब्राम्हण वर्गामध्ये तरी थोडेसे वेदाध्ययन, थोडेसे ब्रम्हकर्म आणि त्याच्या अनुषंगाने संस्कृत भाषेचा थोडासा व्यासंग हे क्रमप्राप्त म्हणून सहजगत्या होऊन जात असे. या संस्कृतमय वातावरणातूनच बुद्धी आणि परिस्थिती यांच्या अनुकूलतेनुसार मोठे शास्त्री पंडित किंवा वैदिक निर्माण होत असत. आता ती परिस्थिती राहिलेली नाही. किंबहुना युनिव्हर्सिट्या-मधून जे संस्कृत विद्येचे शिक्षण चालते त्याच्याकडे वळणारांची संख्या देखील झपाट्याने कमी होत आहे. तेव्हा आपल्या या विद्येच्या रक्षणासाठी यापुढे आपण काय केले पाहिजे हा मोठा प्रश्न समाजाचे नेते, संस्कृतीचे संरक्षक आणि देशाचे हितकर्ते यांच्यापुढे आहे.

आता सभेत अनेक संस्कृत पंडितांची भाषणे आपल्यापुढे झाली. त्यात याच प्रश्नाचा वारंवार उल्लेख करण्यात आला. संस्कृत विद्येचे रक्षण करावयाचे म्हणजे संस्कृत विद्या पढणारा जो पंडितवर्ग आहे त्याचे रक्षण करावयाचे. जुन्या परंपरेने वेदविद्या व शास्त्रविद्या पढलेल्यांचा चरितार्थ जर चालू शकत नसेल

आणि समाजामध्ये त्याला दरिद्री व अपमानित जीवन कंठावे लागत असेल तर या वर्गाच्या आधाराने राहाणाऱ्या संस्कृत विद्येचेही रक्षण होऊ शकणार नाही हे उघड आहे. याच विचारसरणीनुसार आजच्या बहुतेक वक्त्यांनी संस्कृत विद्येच्या रक्षणासंबंधी काळजीचे व निराशेचे उद्गार काढले. संस्कृत पंडितांना अजूनही त्यांच्या योग्यतेनुसार वेतन अथवा निर्वाहाचे साधन मिळत नाही, तेव्हा या स्वराज्यात सुद्धा संस्कृत विद्येला तिचे मानाचे स्थान मिळण्याचा संभव दिसत नाही, असा निराशायुक्त विचार आजच्या सभेत मोठ्या पोटतिडकेने व्यक्त करण्यात आला.

मला मात्र असे वाटत नाही, हे सांगण्याची मी परवानगी घेतो. या बाबतीत मी आशावादी आहे. आपल्या प्राचीन विद्येच्या अध्ययनाचे यापुढे पुनरुज्जीवन होणार, किंबहुना तसे होऊ लागल्याची सुचिन्हे आज घटकेला देखील दिसत आहेत. स्वराज्य होऊनही संस्कृत विद्येला उत्तेजन नाही हे म्हणणे यथार्थ न ठरता स्वराज्य आले म्हणून संस्कृत विद्येला उत्तेजन मिळू लागले आहे व यापुढे अधिकाधिक मिळणार, असे म्हणणे अधिक बरोबर ठरेल. याची लक्षणे कसकशी दिसू लागली आहेत ते पाहण्यास फार बारीक शोध करावयास नको. भारतीय राज्यघटनेचे संस्कृत पंडितांच्याकडून संस्कृतात अधिकृत भाषांतर करविण्यात आले. टिळक विद्यापीठ किंवा पारडीची श्री. सातवळेकरांची संस्था या सारख्यांनी संस्कृताच्या परीक्षा सुरू केल्या आहेत आणि त्यांना हजारो विद्यार्थी बसत आहेत. संस्कृत विद्यापीठ परिषद सोमनाथ येथे व काशी येथे भरली आणि संस्कृत विद्येच्या पुनरुज्जीवनाचा व प्रसाराचा उहापोह तेथे करण्यात आला. शुद्ध आयुर्वेदाच्या परंपरागत शिक्षणाला मुंबई सरकारने मान्यता दिली असून त्याप्रमाणे जुन्या परंपरेच्या वैद्यांनी शिक्षण देण्यास सुरवात केली आहे.—अशी सुचिन्हे अनेक सांगता येतील. स्वराज्य मिळाल्यानंतर जनतेचे आणि राज्यकर्त्यांचे लक्ष्य आपली जुनी विद्या व संस्कृती यांच्याकडे आस्थेने व आदराने वळणे हे साहजिकच नव्हे, तर अपरिहार्य आहे.

जुन्या पद्धतीने शास्त्रविद्या पढलेल्या वर्गाच्या वतीने या सभेत एक तक्रार मोठ्या आवेशाने मांडण्यात आली. इंग्रजीच्याद्वारा संस्कृत शिकलेला, कालेजातून संस्कृत शिकवणारा जो प्राध्यापक वर्ग त्याने जुन्या पद्धतीने शास्त्र-विद्या शिकलेल्या पंडित वर्गाला सतत कमी दर्जाचे लेखले असून अद्यापीही

त्याची ही दृष्टी बदललेली नाही; आंग्लशिक्षित प्राध्यापकापेक्षा जुन्या पद्धतीने शिकलेल्या पंडिताला पगार कमी, मान कमी, अधिकार कमी, मग तो पंडित कितीही गाढ अध्ययन केलेला असो; ही वस्तुस्थिती अद्यापही बदललेली नाही, अशी जी आवेशपूर्ण तक्रार येथे मांडण्यात आली ती चुकीची आहे असे मी म्हणत नाही. पण ही स्थिती आता यापुढे फार काळ टिकणार नाही, असे निभ्रांत वाटते. पूर्वीच्या पारतंत्र्याच्या काळात इंग्रजीचा जो वरचष्मा आपल्यावर होता त्याचे हे अवशेष आहेत. ते आता फार काल टिकणार नाहीत. उच्च पदवीपर्यंतचे विद्यापीठातले सर्व शिक्षण आता मातृभाषेतून होणार आहे. तेव्हा इंग्रजीतून शिक्षण घेतलेल्या प्राध्यापकाचे महत्त्व, किंवा स्तोम म्हणा पाहिजे तर, आता किती दिवस तग धरू शकेल ? विद्यापीठातून संस्कृत शिकणारा वर्ग आणि जुन्या पद्धतीच्या गुरुजवळ अध्ययन करणारा शास्त्रीवर्ग हे दोन्ही यापुढील काळात आता एकरूप होऊन जाणार आहेत. कारण या दोहोंमध्ये भेद निर्माण करणारे इंग्रजी माध्यम अस्तगत होण्याच्या पथाला लागत आहे. इंग्रजीतून शिक्षण घेतलेल्या प्राध्यापकवर्गाला सध्याच्या विषम परिस्थितीबद्दल दोषी ठरविण्यात येते. आजच्या कित्येक वक्त्यानी त्याच्या-वर कडाका उडवला. पण हा काळाचा प्रभाव आहे. त्याबद्दल विशिष्ट वर्गाला दोषी धरणे रास्त होणार नाही. इंग्रजी शिकलेला संस्कृतचा प्राध्यापकवर्ग पारतंत्र्याच्या दडपणात वाढलेला असल्यामुळे त्याच्या मनात ही भेदबुद्धी निर्माण झाली. तथापी तशा परिस्थितीतही त्याने संस्कृत विद्येचा अभिमान बाळगून तिच्या रक्ष-णाचे व महत्त्वस्थापनाचे मोठे कार्य केले, हे आपण विसरता कामा नये. हे काम जुन्या पंडित किंवा शास्त्रीवर्गाकडून झाले नसते. डॉ. भांडारकर, तेलंग, काथवटे, वा. शि. आपटे, म. म. काणे किंवा येथे माझ्या शेजारी बसलेले गुरुवर्य डॉ. बेलवलकर यांच्यासारखी धुरंधर मंडळी नसती तर आधुनिक विवेचक पद्धतीने संस्कृत विद्येची महती प्रस्थापित करण्याचे कार्य कितीसे झाले असते ? यांच्या कार्यामुळे संस्कृत विद्येविषयीचा आदर समाजात कायम राहिला आणि त्यामुळे शास्त्रीपंडित वर्गाला अप्रत्यक्षपणे पुष्कळ आधार मिळाला. तेव्हा इंग्रजीतून शिकलेला प्राध्यापक वर्ग आणि जुन्या पद्धतीने शिकलेला शास्त्रीपंडिताचा वर्ग यांनी एकमेकाविषयी स्पर्धाभाव किंवा कमजास्तपणाचा भाव न बाळगता आपण एकाच मार्गातले सहकारी आहो, एकाच विद्याधनाचे

सहविश्वस्त आहो, अशा भावनेने हातात हात घालून काम केल्यास आपले उद्दिष्ट अधिक चांगल्या रीतीने सफळ होईल असे मला वाटते.

आपल्या संस्कृत विद्येचे अध्ययन अध्यापन यापुढील काळात चालू राहावे व वाढावे यासाठी एक दोन महत्त्वाचे मुद्दे आपण लक्षात ठेवले पाहिजेत. संस्कृत भाषेत साठविलेले जे सर्व ज्ञान आहे त्याची धर्माशी सांगड घातली गेली आहे आणि आपली समाजव्यवस्था ही प्राचीन काळापासून धर्माचेच एक अंग बनलेली आहे. त्यामुळे जुन्या विद्येचे संरक्षण-संवर्धन म्हणजे परंपरागत धार्मिक आचाराचे आणि समाजव्यवस्थेचे समर्थन आणि संरक्षण, असा अर्थ पुष्कळ ठिकाणी घेतला जातो. संस्कृत शास्त्रादिकाचा पुरस्कार ज्या संस्थाकडून अथवा व्यक्तीकडून केला जातो त्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त धार्मिक आचाराचे व वर्णाश्रमव्यवस्थेचे समर्थन व तद्‌विषयक श्रद्धापालन हेही आपले कर्तव्य समजतात. किंबहुना या दोन्ही गोष्टी एकच होत असे त्या गृहीत धरून चालतात. पण या दोन्हींची गुंतागुंत न करिता त्या एकमेकांपासून अलग राखल्यास संस्कृत विद्येच्या प्रसाराचा जो आपला हेतू तो अधिक चांगल्या रीतीने सिद्धीस जाईल असे मला वाटते. श्रुतिस्मृतिपुराणोक्त रूढ धार्मिक आचार आणि तिचा गाभा असलेली वर्ण-जाती-व्यवस्था यांचा पुरस्कार कोणीच करू नये असे मी म्हणत नाही. जे त्याचे अभिमानी असतील त्यांनी तो जरूर करावा. पण तो निराळ्या व्यासपीठावरून करावा. आपली ही लोकशाही आहे. सर्व प्रकारच्या मतप्रचारास येथे वाव आहे. पण या दोन्ही प्रचाराची सांगड घातल्याने दोघांचीही हानी होण्याचा संभव आहे. रूढ धार्मिक आचार आणि वर्णजातिव्यवस्था यांच्यापासून सध्याचा समाज दुरावलेला आहे. मी प्रारंभी सांगितल्याप्रमाणे आचारविचारात प्रचंड क्रांती झालेली आहे. वर्णजातिव्यवस्था आणि जुन्या धार्मिक रूढी यात परिवर्तन झाले पाहिजे असे म्हणणारा आणि या सर्वांचा त्याग केला पाहिजे असे म्हणणारा फार मोठा वर्ग समाजात आहे. पण या वर्गाला देखील धर्माचार नको असले तरी जुन्या विद्याधना विषयी आदर आहे व त्याचे रक्षण केले पाहिजे, ही आस्था आहे. धर्माचार आणि विद्याधन यांची सांगड घातल्याने आपण या फार मोठ्या वर्गाच्या साहाय्याला मुकतो. जुन्या धर्माचाराचे रक्षण आणि संस्कृत विद्येचे रक्षण या भिन्न गोष्टी आहेत. त्यांची फारकत करणेच इष्ट होईल. जुन्या शास्त्रविद्येचे,

किंबहुना वेदादिकांचे अध्ययन ही ब्राम्हणादी वरिष्ठ वर्गांची मिरास आपण का समजावी? हे जुने ठेवणे सर्व जाती व सर्व धर्म यांच्या हक्काचे आहे असे मानून आपण सर्वांना याच्या अध्ययनाला प्रवृत्त केले पाहिजे. ही व्यापक दृष्टी आपणामध्ये पूर्वीपासूनच आहे. तिची जोपासना करण्याच्या कामी आपण कसूर करता कामा नये. नास्तिक चार्वाकाचा आणि वेदनिंदक बौद्धांचादेखील संग्रह आपण आपल्या दर्शनांमध्ये केला आहे. तेव्हा आजदेखील वेदांचे, शास्त्रांचे, दर्शनांचे अध्ययन निर्विकल्प बुद्धीने सर्व जातींनी, सर्व पंथांनी करावे अशा आग्रहाने आपण प्रचार केला पाहिजे. ज्यांना सनातनी भूमिकेवरून धर्मश्रद्धेसाठी वेदादिकांचे अध्ययन करावयाचे आहे त्यांची भूमिका निराळी. अर्थात त्यांची संघटनाहि निराळी असावी. वेदशास्त्रोत्तेजक सभेसारख्या संस्थेने या दोहोपैकी कोणती भूमिका आपण पत्करणार या संबंधाने आपला एक काहीतरी निश्चय करून त्याप्रमाणे वर्तावे. सनातन धर्मरक्षकांची भूमिका स्वीकारल्यास मग शास्त्रविद्यादिकांचा प्रचार होत नाही, त्याला कोणी मदत देत नाही, म्हणून कुरकूर करू नये. त्रैवर्णिकांनाच फक्त वेदाध्ययनाचा व शास्त्रदर्शनादिकांचा अधिकार, असल्या कल्पना सध्याच्या काळी व यापुढे बहुजनमान्य होण्याचा संभव नाही. अशा कल्पनांच्या आधाराने चालणाऱ्या संस्थेचे क्षेत्र यापुढे संकुचित राहणार. खुद्द त्रैवर्णिकांमधील अफाट जनसमाजाला या कल्पना आणि जातिवर्णव्यवस्थेच्या रूढी आज मान्य नाहीत. संस्कृत विद्येचा निर्विकल्प रीतीने प्रचार करावयाचा असेल तर या सर्व कल्पना टाकून देऊन मनुष्यमात्र तेवढा सारखा आणि तो सर्व प्रकारच्या परिपूर्ण अध्ययनाला पात्र अशा भूमिकेवरून तिचा प्रचार करावयास निःशंक मनाने सिद्ध झाले पाहिजे. ही भूमिका सिद्ध झाल्यास संस्कृत विद्येच्या प्रसाराला केवढे तरी अफाट क्षेत्र मोकळे आहे असे आपणास दिसून येईल. अशा रीतीने प्रचार करणाऱ्या अनेक संस्था अस्तित्वात आहेत. पण वेदशास्त्रोत्तेजक सभेसारख्या संस्थांना त्यापेक्षा अधिक सखोल, पायाशुद्ध, वैशिष्ट्यपूर्ण रीतीने काम करता येईल.

आणखी एक मुद्दा याच्या अनुषंगाने सुचतो. तोही आपण ध्यानात घ्यावा अशी विनंती आहे. सनातन धर्म आणि जुन्या धार्मिक रूढी यांची भूमिका सोडून केवळ आपले जुने ठेवणे या नात्याने संस्कृत विद्येच्या अध्ययनाची

भूमिका आपण स्वीकारली तर त्याबरोबरच आधुनिक अध्ययनपद्धतीचा अंगीकार करणे हे क्रमप्राप्त होईल. जुन्या अध्ययनपद्धतीतील गाढता आणि नव्या अध्ययनपद्धतीतील तुलनात्मक, विवेचक आणि ऐतिहासिक दृष्टी यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न यापुढे व्हावयास पाहिजे. सनातन धर्माभिमानाची भूमिका सोडून निरपेक्ष अध्ययनाच्या भूमिकेवर आपण आलो म्हणजे ह्या आधुनिक दृष्टिकोनाचा संचार आपल्या अध्ययनपद्धतीमध्ये अनायासे होईल, आणि सर्वांगपरिपूर्ण पद्धतीचा एक आदर्श आपण विकसित करू शकू. तेव्हा येथे जमलेल्या आपणा सर्व विद्वज्जनांना माझी सविनय प्रार्थना अशी की आपण सध्याच्या काळात कोणती भूमिका स्वीकारावी याचा आत्मनिरीक्षणपूर्वक विचार करावा आणि अनेक भूमिकांची सरमिसळ न करता योग्य वाटेल ती एक दिशा पत्करावी. माझा स्वतःचा नम्र अभिप्राय संस्कृत विद्येच्या निरपेक्ष अध्ययनाची व्यापक भूमिका आपण पत्करावी असा आहे. तथापि माझा आग्रह नाही. आणि अमूकच करा हे सांगण्याचा अधिकारही मला नाही. आधुनिक काळास अनुसरून संस्कृत विद्येच्या अध्ययनाचे व प्रसाराचे विद्यापीठ असे स्वरूप या आपल्या जुन्या व महान संस्थेला प्राप्त व्हावे ही अंतःकरणापासूनची इच्छा प्रकट करून आणि माझे विचार व्यक्त करण्याची संधी मला दिली याबद्दल आपणा सर्वांचे व विशेषतः संस्थेच्या संचालकांचे आभार मानून मी माझे भाषण पुरे करतो.

♣ ♣ ♣

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
क्रमांक ........ दि. ........
ग्रंथांक ........ नों. दि. ........

# १२.

# जागृत गोमन्तक

— १ —

गेल्या शेदीडशे वर्षांत आपल्या सामाजिक व राष्ट्रीय जीवनात आजवर अनेक बदल होत आले. त्यात सध्याच्या कालाचे लक्षण काही निराळेच आहे. अनेक दिशांनी अनेक तऱ्हेचे प्रश्न व त्या प्रश्नांचे पडसाद उठताहेत आणि या आणिबाणीच्या काळात सर्व प्रयत्नांच्या एकत्रीकरणाची जितकी आवश्यकता आहे तितकेच सर्वजण परस्परांहून विलग होऊ पहात असून एकाकी स्थितीत अज्ञात भविष्यकाळात कोठेतरी जाऊन पोचण्यासाठी धडपडत आहेत. या बेदाद कारभाराच्या बुडाशी सार्वत्रिक जागृती आहे यात संशयच नाही. चैतन्याचे स्फुरण राष्ट्रपुरुषाच्या नसानसातून होऊ लागले आहे. अमुक एक स्थळ किंवा अमुक एक विषय म्हणजे या चैतन्याच्या स्फुरणाने, नवजीवनाच्या आकांक्षेने झपाटला गेल्याखेरीज राहिला आहे असे आढळणार नाही.

स्थानिक जागृती व स्वावलंबन बुद्धी हे त्यातल्या त्यात या कालाचे वैशिष्ट्य आहे. कोणासही कोणत्याही कार्यांबाबत केंद्रीभूत व्यवहार नको आहे. जो तो आपले नशीब आपल्या हातात घेऊ चाहत आहे. पूर्वी मुख्य स्थानी

असलेल्या व्यक्तीवर किंवा संस्थावर आपल्या उद्धाराचा बोजा टाकून सर्व लोक विश्वस्त मनाने स्वस्थ बसत असत. परंतु आता प्रत्येकजण स्वतःच्या अडचणींची व उन्नतिमार्गाची छाननी करितो व स्वतः साधेल तसे पाऊल पुढे टाकतो. ऐहिक वार्ताव्यवहारापासून पूर्णपणे अलिप्त राहणारे आणि सर्वस्वी देवावर भार घालून आल्या भोगाला सादर होणारे साधुसन्तसुद्धा जेथे स्वतःच्या संघटनेची चळवळ करू लागले तेथे इतर कोण अशा प्रकारच्या धडपडीपासून अलिप्त राहू इच्छिणार आहे?

ही सार्वत्रिक जागृती अनिष्ट आहे असे कोणी म्हणणार नाही. ज्या प्रयत्नाच्या व चळवळींच्या बुडाशी राष्ट्रीय हिताशी विसंगत अशी आकुंचित स्वरूपाची स्वार्थबुद्धी दिसून येत असेल त्याचा पुरस्कार खरा राष्ट्रभक्त कधी करणार नाही, हे खरे. तथापी पूर्वी व्यक्ती व कुटुंब याच्यापलीकडे सामान्य जनांची दृष्टीदेखील पोचत नसे ती स्थिती जाऊन समाजाचा प्रत्येक घटक आपल्या जातीपुरते, आपल्या मोहल्ल्यापुरते किंवा आपल्या समव्यवसायी लोकांपुरते जरी पाहू लागला तरी ती पूर्वीच्या स्थितीच्या मानाने बरीच मोठी प्रगती होय असे म्हटले पाहिजे. व्यक्तिविषयक संकुचित परिघाच्या बाहेर पडल्या-नंतर पहिलीच उडी एकदम राष्ट्रभक्तीच्या अत्यंत व्यापक परिघापर्यंत कशी पोचेल? सामान्य जनसमूहाची बुद्धी टप्प्याटप्प्यांनीच व्यापक राष्ट्रभक्तीपर्यंत पोचणार हे उघड आहे. ज्यांचे स्वार्जित वा पूर्वार्जित मानसिक संस्कार व्यापक स्वरूपाचे आहेत त्यांनी निर्भेळ राष्ट्रधर्माचा अंगीकार केला आहे. पुष्कळसे लोक आप-आपल्या संस्कारांनुसार मधल्या कुठल्या तरी पायऱ्यावर घुटमळत आहेत तर कित्येक लोकांना आपल्या व्यक्तीच्या संसाराबाहेर बघण्यास अद्याप शिकावयाचे आहे, असा देखावा सध्या दिसून येत आहे.

तथापी सर्वच स्थानिक, प्रादेशिक किंबहुना जातीयदेखील, चळवळी राष्ट्रधर्मास विरोधी असतात असे सरसकट मानून चालावयाचे नाही. आपल्या देशाची परिस्थितीच अशी आहे, की व्यापक स्वरूपाचा एकसूत्री प्रयत्न सर्व देशाकरिता म्हणून चालू करणे शक्य होत नाही. सामाजिक बाजू घेतली तरी जातीजातींची सामाजिक परिस्थिती इतकी भिन्न पडते की सर्व जातीकरता एकसूत्री कार्यक्रम अस्तित्वात येऊ शकत नाही व प्रयत्नाची व त्याबरोबरच कार्यकर्त्यांची भिन्नता राहणे अपरिहार्य होते. फार कशाला राजकीय बाबतीत तरी एकमुखीपणा

अशावयास पाहिजे ना ? पण त्यातही ब्रिटिश मुलुखाचे प्रश्न वेगळे व संस्थानांचे वेगळे पडल्याकारणाने संस्थानांना प्रजापरिषदा काढाव्या लागतात. भाषाविषयक व साहित्यविषयक प्रयत्न हे प्रातनिहाय स्वाभाविकपणेच तोडले जातात. त्यातही पुनः पोटभाषा व प्रादेशिक बोली यांच्या अभिमान्याची चळवळ सुरू झाली म्हणजे तर विचारावयासच नको ! प्रत्येकजण इतर सर्वांस बजावतो, "माझे सगळे तुमच्याहून निराळे आहे, माझी भाषा निराळी आहे, माझी संस्कृती निराळी आहे, इतिहास निराळा आहे, मी माझा संसार निराळा थाटणार ! मला तुमचा विटाळ नको." अशा रीतीने काही अपरिहार्य तर काही अभिमानजन्य, अशा भिन्न भिन्न दिशाकडे तोंड करून चालणाऱ्या असंख्य प्रयत्नांचा कोलाहल पाहिला म्हणजे मन विकल होऊन जाते.

परंतु यातच काही आशास्थानेही आढळतात व तीच उज्ज्वल भविष्याची सूचक होतात. स्थानिक किंवा प्रादेशिक चळवळी जेथे अवश्य असतील तेथे सुरू केल्याच पाहिजेत. याविषयी कोणाचाच वाद नाही. परंतु त्याचे स्वरूप व्यापक राष्ट्रधर्मास व देशहितास पूर्णपणे पोषक असेच राहील याविषयी खबरदारी घेतली पाहिजे. प्रादेशिक चळवळींनी असलेला दुजाभाव वाढत असेल किंवा उत्पन्न होत असेल तर त्या योगाने विशिष्ट प्रकारचा संकुचित स्वार्थ जरी साधत असला तरी त्या त्याज्यच होत हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. हे सर्व पथ्यापथ्य लक्षात ठेवून अतिशय कौशल्याने, समतोलपणाने व पूर्ण राष्ट्रहितबुद्धीने जर कोठे प्रादेशिक स्वरूपाची चळवळ चालविली जात असेल तर ती हिंदुस्थानच्या नकाशात ठिपक्याएवढ्या दिसणाऱ्या गोमंतकात होय. अत्यंत अडचणीच्या परिस्थितीशी टक्कर देऊन तेथील मंडळींनी चालविलेले प्रयत्न पाहिले म्हणजे धन्यतेचे उद्‌गार कोणाच्याही तोंडून निघाल्याखेरीज राहणार नाहीत.

— २ —

बऱ्याच काळापूर्वी गोव्याचे नाव घेतले की गोव्याबाहेरच्या महाराष्ट्रीयाच्या मनास काही अनिष्ट व अनुदार कल्पनाच्या लहरी स्पर्श करून जात असत. गोमन्तक व बाकीचा महाराष्ट्र यांच्यामधील परिचय व दळणवळण वाढू लागल्या- पासून तो काळ व त्या समजुती पालटल्या तरीदेखील वरवरच्या देखाव्यावरून मनाचे ग्रह बनवून घेण्याची महाराष्ट्रीय सुशिक्षितांची प्रवृत्ती नाहीशी झाली असे मुळीच नाही. आजकालचा सुशिक्षित महाराष्ट्रीय गोमंतक म्हणजे केवळ

सृष्टीसुंदरीच्या मनोहर विलासाचे स्थान असं समजतो. परंतु निसर्गसौंदर्याबरोबरच मानवी मनाचे अपार सौंदर्य त्या चिमुकल्या टापूत भरले आहे याची जाणीव त्यास बहुधा नसते. गोमंतकात प्रवेश करताना दिसणारा दूधसागर त्याला हरखवितो. परंतु गोमंतकातून आरपार प्रवास करूनही तेथील नागरिकांच्या अंतःकरणात असलेले अमृताचे संचय त्याला मनोगोचर होत नाहीत! ज्या भूमीत चोरीचहाडी, शिंदळकी करणारा गुन्हेगार मोठ्या नवानवसाने गवसतो, जेथील हिंदु समाजात चुकूनही एखादा भिकारी भीक मागत असलेला नजरेस पडत नाही, ज्या समाजातील तुरुंगाचे नियम इतके सक्त की कैद्याला आपल्या बदली दुसरा माणूस देऊन खुशाल आपल्या बायकामुलांना भेटता येते, त्या भूमीचे व समाजाचे मानसिक ऐश्वर्य हेवा करण्याजोगे असले पाहिजे, यात शंका नाही.

केवळ सुस्वभाव आणि सच्छील हेच गोमन्तकीयाचे मानसिक अलंकार होत, असेही नाही. आपला धर्म, आपली संस्कृती व आपली मातृभूमी यांविषयीच्या अभिमानात गोवेकर हे जगातल्या इतर कोणत्याही देशाच्या नागरिकास हार जाणार नाहीत. साडेतीनशे वर्षेपर्यंत, अत्यंत असहाय स्थितीत, स्वधर्माबाबत एकसारखे अनन्वित अत्याचार व हेकडपणाची जुलूमजबरदस्ती सहन करूनही आज गोव्याच्या लोकसंख्येपैकी निम्मी प्रजा उजळ माथ्याने 'आम्ही हिंदु आहो' असे सांगणारी निघू शकते, यावरूनच त्या जनतेचा स्वधर्म व स्वजाती याविषयीचा अभिमान केवढा चिवट आहे, हे प्रत्ययास येते. यातच तीव्र बुद्धिमत्ता, सुसंस्कृत जीवनाविषयीची आवड, वाङ्मय व ललितकला याविषयीचे अभिजात प्रेम, इत्यादी उच्च गुणांची भर घाला, म्हणजे आजच्या गोमन्तकीय बंधूचे प्रतिनिधिभूत चित्र तुम्हास आपल्या डोळ्यापुढे उभे करता येईल.

यावरून आजचा गोवेकर म्हणजे ख्यालीखुशाली करणारा एक सुखी प्राणी आहे, अशी कल्पना करून घेतल्यास ती रास्त होणार नाही. गोवेकरापुढे त्याचे-त्याचे स्वतःचे प्रश्न आहेतच. आणि ते ब्रिटिश हिंदुस्थानातल्यापेक्षा कमी बिकट आहेत, असेही नव्हे. परंतु तो समाज त्या प्रश्नांना तोंड देण्याचा धीराने व नेटाने प्रयत्न करीत आहे. ब्रिटिश हिंदुस्थानात अल्पसंख्य जातीचा प्रश्न मोठा जाचक होऊन राहिलेला आहे, तर गोव्यामध्ये ख्रिस्ती व हिंदू या दोन सारखीच लोकसंख्या असलेल्या जातींचा प्रश्न प्रामुख्याने उभा आहे. ब्रिटिश हिंदुस्थानामध्ये

भाषेचा प्रश्न एकपटीने बिकट असला तर गोव्यामध्ये त्या प्रश्नास आणखी एक तिढा बसला असल्याकारणाने त्याचा बिकटपणा द्विगुणित झाला आहे. ब्रिटिश हिंदुस्थान औद्योगिक प्रगतीत पंगु असला तरी स्वतःस पुरेसे अन्न तरी निर्माण करू शकतो. गोमन्तकात तेथील लोकसंख्येला वर्षातले ८ महिने पुरेल इतकेही धान्य निर्माण होऊ शकत नाही. ब्रिटिश हिंदुस्थानात कोणत्याही चळवळीला अडचण भासते ती देशाच्या अफाटपणाची व जनतेच्या विस्कळीतपणाची. दळण-वळणाच्या आधुनिक द्रुत साधनांमुळे ती अडचण बऱ्याच अंशी दूर होऊ पाहत आहे. परंतु गोमन्तकाला अडचण येते स्वतःच्या अल्पत्वाची व चिमुकलेपणाची; ती कशानेच दूर होऊ शकणार नाही. ती अडचण दूर होण्यास उपाय एकच' तो म्हणजे गोमन्तक हा ज्या भारतभूमीचा एक अंश आहे तिच्याशी राजकीयदृष्ट्या त्याचा मिलाफ होऊन जाणे. या उपायाचा गोव्यातील धारिष्टवान पुढारी आपल्या लेखनभाषणातून उच्चारही करून दाखवितात, परंतु तो केवळ एक शेखमहंमदी मनोराज्य या दृष्टीने. राजकीय साध्य या दृष्टीने त्याचा विचार करण्याची वेळ आली आहे, असे कोणी मानताना दिसत नाही.

गोव्याच्या चिमुकलेपणाची कल्पना थोडीशी तुलनात्मक दृष्टी वापरल्याने चांगली करून घेता येइल. संबंध गोवा प्रांताची जास्तीत जास्त उत्तर–दक्षिण लांबी ६५ मैल आहे. म्हणजे पुणे ते सातारा, किंवा नागपूर ते पुलगांव जितके अंतर आहे त्यापेक्षाही ही लांबी थोडी कमीच आहे! रुंदी तर साधारणपणे याच्या निम्म्याने आहे. एवढ्याशा टीचभर प्रदेशात एकंदर पाच लाख मनुष्यवस्ती आहे. गोव्याचा प्रदेश जर नकाशात पाहिला तर त्याच्या साधारणपणे मध्यभागी दोन नद्यांच्या मोठ्या खाड्या समुद्रातून आत गेलेल्या दिसतील. या खाड्यांच्या चिमट्यात व यांच्या दक्षिणेस व उत्तरेस सुमारे १५–२० मैल जो प्रदेश आहे तो अतिशय सुपीक असून त्यातच लोकवस्ती अत्यंत दाट आहे. हा प्रदेश पोर्तुगीजांनी अगोदर, म्हणजे सुमारे ४०० वर्षांपूर्वी जिंकला, म्हणून त्यास ' जुनी काबिजाद असे म्हणण्यात येते. या साधारणपणे अर्धवर्तुलाकार प्रदेशाच्या बाहेरचा जो प्रदेश, म्हणजे 'नवी काबिजाद,' त्यापैकी पूर्वेकडचा बराच मुलूख केवळ डोंगराळ असून अतिशय विरळ वस्तीचा आहे. जुन्या काबिजादीचा मुलूख जसा अधिक संपन्न तसाच तेथील समाजही अधिक पुढारलेला, सुशिक्षित व उद्योगी आहे. जुन्या काबिजादीत ख्रिस्ती लोकांची संख्या जास्त असून राजकीय

व सामाजिक व्यवहारात एकंदरीने त्यांचेच प्राबल्य आहे. एकंदर गोवा प्रांतात अडीच लाख लोकसंख्या ख्रिस्त्यांची * आणि तितकीच हिंदूंची आहे. गेल्या चार खानेसुमाऱ्यांचे आकडे पाहता हिंदूंच्या संख्येच्या वाढीचे प्रमाण ख्रिस्त्यांपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. विशेषतः १९२८ साली दहा हजार गावड्यांचे जे शुद्धीकरण झाले त्यामुळे हिंदूंच्या लोकसंख्येत एकदम मोठी भर पडली; पूर्वी ख्रिस्त्यांपेक्षा २५--३० हजारांनी कमी असलेले हिंदू यामुळे व इतर कारणांनी आता त्यांच्यापेक्षा तीन हजारांनी जास्त झालेले आहेत.

तथापी शिक्षणात, सरकारी नोकरी व वकीली–डॉक्टरी इत्यादी वेळ्या व्यवसायात पूर्वीपासून ख्रिस्ती समाजच पुढे आहे व हे त्यांचे पुढारीपण अद्याप कायमच आहे. देशातील कोणत्या एखाद्या समाजाने आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर पुढारीपण संपादिले तर त्यात गैर असे काहीच नाही. परंतु गोव्यातील ख्रिस्त्यांच्या सामाजिक जीवनात एक मोठी पठाडी गोम आहे. त्यामुळे त्यांनी आपले पुढारीपण केवळ स्वतःच्या कर्तबगारीच्या जोरावर संपादिले आहे असे म्हणता येत नाही. आणि एकंदर गोमंतकाच्या राष्ट्रीय जीवनामध्ये जे बिकट प्रश्न उपस्थित झालेले आहेत ते मुख्यत्वेकरून या ख्रिस्ती समाजाच्या कृत्रिम सामाजिक जीवनामुळेच झाले आहेत असे आपणास दिसून येते.

चारशे वर्षांपूर्वीपासून युरोपातून आलेल्या धर्मवेड्या पोर्तुगीजांनी गोवेकरांना या नाही त्या उपायांनी बाटविण्यास सुरुवात केली. पोर्तुगीजांनी त्यांना नुसती आपल्या धर्माचीच दिक्षा दिली असे नव्हे, तर संस्कृती, भाषा, वाङ्मय, इतिहास व आचारविचार या सर्व बाबतीत या गोवेकरांना त्यांनी पूर्णपणे आपलेसे करून टाकले. त्यांचे धोरण स्पष्टपणे आत्मसात करण्याचे (Assimilation) होते. केवळ सत्ता गाजविण्याचे (Subjection) किंवा आर्थिक शोषणाचे (Exploitation) नव्हते. त्यामुळे गोवेकर ख्रिस्ती समाज आचारविचाराने, भाषेने, संस्कृतीने व मनाने केवळ पोर्तुगीज बनून गेला आहे. हा समाज 'पोर्तुगाला'स आपली मातृभूमी, पोर्तुगीज भाषेस आपली मातृभाषा मानतो! पोर्तुगीजांचे आचारविचार व पोशाख तर त्याने त्यांच्या धर्माबरोबरच आपलेसे करून घेतले आहेत. राज्यकर्त्यांनीही अर्थात आपल्या कळपात ओढलेल्या या समाजाच्या धार्मिक उद्धाराबरोबरच व्यावहारिक उत्कर्षाचीही काळजी वाळगली

---

* हा माहिती १९३७ सालची आहे.

आणि हिंदू लोकांपासून हिरावून घेतलेल्या जमिनी आणि त्याचप्रमाणे सरकारी नोकऱ्या व तदंगभूत सर्व उद्योगधंदे त्यांच्या हवाली केले. अशा रीतीने आपला मूळचा धर्म, भाषा व संस्कृती सोडून दिल्याबद्दलचा मोबदला म्हणूनच जणु काय देण्यात आलेला राजाश्रय हा समाज आज उपभोगीत आहे. म्हणूनच एक प्रकारच्या कृत्रिम आधारावर या समाजाचे जीवन आधारलेले आहे असे वर म्हटले आहे. एरवी गोवेकर हिंदूप्रमाणेच हा ख्रिस्ती समाजही बुद्धिमान, हिकमती, कर्तबगार असून शिवाय धार्मिक बंधने नसल्यामुळे पूर्वीपासून वाटेल त्या देशांत जाऊन वाटेल ते काम करून आपले नशीब काढण्यात तत्पर असा बनलेला आहे. परंतु संस्कृतीच्या दृष्टीने आम्हास तो मुकला असल्यामुळे त्याचे श्रेय आम्हास असून नसल्यासारखेच झाले आहे.

— ३ —

या परिस्थितीमुळे सर्व जनतेच्या एकोप्याची कोणतीही चळवळ किंवा कोणताही प्रयत्न होणे गोमन्तकात अशक्यप्राय झाले आहे. एकंदर समाजाची सहसा कोणत्याही बाबतीत न जुळणारी अशी ही दोन शकले होऊन बसलेली आहेत. दोन्ही समाजांचे जीवन, त्यांचे विचारांचे विषय, त्यांच्या मार्गक्रमणाच्या दिशा एकमेकाहून सर्वस्वी भिन्न. हिंदू समाजाचे डोळे इंग्रजी हिंदुस्थानातील आपल्या बांधवाकडे सतत लागलेले तर ख्रिस्ती समाज सात हजार मैलवरील पोर्तुगाल देशाकडे डोळे लावून बसलेला. इंग्रजी हिंदुस्थानातील सूक्ष्मात सूक्ष्म अशा चळवळींच्या लहरीही गोवेकराची हृत्कमले आंदोलित केल्याखेरीज राहात नाहीत. हिंदुस्थानच्या पूर्वाकाशात उदयास येणाऱ्या विचारक्रान्तीचे किरणच त्यांच्या हृत्कमलांना उद्भासित करू शकतात. तर ख्रिस्ती समाजाची मने सूर्याच्या उदयकाली मिटणाऱ्या गुल्लबूप्रमाणे या जागृतीच्या वावटळीतही मख्खच राहतात. दोन्ही समाजाच्या अंत:करणास जाऊन भिडणारे विषय निराळे, त्यांच्या आवडीनिवडी निराळ्या, सर्वच काही निराळे. १९२४ च्या डिसेंबरात प्रस्तुत लेखक गोवा प्रांतात प्रवासास गेला त्या वेळी, दुरभाटसारख्या खेडेवजा गावात रात्री वस्ती करून राहण्याचा प्रसंग आला. ज्या घरात उतरण्याची व्यवस्था झाली होती तेथे देशावरील, विशेषत: बेळगावकडील, प्रवासी आपल्या इथे आले आहेत असे ऐकून ज्या उत्सुकतेने सभोवतालची माणसे गोळा झाली व "गांधी महाराज काय म्हणतात, कॉंग्रेसमध्ये काय

झाले", इत्यादी प्रश्न ज्या उत्कंठेने त्या प्रेमळ बांधवांनी केले, ते दृश्य प्रस्तुत लेखकाच्या डोळ्यासमोरून अद्याप ढळलेले नाही. परंतु हे सर्व आपले हिंदु बांधव! खिस्त्यांची तऱ्हा काही न्यारीच आहे.

पोर्तुगीज सरकाच्या दृष्टीने सर्व गोवेकरांची मातृभाषा पोर्तुगीज ही ठरून गेली आहे. अर्थात सरकारी रीतीने चालणारे प्राथमिक शिक्षण म्हणजे पोर्तुगीज भाषेचे व त्या भाषेमधून चालणारे शिक्षण, हे सांगावयास नकोच. हा विपरीत क्रम पोर्तुगाल देशातील राज्यसत्ता संपून लोकसत्ता स्थापन झाल्यावरही आज पंचवीस वर्षे चालला आहे हे लक्षात ठेवण्याजोगे आहे! रिपब्लिकने (लोकसत्तात्मक सरकारने) धार्मिक स्वातन्त्र्य मात्र दिले. प्रजेची भाषा, विद्या, कला, व संस्कृती ह्यांची जोपासना करण्याचे सरकारच्या गावीही नाही. कारण सरकारच्या मते प्रजेची भाषा पोर्तुगीजहून अन्य नाही व संस्कृतीही पोर्तुगीज संस्कृतीहून भिन्न नाही!

अशा पेचात सापडलेल्या गोवेकर हिंदु बांधवाचा मार्ग आणखी एका तिढ्याने अधिकच बिकट करून ठेवला आहे. एकजात सर्व गोवेकरांची घरीदारी बोलण्याची भाषा 'कोंकणी' असते. सरकारदरबारी गोवेकरांची देशभाषा पोर्तुगीज म्हणून लागलेली असो, आणि महाराष्ट्राच्या सान्निध्यामुळे हिंदूंनी मराठी व्यवहारभाषा म्हणून स्वीकार केलेली असो, तमाम गोवेकरांची खरी जन्मभाषा कोंकणी हीच, यात संशय नाही. कोंकणी भाषा बाकीच्या महाराष्ट्रीयांस बोलता तर येत नाहीच परंतु बोललेली समजतही नाही. त्यामुळे एक गोवेकर दुसऱ्या गोवेकराशी मग तो खिस्ती का असेना—बोलू लागला की तिऱ्हाईतास त्याच्या तोंडाकडे बहुधा टकमक पहातच बसावे लागते! कोणीही महाराष्ट्रीय गोव्यात गेला की अशी ही गमत घडतेच, परंतु मुंबईतदेखील दोन सारस्वत ब्राम्हण एकत्र आले की हा प्रकार हमेशा पाहावयास मिळतो. आता गोव्यातल्या हिंदूंनी महाराष्ट्राच्या सान्निध्यामुळे पूर्वापार व्यवहार, वाङ्मय व संस्कृती यांची भाषा म्हणून मराठीचा अंगीकार केलेला असला तरी गोवेकर खिस्ती हे मात्र तिच्या-पासून चार पावले दूरच राहिले आहेत. त्यामुळे त्यांची जन्मभाषा कोंकणी व राष्ट्रभाषा पोर्तुगीज असा प्रकार झाला आहे. त्यात आणखी बऱ्याचशा गोवेकरांस (खिस्ती व हिंदू) मुंबई व इतर ब्रिटिश हिंदुस्थानात निर्वाहार्थ जाण्याची अपेक्षा असल्यामुळे इंग्रजी भाषा शिकणे आवश्यक ठरते. त्यामुळे इंग्रजी भाषेचे व

त्या भाषेतून शिक्षण देणाऱ्या अनेक शाळा तिकडे चाललेल्या असून त्यांना मुंबई विद्यापिठाकडून मान्यताही मिळालेली आहे. या सर्व गुंतागुंतीमुळे भाषेचा प्रश्न एकंदर राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीने पाहिले असता बिकट होऊन बसला आहे.

— ४ —

या बिकट परिस्थितीत आपले गोवेकर बांधव कशा रीतीने आपला मार्ग काढीत आहेत, हे पाहणे महत्त्वाचे आहे. अर्थात यात हिन्दू बांधवाच्या प्रयत्नाचेच विवरण करावे लागणार आहे. त्याबरोबर ख्रिस्ती बांधवाचा समावेश करता आला असता तर फार चांगले झाले असते, परंतु त्यांचे डोळे दुसरीकडेच लागलेले असल्यामुळे राष्ट्रीयत्वाचे किंवा संस्कृतीसंबंधाचे काही प्रश्न आपल्यापुढे उभे आहेत असे त्यांस वाटतच नाही, आणि म्हणूनच तर हे प्रश्न मुख्यत्वेकरून उपस्थित झाले आहेत, हे वर सांगितलेच आहे. तेव्हा यापुढे नुसते गोवेकर किंवा गोमन्तकीय असे म्हटले तरी त्याचा अर्थ गोव्यातील हिंदू प्रजा असाच घ्यावयाचा, हे सुचवून ठेवलेले बरे.

गोवे हा एक सृष्टिसौंदर्याने नटलेला परंतु सामाजिक जीवनाच्या दृष्टीने अगदी मागासलेला, दडपला गेलेला असा एक प्रांत, अशी बाहेरच्या महाराष्ट्रीयांची एक सामान्य समजूत असलेली आढळते. तेथील लोक बहुतेक छंदी-फंदी व रंगेल असावेत, अशी विचित्र कल्पनाही कित्येकांच्या मनात दबा धरून बसलेली आढळते. खरी गोष्ट अशी आहे की गोवेकरांइतके सुसंस्कृत, सदाचरणी आणि स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा यांबद्दल अभिमान बाळगणारे लोक दुसरीकडे सहसा आढळावयाचे नाहीत. वैयक्तिक सद्गुणांबद्दल तर बोलावयासच नको. परंतु त्यांच्यामधील राष्ट्रीय जागृतीसही प्रारंभ २५-३० वर्षांपूर्वीच झालेला आहे. १९१० साली पोर्तुगालात राजेशाहीचा अस्त होऊन लोकशाहीचा उदय झाला; तेव्हापासून प्रजेला धार्मिक स्वातंत्र्य व थोडेबहुत राजकीय हक्क मिळाले. याच्या पूर्वी ४।५ वर्षे ब्रिटिश हिंदुस्थानात, विशेषतः महाराष्ट्रात स्वदेशी-बहिष्काराची चळवळ जोमात चाललेली असून प्रखर राष्ट्रीयतेच्या भावनेचे बीजारोपण होत होते. या दोन्ही घटनांचा परिणाम गोवेकरांच्या भावनाशाली मनावर होऊन त्यांच्यात राष्ट्रीय जागृतीची जी लाट उसळली तिने गोवेकरांना कायमचेच उन्नतिपथाचे वाटसरू बनविले. गोवा हिंदु क्लब, प्रागतिक संघ, गोमन्तकीय हिंदुसभा, इत्यादि व्यापक स्वरूपाच्या व राष्ट्रीय आकांक्षा व्यक्त करणाऱ्या

संस्था प्रसंगाप्रसंगाने स्थापन होऊन त्यांचे कार्यही जोमाने व एकोप्याने चालत असते. प्रभात, हिंदुमत, भारत इत्यादि मराठी वर्तमानपत्रेही जागृतीच्या त्या प्रारंभकाळी निर्माण झाली. अलीकडे काही वर्षे चालून बंद पडलेले तडफदार ' हिंदु ' पत्र महाराष्ट्रांतही बरेच विख्यात झाले होते. ठिकठिकाणी वाचनालये, व्याख्यानमाला, जातीय परिषदा, व्यायामशाळा इत्यादी अनेक संस्था स्थापन होऊन त्यांची कार्येही व्यवस्थितपणे चाललेली आहेत. अडीच लाख लोकवस्तीच्या चिमुकल्या समाजात अशा ७० पेक्षा अधिक संस्था उत्कृष्ट रीतीने चाललेल्या आहेत, हे ऐकले म्हणजे कोणासही मोठा विस्मय वाटल्याखेरीज राहावयाचा नाही.

परंतु सरकारी मदत न घेता गोवेकरांनी आपल्या संघटनेच्या जोरावर आपल्या मुलांमुलींना मराठी शिक्षण देण्याबद्दल जो भगीरथ प्रयत्न चालविलेला आहे, त्याचा व्याप पाहिला म्हणजे तर मन थक्कच होऊन जाते. मोठ्या शहरातूनच नव्हे तर लहानसहान खेड्यांतूनही मराठी शिक्षणाच्या शाळा खाजगी प्रयत्नानी चाललेल्या असून त्यातील शिक्षण वरच्या दर्जाचे असते. सर्व गोमन्तकात मिळून अशा शाळा दोनशेच्या वर तरी खास चालू असतील. या मराठी शाळांतून सुमारे ८००० मुले-मुली शिक्षण घेत असून त्याप्रीत्यर्थ गोमन्तकीय समाज दरसाल पन्नास हजाराच्या वर रक्कम खर्च करितो ! पुस्तकखरेदी वगैरे-करिता खर्च होणारा पालकांचा पैसा निराळाच ! हे आकडे सांगितल्यानंतर गोवेकरांच्या या शैक्षणिक उद्योगाची अधिक प्रशंसा करण्याचे कारणच राहत नाही.

एखादे सरकार आपल्या सत्तेच्या जोरावरही करू शकणार नाही, इतकी संघटना या शिक्षणसंस्थांमध्ये गोवेकरांनी घडवून आणली आहे, ही गोष्टही अत्यंत अभिनंदनीय व म्हणूनच मुद्दाम सांगण्याजोगी आहे. ' गोमन्तकीय मराठी शिक्षण संमेलन ' नावाची एक संस्था गोवेकरांनी स्थापन केली असून तिच्या द्वारा सर्व मराठी शाळांमध्ये शिक्षण, अभ्यासक्रम, परीक्षा इत्यादी बाबतीत एकसूत्रीपणा स्थापन करण्याचा प्रयत्न चालविला आहे. या संमेलनाने पहिल्या चारी इयत्ताकरिता तपशीलवार अभ्यासक्रम आखला आहे, सर्वत्र एका दर्जाच्या परीक्षा घेण्याचा उपक्रम सुरू केला आहे, परीक्षकांची नावे मुक्रर केली आहेत व याच्याही पुढे पाऊल टाकून अध्यापकांकरिता वर्गही सुरू केला आहे. पुढेमागे या वर्गाचीच परिणती ट्रेनिंग कॉलेज ( अध्यापक शाळा ) मध्ये होईल अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. या संमेलनाची वार्षिक अधिवेशने निरनिराळ्या

ठिकाणी भरविण्यात येत असून तेथे शैक्षणिक प्रश्नाची चर्चा करण्यात येते व नवीन कार्यांचा उपक्रमही जरूरीप्रमाणे करण्यात येतो.

आपल्या मानलेल्या मातृभाषेसाठी इतक्या प्रचंड प्रमाणावर त्याग करणारा व वर्षानुवर्षे एकसारखे इतके चिकाटीचे प्रयत्न करणारा समाज दुसरीकडे दाखवून देणे कठीण जाईल. हे सर्व प्रयत्न स्वतःच्या स्फूर्तीने स्वयंभू उत्साहाने व मोठ्या आनंदाने केले जात आहेत. परंतु बाहेरच्या महाराष्ट्रीयास या प्रयत्नाची दादही नाही. मग त्या प्रयत्नाचे मार्ग समजून घेऊन त्यांचा पुरस्कार करण्याचे व त्यास सक्रीय सहानुभूती दर्शविण्याचे तर दूरच राहिले. 'मला काय त्याचे?' ही वृत्ती आम्हा महाराष्ट्रीयांच्या कशी हाडीमासी खिळली आहे याचे हे एक प्रत्यंतर होय.

— ५ —

मराठीप्रीत्यर्थ चाललेल्या या सर्व प्रयत्नांचे ध्येय काय ? यांची परिणती कशात होणार ? या प्रश्नाचा विचार केल्याशिवाय प्रस्तुत विषयाची पूर्तता होऊ शकत नाही. गोमन्तक हा महाराष्ट्राचाच एक अविभाज्य अंश होय या दृढ भावनेनेच हे सर्व प्रयत्न केले जात आहेत, हे उघड आहे. ही भावना महाराष्ट्राला अत्यंत गौरवास्पद आहे. त्याचप्रमाणे मराठी भाषेच्या शिक्षणामुळे व सार्वत्रिक प्रचारामुळे पुस्तकविक्री, वृत्तपत्रांची गिऱ्हाइकी, मराठी शिक्षकास नोकऱ्या वगैरे अनेक नात्यांनी महाराष्ट्रास थोडाबहुत प्रत्यक्ष लाभही गोवेकरांकडून होतो. याच्या मोबदल्यात गोमन्तकास महाराष्ट्राकडून काय मिळते याचा शोध केल्यास राष्ट्रीयत्वाच्या भावनेचे पोषण व गोमन्तकाच्या वैचारिक प्रगतीस साहाय्य, या दोन अमूर्त लाभाखेरीज दुसरे काही आढळात येत नाही.

बरे, गोमन्तक हा महाराष्ट्राचाच एक अविभाज्य घटक आहे, ही गोष्ट तरी निर्विवाद व सर्व गोमन्तकीयांस मान्य अशी आहे काय ? याचे उत्तर 'नाही' असे आहे. गोव्यातील सख्येने अर्धा जो ख्रिस्ती समाज तो स्वतःस महाराष्ट्रीय मानण्यास तर तयार नाहीच, परंतु खुद्द गोवेकर हिंदूमध्येच असे कित्येक लोक आहेत की ते गोव्यास महाराष्ट्राचा अंश म्हणून कबूल करण्यास कदापी तयार होणार नाहीत.

अशा स्थितीत गोव्यातील या मराठी प्रचाराचे ध्येय काय, त्याच्या प्रगतीची सीमा कोणती, हा प्रश्न अधिकच महत्त्वाचा ठरतो. या प्रश्नास दो

बाजू आहेत. एका बाजूने मराठीचा पोर्तुगीज भाषेशी संबंध येतो. तर दुसऱ्या बाजूने तिचा कोंकणीशी संबंध येतो. हिंदू जनतेपुरती मराठी ही व्यवहारभाषा आजही बऱ्याच अंशाने आहेच. परन्तु तीच सर्व गोव्याची व्यवहारभाषा व राजभाषा होऊ शकेल काय ? म्हणजे सध्याचे पोर्तुगीज भाषेचे स्थान ती प्राप्त करून घेऊ शकेल काय ? हा पहिला महत्त्वाचा प्रश्न होय. सध्या मराठी भाषेचा जो प्रचार गोवेकरांनी चालविलेला आहे त्याच्या बुडाशी हा उद्देश आहे, असे दिसत नाही. तथापी, केवळ तिऱ्हाईत दृष्टीने म्हणावयाचे झाल्यास सध्याच्या चळवळीचा विकास पुढे मागे अशा रोखाने होणे अशक्यच आहे, असेही वाटत नाही. यासाठी भाषेच्या प्रचाराच्या अगोदर सांस्कृतिक प्रचार पुष्कळसा करावा लागेल. गोवेकर ख्रिस्ती लोकांना, तुमची संस्कृती पोर्तुगीज नसून तुम्ही भारतीय संस्कृतीचेच वारस आहात, हे पटवून देऊन त्यांच्यात भारतीय साहित्य, कला, संगीत व इतर संस्कृतिबीजे यांचा प्रसार करावा लागेल. असे झाले म्हणजे मराठी भाषा ही त्यांना आपोआप स्वीकारणीय वाटू लागेल व धर्मभिन्नतेखेरीज हिंदूत व त्यांच्यात फरक राहणार नाही. महाराष्ट्रातील ख्रिस्ती समाजाला अशा तऱ्हेचे वळण मिळत चालले आहे हे आपण पाहतोच. ही गोष्ट जर का घडून आली तर राज्यव्यवहाराची भाषादेखील मराठी होण्याचा मार्ग सुलभ होईल.

गोव्यातील हिंदू समाजाचे सामर्थ्य वाढले, त्यांच्यातील शिक्षण, संघटना व एकोपा वाढला म्हणजे या गोष्टी घडून येणे सुकर होईल. हिंदु समाजाने बलवान व संघटित होऊन ख्रिस्ती समाजाला स्वसंस्कृतीची महती, सहकार्य व सेवा यांच्या द्वारे पटवून देण्याचा उपक्रम केला तर तो सिद्धीस जाणार नाही असे मानण्यास काही कारणे दिसत नाहीत.

या प्रश्नाची दुसरी बाजू कोंकणीशी संबद्ध आहे. गोव्यातील मराठीचा प्रचार एका बाजूने पोर्तुगीज भाषेशी घासतो तर दुसऱ्या बाजूने तो कोंकणीवर दडपण घालतो. निदान काही लोक असे म्हणतात—त्यांची अशी तक्रार आहे—यात शंका नाही. या प्रश्नाचा सांगोपांग विचार या लेखाच्या मर्यादेत करणे शक्य नाही, तथापी त्याचे त्रोटक दिग्दर्शन येथे केलेच पाहिजे. एका लहानशा पण जोरकस पक्षाचे म्हणणे असे आहे, की गोमन्तक हा महाराष्ट्राचा एक भाग आहे हे म्हणणे बरोबर नसून तो एक स्वतंत्र प्रांत आहे व त्याची भाषा कोंकणी आहे; कोंकणी ही एक स्वतंत्र भाषा असून गोवेकरांनी मराठीचा त्याग करून

कोकणीमध्येच लेखन, भाषण व आपल्या मुलाचे शिक्षण केले पाहिजे. श्री. वामनराव रघुनाथ वर्दे, वालावलीकर उर्फ शणै गोंयबाब, हे या पक्षाचे अध्वर्यु असून त्यांनी आपल्या मतांचा प्रचार जोमाने व पोटतिडकेने चालविलेला आहे. श्री. वर्दे हे पट्टीचे इतिहाससंशोधक व भाषाशास्त्री असून त्यांची विद्वत्ता व व्यासंग गाढा आहे. त्यांची लेखणी तल्लख असून प्रतिपादनात आवेश व तडफ मूर्तिमत भरलेली असते. अशा गृहस्थांचे मत उपेक्षणीय खास नसणार हे उघड आहे.

कोकणी ही एक स्वतंत्र भाषा आहे की मराठीतच सामावणारी ती प्रादेशिक बोली ( dialect ) आहे या मुद्द्यावर भाषाशास्त्राच्या दृष्टीने निर्णयात्मक असे फारसे सांगता येण्याजोगे नाही. वर्णप्रक्रिया, रूपप्रक्रिया, वाक्यप्रक्रिया, इत्यादी बाबतीत दोघींत काय साम्य व भेद आहे हे भाषाशास्त्र दाखवून देईल. परंतु हे भेद जमेस धरूनही परस्परांशी बऱ्याच सदृश असलेल्या दोन भाषांपैकी एकीला दुसरीची उपभाषा ( dialect ) मानावयाचे की स्वतंत्र मानावयाचे याचा निर्णय तारतम्यानेच करावा लागेल. त्यासाठी भाषाशास्त्रात सर्वमान्य व निश्चित असे माप किंवा कसोटी उपलब्ध नाही. आजपर्यंतचे पट्टीचे भाषाशास्त्री भांडारकर, ग्रीयर्सन व गुणे हे सर्वजण तिला मराठीचीच बोली मानीत आले आहेत. श्री. वालावलीकर अर्थात् तसे मानीत नाहीत. साधारणपणे एखाद्या बोलीला वाङ्मयरूप प्राप्त होऊन तिजमध्ये म्हणण्यासारखे लिखित वाङ्मय निर्माण झाले आहे की नाही, हीच कसोटी 'बोली की भाषा' या प्रश्नाचा निकाल करताना भाषाशास्त्रातही लावण्यात येते. ती लावली असता कोकणी ही स्वतंत्र भाषा ठरेल असे वाटत नाही. कोकणीमध्ये लिखित वाङ्मय नाही, असे म्हणतात. खुद्द गोव्यातील पूर्वीपासूनची परंपरा अशीच आहे की तेथे मराठी हीच व्यवहारभाषा म्हणून शिकविली जाते. सर्व लोक पिढ्यानुपिढ्या तीच वापरीत आले असून तिचाच वाङ्मयात्मक व्यासंग ते करितात. वालावलीकरासारखे अत्यंत विरळ अपवाद सोडून बाकी एकजात सर्व गोवेकरांनी आपले लेखन मराठीतच करून तिला समृद्ध करण्यात धन्यता मानली आहे.

कोकणी हीच शिक्षणाची भाषा म्हणून गोवेकरांनी स्वीकारली तर एक प्रश्न मात्र चटकन सुटेल. हिंदू व खिस्ती या दोघांची बोधभाषा एकच होऊन सबंध गोमन्तकीय समाजाचे ऐक्य सुकर होईल. मात्र त्या पक्षी बाहेरच्या महाराष्ट्राहून गोमन्तक हा तुटून निराळा पडेल. खिस्ती बांधवांशी कोकणीच्या द्वारे ऐक्य

साधावयाचे की मराठीच्या द्वारे बाहेरच्या महाराष्ट्राशी संबंध राखावयाचा, असा हा गोव्यातील हिंदू जनतेपुढे पेच आहे.

कालच्या ओघाकडे लक्ष दिल्यास हा पेच कशा रीतीने सोडवावा याची सूचना गोमन्तकीय बांधवास मिळू शकेल. आजच्या हिन्दी भाषेच्या भारतव्यापी प्रचाराकडे लक्ष दिले तर पूर्वकाली स्वतंत्र म्हणून वावरलेल्या व वाङ्मयनिर्मितीच्या दर्जास प्राप्त झालेल्या अनेक भाषाही हिंदीच्या पंखाखाली स्वतःचे निराळेपण विसरत चालल्या आहेत असे दिसून येते. ग्रीयर्सन राजस्थानी, बिहारी, पूर्व हिंदी, इत्यादिकांना स्वतंत्र भाषा मानतो. परंतु राजस्थानी जनता व विशेषेकरून अखिल हिंदुस्थानात पसरलेला मारवाडी समाज हिंदीचा पूर्णतया स्वीकार करून बसला आहे, इतकेच नव्हे तर हिंदीप्रसारासाठी कायावाचामनाने खपत आहे. बिहारी लोकही हिंदी हीच आपली भाषा म्हणून सांगतात. आपापल्या जन्मभाषांना ते प्रादेशिक बोलीपेक्षा जास्त महत्त्वाच्या गणू चाहत नाहीत. राष्ट्रीयत्वाची भावना, विविध तऱ्हेचे शास्त्रीय ज्ञान व आधुनिक जागतिक विचार, एका समृद्ध वाङ्मयाचा आस्वाद घेण्याचा आनंद, ग्रंथकार या नात्याने व्यापक प्रसिद्धी मिळविण्याची शक्यता, इत्यादी गोष्टी मराठीचा आसरा सोडल्याने कितपत प्राप्त होण्याजोग्या आहेत, हे चतुर गोमन्तकीयांस दुसऱ्या कोणी सांगावयास पाहिजे असे नाही.

कोणाही महाराष्ट्रीयास गोमन्तकीयांनी मराठीचा स्वीकार करणे हेच इष्ट व स्वाभाविक असे अर्थात वाटेल. परंतु या प्रश्नाचा निकाल खुद्द गोमन्तकीयांनाच करावयाचा आहे. प्रस्तुत लेखकास स्वतःच्या अनुभवावरून तर असे वाटते की मूठभर व्यक्तींखेरीजकरून सर्व गोवेकर हिंदू समाज "या प्रश्नाचा निकाल आम्ही मराठीच्या बाजूने केव्हाच केला आहे." असे उत्साहाने सांगत उठेल. त्यांची कृतीही अर्थात तेच सांगत आहे. मराठी शिक्षणाबाबत त्यांनी केलेली अपूर्व संघटना व प्रचंड त्याग पुरावा या बाबतीत निर्णायक आहे.

या प्रश्नाचा निकाल जर मराठीच्या बाजूने लागला आहे, तर कोंकणीची अवस्था यापुढे काय होणार ? कोंकणी ही गोमन्तकीय समाज व आजूबाजूची जनता यांची घरगुती बोली जशी आज आहे तशी पुढेही राहील. मराठीचा प्रभाव अधिकाधिक पडून ती पुढेमागे बोलण्यातूनही नष्ट होईल की काय ? असा प्रश्न कोणी उपस्थित केल्यास त्याचे उत्तर देणे सोपे नाही. अशा अनेक बोली पूर्वी

नष्ट झाल्या आहेत; त्याचप्रमाणे कित्येक शेकडो वर्षे तग धरूनही राहिल्या आहेत. इतिहासाची साक्ष दोन्ही बाजूस आहे. बोलण्यातूनही कोकणी नष्ट व्हावी, अशी इच्छा कोणीही महाराष्ट्रीय करणार नाही. उलट मराठीचा समजस अभिमानी असेच इच्छील की कोकणीतील विशिष्ट अर्थपूर्ण शब्द व उपयुक्त वाक्प्रचार मराठीत समाविष्ट होऊन मराठीस अधिक व्यापक व सग्राहक स्वरूप यावे.

असो. इतका विस्तार करूनही गोमन्तकातील जागृतीचे एकच अग विवेचिता आले. गोमन्तकीयाचे कलाप्रेम, त्याची वाङ्मयनिर्मितीची हौस, त्यांची उज्ज्वल प्रतिभाशालिता, इतिहाससशोधनात त्यानी मिळविलेले स्पृहणीय यश, इत्यादी गोष्टींचा नुसता उल्लेख करूनच समाधान मानले पाहिजे. श्री. विनायक स. सुखटणकर, श्री. लक्ष्मणराव व जयवतराव सरदेसाई इत्यादी अभिजात कथा-लेखक, श्री. वर्दे वालावलीकर, पिसुर्लेकर प्रभृती श्रेष्ठ दर्जाचे सशोधक, श्री. शाबाराव सरदेसाई यांजसारखे विचारवत विवेचक, श्री. दत्तोपत पै यासारखे राजकीय लेखक व वक्ते, श्री. प्रियोळकर याजसारखे वाङ्मयाभ्यासी, गोमन्तकीय ब्राम्हण समाजामधून उदयास आले आहेत, हे लक्षात घेतले असता, मराठी वाङ्मय गोमन्तकीयाचे केवढे मोठे ऋण लागत आहे, हे सहज लक्षात येईल.

ह्या ऋणाची भरपाई आणि मराठी भाषेकरिता ते करीत असलेल्या त्यागाचे चीज करणे तर आज आमच्या हाती नाही. परतु त्याबद्दलची जाणीव व्यक्त करून कृतज्ञतेचे, अभिमानाचे, शाबासकीचे, धन्यवादाचे चार शब्द उच्चारून दाखविणे व मनातला प्रेमभाव द्विगुणित करणे हे तरी आमच्या हाती आहेना? ते आमचे व आम्ही त्यांचे केव्हा होऊ, हे कोणासच सागता येत नाही. सध्या त्याच्या—आमच्या मध्ये सत्ताभेदाची मोठी थोरली दरी उभी आहे. बाह्य परिस्थिती कशीही असली तरी आपली अतःकरणे एक आहेत, हे जितक्या परीनी ते पटवून देतात तितक्या परीनी त्याची खूण त्यांना पटविणे हे आमच्या हातून होत नाही. ते आमच्या हातून होऊ लागावे व अखिल महा-राष्ट्राने गोमन्तकीयास ‘तुमच्या संपत्काळी व आपत्काळी आम्ही तुमचे पाठीराखे आहो’ हे शब्दांनी व कृतींनी जाणवावे, इतकाच प्रस्तुत लेखकाचा हेतू आहे.

[ प्रस्तुत लेख, गोमन्तकीय लेखकानी गोमन्तकाविषयी जे लेख व ग्रंथ लिहिले आहेत, त्याच्या आधाराने लिहिलेला आहे. त्यात अर्थात स्वानुभवाचा व गोमन्तकीय

मित्रांकरवी मिळालेल्या माहितीची भर घातली आहेच. तथापी या लेखातील वस्तुस्थितीच्या कोणत्याही वर्णनास लिखित आधार देता येतील, असे वाटते विद्यार्थ्यांचे व शाळांचे आकडे मात्र लेखांच्या आधारानेच परंतु अंदाजाने दिले आहेत ज्या लेखांचा व पुस्तकाचा लेख लिहिताना उपयोग झाला त्यांचा नामनिर्देश करणे इष्ट वाटते

## पुस्तके

१. **गोमन्तक परिचय**–लेखक प्रो बाळकृष्ण वामन सावर्डेकर हे २४० पानांचे २ रु. किमतीचे पुस्तक गोमन्तकाविषयी माहिती करून घेऊ इच्छिणाऱ्याना अतीव उपयुक्त वाटेल भौगोलिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, सर्वच अंगाची साधार माहिती यात आहे.

२ महाराष्ट्र सांवत्सरिक १९३३–पृ ११३–१५१ **गोमन्तक**–लेखक प्रो. दत्तात्रेय व्यंकटेश पै. हाही लेख असाच उपयुक्त व मार्मिक आहे

३. **गोमन्तकाची राज्यव्यवस्था**– लेखक द व्य पै.

४. **दत्तात्रेय व्यंकटेश पै यांची निवडक भाषणे**– रहस्यभेदी व स्पष्टोक्तीपूर्ण उद्‌गार यात वाचावयास मिळतील.

५ गोवा हिंदू असोशिएशनच्या वार्षिक समेलनप्रसंगी **श्री. काशीनाथ दामोदर नायक** यानी केलेले अध्यक्षीय भाषण ( १३–१२–१९३६ ), हे गोमन्त-कीयांची आर्थिक स्थिती समजण्यास फार उपयुक्त आहे.

६. गोमन्तकीय मराठा शिक्षण समेलन, अधिवेशन दुसरे, द. व्य. पै यांचे अध्यक्षीय भाषण ( २९–८–३६ ).

## लेख

**विविधज्ञानविस्तार :**

— एप्रिल–आगस्ट १९२४ – ' गोमन्तकस्थ व हिंदू रिपब्लिक ' – लेखक-श्री. अ का प्रियोळकर या लेखात, आंतोनियु द नोरोंज्य या खिस्ती विद्वानाने पोर्तुगीजांनी केलेल्या हिंदूच्या छळाची हकीकत देणारा एक ग्रंथ लिहिला, त्याचा सारांश दिला आहे

— जुलै–सप्टेंबर व आक्टोबर १९२६ -- ' कोंकणी व मराठी ' या विषयावर श्री वि रा. शिंदे, शणै गोंयबाब व रा. सा वि. पां चव्हाण या तिघांचा झालेला वादविवाद.

— आगस्ट व नोव्हेंबर १९२९ आणि जानेवारी १९३० — 'गोंयकारांची गोंयाभायली वसणूक, खंड १ लें' या श्री. वामनराव वर्दे वालावलीकर उर्फ शणै गोंयबाब यांच्या पुस्तकाचें श्री. अ. का. प्रियोळकर यांनी केलेले परीक्षण तीन हप्त्यांनी आले आहे.

— फेब्रु०-मार्च १९३० — 'महाराष्ट्र वालींचे बंड' — श्री. अ. का. प्रियोळकर यांनी कोंकणीचें मराठीविरुद्ध बंड व्यर्थ आहे असे प्रतिपादन केले आहे.

— एप्रिल-मे १९३० — 'वसणूकेचें परीक्षण' — श्री प्रियोळकर यांनी केलेल्या परीक्षणास शणै गोंयबाब यांचे उत्तर.

— जानेवारी १९३१ — 'गोमन्तक'—लेखक — श्री. शणै गोंयबाब. प्राचीन इतिहासाच्या संशोधनाच्या दृष्टीनें उपयुक्त. ]

♣ ♣ ♣

—'विहंगम', जून १९३७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ३७८९ दि
क्रमांक नों दि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# १३.

# सुखसाधनांचे समायोजन

मानवी प्रगती म्हणजे साधनांचे विकसन व बहूभवन. मानवी मनाला जे सुख होते ते इंद्रियांना त्याचे त्याचे खाद्य पुरविल्यामुळे. इंद्रियांची वासना ज्या ज्या पदार्थांवर जाते ते ते पदार्थ त्या त्या इंद्रियाला अधिकाधिक सुलभ करून देणे, तसे पदार्थ स्वेच्छेनुसार कृत्रिम रीतीने निर्माण करणे आणि अगोदरच असलेल्या पदार्थांची इंद्रियांना सुखदायक अशी जुळणी करणे, हेच आजवर संचित झालेल्या मानवी संस्कृतीचे सार म्हटले असता चालेल. म्हणजे असलेले पदार्थ मिळविण्याबरोबरच नको असलेले, म्हणजे इंद्रियांना दुःखदायक असे पदार्थ नष्ट करण्यासाठी किंवा दूर लोटण्यासाठीही मनुष्याची धडपड चाललेली असते. इंद्रियांची वासना ज्या पदार्थांवर जाते त्याला विषय म्हणतात. तेव्हा मानवी संस्कृतीचे विधिनिषेधात्मक दोन्ही रीतींनी वर्णन करावयाचे झाल्यास विषयविस्तार आणि अविषयसंकोच असे करता येईल.

प्रकाश हा डोळ्यांना सुखदायक, शरीराच्या सुखकारक हालचालीस साह्य करणारा आणि दुःखदायक हालचाली टाळण्यास मदत करणारा. म्हणून तो निसर्गाच्या व्यवस्थेनुसार जेव्हा व जेथे मिळत नाही तेव्हा व तेथेदेखील

मिळावा यासाठी मनुष्याने धडपड सुरू केली. निसर्गात दिसून येणाऱ्या आकस्मिक ज्वलनक्रियेपासून प्रकाश मिळतो हे पाहून तसे ज्वलन स्वतःच्या नियंत्रणात निर्माण करण्याची मानवाची धडपड सुरू झाली. या धडपडीतून ज्योतीचा दिवा निर्माण झाला. आभाळात चमकणारी वीज पाहून ती अद्भुत प्रभा भूमितलावर स्वतःच्या नियत्रणात कशी उतरविता येईल याविषयी प्रयत्न सुरु झाले. त्यातून विजेचा दिवा निर्माण झाला. हा इतिहास तर अगदी ताजा आहे. पण इतक्यातच या सुखसाधनांचा इतका विस्तार झाला आहे की ज्यांचे सर्व आयुष्य शहरात गेले आहे अशा आजच्या मुलाना तेलवातीच्या दिव्याची कल्पनाही असत नाही. जिभेचे सुख अथवा लौल्य पुरविण्यासाठी जमिनीची मशागत व जनावरांची जोपासना करून अधिकाधिक रोचक पदार्थ मानवाने निर्माण केले व त्यांची नाना प्रकारची मिश्रणे अग्नीच्या साह्याने अथवा कच्च्या स्वरूपात करून जिभेचे लळे पुरविले.

इद्रियाच्या विषयोपभोगातून कला निर्माण झाली. निसर्गातले काही विशिष्ट देखावे, काही विशिष्ट रेखा व रग आणि त्याची जुळणी डोळ्याना सुखदायक वाटते असे आढळून आल्यावर तसे देखावे, तशी रेखांची व रगाची जुळणी स्वप्रयत्नाने निर्माण करण्याचा यत्न सुरू झाला. यातून चित्रकला निर्माण झाली. शिल्पकलेच्या उद्भवाचाही प्रकार तसाच. मनुष्याच्या गळ्यातून निघणारे काही सूर, आघात व त्यांची जुळणी कानाना आल्हाददायक वाटते असे आढळून आल्यानतर तसे सूर, आघात व त्याची जुळणी कृत्रिम रीतीने निष्पादित करण्यासाठी प्रयत्न सुरू झाला. त्यातून तत ( तारांची ), घन ( घुमटा-कार, तबला वगैरे ) आणि सुषिर ( छिद्रयुक्त, अलगूज, बाजाची पेटी इ० ) अशी नाना प्रकारची वाद्ये निर्माण झाली. मानवी स्वरालापाचे अनुकरण करणे हे त्यांचे ध्येय.

इद्रियाचा सबंध मनाशी असतो. इद्रियाच्या विषयोपभोगामुळे जे सुख वा दुःख होते ते मनाला होते असे आपल्या तत्त्वज्ञानी मानिले आहे. सुखदुःखाची सवेदना मनाला विषयेंद्रियसंयोगापासून मिळू शकते; पण मनाचा व्याप तेवढ्यापुरताच मर्यादित नाही. स्मरण, मनन, कल्पन या केवळ स्वतःच्या व्यापारातही मनाला सुखानुभव येऊ शकतो. तसेच सुताने स्वर्गास जावे त्याप्रमाणे मन हे विषयेंद्रियसयोगाच्या स्थूल आधारावर स्वतःची भावनामय रचना करून

त्यातून आनंद निर्माण करू शकते. कलात्मक आनंद हा अशाच प्रकारचा आनंद होय. अमक्या गाण्याचे स्वर करुण आहेत, असे आपण म्हणतो, तेव्हा कारुण्य त्या स्वरालापात नसते. पूर्व संस्कारामुळे त्या स्वरालापाभोवती आपले मन जे भावनाजाल निर्माण करते त्यात कारुण्य असते. मनाला होणाऱ्या आनंदात इंद्रियसंयोगजन्य अंश जितका कमी तितका तो आनंद अधिक सूक्ष्म व अधिक उच्च दर्जाचा मानला जातो. मनुष्याच्या संस्कृतीचे उच्चनीचत्वही याच मापाने आजमावले जाते.

काव्यानंद, वाङ्मयानंद हा सर्व आनंदात श्रेष्ठ मानला जातो आणि वाङ्मयकला ही सर्व कलात शेखरीभूत मानली जाते याचे बीज हेच आहे. वाङ्मय हे शब्दनिष्ठ असते. आणि शब्द ही एक अशी अद्‌भुत व चमत्कारिक चीज आहे की तिला इंद्रियभोग्य विषयाचा आधार असूनदेखील तिचे स्वरूप मुख्यतया मानसिक आहे. शब्द हा उच्चाररूप असतो आणि उच्चार हा कर्णेंद्रियाचा विषय होय. पण तो उच्चार कानानी ग्रहण केल्यावर त्यापासून अर्थाचे जे उद्‌भवन होते ते सर्वस्वी मनाच्या व्यापारांमुळे होते. हे मनोव्यापार स्मरण, तर्क, भावना इत्यादी स्वरूपाचे फार गुतागुतीचे असतात. हा सगळा भाषाशास्त्राचा विषय असल्यामुळे त्याचा येथे विस्तार करणे योग्य होणार नाही. पण उच्चाररूप स्थूल केंद्राभोवती अर्थाचे जे सूक्ष्म वलय निर्माण होते ते अद्‌भुत मानसिक शक्तींमुळेच होते एवढेच येथे लक्षात ठेवणे बस आहे. म्हणूनच वाङ्मयातील पदलालित्यामुळे होणारा आनंद जर सोडला तर त्यापासून होणारा बाकीचा सर्व आनंद सूक्ष्म मानसिक वृत्तींच्या उल्लासविलासांमुळे होतो. या आनंदाला ब्रह्मानंदसहोदर म्हटले आहे ते यामुळेच.

मानवी प्रगती म्हणजे विषयाचा–सुखसाधनाचा–विस्तार आणि अविषयांचा–दुःखसाधनाचा–संकोच असे मागे सांगितले. या विस्तारसंकोचाची दोन विशिष्ट स्वरूपे फार महत्त्वाची आहेत. त्यांचा येथे उल्लेख अवश्य केला पाहिजे. एक स्थिरीकरण आणि दुसरे अंतरनिवारण. इंद्रियांचे जे विषय क्षणविनाशी असतात ते शास्त्रीय शोधानी निर्माण केलेल्या साधनाच्या योगाने टिकाऊ स्वरूपात स्थिर करून आपल्याला त्याचा वाटेल तेव्हा उपभोग घेता येईल अशी सोय करणे, म्हणजे स्थिरीकरण. मुखातून उच्चारलेल्या शब्दांना कायम टिकविण्याचे साधन जी लिपी ती या स्थिरीकरणाचे अत्यंत प्रमुख उदाहरण

होय. या साधनाने शेकडो, हजारो वर्षांपूर्वी निर्माण झालेले शब्द आज आपण वाचू शकतो. मुद्रणकला, फोनोग्राफ इ० शोध हे स्थिरीकरणाविषयी मानवाच्या चाललेल्या प्रयत्नाचेच मोठमोठाले विजय होत. सुखसाधनांच्या विस्ताराचे दुसरे अंग जे अंतरनिवारण त्याची उदाहरणे आगगाडी, विमान, तारायंत्र, ध्वनिक्षेपण इत्यादी होत हे सहज समजण्याजोगे आहे. हजारो मैलांवर उच्चारलेले शब्द व गाइलेले गायन माझ्या रेडियोवर मी तत्क्षणी ऐकू शकतो ही अंतरनिवारणाची अद्‌भुत किमया होय.

वर वर्णिलेले स्थिरीकरण हे देखील एकप्रकारचे अंतरनिवारण आहे असे म्हणता येईल. स्थिरीकरणाच्या साधनांच्या योगाने कालकृत अंतरनिवारण होते, आगगाडी, तारायंत्र, रेडियो इत्यादिकांच्या योगाने स्थलकृत अंतरनिवारण होते.

सुखसाधनाच्या होत असलेल्या वाढीमुळे निर्मळ सुख मिळते असे मात्र नाही. सुखसाधनाच्या अफाट विस्तारामुळे दोन प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात; एक वैयक्तिक व दुसरा सामाजिक. सामाजिक प्रश्न वितरणासंबंधीचा होय. आजपर्यंत तरी मानवजातीला असा अनुभव आला आहे की सुखसाधनाचे उत्पादन जरी अफाट प्रमाणात होत असले आणि सुखसाधनामध्ये जरी घोडदौडीने प्रगती होत असली तरी ही सुखसाधने सर्वांना समान प्रमाणात, किंवा ज्याच्या–त्याच्या इच्छेनुसार मिळतात असे नाही. कोणतेच वाहन जेव्हा निर्माण झाले नव्हते तेव्हा सर्वच लोक चालणारे असल्यामुळे माणसामाणसात फरक नव्हता. पुढे चाकाचा शोध लागून गाड्या किंवा रथ निर्माण झाले तेव्हा काही थोडेच लोक गाडीत बसणारे झाले व बाकीचे पादचारी राहिले. म्हणजे माणसामाणसांत वैषम्य निर्माण झाले. आजच्या सुधारणेच्या अवस्थेत एकजण विमानाने जातो तर दहाजण मोटार बाळगून असतात; या दहाजणाच्या पाठी शंभरजण पायचाकीवरून जाणारे तर हजारजण पायी चालणारे असतात. असे वैषम्य हे सर्वच सुखसाधनांच्या बाबतीत आढळून येते. काहींच्या पुढ्यात रोज तीन तीन तासांनी नानापरींची सुग्रास अन्ने नको म्हणेपर्यंत येऊन पडतात. तर काही लोक कोरड्या भाकरीलाही महाग झालेले असतात.

ही जी विषमता निर्माण होते ती कमी कशी करावी याचा गेली शेदीडशे वर्षे फार जोरात विचार चाललेला असून त्यावर उपाय सांगणारे तत्त्वज्ञांचे दोन

संप्रदाय मुख्यतया निर्माण झाले आहेत. एक संप्रदाय, ज्या सुखसाधनामुळे विषमता निर्माण होते त्या साधनाचा त्याग करा आणि नैसर्गिक राहणीचा स्वीकार करा असे प्रतिपादन करतो. रस्किन, टॉलस्टॉय, गांधी, विनोबा हे या पंथाचे प्रमुख आचार्य होत. हा संप्रदाय सामाजिक समतेच्या उद्दिष्टानी प्रेरित झाला असला तरी त्याबरोबरच त्याची बैठक बरीचशी आध्यात्मिक आहे. आणि ती भारतातल्या पुरातन आत्मवादी तत्त्वज्ञांच्या विचाराशी जुळती आहे.

विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥

असे म्हणणारी गीता, किंवा

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।

असे घोषित करणारा मनु, यांचा दृष्टिकोण टॉलस्टॉय किंवा रस्किन यांच्या विचारसरणीहून फारसा भिन्न नाही. गांधीजींच्या मध्ये तर या सर्वांचा प्रमाणशीर सुंदर मिलाफ झालेला आहे.

अध्यात्माच्या बैठकीवर वैषम्याचा सामाजिक प्रश्न सोडवू पाहणारा हा एक संप्रदाय; तर जडवादाच्या बैठकीवर समता प्रस्थापित करू पाहणारा मार्क्स प्रभृती साम्यवाद्यांचा दुसरा संप्रदाय होय. सुखसाधनांचे सक्तीने समान वितरण केले पाहिजे असे हा संप्रदाय म्हणतो. सुखसाधनांच्या विस्ताराला काही मर्यादा घालावी असे हा चुकूनसुद्धा म्हणत नाही.

या दोन पंथांचे ओझरते दिग्दर्शन करण्यापलीकडे येथे अधिक काही करण्याचा मानस नाही. त्या विषयाचे खूप मंथन सर्वत्र चालले आहे. सुखसाधनांच्या विस्तारामुळे जो वैयक्तिक प्रश्न उत्पन्न होतो त्याकडे विशेष रीतीने लक्ष वेधण्याचा प्रस्तुत लेखकाचा उद्देश आहे. कारण या संबंधात फारसा विचार होताना दिसत नाही. सुखसाधनांच्या उमाप वाढीमुळे त्या साधनाचा उपभोग घेणारी इंद्रियेच उपभोगाला अक्षम, दुबळी किंवा बोथट होऊन जातात, तेव्हा सुखसाधनांचा उपभोग कसा व कोणत्या रीतीने घ्यावा असा प्रश्न उत्पन्न होतो. याच प्रश्नाची दुसरी बाजू अशी की अनेक प्रकारची सुखसाधने जेव्हा एकाच प्रकारचा आनंद देण्यासाठी योजिली जातात, तेव्हा त्यांची परस्पर अतिव्याप्ती ही गोंधळ उत्पन्न करणारी, अतएव मानसिक आनंदाला विघातक ठरू लागते.

सुधारलेले आधुनिक जीवन इंद्रियावर चोहोकडून आदळणाऱ्या सुखसाधनांनी इतके पर्यांकुल झालेले आहे की त्यामुळे मानवी मनाची स्वस्थता आणि आनंदास्वादातली लज्जत नाहीशी होऊ लागली आहे. पैशाच्या जोरावर सगळी सुखसाधने ज्याला संपादन करता येतात अशा मूठभर नशीबवान माणसापुढेच केवळ नव्हे, तर मोठमोठ्या शहरातील सामान्य मनुष्यापुढे देखील आपल्या मनाचा ताजेपणा व संवेदनक्षमता कायम कशी टेवावी, हा प्रश्न उभा टाकतो. सिनेमा आहे, रेडिओ आहे, रहस्यकथा—कादंबऱ्या आहेत, पैसे लावून खेळण्याचे अड्डे आहेत, आणखी व्यसनाच्या सदरात जमा होणाऱ्या उत्तेजक गोष्टी आहेत. परवाचा गांधी जयंतीचा दिवस (२ आक्टो. १९५३) हा पुण्याच्या रेसेसचा दिवस होता. गांधी जयंतीच्या निमित्ताने जे जे कार्यक्रम झाले त्याना-त्याना श्रोत्यांची पातळाई फार जाणवत होती. आणि सगळी गर्दी कुणीकडे लोटत होती म्हणाल तर रेसग्राऊंडकडे (शर्यतीच्या मैदानाकडे). रेसच्या नादात पैसे मिळविण्याचा हेतू असतो; पण त्याच्याकडे लोक खेचले जातात ते त्याच्या तीव्र उन्मादकतेमुळे. सर्व उन्मादक व्यसनाचा गुण प्रसिद्धच आहे, की त्याच्यापासून जे सुख मिळायचे ते मिळण्यासाठी त्याचे प्रमाण एकसारखे वाढवीत न्यावे लागते. त्यामुळे मनुष्याची अंगे व इंद्रिये हतबल व बोथट होतात.

श्रीमंत शेटजी किंवा बड्या ऑफीसचे मॅनेजर घराच्या बाहेर पडले की त्यांचे पाऊल मोटारीतच पडते. ऑफीस वरच्या मजल्यावर असल तर चढण्यासाठी उत्तोलक उर्फ लिफ्ट आहेच. शेजारच्या खोलीतल्या मुनिमाशी बोलायचे असले तरी खुर्चीवरील आसन ढळविण्याची जरुरी नाही; टेबलावरील फोन कानाशी व तोंडाशी लावला की झाले. रोजच्या सगळ्या दिनचर्येत पायांचा उपयोग जवळजवळ शून्य! शरीराला वाहून नेण्याकरिता म्हणून जो अवयव निसर्गाने दिला त्याचा, सुखसाधनांच्या विपुलतेमुळे, उपयोग करण्याचा प्रसंग म्हणजे गोल्डस्मिथने म्हटल्याप्रमाणे अक्षरशः निळ्यापिवळ्या बिछान्यावरून जाण्यापुरताच. देहधर्माकरिता चार पावले अंगणात जाणे भाग पडावे, म्हटले तर तेही नाही! बंगल्याच्या प्रत्येक खोलीला 'बाथरूम अटॅच्ड' असायचीच! याचा परिणाम असा की साहेब (आणि बाईसाहेब) यांचे पाय दुबळे होऊन जातात. सांधेदुखी, स्नायूंची दुर्बलता, हृदयाची अशक्तता इत्यादी लक्षणे प्रकट होऊन शरीर भारभूत वाटू लागते. मग साहेब शहाणे असतील तर

पहाटे गावाबाहेर शुद्ध हवेत रपेट करण्यास जाऊ लागतात. म्हणजेच निसर्गाने दिलेल्या साधनांचा वापर करून त्याची क्षमता कायम राखणे त्याना भाग पडते. हे सुखसाधनांचे वैयक्तिक समायोजन होय.

भावना आणि मनोवृत्ती यांच्याशी ज्याचा विशेष संबंध नाही, अशा शरीरव्यापाराचा वर उल्लेख केला. पण स्थूल शारीर व्यापाराकडून सूक्ष्म मानसिक सृष्टीकडे लक्ष वळविल्यास तेथेही तृप्तिसाधनांच्या गर्दीमुळे असलीच आपत्ती ओढवताना दिसते. जिज्ञासा किंवा कुतूहल या मनोवृत्तीचे उदाहरण घेऊ. आपल्या भोवताली काय चालले आहे, आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्याची, आपल्या गावाची, देशाची काय हालहवाल आहे हे जाणण्याची इच्छा माणसाच्या मनात स्वभावतः असते. ती तृप्त करणाऱ्या साधनांचा भडिमार किती व्हावा, याला सध्याच्या सुधारलेल्या जीवनात काही सुमार राहिलेला नाही. पहाटे उठतो न उठतो इतक्यात दोन चार वर्तमानपत्रे घरात येऊन पडतात, त्यात कुठल्या तरी गल्लीत नवऱ्याने बायकोच्या थोबाडीत मारली इथपासून तो बर्म्यूडा बेटात आयसेनहॉवरने रशियाला कशी चपराक हाणली इथपर्यंत शेकडो बातम्या आणि त्यांचा काथ्याकूट यांचे अस्ताव्यस्त प्रदर्शन नजरेसमोर उभे ठाकते. दिवसातून अनेकवार बातम्या सांगण्यास रेडियो सज्ज आहेच. दुपारचे ३।४ वाजतात तो सध्याकाळची वृत्तपत्रे विकणाऱ्या पोरांच्या आरोळ्या कानावर आदळू लागतात. या सामग्रीतून लहानमोठ्या शेकडो बातम्या इतक्या त्वरेने आपल्या मेंदूवर आघात करीत असतात की त्याच्या दगलीने आपले मन गोंधळून जाते. आपल्याला महत्त्वाचे कोणचे, उपयुक्त कोणचे, सद्वृत्तींचे पोषण करणारे कोणचे व सद्वृत्तींना हानिकारक कोणचे याचा विवेक राखणे कठीण होते; आणि अखेर परिणाम असा होतो की आपली जिज्ञासा अथवा कुतूहलबुद्धी मरगळीस येते. रोगट पचनशक्तीच्या मनुष्याला ज्याप्रमाणे खमंग मसालेदार पदार्थाखेरीज काही रुचत नाही, त्याप्रमाणे चटकदार प्रक्षोभक किंवा पाचकळ हकीकती वाचण्याची चटक लागू लागते.

सकाळपासून सध्याकाळपर्यंत बातम्या वाचणाऱ्या व ऐकणाऱ्या आजकालच्या सुधारलेल्या मनुष्यास आपल्या शेजारच्या घरी कोणी आजारी किंवा अडचणीत असले तर त्याची दाद नसते, त्याला त्याच्याविषयी अनुकपा व

सहानुभूती तर राहोच; साधे कुतूहलही नसते, हा आधुनिक युगाचा खेदकारक दुर्विलास होय.

रसिकतेची व कलास्वादाची गोष्ट तशीच. संगीताची भरमार व्हावी ती किती ? रेडियो आहे, ग्रामोफोन आहे, सिनेमा आहे, जलसे आहेत; ही सर्व द्वारे एकसारखे गाणे ओकीत असतात. वाङ्मयाचेही तसेच. दैनिके आहेत, साप्ताहिके आहेत, मासिके आहेत, रहस्यकथा आहेत; या सगळ्यातले सकस कोणते, फोल्कट कोणते, मनोवृत्तींना पोषक कोणते व घातक कोणते, याचा विवेक करणार कसा व केव्हा ? सटरफटरातून दृष्टी पलीकडे जाऊन सत्त्वशील अक्षरवाङ्मयापर्यंत पोचेल तेव्हा !

ही धावपळ थाबणार कशी ? धावपळीतून इंद्रियांची संवेदनक्षमता, मनोवृत्तींचा तजेला आणि अभिरुचीचा चोखदळपणा कायम कसा राखायचा ? आगगाडीतून किंवा मोटारीतून अत्यंत वेगाने जाताना बाहेर सर्व सारवल्या-सारखे दिसते; एखादे दृश्य न्याहाळून त्याचे सौंदर्य नजरेत साठवण्याइतकी स्वस्थता कधीच लाभत नाही; तशी आज सुधारलेल्या मानवाची स्थिती झाली आहे. एका बैराग्याची अशी गोष्ट सांगतात की तंबाखू, चरस, माजूम इत्यादिकांचे अखंड सेवन करून त्याची जीभ अशी झाली होती की जणू सकलादीचा तुकडा. कोणच्याही पदार्थाने त्याला नशा येईनाशी झाली तेव्हा त्याने एक नागीण बाळगली; तिजकडून तो आपल्या जिभेला चाववून घेई तेव्हा कुठे त्याला थोडी नशा चढून बरे वाटे. इंद्रियोपभोगसाधनांच्या भरमसाट तारतम्यशून्य उपयोजनामुळे सुधारणाशिखरावर डौलाने मिरवणाऱ्या माणसांची स्थिती वरील बैराग्यासारखी होऊ घातली आहे की काय, असे वाटू लागते.

वाङ्मयाच्या प्रांतातली एक प्रवृत्ती लक्षात घेऊ. एक काळ असा होता की ज्या वेळी मनोरंजन, नवयुग, रत्नाकर यांच्यासारखी मासिके डौलाने चालत असत. आशय व शैली या दोन्ही दृष्टींनी वाचनीय असे पुष्कळ साहित्य त्यातून प्रसिद्ध होई. वार्तम्याची वाहक त्यावेळी बहुतांशी साप्ताहिके होती. केसरी, काळ इ. साप्ताहिकांमध्ये उच्च दर्जाचे लिखाण प्रसिद्ध होत असले तरी तें बहुतांशी राजकीय स्वरूपाचे किंवा तात्कालिक विषयास धरून लिहिलेले असे. दैनिकाचे प्रचलन फार थोडे. ही पूर्वीची गोष्ट झाली. यांत्रिक सुधारणांच्या घोडदौडीमुळे आता कशी स्थिती झाली आहे हे लक्षात घेणे मौजेचे आहे.

दैनिकाचे प्रचलन इतके वाढले आहे की त्यांनी मासिकांना जगणे तर कठीण करून सोडले आहेच, पण साप्ताहिकांनाही गिळून टाकले आहे. सर्व दैनिके आता विविध विषय विभाग किंवा 'मॅगझिन सेक्शन' आठवड्यातून एकदा प्रसिद्ध करतात, त्यात मासिके व साप्ताहिके यात येण्याजोगे लेख देतात. इतर वारीही सवडीनुसार असे लेख दैनिकात येतातच. त्यामुळे दोन्ही बाजूनी हानी कशी होत आहे हे पाहण्याजोगे आहे. दैनिकाचे लेख तयार करण्यास अवकाश अगदी थोडा, त्याचे स्वरूपही क्षणभगुर—त्यामुळे लेखकांकडून व्हावे तसे मनन होत नाही. वाचकांची वृत्तीही तशीच. घरघरीत, पागलेच्या मनःस्थितीत, पुष्कळशा सटरफटर मजकुराबरोबर काही चिरस्थायी लिखाणाचे वाचन व्हावयाचे. धड वाचले न वाचले अशा स्थितीत, त्या कागदाचा चोळामोळा किंवा फाडाफाड होऊन त्याची वासलात लागणार. या परिस्थितीत लेखकाचे लेखन-सामर्थ्य आणि वाचकाचे आस्वादनक्षमत्व वाढेल की घटेल, याचे अनुमान करावयास मोठा तर्कशास्त्री नको.

या एकदर परिस्थितीवर तोड काय ? निसर्गवादी तत्त्वज्ञांच्या उपदेशानुसार सुखसाधनाच्या बहूभवनाकडे पाठ फिरवून निर्भेळ नैसर्गिक जीवन जगावयाचे की काय ? आगगाडी, मोटार, तारायत्र, रेडियो, हे सर्व नको , इतकेच काय, छापायची, शिवण्याची, धुण्याची इत्यादि यंत्रेही नकोत; कपडा नको, चाकाचे वाहन नको, लिहिलेला मजकूरही नको—कारण हे सर्व माणसाच्या यांत्रिक प्रगतीतलेच टप्पे आहेत व त्यामुळे तेवढ्यापुरता निसर्ग माणसाला दुरावला आहे !

निर्भेळ निसर्गवादाची असली हाक लाखातून, कोटीतून एखाद्या तपस्वी साधूने ऐकली, तरी एकदर मानवजातीला ती ऐकणे परवडणार नाही. रस्किन, गांधी प्रभृतींचा अर्धामुर्धा निसर्गवादही प्रसार पावत आहे असे दिसत नाही. पण त्यातील मुख्य तत्त्व तरी मानवाच्या वृत्तीत रुजलेच पाहिजे. या तत्त्वाचा आविष्कार फार काळापूर्वी मनूने करून ठेवला आहे.

वशे कृत्वेन्द्रियग्रामं सयम्य च मनस्तथा ।<br>
सर्वान्ससाधयेदर्थानक्षिण्वन्योगतस्तनुम् ॥

"इन्द्रिये ताब्यात ठेवून आणि मनाचा सयम करून योगाने शरीरसामर्थ्य कायम राखून चारी पुरुषार्थांचे चांगल्या रीतीने साधन करावे." यात सयमाची

कल्पना महत्त्वाची आहे. संयम म्हणजे अजीबात प्रतिबंध नव्हे. आपले उद्दिष्ट साधण्यासाठी जरूर असेल त्या वृत्तींना जरूर असेल तेवढ्या प्रमाणात वाव देणे, म्हणजे संयम. उद्दिष्टामध्ये सर्व अर्थांना मनूने गोवले आहे. त्यात धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारी पुरुषार्थ येतात. पहिले तीन धर्म, अर्थ, काम म्हणजेच मनुष्याचे ऐहिक जीवन. हे उत्कृष्ट रीतीने सफल होण्याकरितादेखील संयमाची जरूरी आहे.

संयम, योग या शब्दांना अध्यात्माची झूत्र आहे. पण त्यामुळे बिचकण्याचे कारण नाही. आपण पाहिजे तर ‘ समायोजन ’ हा शब्द वापरू. इंग्रजीतील adjustment या शब्दास हा प्रतिशब्द बनविलेला आहे. पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या गोष्टींना नव्याने उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळेल व आपले उद्दिष्ट साधेल असे वळण देणे म्हणजे adjustment किंवा समायोजन. मानवाच्या मनोवृत्ती, भावना या सर्व पूर्वीच्याच आहेत. त्यात काही बदल झालेला नाही. मानवाला उपलब्ध असलला अवकाशही तितकाच आहे. मानवाचे उद्दिष्ट समाधान किंवा सुख हेच आहे; तेही बदललेले नाही. सुखाच्या जड साधनांचे मात्र एकसारखे बहूभवन चाललेले आहे. एकच परिमाण बदलते आहे व बाकीची स्थिर आहेत. तेव्हा हे त्रैराशिक अवघड वाटण्याचे कारण नाही. गरिबीत वाढलेल्या माणसाला श्रीमंती आली म्हणजे तो आपल्या घरात नाना प्रकारच्या मूल्यवान वस्तू आणून भरतो. परंतु सर्व गोष्टींची व्यवस्था लावणारे कोणी माणूस नसल्यास सर्वत्र अव्यवस्थितपणे मांडलेल्या पसाऱ्यानेच ते घर खायला उठते. योजकता असलेल्या चतुर गृहिणीचा हात सारखा फिरत असला की त्याच वस्तू त्याच जागेचे सौंदर्य वाढविण्यास कारणीभूत होतात. मानवी संस्कृतीची आज हीच अवस्था झाली आहे. समायोजनाच्या अभावी तिला बकाली बाजाराची कळा येऊ पाहात आहे. जसजसे समायोजन होईल तसतसे रेखीव व पद्धतशीर मांडणी केलेल्या बहुप्रयोजन भांडाराचे उर्फ ‘ मल्टिपरपझ स्टोअर’चे वांछनीय स्वरूप तिला प्राप्त होईल.

हे समायोजन दोन प्रकारचे व्हावे लागेल. एक सामाजिक आणि दुसरे वैयक्तिक. पहिल्याविषयी येथे विचार केलेला नाही हे मागे सांगितलेच आहे. दुसऱ्याविषयीच येथे काही विचार प्रदर्शित केले आहेत. बोलून चालून हे

प्रत्येक व्यक्तीपुरते समायोजन असल्यामुळे त्याचे स्वरूप व्यक्तिगणिक वेगवेगळे असणार. प्रश्न पुढे माडून त्याच्या सोडवणुकीसाठी सूक्ष्म विवेचन करण्यापलीकडे येथे काही करणे अशक्य. सुखसाधने ही सुखाचीच साधने; दुःखाची साधने तर खास नव्हेत. आपली जन्मजात प्रवृत्ती आणि आपल्याला प्राप्त झालेली परिस्थिती यास अनुसरून सुखसाधनांचे समायोजन करावे. इंद्रियांची संवेदनक्षमता आणि मनाची आस्वादक्षमता, भावनांचा सकसपणा आणि वृत्तींचा सोज्वळपणा कायम राहील अशा बेताने आणि पद्धतीने सुखसाधनांचा उपभोग घेणे म्हणजेच समायोजन किंवा सयम किंवा योग. याच्या आचरणाने खऱ्या समाधानाप्रत आपण जाऊ. ही जाणीव ठेवली म्हणजे 'योगस्थः कुरु कर्माणि' या गीतावचनाचादेखील काही एक अभिनव आणि हृद्य असा अर्थ मनात उतरू लागतो.

♣ ♣ ♣

—'युगवाणी', जानेवारी व फेब्रुवारी १९५४

१४.

# एकरूप होऊ सगळे

संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यामुळे मराठी जनतेची फार मोठी आकांक्षा सफल झाली, चिरवांछित स्वप्न साकार झाले. मराठी संस्कृती, मराठी परंपरा यांच्याविषयीचा अभिमान भरास आला आणि प्रगतीविषयीच्या आकांक्षा गगन ठेंगणे वाटेल इतक्या उंचावल्या.

केवळ भावनेच्या भरी न जाता वस्तुस्थिती पडताळून घेणे या घटकेस फार उपयोगी ठरेल. बेळगाव, कारवारसारखे असंमत रीतीने बाहेर घातलेले आणि डांग—उंबरगावसारखे राजीखुशीने दान केलेले काही थोडे प्रदेश वगळल्यास बाकीचा सर्व मराठीभाषी प्रदेश आज जसा एका शासनसत्तेखाली एकवटला आहे तशी स्थिती पूर्वी कधी नव्हती. आज सर्व मराठी जनतेचे एक राज्य झाले आहे. पूर्वी ही जनता भिन्न–भिन्न राज्यांमध्ये विभागलेली होती. मराठी भाषा व मराठी जनता इसवी सनाच्या सहाव्या शतकापासून बनत चालली होती असे मानले तर उत्तरेस राष्ट्रकूट, दक्षिणेस चालुक्य आणि पश्चिमेस व नैर्ऋत्येस काही लहान राज्ये अशी स्थूलमानाने प्राचीन काळातील राज्य-

सत्तेची विभागणी होती असे दिसते. नंतर यादवांचे साम्राज्य झाले. सगळा मराठी मुलूख कधी त्यांच्या सत्तेखाली आला असल्याचे दिसत नाही. त्यानंतर बहामनी साम्राज्य आले. त्याच्या अमलाखाली कोकणपट्टी व खानदेश बहुतकरून नसावा. बहामनी साम्राज्याची पाच मुसलमानी राज्ये झाली, त्यामुळे मराठी मुलखाची राजकीय दृष्ट्या आणखी शकले झाली. पुढे शिवाजी राजांनी स्वराज्य-स्थापना केली. पण खानदेश, वऱ्हाड, नागपूर हा मराठी मुलूख राज्यात अंतर्भूत होऊ शकला नाही. पेशवाईच्या काळात नागपूरकर भोसले, पेशवे आणि निजाम या तीन सत्तांमध्ये मराठी मुलुखाची तिफाळणी झालेली होती. तोच वारसा पुढे इंग्रजी सत्तेने घेतला. महाराष्ट्राची ही तिभगलेली स्थिती परवापर्यंत, म्हणजे सहा वर्षांपूर्वी राज्यपुनर्रचना होइपर्यंत, कायम होती.

मराठी प्रदेश अनेक राज्यसत्तांमध्ये याप्रमाणे विभागलेला राहिल्यामुळे अलगपणाची भावना जोपासली गेली. मराठी जनतेमध्ये ऐक्य भरपूर आहे. देव, दैवते, धार्मिक आचार, विचार, पेहेराव, भोजनपद्धती, सण—समारंभ, करमणुकी व समजुती सर्वत्र साधारणपणे सारख्या आहेत. स्थानपरत्वे आणि जातिपरत्वे भेद आहेत, ते परकेपणा वाटण्याइतके मोठे नाहीत. नागपूरचा मराठी माणूस कोल्हापुरास गेला तरी निराळ्या समाजात आलो असे वाटणार नाही. पण शेजारच्या हिंदीभाषी सद्‌गृहस्थाच्या घरी गेला तर अती अदबशीर भाषणापासून तो महिलांच्या अदर्शनापर्यंत अनेक गोष्टींत त्याला निराळेपण भासू लागते. मराठी प्रदेशात स्थानपरत्वे निरनिराळ्या बोली असल्या व त्या सगळ्या श्रवणीय, अभ्यसनीय असल्या, तरी संपूर्ण महाराष्ट्राची भाषा मराठी ही एकच आहे.

म्हणजे, सामाजिक व भाषिक ऐक्य आहे, पण भावनात्मक ऐक्य उणे पडते. राजकीय सत्तांच्या भिन्नतेमुळे अलगपणाच्या भावनेने मूळ धरले आणि ते दोनअडीचशे वर्षांच्या परंपरेने वाढीस लागले. हे भेदभावनेचे रोपटे कसे उपटायचे आणि ऐक्यभावनेचे रोपटे कसे वाढवायचे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर "महाराष्ट्राच्या निरनिराळ्या प्रादेशिक विभागामध्ये एकतेची भावना निर्माण करणे हा यानंतरचा आपला पहिला कार्यक्रम असला पाहिजे" अशा अर्थाचे उद्‌गार मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी काढले होते, ते या दृष्टीने अत्यंत अर्थगर्भ वाटतात.

ज्या भावनेला संस्कृतीत, समाजरचनेत, जीवनपद्धतीत आधार नाही, तिचे निर्मूलन कठीण वाटू नये. हा नागपुरी, हा वऱ्हाडी, हा पुणेरी, हा कोल्हापुरी, हा कोकणी, हा मराठवाडी, अशी भेदाची भाषा यापुढे कोणत्याही तोंडातून वा लेखणीतून न निघणे बरे. ' पुणेरी ' वृत्ती म्हणून जी समजली जाते ती वास्तविक पुण्यातल्या सर्व लोकांच्या ठायी असते असे नाही; आणि नागपुरात, कोल्हापुरात किंवा इतरत्रही तशी वृत्ती पुष्कळ आढळेल. वऱ्हाडी दिलदारपणा नाशकात किंवा साताऱ्यातही आढळेल, तर कोल्हापुरी रगेलपणा नागपुरात कमी प्रमाणात दिसेल असे नाही. तेव्हा गुणांचा किंवा अवगुणांचा प्रदेशाशी संबंध जोडून काही विधाने करण्याचे सर्वांनी कटाक्षाने टाळावे. विदर्भात आले की विदर्भाची स्तुती व पश्चिम महाराष्ट्राची निंदा, कोकणात बोलताना कोकण्यांचा गौरव आणि पुणे-साताऱ्याचा उद्धार, असे करण्याचा कित्येक वक्त्यांना मोह होतो. खरे पाहता दळणवळणाची जलद साधने, व्यापारउद्योग, राज्यकारभार इत्यादी कारणांमुळे लोकांचे चलनवलन व संघटन इतके वाढले आहे की माणसाचे प्रादेशिक वैशिष्ट्य म्हणून जे सांगितले जाते त्याला पूर्वीच्या स्थितिप्रधान काळात यदा-कदाचित काही अर्थ असला, तरी आता तो राहिलेला नाही. तेव्हा सर्व बाजूंनी सामंजस्य वाढविणे ज्या काळात सर्वांचे पवित्र कर्तव्य आहे, अशा या काळी भेदभावावर भर देणारी वस्तुतः निरर्थक अशी विधाने करण्यात काय अर्थ आहे ?

प्रादेशिक पक्तिप्रपंचाची ओरड अशीच भावनोद्दीपनास कारण होते. ज्या विशिष्ट लोकांवर किंवा वर्गावर अन्याय झाला असेल, किंवा ज्यांच्याकडे दुर्लक्ष होत असेल त्यांच्याकरिता दाद जरूर मागावी व रास्त मार्गाने चळवळही करावी. पण विदर्भावर अन्याय, मराठवाड्याविरुद्ध पक्तिप्रपंच असले उद्घोष करण्यात मतलब काय ? असल्या गोष्टीसंबंधात सरकारवरही पुष्कळ जबाबदारी येते हे इथे सांगणे जरूर आहे. प्रादेशिक भावना उद्दीपित करणाऱ्या अशा ज्या आरडाओरडी होतात, त्यांच्यासंबंधाने वस्तुस्थिती काय आहे, खरी गाऱ्हाणी कुणाची आहेत, ती दूर करण्यासंबंधाने सरकार काय करीत आहे, हे लोकांच्या प्रतिनिधींना विश्वासात घेऊन सरकारने ताबडतोब तपशीलवार सांगावे. याकरिता सुयोग्य अशी यंत्रणा जर सरकारजवळ तयार नसेल तर ती सरकारने निर्माण करावी. लोकांना खरी परिस्थिती माहित नसल्यामुळे अशा आरडाओरडी लोकांचे मन दूषित करू शकतात.

यापेक्षा अधिक महत्त्वाचा आणि आजवर अनेकांनी बोलून दाखविलेला विचार हा की विदर्भ (म्हणजे जुना मध्यप्रदेश) आणि मराठवाडा यांच्या कारभारात आणि राज्ययन्त्रणेत चांगल्या गोष्टी होत्या त्याचा स्वीकार महाराष्ट्र राज्य सरकारने त्वरित आणि बिनासकोच करावा. जुन्या मध्यप्रदेशाच्या राज्य-कारभारात कित्येक उदार, समजस व माणुसकीच्या प्रथा होत्या. विदर्भातील माध्यमिक शिक्षण अधिक पायाशुद्ध व पुढारलेले होते ही प्रस्तुत लेखकाच्या स्वानुभवाची गोष्ट आहे. कायदे, राज्यकारभार व शिक्षण याची एकरूपता सर्व महाराष्ट्र राज्यात शक्य तितक्या लवकर प्रस्थापित झाली पाहिजे. ही एकरूपता चागल्या गोष्टींचा सग्रह करून प्रस्थापित करावी, जुन्या मुबई राज्याच्या ठोकळे-बाज, जरड पद्धतीचा ओंडका सर्वांच्या माथ्यावर लादून नव्हे.

अशी एकरूपता प्रस्थापित झाली म्हणजे राज्याचे सध्याचे सभाग जसेच्या तसेच कायम राखण्याची तरी काय जरूरी आहे? जुन्या मध्यप्रदेशातून आलेल्या आठ जिल्ह्याचाच विदर्भ हा सभाग करणे किंवा निजाम राज्यातून आलेल्या पाच जिल्ह्यांचाच मराठवाडा या नावाचा सभाग करणे, या प्रकारामुळे प्रादेशिक भेदभावनेचे, नकळत का होईना, पोषण होते. पूर्वीची राजकीय भेदाची परपरा काही अंशाने कायम राखली जाते. त्यापेक्षा सहा—सहा जिल्ह्याचे पूर्व, मध्य, पश्चिम आणि दक्षिण या नावाने चार भाग करून उरलेल्या ठाणे जिल्ह्यासह मुबई शहराचा पाचवा सभाग करावा. १ नागपूर, चांदा, भडारा, वर्धा, यवतमाळ, नादेड; २ अमरावती, अकोला, बुलढाणा, परभणी, औरगाबाद, जळगाव; ३ धुळे, नाशिक, नगर, बीड, पुणे, कुलाबा, रत्नागिरी, कोल्हापूर, सागली, सातारा, सोलापूर, धाराशिव (उस्मानाबाद); ५ ठाणे, मुबई— याप्रमाणे हे सभाग कल्पिता येतील. संभागाची सख्या अगर जिल्ह्याची विभागणी यासबधाने आग्रह कोणताच नाही. मुख्य उद्देश वर सागितला आहे, तो साध्य होईल अशी कोणतीही व्यवस्था अमलात आली तर चालेल.

प्रादेशिक भेदभावनेप्रमाणे जातीय भेदभावनेच्या निर्मूलनाचे प्रयत्न जारी राखणे अवश्य आहे. या भेदभावनेचा सध्या बऱ्याच वेगाने ऱ्हास होत आहे, यात शका नाही. पण त्या वेगाला आणखी चालना देणे आणि चाललेले प्रयत्न अधिक पायाशुद्ध रीतीने करणे जरूर आहे. प्रादेशिक आणि जातीय भेदविषावर उतारा म्हणून आपल्यात होऊन गेलेल्या थोर विभूतींच्या विचारधनाचे सगोपन

करणे आणि त्यांचा जीवनसंदेश समाजमनात मुरविणे याचा उपयोग होईल. थोर पुरुषाच्या पुण्यतिथि आपण साजऱ्या करीत असतो पण त्यांची योजना वरील उद्देशाच्या पूर्तीच्या दृष्टीने कशी करता येईल याचा विचार आपण कितीसा केला आहे ? लो. टिळकांची पुण्यतिथि ब्राह्मणांनी साजरी करणे, महात्मा फुल्यांची माळी लोकांनी साजरी करणे, किंवा डॉ. आंबेडकरांची महारांनी साजरी करणे यात त्या विभूतींच्या महाराष्ट्रीयत्वाचा आणि भारतीयत्वाचा कितीसा गौरव होतो ? प्रस्तुत लेखकाला या तिघांच्या पुण्यतिथिसमारंभात पुष्कळदा बोलण्याचा प्रसंग येतो; तेव्हा समारंभाचे चालक व संघटक त्या त्या विभूतींच्या जातीचेच लोक बहुधा असतात असे दिसून येते. आमच्यासारख्यांना बाहेरचे पाहुणे म्हणून बोलावण्यात येते. पण 'घरची' मंडळी बहुधा त्या त्या जातीची असतात.

पण त्यात काय मौज आहे ? टिळकांनी उत्सव सुरू केला तो शिवाजी-महाराजांचा. रामदासांचा किंवा पहिल्या बाजीरावाचा नव्हे. ब्राह्मण मंडळी जर डॉ. आंबेडकरांचा उत्सव करण्यात पुढाकार घेतील आणि महार मंडळी जर टिळकांचा उत्सव स्वयंस्फूर्तीने करतील तर ते महाराष्ट्राच्या एकतेचे खरे प्रतीक होईल. मग हे सगळे ब्राह्मण अगर महार राहणार नाहीत, सर्वजण 'मराठे' होतील. तसे व्हावेत, व्हायला पाहिजेत.

म्हणून मी असे सुचवितो की, प्रत्येक मोठ्या गावी सर्वांचे मिळून एक उत्सवमंडळ असावे. त्याने सर्व जातींच्या ( व सर्व प्रादेशिक विभागातल्या ) विभूतींचे उत्सव साजरे करावे आणि त्यांच्या जीवनसंदेशाचा प्रसार करावा. महाराष्ट्रीयांच्या जीवनाचा उद्धार करणाऱ्या थोरांत थोर अशा पुढील व्यक्तींचा पुण्यतिथिउत्सव सर्वत्र अवश्य साजरा व्हावा.

१. ज्ञानेश्वर २. तुकाराम ३. शिवाजी महाराज ४. जमशेटजी नसरवानजी टाटा ५. महात्मा जोतिबा फुले ६. लोकमान्य टिळक ७. डॉ. आंबेडकर हे महाराष्ट्राचे सप्तर्षि होत.

साधारण मराठी वाचकास यांच्यापैकी चौथ्या क्रमांकाच्या व्यक्तीविषयी प्रश्न पडेल. बाकीच्या सहाजणांसंबंधाने इथे अधिक काही सांगण्याची जरूरी नाही. जमशेटजी टाटा हा महाराष्ट्रात किंबहुना अखिल भारतात औद्योगिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवणारा महान प्रतिभाशाली पुरुष होऊन गेला. त्याचे चरित्र अत्यंत

स्फूर्तिदायक आहे. महाराष्ट्राच्या एकरूपतेच्या आणि उत्कर्षाच्या दृष्टीने इतरांच्या-बरोबर या पुरुषाचे संस्मरण अवश्य होय.

आता जिल्हा परिषदा आल्या आहेत. त्यांनी गावोगाव उत्सव मंडळे निर्माण करून या सत्पर्षीचे पुण्यतिथिउत्सव साजरे करावे. हे उत्सव आटोपशीर, बक्तशीर आणि गांभीर्ययुक्त व्हावेत. प्रत्येक उत्सवात सर्व जातींचा, सर्व वर्गांचा समावेश व्हावा. त्यातून उद्योगाला, कर्तृत्वाला प्रोत्साहन मिळावे. मराठी जनतेच्या एकरूप प्रगतीचे प्रभावी साधन म्हणून यांचा उपयोग व्हावा.

या सत्पर्षीच्या जीवनातील तेजाचा, त्यागाचा, ऐक्याचा व समतेचा संदेश मराठी जनतेच्या अंतःकरणात कोरून बसविणे हे संयुक्त महाराष्ट्रासाठी बळी गेलेल्या हुतात्म्यांचे अतिउज्ज्वल स्मारक होईल. कारण त्यांचे बलिदान याच्या-करिताच झाले.

♣ ♣ ♣

—मुंबईच्या 'हुतात्मा स्मारक समिती 'ने प्रसिद्ध केलेला 'हुतात्मा गौरव ग्रंथ ', आक्टोबर १९६२.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३८५८ .. वि: ..
क्रमांक १४५० नों दि ..
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
53068
RFLBK-0013079